# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

(सत्र ३ पेपर १)

# भारतातील सामाजिक सुधारणा

**(Social Reforms in India)**

(सत्र ४ पेपर २)

# महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा

**(Social Reforms in Maharashtra)**

**बी. ए. भाग–२ आंतरविद्याशाखीय विषय** (IDS)

(शैक्षणिक वर्ष २०१९–२० पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२०
बी. ए. (भारतातील सामाजिक सुधारणा/महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा) भाग-२ इतिहास IDS पेपर १ व २ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर-४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89327-83-0

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) पी. आर. शेवाळे**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
I/c संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. एन. काशिद** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**अभ्यासमंडळ : इतिहास**

अध्यक्ष – **डॉ. अवनिश पाटील**
इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती एन. डी. पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. डी. बी. मासाळ**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. श्रीमती संघमित्रा व्ही. सरवदे**
  आण्णासाहेब डांगे कॉलेज, हातकणंगले,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. दिपक शंकरराव जाधव**
  लाल बहादूर शास्त्री कॉलेज, सातारा
- **डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**
  चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. एम. व्ही. जाधव**
  यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. निवासराव अधिकराव वरेकर**
  आदर्श महाविद्यालय, विटा, ता. खानापूर,
  जि. सांगली
- **डॉ. सुरेश मारूती चव्हाण**
  आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. राजश्री दिलीप निकम**
  कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु।।, शिवनगर,
  ता. कराड, जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मंजिरी कामत**
  इतिहास अधिविभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
- **डॉ. चंद्रकांत अभंग**
  सचिव, भारत इतिहास संशोधक मंडळ,
  इमिनंट स्कॉलर ऑफ मराठा हिस्ट्री.
- **डॉ. अरुण भोसले**
  निवृत्त प्राध्यापक, इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. भारतभुषण माळी**
  सचिव, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद
- **डॉ. अमर आडके**
  सल्लागार, किल्ले जतन आणि संवर्धन, कोल्हापूर

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने जून २०१४ पासून बी.ए.भाग-२ आंतरविद्याशाखीय (आय.डी.एस.) विषयासाठी 'भारतातील सामाजिक सुधारणा' व 'महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा' विषयाचा अभ्यासक्रम सत्रपद्धतीनुसार व सुधारित स्वरूपात लागू केला आहे. त्यानुसार दूरशिक्षण केंद्रामार्फत बहिःस्थ विद्यार्थ्यांसाठी या विषयाचा दोन्ही सत्राचा अभ्यासक्रम विचारात घेऊन सदरच्या पुस्तकातील स्वयं अध्ययन साहित्य अनुभवी प्राध्यापकांच्याकडून लेखन करून तयार करण्यात आले आहे. जून २०२० पासून या वर्गासाठी तयार केलेल्या 'भारतातील सामाजिक सुधारणा' व 'महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा' या पुस्तकांत विद्यार्थ्यांना समजेल अशा सोप्या भाषेत लिखाण करण्यांत आले आहे.

'भारतातील सामाजिक सुधारणा' या सेमिस्टर-३ साठीच्या अभ्यासक्रमात सामाजिक धार्मिक सुधारणा चळवळी, महात्मा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या घटकांचा समावेश करण्यात आला आहे. सत्र ४ साठी तयार केलेल्या 'महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा' या विषयाच्या अभ्यासक्रमात सामाजिक सुधारणांचा प्रारंभ, स्त्री सुधारक, समाज सुधारक, शैक्षणिक सुधारक इ. घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे. या पुस्तकाची विभागणी एकूण आठ घटकामध्ये केलेली आहे. सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांना हे पुस्तक मार्गदर्शक ठरेल असा आम्हास विश्वास आहे.

सदर पुस्तकाच्या लिखाणाचे काम शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विविध मान्यवर प्राध्यापकांनी पूर्ण केल्याबद्दल संपादक मंडळ त्यांचे आभारी आहे. या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठ आणि दूरशिक्षण विभागातील प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल संपादक मंडळ मनापासून आभार मानत आहे.

**■ संपादक ■**

**प्रा. डॉ. चंद्रकांत कुरणे**
इतिहास विभागप्रमुख,
गोपाळकृष्ण गोखले कॉलेज, कोल्हापूर

**प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे**
रयत शिक्षण संस्थेचे, श्री. आर. आर. पाटील
महाविद्यालय, सावळज, ता. तासगाव, जि. सांगली

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **सत्र–३ : पेपर–१ : भारतातील सामाजिक सुधारणा** | |
| **डॉ. मधुकर विठोबा जाधव**<br>यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी, ता. चंदगड, जि. कोल्हापूर | १ |
| **प्रा. डॉ. काशिलिंग रघुनाथ गावडे**<br>बाबा नाईक महाविद्यालय, कोकरूड | २ |
| **डॉ. अर्चना जाधव**<br>शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे कॉलेज, मिरज | ३ |
| **प्रा. डॉ. चंद्रकांत कुरणे**<br>गोपाळकृष्ण गोखले कॉलेज, कोल्हापूर | ४ |
| **सत्र–४ : पेपर–२ : महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा** | |
| **डॉ. स्वाती सरोदे**<br>वेणुताई चव्हाण कॉलेज, कराड, जि. सातारा | १ |
| **डॉ. वैशाली अभिजीत सारंग**<br>डी. डी. शिंदे सरकार महाविद्यालय, कोल्हापूर | २ |
| **डॉ. संघमित्रा विठ्ठलराव सरवदे**<br>मा. श्री. आण्णासाहेब डांगे कॉलेज, हातकणंगले, कोल्हापूर | ३ |
| **डॉ. मनोहर सुबराव कोळसकर**<br>टी. के. कोळेकर आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, नेसरी, ता. गडहिंग्लज | ४ |

### ■ संपादक ■

**प्रा. डॉ. चंद्रकांत कुरणे**
इतिहास विभागप्रमुख,
गोपाळकृष्ण गोखले कॉलेज, कोल्हापूर

**प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे**
रयत शिक्षण संस्थेचे, श्री. आर. आर. पाटील
महाविद्यालय, सावळज, ता. तासगाव, जि. सांगली

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–३ : पेपर–१** <br> **भारतातील सामाजिक सुधारणा** | |
| १. | सामाजिक – धार्मिक सुधारणा चळवळी | १ |
| २. | महात्मा फुले | २१ |
| ३. | राजर्षी छत्रपती शाहू महाराज | ४५ |
| ४. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१८९१–१९५६) | ७९ |
| | **सेमिस्टर–४ : पेपर–२** <br> **महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा** | |
| १. | सामाजिक सुधारणांचा प्रारंभ | १०१ |
| २. | स्त्री सुधारक | १२३ |
| ३. | समाज सुधारक | १४४ |
| ४. | शैक्षणिक सुधारक | १६७ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

---

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१९-२० पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक – १

# सामाजिक – धार्मिक सुधारणा चळवळी

**अनुक्रमणिका :**

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ राजा राममोहन रॉय व ब्राम्हो समाज

१.२.२ स्वामी दयानंद सरस्वती व आर्य समाज

१.२.३ स्वामीविवेकानंद व रामकृष्ण मिशन

१.३ सारांश

१.४ पारिभाषीक शब्द

१.५ स्वयं : अध्ययन प्रश्नाची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## १.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला पुढील उदिदष्ट्ये सांगता येतील.

१. राजा राममोहन रॉय यांच्या कार्याचे महत्व जाणून घेता येईल.

२. ब्राम्हो समाजाची विचारधारा समजुन घेता येईल.

३. स्वामी दयानंदसरस्वती यांची कामगिरी जाणून घेता येईल.

४. आर्य समाजाचे तत्त्वज्ञान सांगता येईल.

४. स्वामी विवेकानंद यांच्या कार्याचे महत्व समजुन घेता येईल.

५. रामकृष्ण मिशनची माहिती सांगता येईल.

## १.१ प्रास्ताविक :

एकोणिसाव्या शतकाची सुरूवात हा भारतीय नवविचारांचा आरंभबिंदू होय.एकोणिसाव्ये शतक हे भारताच्या सामाजिक व धार्मिक प्रबोधनाचे सुर्वणयुग मानले जाते.या शतकात भारतात सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळींची एक मोठी लाट निर्माण झाली होती.भारताच्या सामाजिक़ धार्मिक़ राजकीय व आर्थिक जीवनात महत्त्वपूर्ण बदल घडवून आणण्याचे कार्य या शतकाने केले. भारतामध्ये आधुनिक विचारप्रवाहाची सुरूवात एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीला झाली.पाश्चिमात्यांच्या संपर्कामुळे प्रबोधनाची सुरूवात होऊन बुध्दीवादी दृष्टीकोन भारतीय समाजात निर्माण झाला.त्यामुळे सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीला गती मिळाली. इंग्रजी शिक्षण घेतलेल्या भारतीय तरूणांना उदारमतवाद, बुध्दिप्रामाण्यवाद, व्यक्तिस्वातंज्य समानता या तत्वाचे ज्ञान मिळाले. आपल्या समाजातील अज्ञान, अंधश्रध्दा, कर्मकांड, जातीप्रथा, रूढी परंपरा, बालविवाह, बालहत्या, बहुपत्नीत्व, सतीप्रथा, केशवपन या सारख्या अनिष्ठ प्रथा परंपरांनी भारतीय समाज जीवनात थैमान घातले होते. धार्मिक जीवनामध्ये तंत्रमंत्र, जादुटोणा, उपवास-तापास, चेटूक, नवस, भूतपिशाच्चविद्या यांना महत्व प्राप्त झाले होते. या अनिष्ठ प्रथा, परंपरा दूर सारून भारतीय समाजाला मुळ धर्म तत्वाची ओळख करून देताना त्यांच्या मध्ये उदारमतवादी. भौतिकवाद. बुध्दीप्रामाण्यावादी विचाराच्या आधारे भारतीय समाजाला गतिमान बनविण्याची आवश्यकता समाज सुधारकांना वाटू लागली. या समाजसुधारकांनी विविध संस्था व संघटना स्थापन करून भारतीय समाजाला जागृत करण्याचे कार्य केले.एकोणिसाव्या शतकात भारतीय सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळीला वेग आला. यातुन खऱ्या अर्थाने भारतात सामाजिक धार्मिक व सांस्कृतिक प्रबोधनाला सुरूवात झाली. या समाज सुधारणा चळवळींमुळे भारतीय जीवनामध्ये आमूलाग्र परिवर्तन घडून नवचैतन्य निर्माण झाले. भारतात सामाजिक व धार्मिक सुधारणा कार्याचा आरंभ झाला. या मध्ये ब्राम्हो समाज, आर्य समाज व रामकृष्ण मिशन या सुधारणा चळवळींनी व संस्थांनी श्रेष्ठ कामगिरी केली.राजा राममोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती,.स्वामी विवेकानंद या समाज सुधारकांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

## १.२ विषय विवेचन :

### १.२.१ राजा राममोहन रॉय व ब्राम्हो समाज :

● **प्रास्ताविक :**

भारतामध्ये एकोणिसाव्या शतकात सामाजिक सुधारणा घडवून आणण्यामध्ये राजा राममोहन रॉय यांचा अग्रक्रम वरचा आहे.राजा राममोहन रॉय यांनी खऱ्या अर्थाने भारतीयांच्या प्रबोधनाची व प्रगतीची प्रक्रीया सुरू केली, अज्ञान, अंधश्रध्दा व कर्मकांड यांच्या प्राबल्यामुळे गलितगात्र झालेल्या भारतीय समजामध्ये नविन चेतना निर्माण करण्याचे महान कार्य राजा राममोहन रॉय यांनी केले. भारताच्या प्रबोधन कार्यात राजा राममोहन रॉय यांनी महत्वाची भूमिका बजावली. १९ व्या शतकात सुरू झालेल्या समाज सुधारणा चळवळीचे राजा राममोहन रॉय जनक होत. आधुनिक भारताच्या इतिहासात त्यांच्या कार्याला विशेष महत्त्व दिले जाते. भारतीय समजाला नवविचार देण्याचे व भारतीयांमध्ये विज्ञाननिष्ठा विकसित करण्याचे श्रेष्ठ कार्य राजा राममोहन रॉय यांनी केले.

राजा राममोहन रॉय हे आधुनिक भारताचे जनक व भारताच्या प्रबोधनाचे आद्य प्रवर्तक होत. भारतीयांना खऱ्या धर्माची ओळख करून देऊन समाजातील अनिष्ठ चालीरितीवर हल्ले करून त्यांचे निर्मूलन करण्याचे कार्य राजा राममोहन रॉय यांनी केले.त्यांनी सर्वांगिण प्रबोधनाची प्रक्रिया भारतात सुरू केली. राजा राममोहन रॉय यांनी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याविषयी राजकीय मतेही प्रखडपणे मांडली व त्यातुन भारतामध्ये राष्ट्रवादी विचाराची पेरणी झाली. इंग्रजी शिक्षणाचा पुरस्कार करून भारतीय समाजात आधुनिक विचार प्रवाह विकसित करण्याचे प्रयत्न केले. त्यामुळे भारतात नव्या युगाची पहाट झाली.त्यांनी दिलेल्या सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीच्या योगदानामुळे राजा राममोहन रॉय यांना आधुनिक भारताचे निर्माते म्हणतात.

● **जीवनचरित्र :**

राजा राममोहन रॉय यांचा जन्म २२ मे १७७२ मध्ये बंगलमधील हुगळी जिल्हयातील राधानगर या खेडयात एका सुखवस्तू सनातनी ब्राम्हण कुटूंबात झाला. राजा राममोहन रॉय यांनी वाराणसीत संस्कृत वाङ्‌मय व हिंदू तत्त्वज्ञान यांचा अभ्यास केला. पुढील काळात त्यांनी संस्कृत, इंग्रजी, हिब्रू, फ्रेंच, लॅटिन, ग्रीक, अरबी या भाषांचे ज्ञान आत्मसात केले. राजा राममोहन रॉय यांनी बौध्द व जैन आदि. धार्मिक पंथांचाही अभ्यास केला. त्यांनी पाश्चिमात्य संस्कृती व तत्वज्ञान यांचा सखोल अभ्यास केला. त्यामुळे राजा राममोहन रॉय यांना वेगवेगळ्या भाषांतून लिहिण्यात आलेल्या निरनिराळ्या धर्मग्रंथांचा अभ्यास करणे व त्यांचा तुलनात्मक अध्ययन करणे सोयीचे झाले.

राजा राममोहन रॉय यांना वेद व उपनिषदे यांचे तत्वज्ञान व्यवहारात आणण्याची गरज वाटू लागली. आपले मत भक्कमपणे समाजासमोर मांडण्यासाठी त्यांनी चार वेद व पाच उपनिषेद यांचे बंगाली भाषेत भाषांतर केले. त्याच्या प्रसारासाठी राजा राममोहन रॉय यांनी अनेक पत्रके व पुस्तके प्रकाशित केली. वयाच्या पंधराव्या वर्षी राजा राममोहन रॉय यांनी बंगाली भाषेतून लिहिलेल्या एका पुस्तिकेत मूर्तिपूजेवर अतिशय कडक टिका केली. मूर्तिपूजेला हिंदू धर्मग्रंथात कसलाही आधार नसल्याचे त्यांनी सिध्द करून दाखविले.

राजा राममोहन रॉय यांनी ईस्ट इंडिया कंपनीत इ. सन १८०५ मध्ये नोकरी स्विकारली. १८०९ मध्ये त्यांची शिरस्तेदार म्हणून नियुक्ती झाली. परंतु १८१४ मध्ये त्यांनी नोकरीचा त्याग केला व ते कलकत्ता येथे रहावयास गेले. तेथे ते युनिटेरियन पंथाच्या ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या सहवासात आले. यामुळे त्यांना ख्रिस्ती धर्माचे अध्ययन करण्याची संधी मिळाली.

राजा राममोहन रॉय यांनी आपल्या विचारांच्या प्रसारासाठी इ. सन. १८१५ साली 'आत्मिय सभा' व १८२२ मध्ये 'युनिटेरियन कमिटीची' या संस्थेची स्थापन केली. यातुनच पुढे राजा राममोहन रॉय यांनी ब्राम्हो समाज या समाज सुधारणा चळवळीची स्थापना केली.

राजा राममोहन रॉय १८३० मध्ये मुघल बादशहाचे वकील म्हणून इंग्लंडला गेले. इंग्लंडला जात असताना मुघल बादशहा दुसरा अकबर याने रॉय यांना 'राजा' हा किताब बहाल केला. त्यांच्या ज्ञानाचे इंग्लंडमधील विद्वानांनी मोठे स्वागत केले. भारतीयांना प्रशासनात समाविष्ठ करून घ्यावे असे त्यांचे मत होते. तसे विचार

ही त्यांनी प्रवर समितीपुढे व्यक्त केले होते. भारतीयांच्या आर्थिक शोषणाविरोधी त्यांनी आवाज उठविला. ब्रिटिश संसदेपुढे भारतीयांच्या समस्यांची उकल करण्याचा प्रयत्न करणारे राज राममोहन रॉय हे पहिले भारतीय होत. राजा राममोहन रॉय तेथे जवळ-जवळ तीन वर्षे राहिले. तेथेच त्यांचा ब्रिस्टॉल या शहरी २७ सप्टेंबर १८३३ रोजी मृत्यू झाला.

● **राजा राममोहन रॉय यांचे कार्य :**

भारतीय समाज अज्ञानामुळे अंधकारात चाचपडत होता. धर्माच्या नावावर सती प्रथा, बालविवाह, बालहत्या, नरबळी, जातीप्रथा आदि वाईट प्रथांच्या आहारी गेला होता. या अन्यायकारी रूढी, प्रथांविरोधी राजा राममोहन रॉय यांनी आवाज उठविला. स्त्रियांना समाजात मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी त्यांनी फार परीश्रम घेतले. बालविवाह, बालहत्या, बहुपत्नीत्व, केशवपन आदि. वाईट प्रथा परंपरेवर आवाज उठविला. स्त्रीयांना मान सन्मान मिळावा म्हणूण अहोरात्र कष्ट घेतले. त्यासाठी वारसाहक्काचा व पुर्नविवाहाचा आग्रह धरला व हे कसे आवश्यक आहे याचे महत्व सरकारला पटवून सांगितले. भारतीय समाजातील कर्मकांड, जातिभेद, मूर्तिपूजा ह्या वाईट प्रथा आहेत हीच गोष्ट भारतीयांच्या प्रगतीच्या आड येत आहे. जातीप्रथा संपल्याशिवाय समाज प्रगतशील होणार नाही असे त्यांचे मत होते. भारतीयांना खऱ्या धर्माची ओळख करून देण्यासाठी त्यांनी अनेक धर्म ग्रंथांची भाषांतरे केली व ती सामान्य लोकांपर्यत पोहचविण्याचा प्रयत्न केला. विविध धर्म व धर्मग्रंथ यांच्या ऐक्यावर त्यांचा विश्वास होता. नैतिकता, सदाचार, एकेश्वरवाद या तत्वावर त्यांनी भर दिला. राजा राममोहन रॉय एकेश्वरवदाचे पुरस्कर्ते असल्यामुळे त्यांनी हिंदू धर्मातील अनेकेश्ववादाला विरोध केला. मूर्तिपूजेला विरोध केला. भारतीय लोकांना राजकारणात समाविष्ठ करून घ्यावे म्हणुन सरकार दरबारी प्रयत्न केले.

राजा राममोहन रॉय यांचे शिक्षणक्षेत्रातील कार्यही अतिशय मोलाचे आहे. भारतीयांना इंग्रजी सत्तेमुळे ज्ञान आणि विज्ञानाची माहिती झाली असे त्यांचे मत होते. त्यामुळे राजा राममोहन रॉय इंग्रजी सत्तेला दैवी देणगी मानीत असत. इंग्रजी शिक्षण भारतीयांना द्यावे असा त्याचा प्रामाणिक आग्रह होता.त्यासाठी त्यांनी कलाकत्ता येथे हिंदू महाविद्यालयाची स्थापना केली. राजा राममोहन रॉय यांनी वाङःमयीन क्षेत्रामध्ये मोठे योगदान दिले आहे. यांनी सामाजिक विषयांवर अनेक निबंध लिहिले. उपनिषदांचे बंगाली भाषेत भाषांतर केले. राजा राममोहन रॉय यांनी समाज सुधारणा व धर्म सुधारणा यासाठी विपुल लिखाण केले. त्यांनी बंगाली भाषेत जे वाङःमय लिहिले म्हणुन त्यांना 'आधुनिक बंगाली गद्याचा जनक' म्हटले जाते. राजा राममोहन रॉय यांनी 'संवाद कौमुदी' हे पाक्षिक सुरू केले. त्यातुन त्यांनी समाजसुधारणेसाठी आपल्या विचाराचा प्रसार केला.

राजा राममोहन रॉय यांच्या मृत्यू नंतर देवेंद्रनाथ टागोर व केशवचंद्र सेन यांनी ब्राम्हो समाजास ऊर्जितावस्था आणली. परंतु या दोघांचे विचार भिन्न असल्यामुळे एकमेकांची मते जुळली नाहीत लवकरच ब्राम्हो समाजाचे विभाजन झाले. देवेंद्रनाथ टागोर यांनी इ.सन.१८४० मध्ये धार्मिक सत्याचा शोध घेण्यासाठी 'तत्वबोधिनी सभा' ही एक सार्वजनिक संस्था स्थापन केली.१८४३ साली ते ब्राम्हो समाजास येऊन मिळाले. देवेंद्रनाथ टागोर यांनी ख्रिस्ती मिशनऱ्यांनी हिंदी संस्कृतीवर केलेल्या टिकेला सडेतोड उत्तर दिले.

केशवचंद्र सेन यांच्या नेतृत्वाखाली कार्य करणा-या ब्राम्हो समाजाच्या घटकास 'भारतीय ब्राम्हो समाज'

असे नाव देण्यात आले.केशवचंद्र सेन यांनी ब्राम्हो समाजाची व्दारे स्त्रियांना खुली केली. स्त्री शिक्षणांसाठी नॉर्मल स्कूल, व्हिक्टोरिया इन्स्टिट्यूट व एका तंत्रनिकेतनची स्थापना केली. स्त्रीयांमधील बहुपत्नीत्व, बालविवाह यासारख्या रूढी व प्रथा परंपरांना विरोध केला.मुलींच्या विवाहाची वयोमर्यादा किमान चौदा वर्षे ठरविणारा कायदा 'द नेटिव्ह सिव्हिल मॅरेज ॲक्ट' केशवचंद्र सेन यांच्या प्रयत्नामुळे संमत केला. परंतु आपल्या चौदा वर्षाखालील मुलीचा विवाह कूचबिहारच्या राजाबरोबर करून दिल्यामुळे ब्राम्हो समाजातील तरूण सदस्यांचा केशवचंद्र सेनवरील विश्वास उडाला. आनंद मोहन बोस, शिवचंद्र दत्त, शिवनाथ शास्त्री आदि.नी ब्राम्हो समाजातून बाहेर पडून इ.स. १८७८ मध्ये 'साधारण ब्राम्हो समाज' ही ब्राम्हो समाजाची वेगळी शाखा सुरू केली.ब्राम्हो समाजाच्या या दुस-या फुटीमुळे ब्राम्हो समाजाच्या प्रभावाला ओहोटी लागली.

**● ब्राम्हो समाज–**

भारतामध्ये सामाजिक व धार्मिक सुधारणा घडवून आणण्यासाठी राजा राममोहन रॉय यांनी ब्राम्हो समाजाची स्थापना केली. भारतात सामजिक व धार्मिक सुधारणा घडवून आणण्याच्या उद्देश्याने स्थापन झालेली ही भारतातील पहिली संस्था होय.भारतीयांना खऱ्या धर्म तत्वाची ओळख करून देणे ही ब्राम्हो समाजाच्या स्थापने मागची प्रमुख भूमिका होती. एकेश्वरवादाचा पुरस्कार व मूर्तिपूजेला विरोध ही ब्राम्हो समाजाची प्रमुख वैशिष्ट्ये होती. राजा राममोहन रॉय यांनी २० ऑगस्ट १८२८ रोजी ब्राम्हो समाजाची स्थापना केली. १८३० मध्ये ब्राम्हो समाजाचे न्यास-पत्र तयार करण्यात आले व त्यातुन ब्राम्हो समाजाची तत्वे प्रसारीत केली.

**● ब्राम्हो समाजाचे उददेश :**

१. भारतीयांना खऱ्या धर्माची ओळख करून देणे. हिंदू धर्मावर होणारे हल्ले थांबविणे व हिंदू धर्मात सुधारणा घडवून आणने.

२. भारतीय समाज प्रगतशील बनविणे. त्यासाठी भारतीय समाजातील वाईट रूढी, प्रथा व परंपरा नष्ट करणे.

**● ब्राम्हो समाजाची वैशिष्ट्ये :**

एकेश्वरवादाचा प्रसार व मूर्तिपूजेला विरोध ही ब्राम्हो समाजाची मुख्य वैशिष्ट्ये होती.

**● ब्राम्हो समाजाची तत्वे :**

१. ईश्वर हा एक असुन तो निर्गुण निराकार आहे. म्हणून सर्वांना ईश्वराची उपासना करण्याचा अधिकार आहे.

२. ईश्वर हा सर्वांचा पिता आहे.त्यामुळे आपण सर्वजन एकमेकांचे बंधू आहोत.

३. सर्वधर्माचे अंतरंग सारखे आहे. त्यामुळे प्रत्येकाने सर्व धर्माचा व धर्मग्रंथांचा आदर करावा.

४. कोणत्याही स्वरूपात मूर्तिपूजा करू नये.

५. व्यक्तिने प्रपंचास परमार्थ मानावे.

६. एकेश्वरवादाचा पुरस्कार व अनेकेश्वरवादाला विरोध.

७. ध्यानसाधनेच्या मार्गाने ईश्वराची अंतःकरणपूर्वक प्रार्थना करावी.

८. प्रेम, सेवा व परोपकार यांची जाणीव ठेवून परस्परांशी वागावे.

राजा राममोहन रॉय यांनी भारतीय समाजात बुध्दीवादाचा विकास व्हावा म्हणून ब्राम्हो समाजाच्या माध्यमातुन अहोरात्र कष्ट घेतले.राजा राममोहन रॉय यांनी ब्राम्हो समाजाच्या विचाराचा मोठया प्रमाणावर प्रचार अणि प्रसार केला. बंगाल, पंजाब व मद्रास अशा आदि. ठिकाणी ब्राम्हो समाजाच्या शाखा सुरू केल्या.

● **ब्राम्हो समाजाचे कार्य :**

**समाज व धर्मसुधारणेचे कार्य :**

भारतात सामाजिक व धार्मिक सुधारणा घडवून आणण्यासाठी स्थापन केलेली ब्राम्हो समाज ही पहिली संस्था होय. ब्राम्हो समाजाच्या माध्यमातुन राजा राममोहन रॉय यांनी सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीला महत्त्व दिले. हिंदू धर्मातील वेदउपनिषद या आधारे आपल्या धर्म व संस्कृतीचे श्रेष्ठत्व जगाला दाखवून दिले. राजा राममोहन रॉय यांनी समाजातील सती प्रथा, बालविवाह, बालहत्या आदि. वाईट प्रथा, परंपरांना कडाडून विरोध केला. मूर्तिपूजेबरोबरच देवाला बळी देणे किंवा नैवद्य स्वरूपात एखादी वस्तू अर्पण करणे या प्रथांना राजा राममोहन रॉय यांनी विरोध केला तर विधवा पुनर्विवाहाला मान्यता दिली. राजा राममोहन रॉय यांनी सती प्रथेला कडाडून विरोध केला. सती प्रथा ही किती वाईट प्रथा आहे हे त्यांनी जवळून पाहिले होते. त्यामुळे राजा राममोहन रॉय यांनी सती प्रथेविरोधी मोठी चळवळ उभी केली. त्यातुन इ.सन.१८२९ मध्ये विल्यम बेटींगने सती बंदीचा कायदा केला.

● **शैक्षणिक कार्य :**

इंग्रजी शिक्षणाचा पुरस्कार करणे व त्याव्दारे आधुनिक विचाराला व कार्याला प्रोत्साहन देणे हे ब्राम्हो समाजाचे महत्वाचे कार्य होते.त्यासाठी ब्राम्हो समाजाने शैक्षणिक संस्थांची स्थापना केली. विविध ठिकाणी शाळा व महाविद्यालये स्थापन केली. कलकत्ता येथे इंग्लिश स्कूल, हिंदू कॉलेज सुरू केले. एकेश्वरवादाचा प्रसार करण्यासाठी राजा राममोहन रॉय यांनी कलकत्ता येथे वेदांत कॉलेज सुरू केले. भारतीयांना इंग्रजी, गणित, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र या सारख्या विषयाचे ज्ञान मिळावे हा हेतू डोळयासमोर ठेऊन शैक्षणिक कार्याची वाटचाल सुरू ठेवली.

● **वृत्तपत्रीय कार्य :**

राजा राममोहन रॉय यांनी वृत्तपत्र स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. पाश्चात्य ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी इ.सन १८२१ मध्ये 'संवाद कौमुदी' हे बंगाली साप्ताहिक सुरू केले. त्याचबरोबर सर्व धार्मिक स्तरावर आधुनिक

विचाराचा प्रसार व्हावा म्हणुन राजा राममोहन रॉय यांनी 'मिरत-उल-अकबर' व 'जमे-जहाँ-नुमा' ही पर्शियन भाषेतील वृत्तपत्रे सुरू केली. 'वज्रसूची' या संस्कृत ग्रंथाचे त्यांनी भाषांतर केले.

मानवी सेवा हे ब्राम्हो समाजाचे सर्वोच्च ध्येय होते. ब्राम्हो समाजाने भारत देशाला अनेक थोर सुधारक व विचारवंत दिले. देवेंद्रनाथ टागोर केशवचंद्र सेन, आनंदमोहन बोस, शिवचंद्र दत्त, शिवनाथ शास्त्री, ईश्वरचंद्र विद्यासागर, बिपिनचंद्र पाल, रवींद्रनाथ टागोर आदि. नेत्यांनी विविध क्षेत्रात महत्वपूर्ण कामगिरी केली.

● **सारांश :**

राजा राममोहन रॉय यांनी भारतात आधुनिक युगाची सुरूवात केली. राजा राममोहन रॉय यांच्या सुधारणावादी विचाराचा प्रभाव हिंदू समाजावर मोठा प्रमाणात पडला. त्यांनी ब्राम्हो समाजाच्या माध्यमातुन समाजिक, धार्मिक, शैक्षणिक आदि. क्षेत्रामध्ये महत्वपूर्ण कार्य केले.स्त्री शिक्षण व विधवा विवाहाला चालना दिली. समाजातील जातीप्रथा व अस्पृश्यतेला कडाडून विरोध केला. राजा राममोहन रॉय यांनी समाजातील सती प्रथा, बालविवाह, बालहत्या, बहुपत्नीत्व, पडदा पध्दती, केशवपन, कर्मकांड आदि. वाईट प्रथा व परंपरेवर कडाडून हल्ला केला. ब्राम्हो समाजाच्या माध्यमातून भारतीय समाजात जागृती केली. राजा राममोहन रॉय यांनी शेतकऱ्यांच्या दुःखाला वाचा फोडली. बंगालमधील अन्यायकार जमिनदारावर टिका केली. बंधुभाव, स्वातंत्र्य, लोकशाही या तत्वांना जाहिर पाठिबा दर्शविला. भारतीय समाजाला मानवतावाद, उदारमतवाद, वैज्ञानिकदृष्टी आदि. चे महत्त्व पटवून देण्याचे महान कार्य राजा राममोहन रॉय व त्यांच्या ब्राम्हो समाजाने केले.

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

**अ. योग्य पर्याय निवडुन रिकाम्या जागा भरा.**

१. ........... साली राजा राममोहन रॉय यांनी 'युनिटेरियन कमिटीची' स्थापना केली.

अ) १८२० ब) १८२१ क) १८२२ ड) १८२३

२. सती बंदीचा कायदा ........... साली केला.

अ) १८२९ ब) १८३० क) १८३१ ड) १८३२

३. भारतीय ब्राम्हो समाज ........... यांच्या नेतृत्वाखाली कार्य करीत होता.

अ) देवेंद्रनाथ टागोर ब) केशवचंद्र सेन क) कुमार बोस ड) महादेव शास्त्री

४. आत्मिय सभेची स्थापना ........... साली झाली.

अ) १८०५ ब) १८१० क) १८१५ ड) १८२०

५. राजा राममोहन रॉय यांनी ........... येथे वेदांत कॉलेज सुरू केले.

अ) हैद्राबाद ब) मुंबई क) मद्रास ड) कलकत्ता

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. आधुनिक बंगाली गद्याचे जनक कोण?

२. संवाद कौमुदी हे बंगाली साप्ताहिक कधी सुरू झाले?

३. ब्राम्हो समाजाची स्थापना केव्हा झाली?

४. राजा राममोहन रॉय यांच्या मृत्यू कोणत्या शहरात झाला?

५. राजा राममोहन रॉय यांनी हिंदू कॉलेजची स्थापन कोठे केली?

## १.२.२ स्वामी दयानंद सरस्वती व आर्य समाज :

**● प्रास्ताविक :**

भारताच्या सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीमध्ये आर्य समाजाचे कार्य सर्वश्रेष्ठ आहे. पाश्चिमात्यांचे धर्म, आचार, विचार हे श्रेष्ठ नसुन आमच्या भारतीय संस्कृतीतील धर्म, आचार, विचार त्याहुन श्रेष्ठ आहेत हे भारतीय समाजाला पटवुन देण्याचे महान कार्य स्वामी दयानंद सरस्वती यांनी केले. भारताच्या सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीतील आर्य समाज ही संस्था महत्वाची मानली जाते. स्वदेश व स्वधर्म या विषयीच्या तत्वांना नवसंजीवनी देण्याचे महान कार्य आर्य समाजाने केले. प्राचीन भारतीय संस्कृती विषयी निर्माण झालेली अनास्था व उदासीनता दूर करून त्याविषयी अभिमान जागृत केला. स्वामी दयानंद सरस्वती व आर्य समाज यांनी हिंदू धर्माचे पुनरूज्जीवन केले. हिंदू संस्कृतीची महानता जगाला दाखवून दिली. वैदिक काळात भारतीय संस्कृती प्रगत अवस्थेत होती. ते तत्वज्ञान स्वामी दयानंद सरस्वती यांनी समाजासमोर आणले. स्वामी दयानंद सरस्वती यांनी आर्य समाजाच्या माध्यमातुन भारतातील सामाजिक व धार्मिक सुधारणाा चळवळीचे कार्य अविरतपणे केले.

**● पूर्वइतिहास / जीवनवृत्तांत :**

स्वामी दयानंद सरस्वती यांचा जन्म इ.स. १८२४ साली गुजरात मधील काठेवाड प्रांतातील मोरवी संस्थानातील टंकारा या छोटयाशा गावी एका ब्राम्हण कुटुंबात झाला. स्वामी दयानंदांचे खरे नाव 'मूळशंकर' असे होते. त्यांचे वडिल अंबाशंकर हे धार्मिक व सनातनी वृत्तीचे होते. त्यांच्या घराण्याचे दैवत शिव हे होते. घरामध्ये धार्मिक संस्काराचे वातावरण होते. या वातावरणात मूळशंकर लहाणाचे मोठे झाले. लहाणपणी त्यांना धर्माचे व संस्कृतीचे शिक्षण मिळाले.त्यांच्या वयाच्या १४ वर्षी त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळणारी घटना घडली. महाशिवरात्रीच्या दिवशी मूळशंकर आपल्या वडीलांसोबत रात्रीच्या वेळी शिवाची उपासना करण्यासाठी शिव मंदिरात गेले. ते प्रसन्न मनाने एकाग्रतेने देवाची उपासना करण्यात मंग्न होते. पिंडीकडे पाहिले असता त्यांना विचित्र चित्र दिसले. महादेवाच्या पिंडीवर उंदीर फिरत असताना देवापुढील नैवेद्य खात असल्याचे त्यांना दिसुन आले. हे दृश्य पाहून मूर्तिपूजेबददल त्यांच्या मनात शंका निर्माण झाली. मूर्तिमध्ये परमेश्वर नाही. मूर्तिपूजा योग्य नाही असे त्यांना वाटू लागले.आपल्या शंकेचे निवारण करण्यासाठी त्यांनी वडिलांना अनेक प्रश्न विचारले परंतु त्यांना समाधानकारक उत्तर मिळाले नाही.

खरा धर्म समजुन घेण्यासाठी व परमेश्वराचे सत्य स्वरूप जाणून घेण्यासाठी व परमेश्वराच्या नावाखाली माजलेली अराजकता बंद करण्याचे विचार त्यांच्या मनात घोळू लागले. ही सर्व अराजकता थांबविण्याचे त्यांनी ठरविले. दरम्यान इ.स. १८४५ साली त्यांच्या घरात लग्नाची बोलणी सुरू झाली. आपण जर लग्नाच्या बेडीत आडकलो तर आपल्याला पडलेल्या प्रश्नाची उत्तरे मिळणार नाहीत. म्हणून ते घराबाहेर पडले आणि सरस्वती संप्रदायाकडून संन्यासाची दीक्षा घेतली. खऱ्या गुरूच्या शोधात इ.स. १८६० पर्यंत विंध्याद्री. अरवली, हिमालय पायाखाली घातले. जवळ-जवळ पंधरा वर्षे त्यांनी देशाच्या विविध भागात प्रवास केला. या कालावधीत त्यांनी खऱ्या ज्ञानाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. अखेर मथुरेला त्यांना गुरू भेटला. त्यांनी थोर पंडित स्वामी विरजानंद सरस्वती यांचे शिष्यत्व पत्करले. गुरू बरोबर राहून त्यांनी मथुरेला धर्मतत्वज्ञानाचे ज्ञान प्राप्त केले व त्यानंतर त्यांनी दयानंद सरस्वती असे नाव धारण केले.

आर्य समाजाचे तत्वज्ञान विशद करण्यासाठी इ.स. १८७४ मध्ये स्वामी दयानंद सरस्वती यांनी 'सत्यार्थ प्रकाश' हा ग्रंथ प्रकाशित केला. त्या बरोबरच 'वेदभाष्य भूमिका' आणि ऋग्वेद व यजुर्वेद यांवरील टीकात्मक समालोचन असलेले 'वेदभाष्य' हे ग्रंथ लिहिले. इ.स. १८८३ स्वामी दयानंद सरस्वती यांचा मृत्यु झाला. त्यांच्या मृत्युनंतरही आर्य समाजाचे कार्य लाला हंसराज, लाला लजपतराय, पंडित गुरूदत्त, स्वामी श्रध्दानंद यांनी जोमाने पुढे चालु ठेवले.

● **आर्य समाज :**

भारतामध्ये मोठ्या प्रमाणात सामाजिक व धार्मिक सुधारणा घडवून आणणाऱ्या आर्य समाजाची स्थापना स्वामी स्वामी दयानंद सरस्वती यांनी इ.स. १८७५ साली मुंबई येथे केली. हिंदू धर्माचे तत्वज्ञान लोकांना पटवून सांगण्यासाठी त्यांनी संपूर्ण भारताचा प्रवास केला. आपल्या तत्वज्ञाच्या प्रचारासाठी व प्रसारासाठी त्यांनी अनेक ग्रंथ प्रकाशित केले. समाजसुधारणा चळवळीसाठी त्यांनी संपूर्ण उत्तर भारत पालथा घातला. महाराष्ट्रात व बंगालमध्ये सुरू असलेल्या धार्मिक व सामाजिक सुधारणा कार्याच्या धर्तीवर उत्तर भारतात या कार्याचा प्रसार करण्याचे श्रेय स्वामी दयानंद सरस्वती यांना आहे. आर्य समाजाने पंजाब बरोबरच गुजराथ, राजपुताना, संयुक्त प्रांत या क्षेत्रामध्ये आपली पाळेमुळे खोलवर रूजविली व समाजजागृतीला गती दिली.

● **आर्य समाजाची तत्त्वे :**

स्वामी दयानंद सरस्वती यांनी आर्य समाजाची तत्त्वे व स्वरूप निश्चित करण्याचे कार्य केले. वैदिक धर्माच्या सुविचारांचा मुळ आधार आर्य समाजाच्या तत्त्वज्ञानाला दिला. वेदांना हिंदू धर्माचा मुख्य आधार व प्रेरणास्थान मानले. आर्य समाजाने ब्राम्हो समाज व प्रार्थना समाजातील आदर्श तत्त्वांचा स्वीकार केला. अशा आर्य समाजाचे तत्त्वज्ञान पुढील प्रमाणे -

१. परमेश्वर हाच सर्व यथार्थ ज्ञानाचा उगम असून सर्व वस्तू परमेश्वराच्या स्वरूपात ज्ञात आहेत.

२. परमेश्वर हा सर्व जगाचा निर्माता व पालक असून तो आनंदी, अनंत, निराकार, सर्वसाक्षी, सर्वशक्तिमान, दयाळू, अमर व पवित्र आहे.

३. वेद हे परमेश्वरापासून निर्माण झाले असून त्यात सर्व ज्ञानाचा उगम आहे. ईश्वराच्या शुध्द स्वरूपाचे ज्ञान वेदांमध्ये आहे. म्हणून वेदाचा अभ्यास करणे व त्यांतील ज्ञानाचा प्रसार करणे हे प्रत्येक आर्याचे पवित्र कर्तव्य आहे.

४. अज्ञान नष्ट करून ज्ञानाचा प्रसार करणे हे प्रत्येकाने ध्येय ठेवावे.

५. प्रत्येकाने असत्याचा त्याग करून सत्याचा स्वीकार करावा.

६. प्रत्येक व्यक्तिने नीतिनियमांना अनुसरून आणि चांगल्या वाईटाचा विचार करून सद्‌गुणांचे संगोपन व संवर्धन होईल अशा प्रकारची कृती करावी.

७. मानव जातीची भौतिक सामाजिक व आधात्मिक उन्नती करून मानव जातीच्या सर्वांगीण कल्याणाचा विचार प्राध्यान्याने करावा.

८. समाजाच्या कल्याणासाठी वैयक्तिक मतभेद बाजूला सारून प्रयत्न करावेत परंतु वैयक्तिक हिताच्या बाबतीत प्रत्येकाला आपल्या इच्छेप्रमाणे वागण्यास परवानगी आहे.

९. वैदिक धर्माची दारे सर्व धर्मीयांना खुली असावीत. परधर्मातील कोणाही व्यक्तीस शुध्दिकरणाने वैदिक धर्मात प्रवेश मिळावा.

१०. वेद अध्ययनाचा हक्क सर्व स्त्री-पुरूषांना आहे.

११. प्रत्येक व्यक्तिने केवळ स्वतःच्या कल्याणात धन्यता न मानता दुसऱ्याच्या कल्याणासाठी प्रयत्नशील राहावे.

१२ प्रेम, न्याय व वैयक्तिक सद्‌गुण यांवर आधारित वर्तणूक ठेवणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

● **आर्य समाजाचे कार्य :**

मुंबई या ठिकाणी आर्य समाजाची स्थापना झाली असली तरी आर्य समाजाचा प्रचार आणि प्रसार उत्तर भारतातील पंजाब प्रांतामध्ये मोठया प्रमाणात झाल्याचे दिसुन येते. लाहोर या ठिकाणी आर्य समाजाचे कार्यालय होते. या भागामध्ये आर्य समाजाला प्रामाणिक व निष्ठावंत कार्यकर्ते मिळाले. पंजाबमधील आर्य समाजाचे कार्य लाला हंसराज, लाला मुन्शीराम उर्फ श्रध्दानंद आणि लाला लजपतराय या तीन थोर नेत्यांनी वाढविले. स्वामी दयानंद सरस्वती इ.स. १८८३ पर्यंत म्हणजेच त्यांच्या मृत्युपर्यंत आर्य समाजाच्या वाढीसाठी उत्तर भारतात फिरत राहिले. आर्य समाजाचे कार्य वाढवण्याकरीता उत्तर भारतातील निर-निराळया गावी भेटी देऊन, प्रवचने करून त्यांनी आर्य समाजांच्या शाखांची उभारणी केली.

**१. वैदिक धर्माचे व वेदांचे महत्व सांगितले :**

'वेदाकडे चला' ही आर्य समाजाची मुख्य शिकवण होती.विश्वाचे व ईश्वराचे स्वरूप समजावून घेण्यासाठी प्रत्येक हिंदूने वेद अध्ययन केले पाहिजे. यातुन खऱ्या हिंदू धर्माचे तत्वज्ञान समजून घेतले पाहिजे.

वेद हे शुध्द व परिपूर्ण आहेत. वैदिक धर्म हा हिंदूचा खरा धर्म आहे. त्यामध्ये कर्मकांड व मूर्तिपूजेला थारा नाही. कारण वेदातील ज्ञान ईश्वर प्रणीत आहे.सर्व ज्ञानाचा उगम वेदात असल्यामुळे वेदाचे अध्ययन करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. रूढी, प्रथा, परंपरा यामध्ये गुरफटलेल्या हिंदू धर्माला वाचवण्यासाठी स्वामी दयानंद सरस्वती यांनी 'वेदाकडे पुन्हा चला' असा संदेश दिला.

**२. सामाजिक कार्य :**

स्वामी दयानंद सरस्वती यांनी सामाजिक व धार्मिक सुधारणा करताना त्यांनी समाजात प्रचलित असलेल्या जातीभेद, बालविवाह, बालहत्या, हुंडा प्रथा, पडदा पध्दती, अस्पृश्यता, बहुपत्नीत्व या रूढी व परंपरावर हल्ले केले. स्त्री शिक्षणाला चालना देऊन स्त्रीयामधील आंतरजातीय विवाहाला व विधवा विवाहाला त्यांनी उत्तेजन दिले.जतिभेद निवारण, अस्पृश्यता निवारण आदि. समाजसुधारणा केल्या. सहिष्णु व उदार मानवतावादी विचारांचा समाजात प्रसार केला. हिंदू समाजात निर्माण झालेला न्यूनगंड आपल्या शिकवणुकीव्दारे दूर करून समाजामध्ये नवी चेतना निर्माण करण्याचे महान कार्य आर्य समाजाने केले. भारतीय संस्कृतीच्या महान परंपरेची जाणीव आपल्या लोकांना करून दिली.

**३. शैक्षणिक कार्य :**

आर्य समाजाने शैक्षिणिक क्षेत्रातही महत्त्वपूर्ण भूमिका बजवाली. 'शिक्षणा शिवाय देशाची व समाजाची प्रगती नाही' हे ब्रीद डोळ्यासमोर ठेऊन भारतीय समाजात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी त्यांनी अनेक गूरूकुले, विद्यालये आणि उच्च शिक्षणसंस्था स्थापन केल्या. आर्य समाजाचे आघाडीचे कार्यकर्ते लाला हसंराज यांनी लाहोर येथे 'दयानंद अँग्लो वैदिक स्कूल' ही संस्था स्थापन केली. त्याचे पुढे 'दयानंद अँग्लो वैदिक कॉलेज' असे महाविद्यालयात रूपातंर झाले. हे काँलेज अभिमानी व प्रखर राष्ट्रवादी तरूण निर्माण करणारे केंद्र बनले. तेथे इंग्रजी बरोबरच वैदिक धर्माचे शिक्षण दिले जात होते.स्वामी दयानंद सरस्वती यांच्या मनातील 'गुरूकुल' साकार करण्यासाठी स्वामी श्रध्दानंद यांनी हरिव्दाराजवळ कांगडी येथे इ.स. १९०२ मध्ये शिक्षण देण्याच्या उद्देश्याने गुरूकुल स्थापन केले. पुढे त्यांच्याच नेतृत्वाखाली उत्तर भारतात गुरूकुल पध्दतीच्या शाळा सुरू केल्या. तेथे हिंदी भाषेतुन शिक्षण दिले जात होते. आर्य समाजाने स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करून स्त्रीयांसाठी शाळा सुरू केल्या. लाला लजपतराय यांनी राजकीय कार्यकर्ते तयार करण्यासाठी 'टिळक स्कूल ऑफ पॉलिटिक्स' ही संस्था सुरू केली. आर्य समाजाने गरीब, अनाथ व विधवा यांच्यासाठी आश्रम उघडले. आर्य समाजाच्या माध्यमातुन महाराष्ट्रामध्येही शैक्षणिक चळवळीला गती आली. राजर्षी शाहू महाराजांच्या राजाश्रयामुळे इ.स. १९१८ मध्ये कोल्हापूरात आर्य समाजाची एक शाखा कार्यरत होती. कोल्हापूरचे प्रसिध्द असे राजाराम कॉलेज इ.स. १९१९ ते १९२४ पर्यंत आर्य समाजाकडे चालविण्यासाठी दिले होते. कोल्हापूरात आर्य समाजाने चालविलेले 'शाहू दयानंद हायस्कूल' हे समाजातील अस्पृश्य व गरीब विद्यार्थ्यांचे आश्रयस्थान ठरले होते. आजही सोलापूरात दयानंद महाविद्यालयाच्या रूपात आर्य समाजाचे शैक्षणिक कार्य सूरूच आहे. आर्य समाजाच्या वतीने महाराष्ट्रामध्ये कोल्हापूर, सोलापूर, मुंबई येथे शैक्षणिक कार्य केले.

### ४. शुध्दीकरण चळवळ :

शुध्दीकरण चळवळीच्या माध्यमातुन आर्य समाजाने सामाजिक व धार्मिक सुधारणा क्षेत्रात अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य केले. भारतीय समाजामध्ये एकता निर्माण करणे हा शुध्दीकरण चळवळीचा मुख्य उददेश होता. जबरदस्तीने धर्मांतरित केल्या गेलेल्या अनेक हिंदूंना त्यांनी शुध्दीकरणाच्या मोहिमेव्दारे हिंदू धर्मात परत घेतले. आर्य समाजाचे हे कार्य क्रांतिकारक असेच होते.हिंदू धर्माच्या वाईट प्रथांमुळे धर्मांतर केलेल्या व्यक्तिंना परत हिंदू धर्मात येण्यास मज्जाव होता परंतु आर्य समाजाने परत हिंदू धर्मात येण्याची वाट मोकळी केली. त्यांच्या या कार्यामुळे ख्रिस्ती मिशन-यांच्या धर्मातराच्या कार्याला प्रतिबंध घातला गेला.

### ५. स्वराज्यप्रेम व राष्ट्राभिमान निर्माण केला :

स्वराज्य प्रेम व राष्ट्राभिमान निर्माण करण्याचे कार्य आर्य समाजाने केले. भारतीयांच्या मनामध्ये स्वातंत्र्याची व राष्ट्रभक्तीची भावना निर्माण केली. आर्य समाजाच्या अनुयायांनी स्वदेशी व राष्ट्रीय शिक्षणावर भर दिला. आर्य समाजाने भारत देशाच्या धर्म व संस्कृतीबददल आदर व अभिमान निर्माण केला. राष्ट्रभक्त, समाजसुधारक व तत्त्ववेक्ते यांची एक नवी पिढीच या समाजाने राष्ट्राच्या चरणी अर्पण केली. यातुनच लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल, स्वामी श्रध्दानंद आदि. देशभक्त निर्माण झाले.

### ● सारांश :

आर्य समाजाने प्राचीन वैदिक संस्कृतीचे महत्त्व समाजाला पटवून दिले. स्वदेश, स्वधर्म याचा अभिमान भारतीय समाजामध्ये निर्माण केला. सनातनी परंपरावादावर कडक टिका करून उदार मानवतावादाचा पुरस्कार केला. आर्य समाजाच्या अनुयायानी त्यागी वृत्तीने लोकसेवेचे व्रत चालवून भारतीयांपुढे मानवसेवेचा नवा आदर्श निर्माण केला. अशा प्रकारे आर्य समाजाच्या सेवकांनी सामाजिक, धार्मिक व राजकीय जागृतीचे सेवाभावी कार्य केले. पाश्चात्य पंडित मॅक्समुल्लर यांनी स्वामी दयानंद सरस्वती यांना 'उदारमतवादी सनातनी' म्हणून संबोधले. आर्य समाजाच्या कार्याबददल राजकीय विचारवंत बिपिनचंद्र पाल म्हणतात. 'हिंदू समाजात धार्मिक व सामाजिक जागृती करून त्यात राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्याचे श्रेय काही अंशी आर्य समाजाला द्यावे लागते.' सुप्रसिध्द पाश्चिमात्य लेखक हान्स कोहन्स आर्य समाजाच्या कार्याविषयी म्हणतात. 'विसाव्या शतकातील भारताची पायाभरणी आर्य समाजाने केली. आर्य समाजाने प्राचीन वैदिक संस्कृतीचे श्रेष्ठत्व सिध्द केले.या समाजाच्या कार्यामुळे हिंदू धर्माला परत तेज आले. भारताच्या सामाजिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रामध्ये आर्य समाजाने महत्त्वपूर्ण योगदान दिले.'

### ● स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :

**अ. योग्य पर्याय निवडुन रिकाम्या जागा भरा.**

१. इ.स. १८७५ साली ............ येथे आर्य समाजाची स्थापना झाली.

अ) मुंबई   ब) मद्रास   क) कलकत्ता   ड) पुणे

२. इ.स.१९१८ मध्ये ............ शहरामध्ये आर्य समाजाची एक शाखा कार्यरत होती.

अ) सोलापूर ब) सातारा क) सांगली ड) कोल्हापूर

३. सत्यार्थ प्रकाश हा ग्रंथ ............ यांनी प्रकाशित केला.

अ) स्वामी दयानंद सरस्वती ब) स्वामी विवेकानंद
क) ईश्वरचंद्र विद्यासागर ड) स्वामी हंसराज

४. टिळक स्कूल ऑफ पॉलिटिक्स ही संस्था ............ यांनी सुरू केली

अ) स्वामी दयानंद सरस्वती ब) गुरू रामेश्वर
क) लाल लजपतराय ड) स्वामी श्रध्दानंद

५. २० व्या शतकातील भारताची पायाभरणी आर्य समाजाने केली असे मत ............ यानी मांडले.

अ) हान्स कोहन्स ब) हान्स रॉबर्ट क) हान्स बकलर ड) हान्स वॉर्म

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. स्वामी दयानंद सरस्वती यांचे खरे नाव काय होते.

२. 'वेदाकडे पुन्हा चला' असा संदेश कोणी दिला.

३. आर्य समाजाचे मुख्य केंद्र कोठे होते.

४. स्वामी दयानंद सरस्वती यांनी इ.स. १९०२ मध्ये कोठे गुरूकुल स्थापन केले.

५. कोणत्या शहरामध्ये दयानंद महाविद्यालयाच्या रूपात आर्य समाजाचे शैक्षणिक कार्य सूरू आहे.

**१.२.३ स्वामी विवेकानंद व रामकृष्ण मिशन :**

● **प्रास्ताविक :**

भारतीय संस्कृतीची महानता जगाला पटवून देण्याचे महान कार्य स्वामी विवेकानंदानी केले. पाश्चात्य जगात स्वामी विवेकानंदांनी हिंदू धर्माची विजयपताका फडकविल्यामुळे त्यांचे नाव सर्वश्रुत झालेच परंतु त्याचबरोबर भारतीयांची आणि हिंदू धर्मीयांची मान ताठ झाली. स्वधर्माविषयी अभिमान जागृत झाला. स्वामी विवेकानंदांनी आपल्या लिखाणातून व भाषणातून धार्मिक व सामाजिक सुधारणा हे साध्य नसून बलाढय राष्ट्राची पायाभरणी करण्याचे साधन आहे याची जाणीव भारतीयांना करून दिली. पाश्चात्यांप्रमाणे वैज्ञानिक व भौतिक प्रगतीचा मार्ग धुंडाळून भारताचा उध्दार करता येईल अशी शिकवण स्वामी विवेकानंदांनी तमाम भारतीयांना दिली.स्वामी विवेकानंदांनी भारतीयांच्या धार्मिक रूढी, कर्मकांड, अंधश्रध्दा, वाईट चालीरीतींवर कडाडून हल्ला केला. खरा धर्म मानवतावाद आहे.मानवाची सेवा हीच ईश्वर सेवा आहे. असा मोलाचा संदेश दिला.भारतीयांमध्ये राष्ट्रवादाची भावना निर्माण करण्याचे कार्य स्वामी विवेकानंदांनी केले. भारतीयांना विद्या संपादन करण्याचा व

पाश्चात्य भौतिक विद्या आत्मसात करण्याचा व कृतीशील बनण्याचा उपदेश दिला. धार्मिक व सामाजिक सुधारणेबरोबरच राष्ट्रवादाचा संदेश देणारा प्रेषित म्हणून स्वामी विवेकानंद यांच्या कार्याला अनन्यसाधारण महत्व आहे. सत्य व आत्मसन्मान ही समाजाच्या विकासाची व उन्नतीची गुरूकिल्ली आहे असा संदेश त्यांनी नेहमी भारतीय समाजाला दिला. संपूर्ण भारत देशामध्ये मानवतेचा व राष्ट्रोद्धाराचा मंत्र पोचविण्याचे महान कार्य त्यांनी केले.समाज प्रगती व राष्ट्रवाद या बरोबरच इतर अनेक विषयांवर स्वामी विवेकानंदांनी वेळोवेळी व्यक्त केलेले विचार श्रेष्ठ असेच आहेत.विश्वबंधुत्वाच्या भावनेतून स्वामी विवेकानंद सर्व जागतिक घटनाकडे पाहत होते.

● **रामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानंद :**

रामकृष्ण परमहंस हे कलकत्त्याजवळील दक्षिणेश्वर मंदिरातील कालीमातेचे पुजारी व उपासक होते. रामकृष्ण परमहंस यांचा जन्म बंगाल प्रांतातील हुगळी जिल्हयातील कामारपुकार या गावात १८ फेबुवारी १८३६ मध्ये झाला.लहाणपणापासुनच त्यांना ईश्वर भक्तीचा ओढा होता. माणसाने संपत्तीच्या मागे न लागता ईश्वरी सेवेत धन्यता मानवी असे त्यांनी सांगितले.योगसाधनेच्या माध्यमातुन मोठी प्राप्ती होते असा त्यांचा विश्वास होता. सर्व धर्मात सत्य व चांगले विचार आहेत असे त्यांचे मत होते. कृष्ण, राम, रहिम, अल्ला, ख्रिस्त ही एकाच परमेश्वराची भिन्न रूपे आहेत असे ते मानीत. निःस्वार्थी भावनेने ईश्वराची सेवा करा असे त्यांचे सांगणे होते. वेगवेगळे धर्म म्हणजे ईश्वराकडे जाणाऱ्या भिन्न वाटा आहेत असे ते नेहमी सांगत. त्यांनी आपले तत्वज्ञान सरळ साध्या भाषेत मांडले. ईश्वर प्राप्तीचे ध्येय मनुष्याचे असले पाहिजे, नेहमी कार्य करीत राहा. ज्ञानाबरोबरच चारिज्यविकासही श्रेष्ठ आहे असे त्यांचे मत होते.

● **स्वामी विवेकानंद :**

स्वामी विवेकानंद यांचा जन्म १२ जानेवरी १८६३ रोजी कलकत्ता येथे झाला.स्वामी विवेकानंद यांचे मुळ नाव नरेंद्रनाथ दत्त असे होत. नरेंद्रनाथ यांचे वडिल विश्वनथ दत्त पेशाने वकील होते. नरेंद्रनाथ यांनी वकिल व्हावे असे त्यांचे मत होते. कलकत्ता येथील महाविद्यालयातुन स्वामी विवेकानंदांनी बी.ए. ची पदवी संपादन केली.महाविद्यालयामध्ये असतानाच ते ब्राम्हो समाजाकडे आकृष्ट झाले होते. त्यानंतर हिमालयात जाऊन सहा वर्षे योगसाधना केली व त्यानंतर त्यांनी संपूर्ण हिंदूस्थानचा प्रवास केला. इ.सन १८८२ मध्ये त्यांची रामकृष्ण परमहंस यांच्याशी भेट झाली. त्यांच्या विचाराचा प्रभाव स्वामी विवेकानंदावर पडला व स्वामी विवेकानंद यांनी रामकृष्ण परमहंस यांचे शिष्यत्व स्विकारले.

इ.सन १८९३ साली अमेरिकेतील शिकागो येथे भरलेल्या जागतिक धर्म परिषदेत हिंदू संस्कृतीचे महत्व जगाला पटवून दिले. स्वामी विवेकानंद यांचे भारदस्त व तेजस्वी व्यक्तिमत्व, प्रखर बुध्दीमत्ता, श्रेष्ठ विव्दता, ओजस्वी वाणी, विशाल दृष्टीकोन यामुळे अमेरिकेतील श्रोते मंत्रमुग्ध झाले. स्वामी विवेकानंदाच्या विचाराचे अमेरिकेमध्ये व युरोपियन देशामध्ये जोरदार स्वागत झाले. भारतीय धर्म व संस्कृती पाश्चात्य संस्कृती एवढीच श्रेष्ठ आहे हे जगाला पटवून दिले. त्यांच्या या भाषणाने व त्यानंतर अमेरिकेत अनेक शहरातुन केलेल्या भाषणातुन त्यांनी खऱ्या हिंदू धर्माची ओळख अमेरिकन लोकांना करून दिली. पाश्चात्य जगात स्वामी विवेकानंदांनी हिंदू धर्माची विजयी पताका फडकविल्यामुळे त्यांचे व भारतीयांचे नाव जगभर झाले. अमेरिकेतून स्वामी विवेकानंद

युरोपला गेले व लंडन, पॅरिस आदि. ठिकाणी भाषणे देऊन रामकृष्ण मिशनच्या विचाराचा प्रचार व प्रसार केला. एकाबाजुला त्यांनी परकीयांना भारतीय संस्कृतीचे महत्व पटवून दिले तर दुसऱ्या बाजूला भारतीयांना आधुनिकतेचे महत्व सांगितले. भारतीय समाज सुधारावा, जागृत व्हावा असे त्यांना नेहमी वाटे.

भारतीय समाजातील बहुसंख्य मागास वर्गाच्या शारीरिक, मानसिक. नैतिक प्रगतीवर स्वामी विवेकानंदांनी आपले लक्ष केंद्रित केले. शारीरिक, बौध्दिक, नैतिक दौर्बल्य निर्माण करणाऱ्या सर्व गोष्टी त्याज्य माना असे ते सांगत. सत्याची ताकद व आत्मसन्मानाची भावना ही समाजाच्या विकासाची व प्रगतीची गुरूकिल्ली आहे असा संदेश ते नेहमी देत असत. व्हॅलेंटाईन चिरोलसारख्या पाश्चात्य लेखकाने स्वामी विवेकानंदांविषयी प्राचीन भारतीय संस्कृतीची व नवजात भारतीय राष्ट्रवादाची पाश्चात्यांना प्रभावीपणे जाणीव करून देणारा पहिला हिंदू असे गौरवउदगार काढले. स्वामी विवेकानंदांचा युवा शक्तीवर विश्वास होता. स्वामी विवेकानंदांचा जन्म दिवस युवक दिन म्हणून साजरा केला जातो. युवा वर्गाला योग्य प्रगतीचा मार्ग दाखविल्यास ते जग बदलू शकतात. जग बदलण्याची ताकद युवकांमध्येच आहे असे त्यांना वाटे. परकीय सत्तांच्या प्रभावामुळे भारत दुबळा बनला आहे.भारतीय समाजाला स्वाभीमानाने जगावयास लावण्याची आवश्यकता आहे.ही बाब स्वामी विवेकानंदांच्या लक्षात आली. भारत देश सुप्त शक्तीचे भांडार आहे. गरज आहे ती त्या सुप्त शक्तीला जागृत करण्याची हे स्वामीजींनीं ओळखले म्हणूनच त्यांनी लोकांना उठा जागे व्हा जोपर्यंत ध्येय साध्य होत नाही तोपर्यंत थांबू नका असा मोलाचा संदेश दिला.

रामकृष्ण परमहंसाच्या शिकवणूकीचे सोप्या शब्दात स्पष्टीकरण करण्याचे कार्य स्वामी विवेकानंदांनी केले. येथून पुढे स्वामी विवेकानंद यांनी हिंदू धर्म व संस्कृतीचे तत्वज्ञान प्रसारीत करावयाचे आणि सामाजिक व धार्मिक सुधारणा करण्याचे कार्य सुरू केले. भारतीय समजाच्या प्रगतीसाठी व नैतिक उन्नतीसाठी संपुर्ण आयुष्य व्यतीत करण्याचा निश्चय केला.यातुनच रामकृष्ण मिशनचा उदय झाला.

**● रामकृष्ण मिशनची स्थापना :**

प्राचीन भारतीय धर्मतत्वापासुन प्रेरणा घेऊन भारतीय समाजाचे पुनरूज्जीवन करण्यासाठी ज्या धार्मिक व सामाजिक सुधारणा चळवळी भारतात निर्माण झाल्या त्यामध्ये रामकृष्ण मिशनचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. इ.सन १८९७ मध्ये स्वामी विवेकानंदांनी कलकत्ताजवळील बेलूरमठ येथे रामकृष्ण मिशनची स्थापना केली. बेलूरमठ हेच रामकृष्ण मिशनचे मुख्य केंद्र बनले. संपूर्ण भारतभर रामकृष्ण मिशनच्या शाखा स्थापन केल्या. रामकृष्ण मिशनच्या शाखा संपूर्ण भारत, अमेरिका, इंग्लंडमध्येही स्थापन झाल्या. भारतीयांमध्ये स्वदेश व स्वधर्म या बददलचा अभिमान निर्माण करण्याचे कार्य रामकृष्ण मिशनने केले.

**● रामकृष्ण मिशनचे तत्वज्ञान :**

१. वेदांताची मूलतत्वे समाजाला समजावून सांगणे.

२. वेदांत शिक्षणाला उत्तेजन देणे.

३. मिशनच्या तत्वज्ञान प्रसारासाठी वाडःमय नियतकालिके प्रसिध्द करणे.

४. नैसर्गिक आपत्तीच्या वेळी म्हणजेच दुष्काळाच्या वेळी लोकांना मदत करणे.

५. लोकोपयोगी कामे करणे.त्यामध्ये शाळा, महाविद्यालये, प्रयोगशाळा, दवाखाने, अनाथगृहे, अपंगालये स्थापन करणे.

६. सर्व धर्मामध्ये बंधूभाव निर्माण करणे.

७. ज्ञानविज्ञान यांच्या प्रसारासाठी निवडक लोकांना प्रशिक्षण देणे.

८. भौतिकशास्त्र.कला.साहित्य उद्योग यांचे शिक्षण देणे.

९. व्यक्तिच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी सर्वशक्तीमान ईश्वराची मूर्तिपूजा करण्याचे ते समर्थन करीत.

**● रामकृष्ण मिशनचे कार्य :**

**१. हिंदू धर्म व संस्कृतीचे महत्व पटवून दिले :**

स्वामी विवेकानंदांनी १८९३ च्या शिकागो येथील जागतिक धर्म परिषेदेत हिंदू धर्म व संस्कृती जगामध्ये श्रेष्ठ आहे हे पटवून दिले. पाश्चात्य जगात स्वामी विवेकानंदांनी हिंदू धर्माची विजयी पताका फडकविल्यामुळे त्यांचे नाव सर्वश्रुत झालेच परंतु त्याचबरोबर भारतीयांची आणि हिंदू धर्मीयांची मान ताठ झाली. स्वधर्माविषयी अभिमान जागृत झाला. स्वामी विवेकानंदांनी अमेरिकेतील अनेक शहरामध्ये झालेल्या भाषणातुन हिंदू धर्माची खरी ओळख करून दिली. रामकृष्ण मिशनच्या शाखा देशात व देशाबाहेर अमेरिका. इंग्लंड या देशांबरोबरच जगात ठिकठिकाणी रामकृष्ण मिशनच्या शाखा स्थापन झाल्या.

**२. वाईट चालीरीती व परंपरावर हल्ले :**

भारतीय समाजामध्ये अस्तित्वात असलेल्या अंधश्रध्दा, कर्मकांड व अज्ञानावर जोरदार प्रहार केले. जातीव्यवस्था व अस्पृश्यतेवर कडाडून हल्ले केले. विज्ञाननिष्ठ विचाराचा पुरस्कार केला. समाजामध्ये नव नविन विचाराची पेरणी केली. सर्व सामान्य समाजाने विज्ञानवादी दृष्टीकोन स्विकारावा असे आवाहन केले. वैज्ञानिक मार्गातून भारताची प्रगती साधता येईल असा ठाम विश्वास व्यक्त केला. धर्माच्या नावाखाली अस्तित्वात असलेल्या अनेक वाईट रूढी, प्रथा, परंपरेवर हल्ले केले.

**३. मानवी सेवेला महत्व दिले :**

'मानव सेवा हीच ईश्वरसेवा' आहे हे ध्येय मनाशी बाळगुन रामकृष्ण मिशनच्या शिष्यानी आपले कार्य केले. भारतीय समजातील गरीब, अज्ञानी, अशिक्षित अशा लोकांची सेवा केली.मानसिक व शारिरीक व्याधींनी त्रस्त असेलेल्या लोकांची रामकृष्णच्या अनुयायांनी मनोभावे सेवा केली. सर्व सामान्य जनतेला ईश्वर मानुन त्यांची सेवा करा. तोच सर्वश्रेष्ठ धर्म आहे याची शिकवण रामकृष्ण मिशनने समाजाला दिली. समाजातील दीन दुबळ्यांची सेवा करणे हाच धर्म आहे असे सांगितले. खरा धर्म मानवतावाद आहे. मानवाची सेवा हीच ईश्वर सेवा आहे. असा मोलाचा संदेश दिला.

**४. समाजसेवेचे कार्य :**

सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी या मिशनने बरेच प्रयत्न केले. भारतीय समाजातील गरीबांच्या सेवेसाठी स्वामी विवेकानंदांनी रामकृष्ण मिशनच्या माध्यमातुन शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे, ग्रंथालये, दवाखाने, अनाथाश्रम स्थापन केले. त्यांच्या विचाराचे अनेक ग्रंथ जगभरातील अनेक भाषांमध्ये प्रकाशित झाले आहेत. नैसर्गिक आपत्तीच्या वेळी रामकृष्ण मिशनने नेहमीच मदतीचा हात दिला. दुष्काळ, भूकंप, महापूर आदि. संकटाच्या वेळी नेहमी मदत केली.

● **सारांश :**

भारताच्या सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीमध्ये रामकृष्ण मिशनने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. रामकृष्ण मिशनचे समाजसेवेचे व धर्म सुधारणेचे कार्य अविरत चालू असून आधुनिक भारताच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा ते एक महत्त्वाचा घटक बनले आहे.रामकृष्ण मिशनच्या माध्यमातुन स्वामी विवेकानंदांनी अज्ञान व अंधश्रद्धेमध्ये दबलेल्या भारतीय समाजाला जागे केले. त्यांच्यामध्ये स्वधर्माभिमान निर्माण करून त्यांना विज्ञाननिष्ठ बनवले. मार्गारेट नोबल सारख्या पाश्चात्याने मिशनच्या कार्यासाठी स्वतःला वाहून घेतले. अमेरिका, इंग्लंड, श्रीलंका, ब्रम्हदेश आदि देशांबरोबर जगभरामध्ये रामकृष्ण मिशनच्या शाखा निर्माण झाल्या. हिंदू धर्माचे श्रेष्ठत्व जगाला पटवून दिले. हिंदू धर्म हा विश्व धर्म आहे. हिंदू धर्म जगाचे नेतृत्व करू शकेल. परंतु त्यातील जातीयतेसारखे दोष दूर केले पाहिजेत. असे रामकृष्ण मिशनने प्रतिपादन केले.

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :**

**अ) योग्य पर्याय निवडुन रिकाम्या जागा भरा.**

१. स्वामी विवेकानंदांचा जन्म ........... रोजी झाला.

अ) १२ जानेवारी १८५३ ब) १२ जानेवारी १८६३
क) १२ जानेवारी १८७३ ड) १२ जानेवारी १८८३

२. स्वामी विवेकानंदांचे गुरू.......... होत.

अ) रामकृष्ण परमहंस ब) स्वामी श्रध्दानंद क) रामकृष्ण सरस्वती ड) रामकृष्ण चटर्जी

३. ........... येथील महाविद्यालयातुन स्वामी विवेकानंदांनी बी.ए.ची पदवी संपादन केली.

अ) मुंबई ब) वाराणसी क) कलकत्ता ड) हैद्राबाद

४. अमेरिकेतील ........... शहरात जागतिक धर्म परिषद भरली.

अ) शिकागो ब) न्यूयॉर्क क) वॉशिंग्टन ड) जॉर्जिया

५. ........... या पाश्चात्याने रामकृष्ण मिशनच्या कार्याला स्वतःला वाहून घेतले.

अ) जॉर्ज नोबल ब) विल्सन क) जॉन्सन ड) मार्गारेट नोबल

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. स्वामी विवेकानंदांचे मुळ नाव काय होते.

२. स्वामी विवेकानंद व रामकृष्ण परमहंस यांची भेट कोणत्या वर्षी झाली.

३. कोणाचा जन्म दिवस आज युवक दिन म्हणुन साजरा केला जातो.

४. रामकृष्ण मिशनचे मुख्य केंद्र कोठे होते.

५. स्वामी विवेकानंद कोणत्या वर्षी जागतिक धर्म परिषेदाला हजर होते.

## १.३ सारांश :

भारताच्या सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीमध्ये राजा राममोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती व स्वामी विवेकानंद यांना महत्त्वाचे स्थान आहे. ब्राम्हो समाज, आर्य समाज, रामकृष्ण मिशन या सुधारणा चळवळींनी व संस्थांनी श्रेष्ठ कामगिरी केली. आपल्या प्रगत विचारधारेव्दारे भारतीय समाजाला परंपरेच्या विळख्यातून बाहेर काढुन आधुनिक काळात आणण्याचे महान कार्य राजा राममोहन रॉय यांनी केले. भारतातील सामाजिक व धार्मिक सुधारणाचळवळीचे ते आद्यप्रवर्तक होत. स्वामी दयानंद सरस्वती यांनी प्राचीन भारतीय संस्कृती विषयी निर्माण झालेली अनास्था व उदासीनता दूर करून त्याविषयी अभिमान जागृत केला. पाश्चिमात्यांचे धर्म.आचार, विचार हे सर्वश्रेष्ठ नसून आमच्या ही संस्कृतीतील धर्म, आचार, विचार त्याहुन श्रेष्ठ आहेत हे भारतीय समाजाला पटवून देण्याचे महान कार्य स्वामी दयानंद सरस्वती यांनी केले. स्वामी विवेकानंदांनी भारतीय समाजाची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दुरावस्था बाजुला सारून त्यांचे जीवनमान बदलून टाकले. स्वामी विवेकानंदांनी समाज सुधारणे बरोबरच भारतीयांना राष्ट्रवादाचा संदेश दिला. त्यातुनच भारताच्या स्वातंत्र्य लढयाला गती आली. भविष्य आणि वर्तमान घडविण्यासाठी स्वामी विवेकानंद यांच्या कार्याचे व विचारांचे चिंतन योग्य पद्धतीने झाले पाहिजे हे भारतीय समाजाच्या प्रगतीसाठी व विकासासाठी महत्वाचे आहे.

## १.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

१. पाश्चात्य –परकीय

२. अनास्था –अस्था नसणे

३. चिरकाल –कायम स्वरूपी

४. मिशन – संस्था

५. न्यास पत्र –विश्वास पत्र

६. धर्मपरिपालन –धर्माचे पालन करणे

७. चार्तुवर्ण – चार वर्ण

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे :

**● स्वयं अध्ययन प्रश्न क्र. १ ची उत्तरे**

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | १) १८२२ | २) १८२९ | ३) केशवचंद्र सेन |
| | ४) १८१५ | ५) कलकत्ता | |
| ब. | १) राजा राममोहन रॉय | २) १८२१ | ३) २० ऑगस्ट १८२८ |
| | ४) ब्रिस्टॉल | ५) कलकत्ता | |

**● स्वयं अध्ययन प्रश्न क्र.२ ची उत्तरे**

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | १) मुंबई | २) कोल्हापूर | ३) स्वामी दयानंद सरस्वती |
| | ४) लाला लजपतराय | ५) हान्स कोहन्स | |
| ब. | १) मूळशंकर | २) स्वामी दयानंद सरस्वती | ३) लाहोर |
| | ४) कांगडी | ५) सोलापूर | |

**● स्वयंअध्ययन प्रश्न क्र.३ ची उत्तरे**

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | १) १२ जानेवारी १८६३ | २) रामकृष्ण परमहंस | ३) कलकत्ता |
| | ४) शिकागो | ५) मागरिट नोबल | |
| ब. | १) नरेंद्र | २) १८८२३ | ३) स्वामी विवेकानंद |
| | ४) बेलूरमठ | ५) १८९३ | |

## १.६ सरावासाठी स्वाध्याय :

१. राजा राममोहन रॉय यांच्या कार्याची माहिती द्या.

२. ब्राम्हो समाजाची तत्वे व कार्य स्पष्ट करा.

३. स्वामी दयानंद सरस्वती यांच्या कार्याचा आढावा घ्या.

४. स्वामी विवेकानंद यांच्या कार्याचे मुल्यमापन करा.

५. रामकृष्ण मिशनचे कार्य स्पष्ट करा.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके :

१. ग्रोवर बी.एल व बेल्हेकर एन.के -आधुनिक भारताचा इतिहास

२. सुमन वैध व शांता कोठेकर –आधुनिक भारताचा इतिहास

३. जावडेकर श. द. – आधुनिक भारत

४. आधुनिक भारताचा इतिहास – प्रा. गजानन भिडे

५. Sarkar Sumit - Modern India

❖❖❖

## घटक – २

# महात्मा फुले

**अनुक्रमणिका :**


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ शैक्षणिक आणि सामाजिक कार्य

२.२.२ सत्यशोधक समाज

२.२.३ महात्मा फुले यांचे 'शेतकऱ्याचा असूड' व 'गुलामगिरी' तील विचार

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द शब्दार्थ

२.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


**२.० उद्दिष्ट्ये :**

या घटकांचा अभ्यास केल्यानंतर आपणाला पुढील उद्दिष्टे सांगता येतील –

१. महात्मा फुले यांचा शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टिकोन समजेल.

२. त्यांनी स्त्री शिक्षणसाठी केलेले कार्य समजेल.

३. म. फुले यांनी अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी केलेल्या कार्याची कल्पना येईल.

४. म. फुले यांचे सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून केलेले कार्य कळेल.

५. म. फुले यांचे स्त्री उध्दारासाठी केलेल्या कार्याची माहिती समजेल.

६. म. फुले यांचे शेती व शेतकरी याविषयीची भूमिका समजेल.

७. म. फुले यांच्या साहित्यातून व्यक्त झालेले विचार समजतील.

## २.१ प्रास्ताविक :

भारतीय समाज हा विविध जातीमध्ये विभागलेला असून या जातिसंस्थेच्या बंधनांनी जखडलेला होता. कनिष्ठ जातीवर असलेल्या बंधनामुळे त्यांना मानवतेचे साधे अधिकार ही मिळत नव्हते. शिक्षण ही ब्राह्मण जातीची मक्तेदारी बनली होती. अनिष्ठ सामाजिक परंपरा सामाजिक बंधने, रोटी बेटी व्यवहारावरील बंधने यांचे समाजात प्राबल्य होते. स्त्रियांचीं स्थितीही दयनीय होती. त्यांना सामाजिक किंवा धार्मिक जीवनात कोणतेही स्थान दिलेले नव्हते. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. बालविवाह, सतीची पध्दत, जरठ कुमारी विवाह, भ्रुणहत्या, विधवा विवाहाला बंदी इत्यादी अनिष्ठ परंपरांनी स्त्रियांचे जीवन अधिकच दयनीय बनविले होते.

धार्मिक जीवनात बुध्दीप्रामाण्यापेक्षा शब्दप्रामाण्य व ग्रंथप्रामाण्य यांना महत्त्व मिळाले होते. धार्मिक आचारांच्या बाबतीत पुरोहितांची मक्तेदारी निर्माण झाली होती. अंधश्रध्दा, अनिष्ठ परंपरा इत्यादींचे वर्चस्व होते. धार्मिक जीवनात मुलभूत तत्वांपेक्षा आचारांना प्राधान्य मिळाले होते. सामाजिक व धार्मिक जीवनातील या अनिष्ठ परंपरा व अंधश्रध्दा यामुळे समाजाची अधोगती झाली होती.

१८ व्या शतकात युरोपात जागृतीचे नवे युग सुरु झाले. तर्कवाद, विज्ञान व वैज्ञानिक दृष्टीमुळे युरोपात राजकीय, लष्करी, आर्थिक, धार्मिक व सर्वच क्षेत्रात आमुलाग्र बदल घडून आले. १८१८ मध्ये पेशवाई बुडाली आणि ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता महाराष्ट्रात स्थिर झाली. १९ व्या शतकात महाराष्ट्रातील सामाजिक, आर्थिक, राजकीय तसेच सांस्कृतिक जीवनात एक नवीन कालखंड, नवे युग नवे चैतन्य उदयाला आले. महाराष्ट्रात ब्रिटीशांची सत्ता स्थिर झाल्यानंतर प्रारंभीच्या काळात राज्यकाराभाराची सुत्रे एल्फिन्स्टन, माल्कम यासारख्या दूरदर्शी, कर्तव्यतत्पर व मुत्सद्यी अधिकाऱ्यांच्या हाती होती. महाराष्ट्रात ब्रिटीश शासन स्थिर करण्याबरोबरच येथील समाजाला नवे शिक्षण देणे व सुधारणा घडवून आणणे या कार्यालाही त्यांनी प्राधान्य दिले. ब्रिटीशांनी भारतात शिक्षणप्रसाराला चालना दिली. महाराष्ट्रात विविध शिक्षण संस्थाची स्थापना केली. शिक्षणकार्यात सुरुवातीस ख्रिश्चन मिशनऱ्यांनी मोठे कार्य केले.

शिक्षणाच्या प्रसारामुळे महाराष्ट्रात नवशिक्षित तरुणांची एक नवी पिढी उदयास आली. पाश्चिमात्य संस्कृती, त्यांनी केलेली भौतिक प्रगती, उदारमतवाद, स्वातंत्र्य, मानवता, समानता यांसारख्या आधुनिक विचारांचे, तत्वांचे या तरुणांना ज्ञान प्राप्त झाले. हे पाश्चिमात्य युरोपीय शिक्षण घेतलेल्या तरुणांनी भारतातील आपल्या धार्मिक व सामाजिक जीवनाकडे चिकित्सक भूमिकेतून, आत्मपरीक्षणाच्या जाणिवेतून पाहण्यास सुरुवात केली. त्यातूनच सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळींना गती मिळाली.

**● महात्मा जोतिराव फुले–जीवन वृत्तांत :**

म. जोतिराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी कटगुण, जि. सातरा येथे झाला. त्यांच्या आजोबांचे नाव शेटीबा होते. सातारा जिल्ह्यातील कटगूण हे त्यांचे मूळगाव होते. गावातील प्रस्थापितांबरोबर त्यांच्या पणजोबांचे भांडण झाले. त्यामुळे ते गाव सोडून खानवली (पुणे जिल्हा) येथे स्थायीक झाले. कालांतराने शेटीबा उदरनिर्वाहासाठी पुणे येथे स्थायिक झाले. शेटीबांना राणोजी, कृष्णा व गोविंदराव अशी तीन मुले होती. ते

फुलांचा व्यवसाय करत. त्यांचे मुळ आडनांव गोऱ्हे होते परंतु फुलांच्या व्यवसायावरुन फुले असे आडनांव पडले. गोविंदराव व चिमणाबाई यांच्या पोटी जोतिबांच्या जन्म झाला. जोतीराव एक वर्षाचे असताना आई चिमणाबाईचा मृत्यू झाला. परंतु त्यांच्या वडिलांनी दुसरा विवाह केला नाही. जोतिरावांची आऊ सगुणाबाईनी त्यांचा सांभाळ केला. त्यांना संस्कारक्षम बनविले. सगुणाबाई विषयी जोतिराव म्हणतात, आऊने मला नुसते जगविलेच नसून माणूस बनविले, दुसऱ्याच्या मुलावर प्रेम कसे करावे हे मी आऊपासून शिकलो.

जोतिराव शरीरयष्टीने मजबूत आणि सुंदर दिसत होते. वयाच्या सातव्या वर्षी त्यांना शाळेत दाखल केले. सनातनी लोकांनी गोविंदरावांचा बुध्दीभेद केला. परिणामी जोतिरावांचे शिक्षण थांबले. त्यांना शाळेतून काढण्यात आले. परंतु त्यांच्या शेजारी राहणारे लिजीटसाहेब व गफार मुन्सी बंग या ख्रिश्चन व पारसी गृहस्थांनी गोविंदरावांची समजूत काढली आणि पुन्हा जोतिरावांचे शिक्षण सुरु झाले. शालेय जीवनात जोतिरावांनी छ. शिवाजी महाराज, बुकर टी वॉशिग्टन, मॉर्टिनल्युथर, यासारख्या महापुरुषांची चारित्राचे वाचन केले. त्यांच्यावरती थॉमस पेन यांच्या 'राईटस ऑफ मॅन' तसेच अमेरिकन राज्यक्रांती व फ्रेंच राज्यक्रांतीचा प्रभाव होता. १८४० मध्ये वयाच्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह खंडोजी नेवसे पाटील यांची कन्या सावित्रीबाई हिच्याशी झाला. विवाहावेळी सावित्रीबाई ९ वर्षाच्या होत्या. त्यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी नायगाव येथे झाला. जोतिरावांनी स्वत: शिक्षण घेत असतानाच सावित्रीबाईना व सगुणाबाईना जोतिरावाची मावस बहीण आपल्या शेतातील झाडाखाली धुळपाटीवर प्राथमिक शिक्षणाचे धडे दिले. दोघीही मुळातच हुशार व जिज्ञासू असल्यामुळे त्यांनी अल्पावधीत शिक्षणात प्रगती केली. शाळेतून घरी आल्यानंतर जोतिराव सावित्रीबाईशी मानवांचे हक्क, कर्तव्ये, जातिभेद व उच्चनीय भेदभाव या विषयावर तासान तास चर्चा करत असत. या वैचारिक देवाणघेवाणीमुळे सावित्रीबाईच्या जाणिवा प्रगल्भ झाल्या. आणि जोतिराव सावित्रीबाई यांनी महाराष्ट्राच्या समाजजीवनाला आपल्या विचार व कृतीने आकार दिला.

### २.२ विषय विवेचन :

#### २.२.१ म. फुले यांचे शैक्षणिक कार्य :

भारतीय समाजाने स्त्री शुद्र व अतिशुद्रांना प्राचीन काळापासून शिक्षण समता व अधिकारांपासून वंचित ठेवले होते. व्यक्तीच्या जीवन विकासासाठी शिक्षण आवश्यक असून ते सर्व सुधारणांचे मुळ असल्याचे जोतिराव व सावित्रीबाईनी जाणले होते. मानसिक व सामाजिक व आर्थिक गुलामगिरीची शृखंला तोडण्यासाठी शिक्षण हा एकमेव पर्याय त्यांना दिसला. याविषयी जोतिराव आपल्या 'शेतकऱ्यांचा असूड' या ग्रंथात म्हणतात. ''विद्येविना मती गेली। मतीविना नीती गेली। नितीविना गती गेली। गतीविना वित्त गेले। वित्ताविना शुद्र खचले। एवढे अनर्थ एका अविद्येने केले।।''

- **म. फुलेंनी सामाजिक कार्याची पायाभरणी शिक्षणाने केली.**

**१. सावित्रीबाईंना शिक्षित केले :**

पुरुष शिकला तर तो एकटाच शिकतो पण स्त्री शिकली तर ती संपूर्ण कुंटुब शहाणे करते असे म. फुलेंचे

मत होते. स्त्री शिक्षण व त्यांच्याबाबत सुधारणा चिरंतन होण्यासाठी त्याची सुरुवात घरापासून करण्याच आग्रह म. फुले यांनी धरला. त्यांना सावित्रीबाई व सगुणाबाई यांना शेतात झाडाखाली धुळपाटीवर प्राथमिक शिक्षणाचे धडे दिले. यांनतर पुण्यातील नॉर्मल स्कुलमध्ये या दोघींना दाखल करण्यात आले. नॉर्मल स्कुलच्या प्रमुख मिसेस मिचेल यांच्याकडे तीन वर्षे शिक्षण घेतले. यानंतर सावित्रीबाईनी सन १८४९ मध्ये अहमदनगरला मिस फरारबाईच्या शाळेत शिक्षिकेचे प्रशिक्षण सहा महिन्यांत पूर्ण केले व ट्रेन्ड शिक्षिका झाल्या.

**२. मुलींसाठी शाळा सुरु केल्या :**

म. फुले यांनी पुण्यात वानवडी येथे अस्पृश्यांच्या वस्तीत पहिली शाळा १८४८ मध्ये सुरु केली. ती जून १८४८ ते ऑक्टोबर १८४८ पर्यत चालली. वयाच्या २१ व्या वर्षी जोतिरावांनी आपल्या शिक्षण प्रसाराच्या ऐतिहासिक कार्याला सुरुवात केली. यावेळी त्यांना साथ देणाऱ्या सावित्रीबाईचे वय केवळ १८ वर्षाचे होते. १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील बुधवार पेठेतील भिडे यांच्या वाडयात मुलींची शाळा सुरु केली. या शाळेने भारतीय स्त्री शिक्षणाचा पाया घातला गेला. या शाळेत पहिल्या शिक्षिका व पहिल्या मुख्याध्यापिका म्हणून सावित्रीबाईनी कार्य केले. सन १८४८ ते १८५२ या कालावधीत ज्योतिराव सावित्रीबाईनी पुणे व पुण्याबाहेर १८ शाळा सूरु केल्या. त्यातील पुणे परिसरात भिडेवाडा, महारवाडा, हडपसर, ओतूर, कसबा पेठ, वेताळपेठ येथे शाळा सुरु केल्या तर पुण्याबाहेर सासवड, नायगांव, खंडाळा, शिरवळ – खंडाळा, अंजीरवाडी, माजगांव, करंजे, सातारा या ठिकाणी शाळा सुरु केल्या.

**३. अस्पृश्यांसाठी शिक्षणाचे कार्य :**

अस्पृश्यांचा उध्दार झाल्याशिवाय सामाजिक प्रगती होणार नाही यांची म. फुलेंला जाणीव होती. म्हणून त्यांनी इ.स. १८५१ मध्ये पुण्यात अस्पृश्य मुलांच्या शिक्षणासाठी पहिली शाळा सुरु केली. अस्पृश्यांच्या सुधारणेचा मार्ग हा शिक्षणाच्या रस्त्यावरुन जातो हे ओळखणारे म. फुले हे पहिले समाजसुधारक होते. अस्पृश्यांना अज्ञान व अंधश्रध्देतून बाहेर काढण्यासाठी म. फुलेंनी इ.स १८५८ पर्यत पुण्यात अस्पृश्यांसाठी तीन शाळा सुरु केल्या. अस्पृश्यांना शिक्षण देऊन म. फुले हे अतिशय महत्त्वाचे कार्य करीत आहेत ही बाब ब्रिटीशांच्या लक्षात आली. ब्रिटीश सरकारने म. फुले यांना दक्षिणा फंडामधून मदत केली. इ.सन. १८७३ मध्ये म. फुलेनी अस्पृश्यता निवारणाचा जाहिरनामा प्रकाशित करुन मोठी सामाजिक क्रांती घडवून आणली.

**४. घर सोडले पण ध्येय सोडले नाही :**

ज्योतिराव व सावित्रीबाई स्वत: घरोघरी जाऊन पालकांना मुलींच्या शिक्षणाचे महत्व व आवश्यकता पटवून देत होते. स्त्री शिक्षण ही सुधारणांची नांदी आहे हे सनातन्यानी ओळखले. फुले दांपत्यांचे स्त्रीशिक्षणाचे कार्य सनातन्यांना समाजद्रोही व धर्मद्रोही वाटले. त्यांनी सावित्रीबाईंना शाळेत येता जाता त्रास देण्यास सुरुवात केली. त्यांना शिव्या शाप देणे, अंगावर चिखल फेकणे, दगड मारणे सुरु झाले. परंतु सावित्रीबाईनी हा त्रास सहन करुनही आपले कार्य सुरुच ठेवले. तेव्हा सनातन्यांनी ज्योतिरावांचे वडील गोविंदरावाचे कान फुंकले की कुलीन व घरंदाज स्त्रियांनी शाळेत जाऊन शिकविणे योग्य नाही. यामुळे तुमच्या कुळाची बेअब्रु होईल, धर्म बुडेल. सनातन्यांचा

व समाजाचा रोष नको याकरिता गोविंदरावांनी नाईलजाने जोतिरावांना एकतर घर सोडा किंवा शाळेत सावित्रीबाईंना शिक्षिका म्हणून काम करण्यास बंदी करा अशी आज्ञा केली. फुले दांपत्यापुढे मोठे आव्हान उभे राहिले. त्यांनी मोठया निर्धाराने घर सोडण्याचा निर्णय घेतला मात्र आपला शिक्षणाचा मार्ग सोडला नाही. उस्मान शेख व फातीमा शेख या मुस्लीम कुटुंबियाने त्यांना राहायला घर दिले तसेच शिक्षणकार्यात मोलाची मदत केली. फातिमा शेख या मुस्लिम समाजातील पहिल्या ट्रेन शिक्षिका होत्या.

**५. शिक्षणसंस्था व कार्यकारी मंडळ स्थापन केले :**

महात्मा फुले यांनी शैक्षणिक कार्याला दिशा मिळावी व गती यावी यासाठी एक कार्यकारी मंडळ स्थापना केले. कृष्णशास्त्री चिपळूणकर प्रमुख तर सखाराम परांपजे त्यांचे खनिजदार होते. १८५३ साली फुले यांनी 'नेटीव्ह फिमेल स्कुल' व 'महार मांग इत्यादी लोकांस शिकविण्याकरीता मंडळी' या नावाच्या दोन शिक्षण संस्था काढल्या. त्यांच्या शैक्षणिक कार्याला ख्रिश्चन मिशनऱ्यांनी मोठी मदत झाली. तसेच लहूजी साळवे, उस्मान व फातिमा शेख, सगुणाबाई, सदाशिवराव गोवंडे यांची महत्त्वाची मदत झाली.

**६. ज्योतिराव सावित्रीबाईचा गौरव :**

दादोबा पांडुरंग तर्खडकर हे सरकारी देशी शाळांचे पर्यवेक्षक होते. १६ ऑक्टोबर १८५१ रोजी त्यांनी बुधवार पेठेतील मुलींच्या शाळेची परीक्षा घेतली. मुलींची प्रगती पाहून त्यांनी फुले दांपत्यांचे अभिनदंन केले. मुलींच्या शाळेची दुसरी वार्षिक परीक्षा १२ फेब्रुवारी १८५३ रोजी पुना कॉलेजमध्ये झाली. २३७ मुली परीक्षा देत होत्या. हे दृश्य पहाण्यासाठी तीन हजारहून अधिक लोक जमले होते. मुलींची प्रगती पाहून त्यांनीही फुले दांपत्यांचे कौतुक केले. शिक्षणमंडळाचे जॉन वॉर्ड व पुणे महाविदयालयाचे मेजर कॅन्डी यांनी मुलींची बुध्दीमत्ता आणि प्रगती पाहून पुण्यात जाहिर कार्यक्रमात शाल देऊन फुले दांपत्यांचा गौरव केला.

**७. शिक्षणाच्या झिरपण्याच्या सिध्दांतास विरोध :**

लॉर्ड बेटींगच्या काळात भारतातील शिक्षणाबद्दल सुधारणा सुचविण्यासाठी लॉर्ड मेकॉलेच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली होती. १८३५ सालच्या या अहवालात मेकॉलेने पाश्चात्य विदया इंग्रजी भाषेतून भारतीयांना शिकवाव्यात अशी शिफारस केली. त्याचबरोबर शिक्षणाच्या झिरपण्याचा सिध्दांत मांडला होता. मेकॉलेच्या शिफारसीनूसार भारतात दिले जाणारे शिक्षण उच्चवर्णीयांना व मध्यमवर्गीयांना मिळणार होते. मग ते झिरप झिरपत हळूहळू खालच्या वर्गापर्यत पोहचणार होते. या झिरपण्याच्या शिक्षणाच्या सिध्दांताला म. फुले यांनी विरोध केला. व शिक्षण वरुन खाली न देता सर्वप्रथम खालच्या वर्गाला दयावे अशी भूमिका मांडली.

**८. सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षणाची मागणी :**

भारतात प्राथमिक शिक्षणाकडे दुर्लक्ष होते हे लॉर्ड रिपनच्या लक्षात आले त्यात सुधारणा सुचविण्यासाठी लॉर्ड रिपनच्या काळात सर विल्यम हंटरच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली गेली. १९ ऑक्टोबर १८८२ साली म. फुले यांनी या समितीपुढे निवेदन दिले. या निवेदनात त्यांनी बारा वर्षाच्या आतील मुलामुलींना सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण देण्याची मागणी केली. तसेच प्राथमिक शिक्षक शेतकरी वर्गातील असावेत, ते

प्रशिक्षीत असावेत. ब्राम्हण शिक्षक धार्मिक पूर्वग्रहामुळे कनिष्ठ वर्गीयांशी फटकून वागतात. शेतकरी वर्गातील शिक्षक त्या वर्गात अधिक सहजपणे मिसळतील. अस्पृश्यांना मुलांना शिक्षण देणारा शिक्षक जर त्याच समाजातील असेल तर अत्यंत तळमळीने तो आपले कार्य करेल. या मुलांना शिक्षण देताना त्यांच्या मुलभूत गरजांकडेही लक्ष देण्यावर त्यांनी भर दिला. म. फुलेनी अत्यंत गांभीर्याने व बारकाईने शिक्षणाबद्दल आपल्या मागण्या हंटर आयोगासमोर मांडल्या होत्या.

**२.२.१. सामाजिक कार्य :**

म. फुले यांच्या काळात समाज राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व मानसिक अशा सर्व पातळीवर गुलामगिरीच्या बंधनात जखडला होता. समाजव्यवस्थेत शुद्र, अतिशुद्र यांना दिली. जाणारी हीन वागणूक, शेतकरी व शेतमजूराचा होणारा छळ, बालविवाहाची प्रथा, विधवांचे प्रश्न, सतीची चाल, केशवपण या सामाजिक प्रश्नांकडे फुले दांपत्याने लक्ष दिले. शालेय शिक्षणापासून फुलेंच्या मनावर जॉर्ज वॉशिंग्टन, मॉर्टिन ल्युथर किंग यांच्या विचारांचा पगडा होता. फ्रेंच राज्यक्रांती, अमेरिकन राज्यक्रांती, त्यांच्या आवडीचा विषय होता. अमेरिकन विचारवंत थॉमस पेन यांच्या 'राईटस ऑन मॅन' या ग्रंथाचा त्यांच्या मनावर खोलवर ठसा उमटला होता. अशातच ते आपल्या एका ब्राम्हण मित्राच्या विवाहासाठी गेले असताना तेथे त्यांचा वरातीत अपमान झाला. हा अपमान त्यांना सामाजिक परिवर्तनाकडे घेऊन गेला. ब्राम्हणतत्वाच्या जोखडातून समाजाची मुक्तता केली पाहिजे असा तेथे त्यांनी आपल्या मनाशी निश्चय करुन ते सामाजिक कार्याकडे वळले.

**१. शैक्षणिक कार्य :**

स्त्री शुद्रातीशुद्रांच्या गुलामगिरीचे मुळ अज्ञानात आहे हे ओळखून म. फुलेनी १८४८ साली भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरु केली. १८४८ ते १८५२ या कालावधीत फुले दांपत्यांनी पुणे व पुण्याबाहेर १८ शाळा सुरु केल्या. दोन शिक्षणसंस्था स्थापून शिक्षणाची द्वारे स्त्रीशुद्रातीशुद्रांना खुली केली. अस्पृश्यांसाठी पुण्यात तीन शाळा सुरु केल्या. तसेच रात्रशाळांच्या माध्यमातून प्रौढांसाठी शिक्षण सुरु केले. शिक्षण हे पाठांतर करणारे नसावे तर ते चिकित्सा करणारे असावे अशी फुलेंची अपेक्षा होती. शिक्षण माणूस घडवणारे असावे, सत्यनिष्ठा, शीलसवंर्धन, नितीमत्ता, श्रमप्रतिष्ठा, सौजन्यशीलता, विवेकी विचार या मुल्यांना त्यांनी प्राधान्य दिले.

**२. विधवा पुनर्विवाह :**

१९ व्या शतकामध्ये भारतभर विधवा पुनर्विवाहास समाजाचा विरोध होता. बालविवाह, जरठकुमारिका विवाह पध्दतीमुळे बालविधवांचे प्रमाण मोठे होते. बालविधवा ही समाजातील फार मोठी समस्या होती. यामध्ये ब्राह्मण महिला विधवांचे प्रमाण जास्त होते. म. फुलेनी सामाजिक समस्या सोडविण्यासाठी विधवा पुनर्विवाहाचे समर्थन केले आणि गोखल्यांच्या बागेत ८ मार्च १८६४ मध्ये पहिला विधवा पुनर्विवाह घडवून आणला. ही त्या काळामध्ये सामाजिक क्रांती म्हणावे लागेल. सावित्रीबाईंनी विधवा पुनर्विवाह संस्थेची स्थापना केली. या संस्थेची सभा दर १५ दिवसांनी होत असे. यामध्ये प्रौढ स्त्रियांचे प्रश्न, विधवा स्त्रियांचे प्रश्न, त्यांच्या समाज व आप्तेष्टाकडून होणारा अवमान, स्त्रियांचे शिक्षण इत्यादी विषयांवर चर्चा होई. सभेची सांगता हळदी कुंकू समारंभाने होत असे.

### ३. बालहत्या प्रतिबंधकगृह :

१९ व्या शतकात विधवा स्त्रियांचे जीवन अतिशय खडतर होते. बालविवाह जरठकुमारिका विवाहामुळे समाजात विधवांची संख्या मोठी होती. विधवा स्त्रियांना एकतर सती जावे लागे अन्यथा वैधव्यात रहावे लागे. विधवा पुनर्विवाहाची सुधारणा त्या काळी समाजाच्या पचनी पडणे अवघड होते. यासाठी बराच कालावधी लागणार होता. काही तरुण विधवा मुली मोहास बळी पडत असत. या अभागी स्त्रिया गरोदर राहिल्या तर त्यांची क्रुर पध्दतीने निर्भर्त्सना होई. त्यांना वाळीत टाकले जाई. त्यांच्यावर बहिष्कार घातला जाई. अशा परिस्थितीत तिला जन्माला येणारे मुल मारण्याशिवाय गत्यंतर नव्हते. अशा स्त्रिया आत्महत्येस प्रवृत्त होत, ही भ्रुणहत्या थांबविण्यासाठी विधवा गरोदर स्त्रियांना आत्महत्येपासून परावृत्त करण्यासाठी फुले दांपत्यांनी २८ जानेवारी १८६३ रोजी आपल्या घरी 'बालहत्या प्रतिबंधक गृह व प्रसुतीगृह' सुरु केले. म. फुले या भारतीय व्यक्तीने सुरु केलेले हे देशातील पहिले बालहत्याप्रतिबंधक गृह होय यांच्यापासून प्रेरणा घेऊन न्या. एम.जी. रानडे लोकहितवादी या समाजसुधारकांनी पंढरपूर येथे अनाथाश्रम, बालहत्या प्रतिबंधक गृह सुरु केले. म.फुले यांनी बालहत्या प्रतिबंधक गृह व प्रसुतीगृह यांची माहिती देणारी भितिपत्रके सर्वत्र वाटली, घरांच्या भिंतीवर लावली. तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी लावली. त्यातील मजकूर असा होता की, कोणा विधवेचे अज्ञानपणाने वाकडे पाऊल पडून ती गरोदर राहिली तर येथे येऊन गुप्तपणे आणि सुरक्षितपणे बाळंत व्हा, तुम्ही आपले मुल न्यावे किंवा ठेवावे हे तुमच्या खुशीवर अवलंबून आहे. त्या मुलाची काळजी अनाथ आश्रम घेईल. म.फुले दांपत्यांनी हे काम हाती घेतले त्यावेळी त्यांची मिळकत त्यांच्या खर्चाच पुरेशी नव्हती अशाकाळात ही त्यांनी ८४ विधवा स्त्रियांची बाळंतपणे केली व त्या मुलांचा सांभाळ केला.

### ४. विधवेचे मुल दत्तक घेतले :

ज्योतिरावांना मुलबाळ नसल्याने त्यांनी दुसरे लग्न करावे असा आग्रह वडील व मित्र मंडळीनी धरला. पण ज्योतिरावांनी त्यास ठामपणे नकार दिला. पुरुषाने पहिल्या पत्नीपासून मुल होत नाही म्हणून दुसरा विवाह करावा ही अंत्यत निष्ठूर चाल आहे असे त्याचे परखड मत होते. म. फुलेंनी काशीबाई या वाट चुकलेल्या ब्राम्हण बालविधवेस आत्महत्या करण्यापासून परावृत्त केले व आपल्या घरी आणले. तिची सर्व जबाबदारी सावित्रीबाईनी घेतली. दोघांनीही काशीबाईला आई वडीलांचे प्रेम दिले. तिच्या पोटी जन्माला आलेल्या मुलाला दत्तक घेतले. त्याचे नाव यशवंत ठेवले. त्याचे संगोपन व शिक्षण केले त्यास डॉक्टर बनविले. यशवंतरावांनीही समाजसेवेतच आपला देह ठेवला.

### ५. नाभिक बांधवांचा संप :

पतीच्या निधनानंतर विधवा स्त्रीकडे समाजाची वाईट नजर जाऊ नये म्हणून विधवा स्त्रीचे केशवपन करुन तिला विद्रुप केले जाई. सकेशा विधवा मरण पावली तर तिच्या प्रेत संस्कारास धर्ममार्तंडाकडून हरकत घेतली जाई. विधवेच्या प्रेताचे क्षौर (मुंडण) केल्याशिवाय त्यास दहनासाठी शुध्द मानले जात नसे. केशवपनाची ही पध्दत ब्राम्हणांनी रुढ केली होती. ही अमानुष चाल बंद करण्यासाठी फुले दांपत्यांनी पुणे, मुंबई येथील नाभिकांची २३ मार्च १८९० रोजी मुंबई येथे परिषद घेतली. परिषदेस ५०० नाभिक उपस्थित होते. या परिषदेत

फुले दांपत्याने विधवा स्त्रियांवर होणारा अन्याय त्यांची विटंबना यांची माहिती दिली. तसेच नाभिक बांधवांनी विधवांचे केशवपन करु नये असे आवाहन केले. त्यास साथ देऊन नाभिक बांधवांनी स्वत:ची आर्थिक हानी होत असतानाही संप करुन सामाजिक कार्यास साथ दिली. विधवांचे केशवपन करण्याचे काम त्यांनी बंद केले. भारताच्या इतिहासातील नाभिक बांधवाचा हा पहिला ऐतिहासिक संप होय. या संपाची दखल इंग्लंडमधील 'लंडन टाईम्स' या वृत्तपत्राने घेऊन मुखपृष्ठावर ही बातमी छापली. इंग्लंडमधील भगिणींनी वर्गनी गोळा करुन या भारतीय नाभिकांना बहिणबीज म्हणून पाठविली.

### ६. दुष्काळग्रस्तांना मदत :

महाराष्ट्रात इ.स १८७७ साली मोठा दुष्काळ पडला. या दुष्काळात हजारो लोक मृत्यूमुखी पडले. हे पाहून म. फुले यांचे मन द्रवले आणि त्यांनी कॉन्ट्रक्टरच्या व्यवसायातून मिळवलेला सर्व पैसा दुष्काळग्रस्तांसाठी खर्च करुन हजारो लोकांचे प्राण वाचविले. सतत नऊ महिने त्यांनी दोन हजार लोकांना जेवायला घालून महाराष्ट्रात मोठा आदर्श निर्माण केला.

### ७. कामगार चळवळ :

कामगारांच्या प्रगतीसाठी म. फुले यांनी कार्य केले. त्यांच्या नेतृत्वाखाली नारायण मेघाजी लोखंडे यांच्या सहकार्याने १८७९ साली मुंबई येथे गिरणी कामगारांचा संघ स्थापन होऊन महाराष्ट्रातील पहिली कामगार चळवळ उभी राहिली. म.फुले यांच्या प्रयत्नामुळे सरकारला कामगारांच्या सुधारणेकडे लक्ष दयावे लागले.

### ८. अस्पृश्योध्दाराचे कार्य :

हिंदू धर्मामध्ये हजारो वर्षापासून वर्णव्यवस्था चालत आली आहे. उच्चवर्णीयाकडून अस्पृश्यांना अत्यंत हीन वागणूक दिली जात होती. अस्पृश्यांना गावकुसाबाहेर राहावे लागे. अस्पृश्यांना सकाळ व संध्याकाळी गावातून फिरण्यास मज्जाव होता. थुंकण्यासाठी गळयात मडके व पावलांचे ठसे पुसण्यासाठी कमरेला खराटा बांधून दुपारच्या वेळी अस्पृश्यांना गावात येण्यास परवानगी होती. त्यांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. सार्वजनिक जीवनात त्यांचा कसलाही सहभाग नव्हता. उपेक्षित जीवन जगावे लागणाऱ्या या घटकासाठी फुले दांपत्यांनी त्या काळात लढा उभारला. वर्णभेदाविरुध्द आवाज उठविण्यासाठी त्यांना शिक्षणाचा प्रभावीपणे प्रचार आणि प्रसार केला. अस्पृश्यांमध्ये आपल्या हक्क व कर्तव्याची जाणीव व्हावी याकरीता स्वखर्चाने १८५२ मध्ये वेताळ पेठेत अस्पृश्यांसाठी एक शाळा सुरु केली. १८५३ साली त्यांनी 'महार मांग इत्यादी लोकांस विद्या शिकविण्याकरीता मंडळी' या नावाची संस्था स्थापन केली. या संस्थेमार्फत १८५८ सालापर्यत पुण्यामध्ये तीन शाळा सुरु केल्या. हंटर आयोगापुढे साक्ष देतानाही म. फुले यांनी अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी शासनाने प्रयत्न करावेत अशी मागणी केली. पुण्यातील अस्पृश्य लोकांना पाण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत होता. म्हणून फुले दांपत्यांनी १८६८ मध्ये आपल्या घरातील पाण्याचा हौद अस्पृश्य लोकांसाठी खुला केला. अस्पृश्य स्त्रियांच्यात सुधारणा करण्यासाठी सावित्रीबाई आग्रही होत्या. त्यांनी पुण्याच्या कलेक्टरांच्या पत्नी मिसेस जोन्स यांच्या अध्यक्षतेखाली 'महिला सेवा मंडळा'ची स्थापना केली. १४ जानेवारी १८५२ रोजी मकर संक्रातीदिवशी

हळदीकुंकू व तिळगुळवाटप कार्यक्रम घेतला. या कार्यक्रमाला उपस्थित सर्व स्त्रिया एकाच सतरंजीवर एकत्र बसल्या. उच्चनीचता, जातिभेद न मानता एकमेकींना हळदी कुंकू लावले आणि तिळगूळ वाटण्यात आले. यावरुन सावित्रीबाईंचा पुरोगामी विचार व स्त्री शुद्रांपती असणारी तळमळ कळते.

**● स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – १**

**अ) खालील उपप्रश्नामध्ये विधाने व पर्याय दिले आहेत. त्यातील अचूक पर्याय निवडून वाक्य पून्हा लिहा**

१. शिक्षणातील झिरपण्याचा सिध्दांत म्हणजे काय?

अ) प्रथम उच्चवर्गाला शिक्षण दिल्यास ते झिरपत कनिष्ठ वर्गापर्यत जाणारे

ब) उच्च शिक्षितांकडून अल्प शिक्षितापर्यत जाणारे शिक्षण

क) शुद्र वर्गाकडून कुटुंबातील सर्वापर्यत जाणारे शिक्षण

ड) स्त्री वर्गाकडून कुटुंबातील सर्वापर्यत जाणारे शिक्षण

२. लॉर्ड मेकॉलेने भारतीयांच्या शिक्षणासाठी कोणत्या पध्दतीच्या शिक्षणाची शिफारस केली?

अ) निवासी ब) बहिस्थ क) पौर्वात्य ड)पाश्चात्य

३. स्त्री शिक्षणासाठी म. फुले यांनी स्थापन केलेल्या संस्थेचे नाव काय होते ?

अ) स्त्रि शिक्षण संस्था ब) नेटिव्ह फिमेल स्कुल

क) फिमेल एज्युकेशन संस्था ड) बालिका शिक्षण संस्था

४. अस्पृश्य वर्गाला शिक्षण देण्यासाठी म.फुले यांनी स्थापन केलेल्या संस्थेचे नाव काय होते?

अ) महार मांग इत्यादी लोकांस विदया शिकविण्याकरीता मंडळी

ब) ब्राम्हण ब्राम्हणोत्तर इत्यादी लोकांस विदया शिकविण्याकरीता मंडळी

क) ढोर चांभार इत्यादी लोकांस विद्या शिकविण्याकरीता मंडळी

ड) रामोशी, बेरड इत्यादी लोकांस विद्या शिकविण्याकरीता मंडळी

५. समाजसुधारणेसाठी म.फुले यांनी शिक्षणाचा आग्रह का धरला?

अ) शिक्षणाशिवाय आर्थिक शोषण बंद होणार नाही

ब) शिक्षणाशिवाय समाजपरिवर्तन होणार नाही

क) समाजस्वास्थ व समतेसाठी

ड) गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी

**ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. महात्मा फुले यांचा जन्म केव्हा व कोठे झाला ?

२. पेशवाईचा शेवट केव्हा झाला ?

३. म. फुले यांनी मुलींसाठी पहिली शाळा केव्हा व कोठे सुरु केली ?

४. राईटस ऑफ मॅन हा ग्रंथ कोणी लिहीला ?

५. म. फुले यांनी हंटर आयोगासमोर केंव्हा निवेदन दिले ?

### २.२.२ सत्यशोधक समाज :

**● सत्यशोधक समाजाची स्थापना :**

बहुजन समाजाला मानसिक बौध्दिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी म.फुले विचारमग्न होते. सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी एका संस्थेची स्थापना करण्याचे त्यांनी ठरविले. म.फुले व त्यांची समविचारी मंडळी पुणे येथे फुलेंच्या घरी जमली आणि २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना झाली. धार्मिक व सामाजिक गुलामगिरी नष्ट करणे हे या समाजाचे प्रमुख उद्दिष्ट होते. 'सर्वसाक्षी जगत्पती, त्याला नकोच मध्यस्थी' हे या समाजाचे ब्रीदवाक्य होते.

**१. सत्यशोधक समाजाची तत्वे :**

म.फुले यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म' नावाचा ग्रंथ लिहीला. या ग्रंथातून आपणास सत्यशोधक समाजाची महत्वाची तत्वे कळू शकतात.

१. निर्मिक या सृष्टीचा निर्माता असून तो सर्वव्यापी, निर्गूण आणि सत्यमय आहे.

२. सर्व मानवजात ही निर्मिकाची मुले असून तोच सर्वाचा आई-बाप आहे.

३. निर्मिकाकडे जाण्यासाठी कोणाही मध्यस्थाची आवश्यकता आपणास नाही.

४. स्त्री-पुरुष समान आहेत. त्यांना समान हक्क व अधिकार आहेत.

५. स्वर्ग व दैववाद सत्यशोधक समाजास मान्य नाही.

६. सर्व मानवजात समान आहे. जातिभेद व अस्पृश्यता या दोषांचा त्याग करावा.

७. आकाशातील ग्रहांचा मानवी जीवनावर परिणाम होत नाही.

सार्वजनिक सत्यवर्तनींसाठी त्यांनी ३३ नियम 'सार्वजनिक सत्यधर्म' या ग्रंथांत दिले आहेत. ही तत्वे मान्य असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला या समाजाचे सभासद होता येईल.

## २. सभासदांची कर्तव्ये :

सभासदांच्या कर्तव्याविषयी म.फुले यांनी काही नियम घालून दिले होते. ते पुढीलप्रमाणे -

१. सभासदांनी सत्याचा प्रसार लोकांत करावा.

२. सदविचारांचा प्रचार जनतेत वाढेल याकरिता सभासदांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करावा.

३. लोकांना मानवी हक्क आणि कर्तव्याची जाणीव करुन द्यावी. त्यासाठी सभासदांनी विविध वृत्तत्रातून लेख लिहावेत किंवा व्याख्याने देऊन समाजात जागृती घडवून आणावी.

४. समाजातील अनिष्ट चालीरीती व दुर्गुण नष्ट करण्यासाठी सभासदांनी प्रयत्न करावेत.

५. सभासदांनी जातिभेद पाळू नयेत.

- **सत्यशोधक समाजाची वाटचाल व कार्य :**

## १. सभा व व्याख्याने :

२४ सप्टेंबर १८७३ पासून सत्यशोधक समाजाची वाटचाल सुरु झाली. इ.स. १९३० पर्यंत या समाजाच्या वाटचालीचा इतिहास विस्तृत आहे. इ.स. १८७५ पासून दर रविवारी या समाजामार्फत प्रार्थना सभा घेण्यात येई. पंधरा दिवसातून व्याख्यानाचे आयोजन केले जाई. ज्यामुळे वैचारिक देवाण घेवाण होवून ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या गेल्या. अनेक गावात सत्यशोधक समाजाच्या शाखा स्थापन झाल्या. मोठमोठे हुद्देदार, वकील, व्यापारी, शेतकरी अशा वर्गातील लोक सहभागी झाले होते. तसेच मराठा, माळी, रजपूत, ब्राम्हण, सोनार, कासार, गोसावी, जती, मारवाडी, अस्पृश्य, मुसलमान अशा अनेक जातीधर्माचे लोक या सत्यशोधक समाजाचे सभासद झाले हाते.

## २. विद्यार्थ्यांना मदत :

विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान वाढावे याकरिता सत्यशोधक समाजाच्या वतीने सातत्याने विविध उपक्रम राबविले जात. वक्तृत्वस्पर्धा, निबंधस्पर्धा आयोजित करुन विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिला जाई. पैशा अभावी शिक्षण घेऊ न शकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाई. पुण्यात शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची राहण्याची गैरसोई होई, ती दूर करण्यासाठी सत्यशोधक समाजाच्यावतीने ' सुशिक्षणग्रह' नावाचे वसतिगृह पुण्यात सुरु केले.

## ३. 'दीनबंधू' चळवळीचे मुखपत्र :

कोणतीही चळवळ समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत पोहचविणे, चळवळीची तत्वे, कार्य, घडामोडी लोकांना समजावून सांगण्याचे कार्य वृत्तपत्र अत्यंत उत्कृष्ठरित्या करत असते. वृत्तपत्र हा त्या चळवळीचा आरसा असतो हे ओळखून म.फुले यांनी १८७७ साली 'दीनबंधू' हे वृत्तपत्र सुरु केले. दीनबंधूच्या माध्यमातून सत्यशोधक समाजाची जनतेला अधिक व्यापक प्रमाणात माहिती होऊ लागली. नारायण मेघाजी लोखंडे यांनी

या वृत्तपत्राच्या संपादक पदाची धूरा उत्कृष्टरित्या सांभाळली. सत्यशोधक समाजाची तत्वे, ध्येयधोरणे, वाटचाल, समाजातील ज्वलंत प्रश्न निर्भीडपणे जनतेसमोर व सरकारसमोर मांडण्याचे कार्य 'दीनबंधू' या वृत्तपत्राने केले.

**४. गिरणी कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडली :**

औद्योगिक क्रांतीचे पडसाद भारतातही उमटले. मुंबईमध्ये अनेक ठिकाणी कापडगिरण्या सुरु झाल्या. या कापडगिरण्यात काम करणाऱ्या कामगारांची गिरणीमालक हरतऱ्हेने पिळवणूक करीत. कामगारांचे अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य व शिक्षणाचे प्रश्न अत्यंत बिकट बनले होते. नारायण मेघाजी लोखंडे यांनी दीनबंधूच्या माध्यमातून गिरणीकामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडली. सरकारचे लक्ष्य कामगारांच्या विविध समस्यांकडे वळविले. दीनबंधूच्या प्रयत्नामुळे गिरणी कामगारांच्या जीवनमानात सुधारणा झाली.

**५. दुष्काळग्रस्तांना अन्नछत्रे सुरु केली :**

सन १८७६-७७ मध्ये महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला. सामान्य माणसे अन्नान करुन मरु लागली. वैरणकाडी अभावी जनावरे उपाशी मरु लागली. अशा भीषण परिस्थितीतून समाजाला वाचविण्यासाठी जोतिराव व सावित्रीबाईंनी अनेक मदत केंद्रांची उभारणी केली. सावित्रीबाईंच्या देखरेखीखाली सत्यशोधक समाजामार्फत बावन्न ठिकाणी अन्नछत्रे उघडण्यात आली होती. सुमारे दोन हजार मुलांच्या जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. सलग एक वर्षभर ही अन्नछत्रे सुरु होती. सावित्रीबाई स्वत: आपल्या सहकारी भगिनींसोबत भाकरी बनवून या मुलांना खायला घालत. त्यांनी धनिकांना तसेच सरकारला लोकांसाठी मदतीचे आवाहन केले. म.फुलेंनी बांधकाम व्यवसायातून मिळालेला सर्व पैसा दुष्काळग्रस्तांसाठी खर्ची घातला. त्यांच्या या कार्यामुळेच या भीषण दुष्काळात हजारो दीन दलितांचे प्राण वाचले.

**६. शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली :**

१९ व्या शतकाच्या शेवटी भारतात मोठया प्रमाणात दुष्काळ पडले. दुष्काळामुळे शेतकरी कर्जबाजारी झाला. कर्ज माफ करण्यासाठी त्याला जमिनी विकाव्या लागल्या. अशा गंभीर परिस्थितीत दुष्काळामुळे शेतकरी कर्जबाजारी झाला. दीनबंधु हे साप्ताहिक शेतकऱ्यांच्या मदतीला धावून आले. या साप्ताहिकातून 'असुडाचे निंबध' प्रकाशित होऊ लागले या निबंधानी सरकारमध्ये खळबळ उडवून दिली. शेवटी सरकारला डेक्कन ॲग्रीक्चरल रिलीफ ॲक्ट करावा लागला.

**७. सत्यशोधक विवाह :**

सत्यशोधक समाजाने पुरोहित नाकारुन साध्या पध्दतीने, हुंड्याशिवाय कमी खर्चातले विवाह लावायचा कार्यक्रम हाती घेतला. २५ डिसेंबर १८७३ रोजी पहिला सत्यशोधक विवाह राधा व सीताराम आल्हाट यांचा लावण्यात आला. देशाच्या हजारो वर्षातल्या धार्मिक परंपरा नाकारुन त्याविरुद्ध विधायक विद्रोह करणारे जे क्रांतीकारी पाऊल समाजाने उचलले त्यात सावित्रीबाईचा पुढाकार होता. दत्तकपुत्र यशवंतचा विवाह ही लक्ष्मीशी ४ फेब्रुवारी १८८९ रोजी सत्यशोधक पध्दतीने लावला. समाजाच्या वतीने लावण्यात आलेल्या

सत्यशोधक विवाहांना भटजींनी देशभर विरोध केला, कोर्ट कचेऱ्या झाल्या. सावित्रीबाई ज्योतिरावांना अपार त्रास झाला. पण ते डगमगले नाहीत.

सत्यशोधक विवाहपध्दतीने बोहल्यावर चढलेल्या नवऱ्या मुलाने स्त्री शिक्षणाची आणि स्त्रीयांना समान हक्क देण्याची प्रतिज्ञा करायची असते. यातील मंगलाष्टके स्वत: नवरा नवरी म्हणतात. मंगलाष्टके दुसरे तिसरे काही नसून प्रतिज्ञा आहेत. त्या प्रतिज्ञेत सर्वासमक्ष वधू वराला उद्देशून म्हणते,

''स्वांतत्र्यानुभवाची ओळख आम्हा, झाली नसे मानशी ।

यासाठी अधिकार देशिल स्त्रिया घे आण त्याची अशी ।।''

वधूच्या या मागणीवर वर वचन देतो

''स्थापाया अधिकार मी झटतसे या बायकांचे सदा।

खर्चाया न मनी मी किमपिही सर्वस्व माझे कदा ।।''

१५० वर्षापूर्वी म. फुले स्त्रीयांच्या अधिकाराविषयी किती जागरुक होते व दुरदृष्टीचे समाजसुधारक होते याची साक्ष पटते. सत्यशोधक विवाह हा पवित्र संस्कार व जबाबदार वधु वरांचा करार होता. वयात आल्यावर मुलीने वडीलांचा सल्ला व सारासार विचारपूर्वक निवड करुन पतीशी पंचासमक्ष प्रतिज्ञापूर्वक विवाह केला जाई. विवाह करताना मुलामुलींचे वय गुण (स्वभाव वैशिष्ट्ये) व प्रीत पाहून विवाह करावा अशी मार्गदर्शक तत्त्वे या विवाह पध्दतीत होती.

**८. प्रतिसंस्कृतीचे निर्माते :**

म. फुले यांनी सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून बहूजन समाजाला पर्यायी संस्कृती दिली. सार्वजनिक सत्यधर्म व गुलामगिरी या ग्रंथात या पर्यायी संस्कृतीची मांडणी स्पष्टपणे जाणवते. हिंदू धर्मातील अनिष्ट भेदाभेद करणारे, गुलामगिरी जोपासणारे व शारिरीक, आर्थिक आणि मानसिक शोषण करणारे सर्व सण - उत्सव, विधी यांना म. फुले यांनी विरोध केला आणि समतावादी व मानवतावादी पर्यायी सण - उत्सव व विधी सत्यशोधक समाजाच्या वतीने देण्यात आले. पुरोहिताशिवाय लग्न लावण्यासाठी मराठी मंगलाष्टके त्यांनी रचली. जावळ, नामकरण, विवाह, अंत्यविधी, श्राध्द या विधींना त्यांनी पर्यायी रुप दिले. सत्यशोधक विवाह, सत्यशोधक वास्तुशांत, बळीराजाचा गौरव करणारा दिवाळी सण या सर्वामुळे महात्मा फुले यांना प्रतिसंस्कृतीचे जनक म्हटले गेले.

**९. एक निर्मिक एकधर्म :**

महात्मा फुले हे एकेश्वर वादाचे पुरस्कर्ते होते. सत्यशोधक समाज 'निर्मिक' हा एकच ईश्वर मानत होते. 'निर्मिक' परिपूर्ण असून त्याला कशाचीही गरज नाही. निर्मिकाचा आदर करावा पण त्याची पुजा करु नये. म. फुले एक निर्मिक एकधर्म या विषयी म्हणतात की,

''मानवाचे धर्म नसावे अनेक । निर्मिक तो एक । ज्योती म्हणे ।।
कोणास न पिडी । कमवले खाई । सर्वा सुख देई आनंदात ।।
खरी हीच नीती । मानवाचा धर्म । बाकीचे अधर्म । जोती म्हणे ।।''

**१०. विश्वकुटुंबाचा जाहिरनामा :**

म. फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्म या ग्रंथात सार्वजनिक सत्यधर्माचे अधिष्ठान मानवी स्वांतत्र्य, समता व विश्वबंधूत्व या तत्त्वावर अधिष्ठित केले. हा ग्रंथ विश्वकुटुंबाचा जाहिरनामाच आहे, असे मत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मांडले आहे. म.फुले म्हणतात की,

धर्म, राज्यभेद मानवा नसावे । सत्याने वागावे । ईशासाठी ।।
ख्रिस्त, महंमद, मांग, ब्राह्मणाशी । धरावे पोटाशी बंधूपरी ।।
निर्मिकांचा धर्म सत्य आहे एक । भांडणे अनेक । कशासाठी।।''

सर्व समाज एकाच निर्मिकाची लेकरे आहेत मग धर्म, राज्य जात पात यावरुन माणसा - माणसात भेदभाव का करावा ? असा प्रश्न ते उपस्थित करतात. ख्रिश्चन मुस्लीम, मांग व ब्राम्हण या सर्वांना बंधूभावाने पोटाशी धरावे ही त्यांची वैश्विक बंधूभावाची भावना दिसते. म. फुलेंच्यामते एकाच कुटुंबात राहणारी आई बौध्दधर्मीय वडील - इस्लामधर्मीय मुलगी, ख्रिश्चनधर्मीय तर मुलगा सार्वजनिक सत्यधर्माचा आचरण करणारा असू शकतो. म. फुलेंचा हा विश्वकुटुंबाचा विचार काळाच्या कित्येक शतके पुढचा आहे. परंतु येणाऱ्या काही शतकामध्ये हा विचार प्रत्यक्ष व्यवहारात येताना दिसून येईल. यात शंका नाही कारण मानवाला जेव्हा खरा धर्म समजेल तेव्हा तो आपापसात धर्माच्या प्रश्नावरुन भांडणार नाही. याविषयी म. फुले म्हणतात

''जगामाजी धर्म अंगणीत होती । लढाया खेळती द्य रेडयापरी ।।
रेडे धरणारे प्राणास मुकती । कित्येक म्हणती । स्वर्गी गेले ।।
कोण म्हणे सर्व मार्टर झाले । जन्नतीस गेले । कोणी म्हणे ।।
सदविवेकावीण सर्व भांबावले । रक्तपाती झाले । जोती म्हणे ।।''

**११. म. फुले नंतर सत्यशोधक समाजाची वाटचाल :**

२८ नोव्हेंबर १८९० रोजी म. फुले यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर सावित्रीबाईनी ही चळवळ जोमाने पुढे सुरु ठेवली. १८९६ - ९७ साली महाराष्ट्रात प्लेगच्या साथीने धुमाकूळ घातला. अशावेळी सावित्रीबाईनी आपला डॉक्टर मुलगा यशवंत याच्या मदतीने प्लेग निवारण्याचे कार्य सुरु केले. मुंढवा गावातील प्लेगने ग्रासलेल्या पांडुरंग गायकवाड या दलित मुलास सावित्रीबाईनी स्वत: पाठीवर घेऊन उपचारासाठी दवाखान्याकडे येत असतानाच त्यांना प्लेगचा उपसर्ग झाला. प्लेगशी लढत लढताच दि १० मार्च १८९७ रोजी सावित्रीबाईचा वयाच्या ६८ व्या वर्षी मृत्यू झाला. सावित्रीबाईच्यानंतर या समाजाची धुरा डॉ. विश्वास रावजी, कृष्णराव भालेकर यांनी समर्थपणे सांभाळली. मधल्या काळात सत्यशोधक समाजाचे विस्कळीत झालेले कार्य भास्करराव

जाधव यांनी सुरळीत केले. इ.स.१९११ साली त्यांनी सत्यशोधक समाजाचे अधिवेशन पूणे येथे होऊन सत्यशोधक समाजाला चैतन्य आणले. याकामी त्यांना राजर्षी शाहू महाराजांची मोठी मदत झाली. सत्यशोधक चळवळीने ब्राम्हणेत्तर चळवळीचा पाया घातला. इ.स १९३० नंतर ब्राम्हणेत्तर पक्ष स्वांतत्र्य मिळविण्यासाठी कॉग्रेसमध्ये सामील झाला आणि सत्यशोधक समाजाची चळवळ थंडावली.

- **स्वंय अध्यायानासाठी प्रश्न २**

**अ) खालील उपप्रश्नांमध्ये विधान व पर्याय दिले आहेत. त्यातील अचूक पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा**

१. म.फुले यांनी ईश्वरास कोणत्या नावाने संबोधले आहे ?

अ) परमेश्वर ब) निर्मिक क) देव ड) यापैकी नाही

२. 'सर्वसाक्षी जगत्पती त्याला नकोच मध्यस्थी' हे ब्रीदवाक्य कोणत्या समाजाचे होते ?

अ) सत्यशोधक समाज ब)प्रार्थना समाज क) आर्य समाज ड) ब्राम्हो समाज

३. प्रतिसंस्कृतीचे जनक कोणास म्हटले आहे ?

अ) सावित्रीबाई फुले ब) गो.ग.आगरकर क) महात्मा फुले ड) नारायण लोखंडे

४. म.फुले यांनी विश्वकुटुंबाचा जाहिरनामा कोणत्या ग्रंथांत मांडला आहे ?

अ) गुलामगिरी ब) तृतीय नेत्र क) सत्सार ड) सार्वजनिक सत्यधर्म

५. प्लेग निवारण्याचे कार्य करताना सावित्रीबाईचा मृत्यू केव्हा झाला?

अ) १० मार्च १८९७ ब) १० मार्च १८९६ क)१० मार्च १८९८ ड) १०मार्च१८९०

**ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा**

१. सत्यशोधक समाजाची स्थापना कोठे व कधी झाली ?

२. सार्वजनिक सत्यधर्म ग्रंथात सार्वजनिक सत्यवर्तनीसाठी किती नियम सांगितले आहेत ?

३. सत्यशोधक समाजाची स्थापना कोणी केली ?

४. सत्यशोधक समाजाच्या मुखपत्राचे नाव काय होते ?

५. पहिला सत्यशोधक विवाह कधी व कोणाचा झाला ?

## २.२.३. महात्मा फुले यांचे 'शेतकऱ्यांचा असूड' व 'गुलामगिरी'तील विचार

- **शेतकऱ्यांचा असूड :**

'शेतकऱ्यांचा असूड' या ग्रंथाचे लेखन महात्मा फुले यांनी १८ जुलै १८८३ रोजी पूर्ण केले. या ग्रंथात

एकूण ५ प्रकरणे आहेत. शेतकऱ्यांचा आक्रोश 'शेतकऱ्यांचा असूड' या ग्रंथामध्ये समग्रपणे मांडले आहे. शेतकऱ्यांची पूर्वस्थिती, त्यांची सध्य:स्थिती, त्यांचे होणारे शोषण, त्यांचे अज्ञान, त्यांच्या हालअपेष्ठा व त्यांवरील उपाय या संदर्भातील महात्मा फुले यांचे अनुभव, विचार आणि चिंतन 'शेतकऱ्यांचा असूड' या ग्रंथात एकवटले आहेत. या ग्रंथात त्यांनी शेती आणि शेतकरी यांचा समग्रपणे आणि सुसंगतपणे विचार केला आहे. हा ग्रंथ प्रामुख्याने भारतातील मध्यम व कनिष्ठ प्रतीच्या शेतकऱ्यांची हालाखी व दु:खे प्रकट करणारा आहे. या ग्रंथांतील विचार पुढीलप्रमाणे,

**१. अज्ञानाने शेतकऱ्यांची दैना :**

शेतकऱ्यांची सतत पिळवणूक करता यावी याकरिता त्याला भटजी, इंग्रज व सावकार हे नेहमी अज्ञानात ठेवू इच्छितात. शेतकरी अज्ञानी राहिल्यामुळे त्यांची झालेल्या दैनाविषयी म.फुले म्हणतात, ''विद्येविना मती गेली । मतीविना नीती गेली । नीतीविना गती गेली । गतीविना वित्त गेले । वित्ताविना शुद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।''

**२. विद्येने शेतकऱ्यांचे कल्याण :**

शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा गैरफायदा भटजी, शेटजी व लाटजी घेतात. त्यामुळे शेतकरी अधिकच गरीब बनतो. म्हणून शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण थांबविण्यासाठी त्यांना शिक्षण देणे गरजेचे आहे, असे महात्मा फुले म्हणतात. त्यांच्यामते 'शेतकरी विद्वान झाल्याबरोबर ते आपल्या खांद्यावर असूड टाकून लक्ष्मीस पुढे घालून आपल्या घरी आणून नांदावयास लावण्याकरिता कधी मागेपुढे पाहणार नाहीत. या भयास्तव ते शेतकऱ्यास विद्वान करीत नाहीत.

**३. भटजीकडून शेतकऱ्यांची लुबाडणूक :**

शेतकऱ्यांच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत ग्रामव्यवस्थेतील उच्चवर्णिय ब्राम्हण आपल्या उच्चवर्णियत्वाचा फायदा घेऊन शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण कसे करतात याचे विवेचन महात्मा फुले यांनी या ग्रंथात पहिल्या प्रकरणात केले आहे. शेतकऱ्यांच्या मुलीस ऋतूप्राप्ती झाली की, ऋतूशांती केली पाहिजे हे भट-ब्राह्मण शेतकऱ्यांना पटवून देत, त्या मुलीला निसर्गक्रमानुसार गर्भ राहिला आणि मूल झाले की खोट्या कुंडल्या करुन जपानुष्ठानाचे निमित्ताने जेवण व पैसे उकळायचे, म्हणजे शेतकऱ्यांच्या जन्मापासूनच नव्हे तर त्याही आधीपासून त्यांच्या शोषणाला प्रारंभ होत असे. मुलांच्या लग्नाच्या वेळी लग्नसमारंभात, घर बांधताना आणि मृत्यूच्या वेळीही हे भट ब्राह्मण तयारच असत. तसेच चैत्रातील वर्षप्रतिपदा, रामनवमी, हनुमानजयंती, नागपंचमी, श्रावणी पौर्णिमा, श्रावणातले सगळे सोमवार, हरितालिका, गणेश चतुर्थी, ऋषिपंचमी, अनंतचतुर्दशी, विजयादशमी, अमावस्येची लक्ष्मीपूजा, बलिप्रतिपदा, तुळशीचे लग्न, मकर संक्रांत, महाशिवराषी, होळी इ. अनेक सण शेतकऱ्यांचे द्रव्यहरण करण्यासाठीच होते. याशिवाय तीर्थयात्रा आणि जत्रेच्या निमित्तानेही शेतकऱ्यांची लूबाडणूक केली जाई. शेतकरी हा या भट-ब्राह्मणांच्या दृष्टीने कायम सोन्याची अंडी देणारी कोंबडी होती. ही सोन्याची अंडी न थांबविण्यासाठीच अनेक स्मृती आणि ग्रंथांची निर्मिती ब्राह्मणांनी केली असे महात्मा फुले नमूद करतात.

**४. नोकरशाहीकडून शेतकऱ्यांची लूबाडणूक :**

म.फुले यांनी या ग्रंथात दुसऱ्या प्रकरणात भट कामगारांच्या लाचखाऊपणाचे आणि शेतकऱ्यांच्या छळाचे सविस्तर चित्रण केले आहे. इंग्रजी राजवटीत ब्राह्मणांनी सरकारी नोकऱ्यात प्रवेश केला. महसूल खाते, जंगल खाते, न्यायखाते, शिक्षण खाते, पोलिस खाते, इत्यादी ठिकाणी ब्राह्मणांनी नोकऱ्या मिळविल्या. शेतकऱ्यांमध्ये भांडणे सुरु झाले की या भट कामगारांचे फावत असे. दोन्ही पक्षांकडून पैसे उकळणे आणि सरकारी कामासाठी लाच खाणे हा त्यांचा नित्याचा बाणा होता. स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी संबंध शासनयंत्रणा आणि न्यायव्यवस्था हे भट कामगार राबवून घेत.

**५. सावकार मारवाडीकडून शेतकऱ्यांची लूबाडणूक :**

तिसऱ्या प्रकरणामध्ये सावकार मारवाडीकडून शेतकऱ्यांची केली जाणारी लूबाडणूक चित्रीत केली आहे. भटजी व नोकरशाहीच्या आर्थिक पिळवणुकीमुळे शेतकरी कर्जबाजारी होतो. तो पैशासाठी सावकार – मारवाडी म्हणेल त्या व्याजदरात कर्ज घेतो व अधिकच कर्जबाजारी होतो.

**६. शेती व शेतकरी यांची दयनीय अवस्था :**

शेतकऱ्यांच्या दुर्दशेचे, दयनीय अवस्थेचे, कर्जबाजारीपणाचे आणि या सर्वाचा परिणाम म्हणून झालेल्या त्यांच्या भ्रमिष्ट अवस्थेचे, उध्वस्थेचे मोठे परिणामकारक चित्र त्यांनी या ग्रंथाच्या चौथ्या प्रकरणात रेखाटले आहे.

**७. शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी उपाय :**

पाचव्या प्रकरणात महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठीचे उपाय सुचविले आहेत. शेतकऱ्यांच्या जीवनाचा विकास शेती सुधारल्याशिवाय होणार नाही हे म.फुले यांनी ओळखले होते. म्हणूनच शेतकऱ्यांच्या वैयक्तिक जीवनातील सुधारणांबरोबरच त्यांच्या शेतीचा विकास झाला पाहिजे असा आग्रह त्यांनी धरला. शेतकऱ्यांच्या नैतिकते बाबत त्यांनी बालविवाह व बहुविवाहास विरोध, व्यसनाधीनता व वाघ्यामुरळीच्या गाण्यांवर बंदी, तसेच शिक्षीत व्हावे इत्यादी उपाय सुचविले आहेत.

शेती सुधारण्यासाठी शेतकऱ्यांना शेती संबंधीचे अत्याधुनिक ज्ञान मिळावे, त्यासंबंधीचे ग्रंथ त्यांना उपलब्ध व्हावेत, उत्तम प्रतीचे बैल व जनावरांना चरण्यासाठी जंगले असावीत, वाहणाऱ्या पाण्याला अडवून पोलीस व सैन्यामार्फत बंधारे घालावेत. शेतकऱ्यांना पिक संरक्षणासाठी बंदूक परवाना, कृषी माहिती पुस्तिका सरकारने पुरवाव्यात. तसेच शेतीला जोडधंदा असावा आणि शेतीवरील कर सरकारने माफ करावा, जेणेकरून शेतकरी अधिक जोमाने काम करेल इत्यादी उपाय महात्मा फुले यांनी सुचविले.

**८. समग्रविकासाचे संकल्पचित्र :**

महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्यांचा असूड' या ग्रंथामध्ये शेती आणि शेतकरी यांच्या समग्र विकासाचे संकल्पचित्र प्रकाशित केले. शेतीचे शिक्षण, संकरित बियाणे, अवजारे, पीकपध्दती, शेतीला जोडधंदे, 'पाणी अडवा पाणी जिरवा' या मोहिमेद्वारे पाणीपुरवठ्याचे नियोजन आधुनिक पध्दतीने करण्यावर त्यांनी भर दिला.

शेतीमालाला 'उत्पादन खर्चावर आधारित बाजारभाव' मिळाले पाहिजेत. याचा त्यांनी आग्रह धरला. शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित बाजारभाव मिळाल्याशिवाय शेती आणि शेतकरी यांचे दैन्य संपणार नाही या महात्मा फुलेंच्या विचारातील वास्तविकता आज प्रकर्षाने जाणवते.

- **गुलामगिरी :**

महात्मा फुले यांनी गुलामगिरी हा ग्रंथ १८७३ मध्ये प्रकाशित केला. या ग्रंथामध्ये त्यांनी प्रस्थापित समाजव्यवस्था, जुन्या अवतार कल्पना, जुनी मूल्ये यांच्यावर ताशेरे ओढले आहेत. हा ग्रंथ त्यांनी अमेरिकेतील गुलामगिरी विरूद्ध लढणाऱ्या लोकांना अर्पण केला आहे.

**१. प्रकरण रचना :–**

या ग्रंथात एकूण १६ प्रकरणे आहेत. त्यातील पहिल्या ९ प्रकरणांत या देशातील ब्राह्मणी वर्चस्वाचा इतिहास आहे. तर १० ते १६ या प्रकरणात प्रामुख्याने ब्राह्मणी धर्माची फजिती आणि पाश्चिमात्य इतिहासकारांनी हिंदू धर्मातील उघडकीस आणलेला दांभिकपणा मांडला आहे. भारताचा इतिहास हा या देशातील बहुसंख्यांक समाजावर लादलेला गुलामगिरीचा इतिहास आहे. ही गुलामगिरी धर्मदास्यातून निर्माण झालेली आहे. म्हणून हे धर्मदास्य मानवी मुक्तीसाठी झुगारून दिले पाहिजे. या जोतीरावांच्या अंतरीच्या इच्छेचे प्रतिबिंब त्यांच्या गुलामगिरी या ग्रंथात उमटलेले दिसते.

**२. संवादमाध्यम प्रश्नोत्तरूपी मांडणी :**

या ग्रंथाची मांडणी धोंडीबा आणि जोतीबा यांच्या संवाद माध्यमातून प्रश्नोत्तरूपाने केलेली आहे. धोडींबा हा वर्षानुवर्षे ऊनपावसात भिजणाऱ्या आणि धार्मिक सामाजिक अशा पारंपारिक गुलामगिरीच्या ऊनपावसात सातत्याने मारा सहन करणाऱ्या 'धोंड्या' चे प्रतीक आहे. स्थितीशील, गतिहीन, निष्प्राण आणि निर्जीव बनलेल्या समाजाचे प्रतीक असणारा व त्या समाजाचे प्रतिनिधित्व करणारा 'धोडींबा' ची ज्योत महात्मा फुले यांच्या विचाराने प्रज्वलित झाली. महाराष्ट्रातील समाज जीवनाच्या दशदिशा उजळून निघाल्या. हि 'ज्योत' नवविचारांचे, नव्या प्रेरणांचे आणि नव्या आशा – आकांक्षाचे प्रतीकच आहे.

**३. बुध्दीप्रामाण्याने अंधश्रध्देला छेद :**

धर्मग्रंथकर्त्यांनी धर्माच्या नावाखाली ब्राह्मण वर्गाला बहाल केलेले श्रेष्ठत्व, प्रदान केलेले सर्व अधिकार आणि त्याद्वारे प्राप्त होणारी जीवनातील सर्वसुखे व त्याच्या समर्थनार्थ निर्माण केलेल्या अनेक दंतकथा, अवतार कल्पना, असत्यवादी धर्मरूढी, भोळसट अंधश्रध्दा, देवाच्या आणि धर्माच्या नावावर अडाणी समाजाच्या गळ्यात मारलेली अनेक बंधने यासंबंधीचे 'गुलामगिरी' मधील विवेचन बुध्दीप्रामाण्यवादी आहे. या बुध्दिप्रामाण्याने त्यांनी अंधश्रध्देला छेद दिला आहे.

**४. अवतार कल्पनापेक्षा इसापनीती चांगली :**

महात्मा फुले यांनी वेद, मनुस्मृती व भागवत ग्रंथातील अवतारकल्पना नाकारली. तसेच परशुरामास नोटीस

पाठवून ६ महिन्याच्या आत हजर राहून सर्वसाक्षित्वाची प्रचीती देण्यास बजावले. भागवतामधील मन:कल्पित भाकड दंतकथापेक्षा इसापनीती हजार वाट्याने बरी आहे. असे फुले म्हणतात. कारण तिच्यामध्ये मुलांची मने भ्रष्ट होण्याजोगी एकही गोष्ट आढळत नाही.

**५. इतिहासाची पूनर्मांडणी :**

महात्मा फुले यांनी 'गुलामगिरी' या ग्रंथात बळीराजा, म्हसोबा, खंडोबा यांचा इतिहास मांडला आहे. 'इडा पिडा टळो बळीचे राज्य येवो' या म्हणीवरून बळीराजा गुणी होता व आपला पूर्वज होता हे त्यांनी नमूद केले आहे. तसेच राक्षस, क्षत्रिय, विप्र, महार इत्यादी शब्दांच्या व्युत्पत्ती त्यांनी सांगितल्या आहेत. त्यांनी गुलामगिरी या ग्रंथात बहुजनांचा खरा इतिहास मांडण्याचा प्रयत्न केला आहे. बळी, परशुराम, राम, कृष्ण इत्यादींच्या चरित्रांची त्यांनी जी चिकित्सा केली ती इतिहासाची पुनर्मांडणीची सुरूवात होती.

**६. मानवतावादी विचारासाठी लढा :**

महात्मा फुले यांचा लढा ब्राह्मणांच्या विरूद्ध नव्हता तर जीर्ण झालेल्या धर्मकल्पना, अज्ञान रूढी, जन्माने मिळालेले श्रेष्ठत्व, दारिद्र्य इत्यादी अनेक समाजविघातक गोष्टींच्या विरूध्द हा लढा होता. धार्मिक, सामाजिक व आर्थिक विषमतेविरूद्ध हा लढा होता. समतेच्या प्रस्थापनेसाठी हा लढा उभारला होता. माणसाला माणूस म्हणून जगता आले पाहिजे, त्याला योग्य ते न्याय हक्क मिळाले पाहिजेत. कोणी केवळ जन्माच्या नावावर श्रेष्ठ नाही. धर्मग्रंथांच्या आधारावर उच्च नाही. कोणी कनिष्ठ नाही की कोणी नीच नाही. सर्व माणसे समान आहेत. या मानवतावादी विचारांची त्यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता या विचारत्रयीस अजोड जोड दिली. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या नवमूल्यांची ग्वाही देणारा व त्यासाठी आग्रह धरणारा 'गुलामगिरी' हा ग्रंथ यासाठीच अत्यंत मोलाचा आहे.

- **महात्मा फुले यांची ग्रंथसंपदा :**

महात्मा फुले यांनी विपूल साहित्य लेखन केले. १८५५ साली जोतीरावांनी 'तृतीयरत्न' हे पहिले आधुनिक मराठी नाटक लिहिले. 'शिकायला चला' हा संदेश देणारे हे आद्य'मराठी नाटक आहे. या नाटकात भट-ब्राह्मण, तत्कालीन समाजातील लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांना धर्माच्या नावावर कसे फसवतात, लुबाडतात हे दाखविले आहे. तसेच ख्रिश्चन धर्मप्रसारक आपल्या नि:पक्षपाती धर्माच्या मदतीने अशिक्षित शुद्रास खरे ज्ञान सांगून त्यास कसकसे सत्य मार्गावर आणतात ते स्पष्ट करतात.

१८६९ साली जोतीरावांनी 'छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा' लिहिला. हा पवाडा शिवाजी महाराजांचे मराठीतील पहिले पद्यमय चरित्र आहे. स्त्री-पुरूष सहजीवनाचा विचार रूजविण्यासाठी जोतीरावांनी इतिहासाचा वापर अत्यंत चातुर्याने केला आहे. तसेच शिवाजी महाराजांच्या जीवनातील अनेक महत्वपूर्ण प्रसंगावर प्रकाश टाकला आहे. १८६९ साली महात्मा फुले यांनी 'ब्राह्मणांचे कसब' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्यांनी अज्ञानी, भोळ्या, भाबड्या बहुजन समाजाला भट ब्राह्मण देवाच्या, धर्मांच्या नावाखाली कसे आडवतात याविषयी लेखणीद्वारे तोफ डागली आहे.

१८८५ साली त्यांनी 'सत्सार अंक १ व २' लिहिले. यामध्ये त्यांनी भट, ब्राह्मणांच्या धर्माचे कारस्थानी स्वरूपावर प्रकाश टाकला. तसेच 'ब्राह्मोसमाज' व 'प्रार्थना समाजा'च्या अंतरंगाविषयी चर्चा केली आहे. १८८५ साली त्यांनी 'इशारा' हा ग्रंथ लिहिला. 'तीस वर्षापेक्षा हल्ली शेतकीची स्थिती चांगली आहे' या न्या.म.गो. रानडे यांच्या मताचे खंडन करण्यासाठी म.फुले यांनी हा ग्रंथ लिहिला.

महात्मा फुले यांनी लिहिलेले 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक ' त्यांच्या मृत्यूनंतर १८९१ साली प्रसिध्द झाले. पक्षघाताने फुले यांचा उजवा हात निकामी झाल्यामुळे त्यांनी डाव्या हाताने हा ग्रंथ लिहून पूर्ण केला. या ग्रंथात सार्वजनिक सत्यधर्माचे अधिष्ठान मानवी स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व या तत्वावर अधिष्ठित केले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींच्या मते, 'सार्वजनिक सत्यधर्म हा ग्रंथ जोतिबांचा विश्वकुटूंबवादाचा जाहिरनामाच आहे'.

● **महात्म्याची अखेर :**

स्त्री-शुद्र व अतिशुद्रास शिक्षण, सती प्रथेस विरोध, केशवपनास विरोध, अस्पृश्यता निवारण, विधवा पुनर्विवाह, बालहत्याप्रतिबंधक गृह, सत्यशोधक समाजाची स्थापना, सत्यशोधक विधी या त्यांच्या कार्यामुळे बहुजन समाज चांगल्या पध्दतीने जीवन जगू लागला. मानवतावाद, बुध्दीप्रामाण्यवाद व बंधुभाव या तत्वांना त्यांनी महत्व दिले. १८८२ साली हंटर कमिशनला निवेदनाद्वारे प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याची मागणी केली. १८८८ रोजी भारत दौऱ्यावर आलेल्या ड्यूक ऑफ कॅनॉट या व्हिक्टोरिया राणीच्या चिरंजीवापुढे शेतकरी वेष धारण करून त्यांनी शेतकऱ्यांची कैफियत मांडली. मानवी हक्कासाठी ते अहोरात्र झगडले. त्यांच्या कार्याची दखल घेऊन ११ मे १८८८ रोजी मुंबईतील हजारो कामगारांनी भायखळ्याला एकत्र जमून समाजक्रांतीकारक जोतीराव फुल्यांना 'महात्मा' ही पदवी दिली. सामान्य माणसांनी आपल्या उध्दारकर्त्याला अशी पदवी देऊन सन्मानित करण्याची ही देशातील पहिलीच घटना होती. मांडवी कोळीवाड्यातील रघुनाथ महाराज सभागृहात हा समारंभ आयोजित केला होता. महात्मा फुले यांनी आपल्या कार्याद्वारे आधुनिक भारताच्या पायाभरणीचे काम केले. त्यामुळेच ख्यातनाम इतिहासकार डॉ. रामचंद्र गुहा यांनी जोतीरावांना 'आधुनिक भारताचे शिल्पकार' मानलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांना आपले गुरू मानत होते. १९३२ साली पुण्यात बोलताना महात्मा गांधी म्हणाले होते, 'जोतीराव फुले देश के पहले महात्मा थे असली महात्मा थे,' वि.दा.सावरकरांनीही महात्मा फुले यांना 'समाज क्रांतिकारक' म्हणून गौरविले होते.

आयुष्याच्या अखेरीस महात्मा फुले यांना पक्षघात (अर्धांगवायूचा) आजार जडला. त्यांनी बांधकाम व्यवसायातून मिळविलेला सर्व पैसा समाजकार्यासाठी खर्च केल्यामुळे या आजारपणात उपचारासाठीही त्यांच्याकडे पुरेसे पैसे नव्हते. २८ नोव्हेंबर १८९० रोजी पुणे येथे त्यांचा मृत्यू झाला. सावित्रीबाईनी स्वत:च टिटवे धरून आपल्या पतीच्या प्रेतास अग्नी दिला. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्षी जोशी म्हणतात, 'हिंदू धर्मातील बहुजन समाजात आत्मप्रत्यय व आत्मावलोकन उत्पन्न करणारा पहिला माणूस म्हणजे महात्मा फुले होय.'

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३ :**

अ. **खालील उपप्रश्नामध्ये विधाने व पर्याय दिले आहेत. त्यातील अचूक पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१. 'विद्येविना मती गेली । मतीविना नीती गेली । नीतीविना गती गेली । गतीविना वित्त गेले । वित्ताविना शुद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले । हे सुत्र कोणत्या ग्रंथातील आहे।

अ. शेतकऱ्यांचा असूड ब. गुलामगिरी क. इशारा ड. ब्राह्मणाचे कसब

२. 'शेतकरी विद्वान झाल्यावर ते आपल्या खांद्यावर असूड टाकून लक्ष्मीस पुढे घालून आपल्या घरी आणून नांदावयास लाविल ' हे विधान कोणत्या ग्रंथातील आहे.

अ. इशारा ब. तृतीय रत्न क. गुलामगिरी ड. शेतकऱ्यांचा असूड

३. महात्मा फुले यांनी धोडींबा आणि जोतिबा यांच्या संवादमाध्यमातून कोणत्या ग्रंथाचे लेखन केले आहे?

अ. शेतकऱ्यांचा असूड ब. गुलामगिरी क. इशारा ड. सार्वजनिक सत्यधर्म

४. महात्मा फुले यांनी कोणता ग्रंथ अमेरिकतील गुलामगिरी विरूध्द लढणाऱ्या लोकांना अर्पण केला आहे?

अ. ब्राह्मणाचे कसब ब. इशारा क. गुलामगिरी ड. शेतकऱ्यांचा असूड

५. शेती आणि शेतकरी यांच्या समग्र विकासाचे संकल्पचित्र महात्मा फुले यांनी कोणत्या ग्रंथात रेखाटले आहे?

अ. गुलामगिरी ब. शेतकऱ्यांचा असूड क. इशारा ड. ब्राह्मणाचे कसब

**ब. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. 'प्रतिसंस्कृतीचे निर्माते' म्हणून कोणास ओळखले जाते?

२. महात्मा फुले यांची पहिली साहित्यकृती कोणती?

३. महात्मा फुले यांनी छ. शिवाजी महाराजांवर कोणता काव्यग्रंथ लिहिला?

४. जोतिराव फुले यांना 'महात्मा' ही पदवी कधी व कोठे दिली?

५. महात्मा फुले यांचा मृत्यू कधी व कोठे झाला?

## २.३. सारांश :

१९ वे शतक हे भारताच्या इतिहासातील प्रबोधनाचे शतक म्हणून ओळखले जाते. महात्मा फुले हे या काळातील समाजक्रांतीकारक व कर्ते सुधारक व आधुनिक भारताचे प्रमुख शिल्पकार होते. त्यांनी स्त्री

शुद्रअतिशुद्रांच्या शिक्षणासाठी शिक्षणामुळेच चांगल्या व वाईट गोष्टीतील फरक माणसाला करता येतो. अज्ञान, दारिद्र्य, गुलामगिरी नष्ट करण्यासाठी शिक्षण सक्तीचे व मोफत असावे असा त्यांनी आग्रह हंटर कमिशनसमोर धरला होता. स्त्री शिकली तर ती दोन्ही कुंटूबे शिक्षित करते. म्हणून त्यांनी स्त्री शिक्षणाचा आग्रह धरला. व १८ शाळा सुरू केल्या. पत्नी सावित्रीबाईस शिकवून शिक्षिका केले. सावित्रीबाई देशातील पहिली शिक्षिका व मुख्याध्यापिका होत्या. विधवा स्त्रियांना चांगले जीवन जगता यावे याकरिता त्यांनी विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. तसेच विधवा पुनर्विवाह घडवून आणले. समाजातील धूर्त माणसांच्या वासनेच्या शिकार झालेल्या विधवा स्त्रीयांना मदतीचा आधार दिला. 'बालहत्या प्रतिबंधक गृह' सुरू केल्याने अनेक विधवांचे व त्यांच्या निष्पाप बाळांचे प्राण वाचले. अस्पृश्यांना पशूपेक्षाही हीन वागणूक दिली जात होती. त्यांना माणुसकीचे कोणतेच अधिकार दिले जात नव्हते. अशावेळी महात्मा फुले यांनी त्यांच्यासाठी शिक्षणाचा मार्ग खुला केला. शिक्षणामुळे त्यांच्यात आत्मभान निर्माण केले. सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून बहुजन समाजाला त्यांच्या धार्मिक, मानसिक, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी त्यांनी पर्यायी संस्कृतीची निर्मिती केली. सत्याचा आग्रह धरून नीतीमान समाज निर्मितीसाठी प्रयत्न केले. शेतकरी हा समाजाचा पोशिंदा व मुख्य आधार होता. परंतु त्याची स्थिती भट-भिक्षुक, गुजर-मारवाडी, ब्राह्मण, सावकार, सरकारी नोकरीतील भट कामगार यांच्या शोषणाने वाईट झाली होती. या शेतकऱ्यांची व शेतीची दैन्यावस्था व त्यावरील उपाययोजना त्यांनी 'शेतकऱ्याचा असूड' व 'गुलामगिरी' या ग्रंथातून मांडल्या त्यांचे समग्र साहित्य म्हणजे मानवमुक्तीचा जाहिरनामाच आहे. त्यामुळेच ते १९व्या शतकातील समाजक्रांतीकारक, कर्ते सुधारक व आधुनिक भारताचे प्रमुख शिल्पकार आहेत.

शिक्षणतज्ञ, कृषीतज्ञ, अर्थतज्ञ, आधुनिक नाटककार, निबंधकार, आद्य शिवचरित्रकार, आधुनिक मराठी कवितेचे जनक, पुण्याचे आयुक्त, पुणे कमर्शियल ॲण्ड कॉन्ट्रक्टींग कंपनीचे कार्यकारी संचालक आणि प्रकाशक म्हणून त्यांनी भारतीय समाजावर आपली मोहर उमटवली. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या वैश्विक मूल्यांच्या आधारे त्यांनी लिंगभाव, जातीव्यवस्था आणि वर्गव्यवस्था या तीन ही शोषण केंद्रावर हल्ला केला. स्त्री-पुरूष समता, जातीनिर्मूलन, ज्ञाननिर्मिती, धर्मचिकित्सा, संसाधनांचे फेरवाटप, सामाजिक न्याय आणि आंतरजातीय विवाह या कृतीकार्यक्रमांद्वारे त्यांनी पर्यायी संस्कृतीचा पाया घातला.

## २.४. पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

प्रबोधन : समाजात प्रचलित असलेल्या आचार, विचार व व्यवहारात जेंव्हा दोष उत्पन्न होतात तेव्हा समाजाला पुन्हा बुध्दिनिष्ठ व विज्ञाननिष्ठ पध्दतीने जागृत करण्याच्या प्रक्रियेस 'प्रबोधन' म्हणतात.

बुध्दिप्रामाण्य : तर्क व बुध्दीचा वापर करून जे पटेल ते स्वीकारणे.

ग्रंथप्रामाण्य : ग्रंथातील मत तसेच योग्य समजून मान्य करण्याची परंपरा.

शब्दप्रामाण्य : एखाद्या विशिष्ट व्यक्तीने सांगितले म्हणून खरे मानण्याचा आग्रह.

| | | |
|---|---|---|
| विज्ञाननिष्ठा | : | वैज्ञानिक दृष्टीकोन स्वीकारून कार्यकारण भाव, बुध्दी, तर्क यांनी पडताळलेले निर्णय मान्य करणे म्हणजे विज्ञाननिष्ठा होय. |
| मिशनरी | : | धर्मप्रसारक |
| बहुजन | : | ब्राह्मण सोडून इतर सर्वजण |
| असूड | : | चाबूक |
| कसब | : | कामातील कौशल्य, कारागिरी |
| नाभीक | : | न्हावी |
| निर्गूण | : | कोणत्याही गुणधर्माशिवाय |

## २.५. स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

- **स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे १ :**

**अ.** १. प्रथम उच्चवर्गाला शिक्षण दिल्यास ते झिरपत कनिष्ठ वर्गापर्यत जाणारे.

२. पाश्चात्य. ३. नेटिव्ह फिमेल स्कूल.

४. महार-मांग इत्यादी लोकांस विद्या शिकविण्याकरिता मंडळी

५. शिक्षणाशिवाय समाजपरिवर्तन होणार नाही

**ब.** १. ११ एप्रिल १८२७, पुणे २. १८१८ ३. १ जानेवारी १८४८ पुणे

४. थॉमस पेन ५. १९ ऑक्टोबर १८८२

- **स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे २ :**

**अ)** १. निर्मिक २. सत्यशोधक समाज ३. महात्मा फुले

४. सार्वजनिक सत्यधर्म ५. १० मार्च १८९७

**ब)** १. २४ सप्टेंबर १८७३ पुणे २. ३३ नियम ३. महात्मा फुले

४. दीनबंधू ५. २५ डिसेंबर १८७३ राधा व सिताराम आल्हाट

- **स्वंय अध्ययन प्रश्नांची उत्तरे ३ :**

**अ)** १. शेतकऱ्याचा असूड २. शेतकऱ्याचा असूड ३. गुलामगिरी

४. गुलामगिरी ५. शेतकऱ्याचा असूड

**ब)** १. महात्मा फुले २. तृतीय रत्न ३. छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पोवाडा
४. ११ मे १८८८,मुंबई ५. २८ नोव्हेंबर १८९०, पुणे.

**२.६. सरावासाठी स्वाध्याय :**

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. महात्मा जोतीराव फुले यांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घ्या.

२. महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणा चळवळीतील महात्मा फुले यांच्या योगदानाचा आढवा घ्या.

३. सत्यशोधक समाजाच्या कार्याचा आढावा घ्या.

४. महात्मा फुले यांचे शेतकऱ्यांसाठीचे कार्य स्पष्ट करा.

**ब) टिपा लिहा.**

१. महात्मा फुले यांचे स्त्री उन्नतीचे कार्य.

२. महात्मा फुले यांनी अस्पृश्यांसाठी केलेले कार्य.

३. महात्मा फुले यांचे 'शेतकऱ्यांचा असूड' मधील शेतकऱ्याविषयीचे विचार.

४. महात्मा फुले यांचे 'गुलामगिरी'तील शेतकऱ्याविषयीचे चिंतन.

५. महात्मा फुले यांची साहित्यसंपदा.

**२.७ अधिक वाचनासाठी ग्रंथ :**


१. फडके य. दि. : महात्मा फुले समग्र वाडमय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई (१९८२).

२. साळुंखे पी. बी (संपा) : महात्मा फुले गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई (१९८२).

३. नरके हरी (संपा) : महात्मा फुले साहित्य आणि चळवळ महात्मा फुले चरित्र साधने समिती मुंबई (२००६).

४. नरके हरी (संपा) : महात्मा फुले समग्र वाडमय आणि चळवळ महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र शासन मुंबई (२०१३)

५. कीर धनंजय : महात्मा जोतिराव फुले : आमच्या समाजक्रांतीचे जनक चौथे पुनर्मुद्रण, पॉप्यूलर प्रकाशन मुंबई

६. ऑमवेट गेल : वासाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड, सुगावा प्रकाशन, पुणे (१९९५).


❖❖❖

## घटक – ३

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज

**अनुक्रमणिका :**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

 ३.२.१ कनिष्ठ वर्गाची शैक्षणिक व सामाजिक उन्नती

 ३.२.२ महिलांसाठी कायदे

 ३.२.३ वसतिगृह चळवळ

३.३ स्वयं-अध्ययन प्रश्न

३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

३.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सारांश

३.७ सरावासाठी स्वाध्याय

३.८ संदर्भ

### ३.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला पुढील उद्दिष्टे सांगता येतील –

- राजर्षी शाहू महाराजांच्या पूर्वायुष्य व जडणघडणीची माहिती देता येईल.
- राजर्षी शाहू महाराजांनी कनिष्ठ वर्गाच्या शैक्षणिक उन्नतीसाठी केलेले कार्य सांगता येईल.
- राजर्षी शाहू महाराजांनी कनिष्ठ वर्गाच्या सामाजिक उन्नतीसाठी केलेले कार्य सांगता येईल.
- राजर्षी शाहू महाराजांनी स्त्रियांसाठी केलेल्या विविध कायद्यांची माहिती होईल.
- राजर्षी शाहू महाराजांच्या वसतिगृह चळवळीची माहिती देता येईल.

### ३.१ प्रास्ताविक :

१९ वे शतक भारतामध्ये सामाजिक, धार्मिक सुधारणांचे शतक म्हणून ओळखले जाते. या शतकात राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात महत्वपूर्ण बदल घडून आले. भारतात नव्या युगाची सुरूवात झाली. या शतकात इंग्रजांमुळे, इंग्रजी शिक्षणामुळे भारतीयांना आपल्या राजकीय, सामाजिक, धार्मिक जीवनातील उणिवा लक्षात आल्या. त्यातूनच भारतात अनेक धार्मिक व सामाजिक सुधारणा चळवळी उदयास आल्या. सर्वप्रथम बंगालमध्ये व त्यानंतर महाराष्ट्रात सामाजिक, धार्मिक परिवर्तनाचे कार्य सुरू झाले. महाराष्ट्रात १९ व्या शतकात महात्मा फुले, न्या. रानडे, डॉ. भांडारकर, दादोबा पांडुरंग तर्खडकर, बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, छ. शाहू महाराज यासारख्या समाजसुधारकांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. त्यांनी केलेल्या शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक सुधारणांमुळे आधुनिक महाराष्ट्राची जडण-घडण झाली. भारताच्या सामाजिक सुधारणेच्या इतिहासातील अग्रगण्य व्यक्तींमध्ये कोल्हापूरचे राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे एक होत.

राजश्री छत्रपती शाहू महाराजांची कारकीर्द (इ. स. १८९४ ते इ. स. १९२२) कोल्हापूर संस्थानच्याच नव्हे तर महाराष्ट्राच्या इतिहासाला कलाटणी देणारी ठरली. महात्मा फुलेंनी समाजातील जातीभेद, उच्चनीचता दूर करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांचे अपूरे कार्य पुढे छ. शाहू महाराजांनी हाती घेतले. शाहू महाराजांनी आपल्या कारकीर्दीत वेदोक्त चळवळ, अस्पृश्यता निवारण, मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण, विद्यार्थी वसतीगृहांची चळवळ, अस्पृश्योद्धार याद्वारे सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक क्षेत्रात विविधांगी कार्य केले. शाहू महाराजांनी केलेल्या विविधांगी सुधारणांमुळे कोल्हापूर हे शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक सुधारणांचे केंद्र म्हणून ओळखले जाऊ लागले. शाहू महाराजांच्या प्रोत्साहनाने कोल्हापूर संस्थानात अनेक चळवळी सुरू झाल्या. त्यामुळे केवळ कोल्हापूर संस्थानातच नव्हे तर महाराष्ट्रात सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया सुरू झाली. शाहू महाराजांच्या कार्यापासून प्रेरणा घेवून नवनेतृत्व निर्माण झाले. अशा निरनिराळ्या क्षेत्रात तयार झालेल्या नवनेतृत्त्वांनी आधुनिक महाराष्ट्राच्या, किंबहुना आधुनिक भारताच्या उभारणीमध्ये मोलाची कामगिरी बजावली. शाहू महाराजांनी बहुजन समाजासाठी केलेल्या सुधारणांमुळे आज बहुजन समाज विविध क्षेत्रात नेतृत्व करताना दिसत आहे. हे कार्य करीत असताना त्यांच्यावर प्रचंड टिकाही झाली. तरीही त्यांनी आपले कार्य अव्याहतपणे सुरू ठेवले. म्हणूनच आधुनिक भारताच्या सामाजिक सुधारणेचा इतिहास पाहताना राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याची माहिती घेणे अपरिहार्य ठरते.

### ३.२ विषय विवेचन :

● **कोल्हापूर संस्थान :**

इ. स. १७१० मध्ये छ. शिवाजी महाराजांची सून व छ. राजाराम महाराज यांची पत्नी महाराणी ताराबाईने कोल्हापूरच्या गादीची स्थापना केली. ताराबाईने आपला अज्ञान पुत्र शिवाजी यास कोल्हापूरच्या गादीवर बसविले. तेच कोल्हापूरच्या राजघराण्यातील पहिले छत्रपती शिवाजी होत. यानंतर छ. संभाजी (१७१४ ते १७६०), दुसरा शिवाजी (१७६२ ते १८१३), संभाजी उर्फ बाबासाहेब (१८१३ ते १८२१), शहाजी उर्फ बुवासाहेब (१८२१ ते १८३८), तिसरे शिवाजी उर्फ बाबासाहेब (१८३८ ते १८६६) छ. राजाराम महाराज (१८६६ ते

१८७०), चौथे शिवाजी महाराज (१८७१ ते १८८३) यांनी कोल्हापूर संस्थानच्या छत्रपतीपदाची धुरा सांभाळली. चौथ्या शिवाजी महाराजांचा अहमदनगरच्या किल्ल्यात डिसेंबर १८८३ मध्ये ह्दयद्रावक मृत्यू झाला. त्यापूर्वीच १८८२ मध्ये बाबासाहेब महाराजांचे भाचे राजाराम राजारामांचे मावसबंधू व कागलचे जहागिरदार जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे यांची कोल्हापूरचे रीजंट (राजप्रतिनिधी) म्हणून नियुक्ती झाली होती. याच आबासाहेब घाटग्यांचे जेष्ठ पुत्र 'यशवंतराव' यांना चौथे शिवाजी महाराज यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले व त्यांचे नाव शाहू महाराज ठेवले. २ एप्रिल, १८९४ रोजी त्यांना कोल्हापूर संस्थानच्या राज्यकारभाराची सूत्रे देण्यात आली.

● **शाहू महाराजांचा जन्म व शिक्षण :**

शाहू महाराजांचा जन्म २६ जून, १८७४ रोजी कागलचे जहागिरदार आबासाहेब यांच्या पोटी झाला. वयाच्या दहाव्या वर्षी १७ मार्च, १८८४ रोजी ते कोल्हापूरच्या राजघराण्यात दत्तक आले. प्रारंभी महाराजांचे शिक्षक कृष्णाजी भिकाजी गोखले व हरिपंत गोखले हे होते व मुख्य म्हणून फिटझिराल्ड हे होते. शिक्षण सुरू असतानाच सन १८८५ मध्ये महाराजांचे वडील आबासाहेब घाटगे यांचे अकाली निधन झाले. जानेवारी १८८६ मध्ये महाराजांना राजकोट येथील राजकुमार कॉलेजात शिक्षणासाठी पाठविण्यात आले. सन १८८९ पर्यंत शाहू महाराजांनी राजकोट येथे शिक्षण घेतले. या कालावधीत त्यांनी कोल्हापूरचा इतिहास अभ्यासला. आशिया खंडाचा इतिहास जाणून घेतला. इंग्रजी भाषा व मोडी लिपीचे ज्ञान अवगत केले. सन १८८९ मध्ये इंग्रज सरकारने स्टुअर्ट फ्रेजर यांची महाराजांचे 'ट्युटर व गार्डीयन' म्हणून नियुक्ती केली. फ्रेजर यांच्या मार्गदर्शनाखाली महाराजांचे धारवाड येथे शिक्षण सुरू झाले. फ्रेजरनी आदर्श राज्यकर्ता बनण्याच्या दृष्टीने महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण केली. त्यांनी उत्तरेत दोन व दक्षिणेत एक अशा तीन प्रदीर्घ सफरी घडवून आणल्या. या प्रवासातून महाराजांना देशाचा इतिहास, ऐतिहासिक स्थळे, शैक्षणिक व सांस्कृतिक केंद्रे, लोकांची परिस्थिती यांचे दर्शन झाले. धारवाड येथे शिक्षण सुरू असतानाच महाराजांचा बडोद्याचे श्री. गुणाजीराव खानविलकर यांची कन्या श्रीमंत लक्ष्मीबाईसाहेब यांच्याशी सन १८९१ मध्ये विवाह झाला.

सन १८९३ मध्ये महाराजांचे शिक्षक कृष्णाजी गोखले निवृत्त झाल्यावर त्यांच्या जागी सर रघुनाथराव सबनीस यांची शाहू महाराजांचे शिक्षक म्हणून नेमणूक झाली. महाराजांच्या व्यक्तीमत्त्वाची जडण-घडण करण्यात फ्रेजर यांच्याप्रमाणेच सर सबनीस हे प्रमुख होते. शाहू महाराजांनी फ्रेजर यांच्या मार्गदर्शनाखाली व रघुनाथराव सबनीस यांच्या सहवासात कोल्हापूर संस्थानचा दौरा सन १८९३ मध्ये केला. या काळात त्यांना संस्थानातील प्रदेशाची परिस्थिती, लोकांचे जीवन, अज्ञान, अंधश्रद्धा, दारिद्र्य यांचे दर्शन झाले. याचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव पडला. २ एप्रिल १८९४ रोजी वयाच्या २० व्या वर्षी शाहू महाराजांना कोल्हापूर संस्थानच्या राज्यकारभाराची अधिकारसूत्रे देण्यात आली.

सन १९०२ मध्ये बादशहा सातव्या एडवर्डच्या राज्यरोहनाच्या सोहळ्यात हजर राहण्यास महाराज इंग्लंडला गेले होते. त्यावेळी त्यांनी फ्रान्स व इटली या देशांनाही भेटी दिल्या. युरोपातील वैज्ञानिक प्रगती, आधुनिक उद्योगधंदे, शेती सुधारणा, धरणे, सामाजिक संस्था, लोकशाही जीवनपद्धती इ. अनेक बाबींचा महाराजांवर प्रभाव

पडला. या देश-विदेशातील पर्यटनांनी शाहू महाराजांची दृष्टी विशाल बनली.

याशिवाय तत्कालीन आर्य समाज, सत्यशोधक समाज, थिऑसॉफिकल सोसायटी यांच्या कार्याचा व विचारांचा कमी-अधिक प्रभाव शाहू महाराजांच्या व्यक्तिमत्त्वावर पडला होता.

**● शाहू महाराजांचे कौटुंबिक जीवन :**

शाहू महाराजांना चार अपत्ये होती. श्री राधाबाईसाहेब व श्री आऊसाहेब या मुली व छत्रपती राजाराम महाराज व राजकुमार शिवाजी महाराज ही दोन मुले होती. यापैकी श्री आऊसाहेब या लहानपणीच मरण पावल्या होत्या. राजकुमार शिवाजी महाराज हे शिकारीच्यावेळी रानडुकराचा पाठलाग करताना सन १९१८ मध्ये मरण पावले.

**● शाहू महाराजांचे राज्यारोहन :**

२ एप्रिल १८९४ ला गव्हर्नर लॉर्ड हॅरिस यांच्या उपस्थितीत शाहू महाराजांचे राज्यारोहन झाले. आपल्या पहिल्याच जाहिरनाम्यात त्यांनी प्रजेच्या सुखाची व कल्याणाची वृद्धी हे ध्येय स्पष्ट केले.

**● शाहू महाराजांच्या राज्यारोहणावेळची परिस्थिती :**

शाहू महाराजांकडे राज्यसूत्रे येण्यापूर्वी कोल्हापूर राज्यात अर्धशतकाहून अधिक काळ अल्पवयीन राजांच्याच कारकीर्दी झाल्या. त्यामुळे कोल्हापूरचा राज्यकारभार इंग्रजांनी नेमलेल्या दिवाण, रीजंट, अथवा कौन्सिल यांच्याच हाती होता. शाहू महाराजांकडे जेव्हा राज्यसूत्रे आली तेव्हा त्यांना आपल्या प्रशसनातील गुणदोषांची जाणीव झाली. इंग्रज अधिकाऱ्यांचे छत्रपतींशी आणि प्रजेशी असणारे शिरजोर वर्तन, नोकरदारांचे स्वार्थी धोरण आणि ब्राह्मण अधिकाऱ्यांकडून बहूजनांची होणारी पिळवणूक या सर्व गोष्टी शाहू महाराजांच्या निदर्शनास आल्या होत्या. शाहू महाराजांच्या अगोदरच्या छत्रपतींनी इंग्रजांना विरोध केल्याने संकटाचा सामना करावा लागला होता. महाराजांचे दत्तक वडील चौथे शिवाजी महाराज यांचा यातच अंत झाला. अशा परिस्थितीत अधिकारग्रहण केल्यानंतर शाहू महाराजांनी इंग्रजांशी सहकार्य करून आपणास प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी करण्याचा निर्णय दूरदृष्टीने घेतला. स्वराज्य तर हवेच, पण तत्पूर्वी सुराज्य निर्माण होणे आवश्यक आहे असे त्यांना वाटत होते. बहुजन समाजात जागृती न झाल्यास येणाऱ्या सुराज्याचे फायदे केवळ उच्चवर्णियांनाच मिळतील, बहुजन समाज त्यापासून वंचित राहिल असे महाराजांना वाटत होते. राजकीय स्वातंत्र्याला महाराजांचा विरोध नव्हता, पण तत्पूर्वी स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यासाठी बहुजन समाजाला सक्षम बनविणे त्यांना आवश्यक वाटत होते.

१८९४ मध्ये कोल्हापूर संस्थानच्या ७१ अधिकाऱ्यांपैकी ६० ब्राह्मण होते व ११ इतर जन होते आणि महाराजांच्या खाजगी नोकरीत ५२ अधिकाऱ्यांपैकी ४५ ब्राह्मण व ७ इतर जन होते. या इतरजनात इंग्रज, हिंदी ख्रिश्चन, पारशी, प्रभू हे लोक मोडत होते. कोल्हापूर संस्थानच्या ९ लाख लोकसंख्येपैकी ब्राह्मण आणि तत्सम वरिष्ठ वर्ग यांची संख्या अवघी २६ हजार होती. अशाप्रकारे शाहू छत्रपतींच्या हाती राज्यकारभाराची सूत्रे येण्यापूर्वी दरबार आणि खाजगी कारभार ही ब्राह्मणांचीच मिरासदारी बनली होती. त्यावेळी सुमारे ८० टक्के ब्राह्मण शिकलेले

होते, तर २० टक्के बहुजन समाज शिक्षित होता. यामुळे बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात केला पाहिजे याची जाणिव त्यांना झाली. बहुजन समाज अज्ञान व अंधश्रद्धा यामध्ये गुरफटला होता. स्त्रिया व अस्पृश्य यांची स्थिती दयनीय होती. अशा परिस्थितीत शाहू महाराजांनी सत्तेवर येताच बहुजन समाजाच्या प्रगतीसाठी शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, आर्थिक सुधारणा करण्यावर भर दिला.

● **स्वयंअध्ययन प्रश्न– १ :**

**योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. राजर्षी छ. शाहू महाराजांचे मूळ नाव ............ होते.

अ) जयसिंगराव ब) यशवंतराव

क) हिंदूराव ड) नारायणराव

२. राजर्षी छ. शाहू महाराजांचा जन्म कागलच्या ............ घराण्यात झाला.

अ) जाधव ब) भोसले

क) शिर्के ड) घाटगे

३. छत्रपती शाहू महाराज ............ रोजी कोल्हापूरच्या राजघराण्यात दत्तक आले.

अ) १७ मार्च १८८४ ब) १८ मार्च १८८४

क) २ एप्रिल १८९४ क) २६ जून १८७४

४. सन १८८९ मध्ये शाहू महाराजांचे ट्युटर व गार्डीयन म्हणून ............ यांची नियुक्ती झाली होती.

अ) प्रिन्सिपल मॅकनॉटन ब) स्टुअर्ट फ्रेजर

क) कृष्णाजी गोखले ड) सर रघुनाथराव सबनीस

५. छत्रपती शाहू महाराजांनी वयाच्या २० व्या वर्षी ............ रोजी कोल्हापूर संस्थानची राज्यसुत्रे हाती घेतली.

अ) १७ मार्च १८८४ ब) १८ मार्च १८८४

क) २ एप्रिल १८९४ ड) २६ जुलै १८७४

## ३.२.१ कनिष्ठ वर्गाची शैक्षणिक व सामाजिक उन्नती :

● **छ. शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य :**

शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानची राज्यसूत्रे हाती घेतल्यापासून (इ. स. १८९४) सामान्य जनतेची सर्वांगिण प्रगती साधण्यासाठी प्रशासन, शेती, उद्योगधंदे, शिक्षण इत्यादी क्षेत्रात मोठ्या सुधारणा घडवून आणण्यास

सुरवात केली. या सर्व सुधारणांमध्ये शाहू महाराजांनी शैक्षणिक सुधारणांना विशेष प्राधान्य दिले. कारण जनतेच्या सर्वांगिण प्रगतीचा पाया, सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम म्हणून शिक्षणाचे महत्त्वाचे स्थान असल्याने त्यांनी शैक्षणिक सुधारणांना प्राधान्य दिले. शिवाय संस्थानातील प्रजेला प्रशासकीय यंत्रणेत सहभागी करून घ्यावे, अशी त्यांची इच्छा होती. त्यासाठी संस्थानातील प्रजा सुशिक्षित असणे आवश्यक होते. म्हणूनच शाहू महाराजांनी कारकीर्दीच्या सुरूवातीपासून शैक्षणिक सुधारणांवर भर दिला. त्यांनी आपल्या शैक्षणिक कार्यक्रमामध्ये वेगवेगळ्या शिक्षणसंस्थांची स्थापना करणे, विद्यार्थ्यांना सवलती देणे, कोल्हापूर शहरात विद्यार्थी वसतिगृहे सुरू करणे आणि संस्थानातील व संस्थानाबाहेरील शिक्षणसंस्थांना मदत करणे या बाबीकडे जास्त लक्ष दिले.

● **१८९४ ची कोल्हापूर राज्याची शैक्षणिक स्थिती :**

शाहू महाराजांच्या हाती कोल्हापूर संस्थानचा राज्यकारभार येण्यापूर्वी संस्थानात उच्च शिक्षणासाठी राजाराम कॉलेज, माध्यमिक शिक्षणासाठी राजाराम हायस्कूल होते आणि प्राथमिक शाळांची संख्या २२४ इतकी होती, हे जरी खरे असले तरी या शैक्षणिक संस्थांमधून शिक्षण घेणारे विद्यार्थी हे प्रामुख्याने उच्चवर्णीयच होते. बहुजन समाजात साक्षरतेचे प्रमाण अल्पच होते. त्यावेळी कोल्हापूरातील ७९.१ टक्के ब्राह्मण शिकलेले होते तर मराठा ८.६, कुणबी १.५, मुसलमान ७.५ आणि जैन व लिंगायत हे १०.१ टक्के शिकलेले होते. त्याच वर्षी राजाराम हायस्कूलची एकूण विद्यार्थीसंख्या ४४१ होती. त्यामध्ये ब्राह्मण विद्यार्थी ३६८ हाते, तर राजाराम कॉलेजध्ये ६१ विद्यार्थी होते, पण त्यापैकी ५५ विद्यार्थी ब्राह्मण वर्गाचे होते.

आपल्या संस्थानातील प्रजेमध्ये शिक्षणाबाबत असणारी ही विषमता शाहू महाराजांच्या लक्षात आली होती. त्यामुळे समाजातील सर्व थरातील लोकांना शिक्षण मिळाले पाहिजे असा शाहू महाराजांचा आग्रह होता. हिंदू समाजात हजारो वर्षे ब्राह्मण वर्गाकडे शिक्षणाची मक्तेदारी होती. त्याला सर्वस्वी ब्राह्मणच जबाबदार होते असे नाही. तर बहुजन समाजात शिक्षणाविषयी अनास्था होती. शिक्षण हे आपले क्षेत्र नव्हे असे त्यांना वाटे. त्यामुळे ब्रिटिशांनी शिक्षण सर्वांना खुले केले तरीही शिक्षणामध्ये उच्चवर्णीयांचीच मक्तेदारी होती. त्यामुळेच शाहू महाराजांनी बहुजन समाजात शिक्षणप्रसार करण्याचे धोरण स्वीकारले. शाहू महाराजांनी शिक्षण क्षेत्रात खालील प्रमुख उपाययोजना व कार्यक्रम नियोजनपूर्वक आखून पार पाडले.

● **शिक्षण सुधारणा समिती :**

शाहू महाराजांनी कारकीर्दीच्या पहिल्या वर्षीच प्रचलित शैक्षणिक परिस्थितीचा आढावा घेवून त्यात सुधारणा सुचविण्यासाठी 'शिक्षण सुधारणा समिती' ची स्थापना केली.

● **शिक्षणाधिकारी :**

कोल्हापूर संस्थानात सन १८९५ पर्यंत उपशिक्षणाधिकारी हेच शिक्षणखात्याचा कारभार पहात होते. शाहू महाराजांनी संस्थानातील उपशिक्षणाधिकारी हे पद बंद करून त्याऐवजी सर्वोच्च असे शिक्षणाधिकारी हे पद निर्माण केले (सप्टेंबर १८९५). संस्थानातील मुला-मुलींच्या सर्व शाळा शिक्षणाधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली दिल्या.

● **१९०२ चा जाहीरनामा :**

शाहू महाराजांनी कारकीर्दीच्या सुरूवातीपासूनच सर्व वर्णातील लोकांना शिक्षण मिळावे यासाठी विशेष प्रयत्न केले. परंतु यात त्यांना म्हणावे तसे यश अद्याप आले नव्हते. कारण मागासलेल्या लोकांनी उच्च शिक्षण घेतले तरी त्यांना प्रशासकीय नोकऱ्यांत स्थान मिळत नव्हते. म्हणून शाहू महाराजांनी २६ जुलै १९०२ च्या जाहिरनाम्याने, मागासलेल्या लोकांनी उच्च शिक्षण घ्यावे म्हणून त्यांना उत्तेजन देण्यासाठी संस्थानातील नोकऱ्यांत त्यांच्यासाठी ५० टक्के राखीव जागांची तरतूद केली. अशाप्रकारे उच्च शिक्षणामुळे सरकारी नोकऱ्यांत प्राधान्य मिळू शकते याची जाणीव होताच मागासवर्गीय उच्च शिक्षणाकडे वळतील असा त्यांचा दृष्टीकोन होता.

● **उच्च शिक्षणासाठी देणग्या, शिष्यवृत्त्या :**

शाहू महाराजांनी उच्च शिक्षण घेणाऱ्या विविध जाती-धर्माच्या विद्यार्थांना देणग्या व शिष्यवृत्त्यांच्या रूपाने वेळोवेळी सहाय्य केल्याची अनेक उदाहरणे दिसून येतात. उदा. शंकर बाळाजी ढवळे हे राजाराम कॉलेजचे विद्यार्थी आय. सी. एस. च्या परीक्षेस बसण्यासाठी १९०१-०२ मध्ये इंग्लंडला निघाले होते. शाहू महाराजांनी ढवळे यांना दोन हजार रुपयांची देणगी दिली. शाहू महाराजांनी डॉ. आंबेडकरांनाही परदेशातील उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत केली होती. अशाप्रकारे छ. शाहू महाराजांनी उच्च शिक्षण घेणाऱ्या सर्व जातीधर्माच्या विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करून शिक्षणासाठी उत्तेजन देण्याचा प्रयत्न केला.

● **फी-माफी :**

शिक्षणप्रसारासाठी शाहू महाराजांनी विविध योजना राबविल्या. आर्थिकदृष्ट्या दुर्बल लोकांच्या मुलांना फी-माफ केल्याशिवाय शिक्षणप्रसार होऊ शकणार नाही म्हणून शाहू महाराजांनी प्रत्येक शाळेतील १५% मुलांना फी माफी देण्याचा निर्णय २० मे १९११ रोजी घेतला. शेतकरी, कामकरी इत्यादी शिक्षणवंचित मागासलेल्या वर्गांना फी-माफी देताना प्राधान्य देण्यात यावे आणि उरलेल्या फ्रीशिप्स पुढारलेल्या वर्गातील मुलांना देण्यात याव्यात असा फतवा त्यांनी काढला.

● **शाळा पंचसमिती :**

शाळांवर लक्ष ठेवण्यासाठी शाळा पंच नेमण्याची पद्धत करवीर राज्यात होती. पण ती योजना नामधारी होती. पंचाना अधिकारी नव्हते. शाहू महाराजांनी गावातील लोकांची शाळेच्या पंच समितीवर नेमणूक केली व त्यांना अधिकार दिले. तसेच त्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून दिली. शाळेवर देखरेख ठेवणे, शाळेतील गैरकारभाराची माहिती शिक्षणाधिकाऱ्यांना देणे, मागासलेल्या वर्गातील मुलांना शिक्षणासाठी उद्युक्त करणे, इ. कार्ये पंचसमितीस करावी लागत.

● **प्राथमिक शिक्षण :**

म. फुले यांच्याप्रमाणेच छ. शाहू महाराजांनी सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा पुरस्कार केला. नाशिक येथील एका भाषणात ते म्हणतात, *''प्राथमिक शिक्षणावर माझा भर आहे तरी दुय्यम व उच्च शिक्षणाकडे माझे लक्ष कमी नाही.... रयतेतील थोडासा भाग पूर्ण सुशिक्षित होण्यापेक्षा सर्व रयतेला प्राथमिक शिक्षणाचा थोडा तरी अंश*

*मिळाला पाहिजे असे माझे मत आहे. रयतेतील मोठा भाग अडाणी राहिला व थोडेसे लोक विद्याचार संपन्न झाले व प्रजेस अधिकार दिले तर ते या थोड्या लोकांच्या हाती पडणार.... .''*

कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्याचा विचार शाहू महाराजांच्या मनात १९१२-१३ च्या सुमारात प्राथमिक उद्‌भवला होता. इतर खात्यापेक्षा शिक्षण खात्याकडे महाराजांचे विशेष लक्ष होते. प्रत्येक गावात किमान एक शाळा असली पाहिजे व ज्या जातीचे लोक गावात जास्त असतील त्यांच्यापैकी एका प्रतिनिधीने ती चालविली पाहिजे असे त्यांचे मत होते.

- **मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण :**

प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात शाहू महाराजांनी २४ जुलै १९१७ रोजी प्रसिद्ध केलेला जाहीरनामा महत्त्वपूर्ण आहे. त्यात म्हटले होते, *'येत्या गणेश चतुर्थीपासून करवीर इलाख्यात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याचे आहे. सध्या असलेल्या सर्व प्राथमिक शाळातील फी सदर दिवसापासून माफ करण्यात येत आहे.... आज शाळा खात्यावर खर्च होत असलेल्या रकमेशिवाय देवस्थान फंडातून २०,००० व दरबार खजिन्यातून ८०,००० मिळून एक लाख रुपयांची जास्त मंजुरी देण्यात येत आहे.'* या मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना राबविण्यासाठी एक समिती नेमली होती. पहिल्या सक्तीच्या शाळेचे उद्‌घाटन करवीर पेट्यातील चिखली येथे ४ मार्च, १९१८ रोजी शाहू महाराजांच्या हस्ते झाले. १९१८-१९ या सालाअखेर अशा ९५ शाळा निरनिराळ्या खेड्यात सुरू झाल्या. या योजनेमुळे सुमारे पाऊण लाख खेड्यातील लोकांच्या टप्यात प्राथमिक शिक्षण प्रथमतःच आले व त्यांच्यापैकी ४,६३१ मुले शिक्षण घेवू लागली.

सक्ती शिक्षणाच्या संदर्भात जेवढी आर्थिक तरतूद एका जिल्ह्याहून लहान असलेल्या करवीर राज्याच्या शाहू छत्रपतींनी केली होती, तेवढीदेखील तरतूद अवाढव्य मुंबई इलाख्यात सरकारने केली नव्हती. ही तरतूद हिंदुस्थानच्या शैक्षणिक इतिहासात वैशिष्ट्यपूर्ण मानली पाहिजे. महाराजांनी हा पैसा संस्थानातील प्रत्येक घरावर एक रुपया अशा शिक्षण-कराच्या रुपाने उभा केला. याशिवाय संस्थानातील इनामदार, सरंजामदार तसेच सावकार, वकील, डॉक्टर, दरबारचे वरिष्ठ प्रतीचे अधिकारी यांच्यावरही शिक्षण-विषयक कर बसविण्यात आला.

कोल्हापूर संस्थानातील प्रत्येक गावात असणाऱ्या देवस्थानचे उत्पन्न आणि इमारती यांचाही शाहू महाराजांनी शिक्षणासाठी उपयोग करून घेतला. ९ जुलै, १९१७ रोजी देवस्थान व्यवस्थेसंबंधी केलेल्या नियमावलीत नवीन देवालय बांधताना त्याच्या उजव्या बाजूस शाळेसाठी सोपा बांधावा आणि देवालयाचा नित्य आणि नैमित्तिक खर्च होऊन जी रक्कम शिल्लक राहील ती शाळेच्या खर्चासाठी वापरावी अशा तरतूदी केल्या होत्या.

सक्तीच्या व मोफत शिक्षणाचा कायदा करूनही अनेक खेड्यातून शेतीच्या कामाच्या सबबीखाली मुले पाठविण्याबाबत पालकांकडून चालढकल होवू लागली, हे लक्षात येताच शाहू महाराजांनी शिक्षणास योग्य वयाची मुले पालकांनी शाळेत पाठवावित असा आदेश दिला. मुले शाळेत आली नाहीत तर पालकांना दंड करण्याचा हुकूम केला. तसेच शेतीच्या कामासाठी मुलांच्या मदतीची जरूरी असल्यास १५ दिवस गैरहजर राहण्याची मुभा दिली होती. यावरून प्राथमिक शिक्षणासंबंधी योजना राबविताना सर्वसामान्य जनतेला ती जाचक होणार नाही याची खबरदारी शाहू महाराजांनी घेतली होती असे दिसते.

सन १९१८ च्या प्रारंभीच शाहू महाराजांनी सक्तीच्या व मोफत शिक्षणासाठी एक स्वतंत्र खाते स्थापन केले. त्यावर 'डायरेक्टर' आणि 'एज्युकेशल इन्स्पेक्टर' या वरिष्ठ अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली. तसेच हे खाते त्यांनी स्वतःच्या नियंत्रणाखाली ठेवले होते. प्राथमिक शाळेतील शिक्षक नेमतानाही त्यांना थोडेफार इंग्रजीचे ज्ञान असावे अशी शाहू महाराजांची अपेक्षा होती. शिवाय नेमणूकीपूर्वी त्याला एक परीक्षा उत्तीर्ण व्हावे लागे. चांगल्या वर्तणूकीचा दाखला द्यावा लागे व त्याचे वय पंचवीसच्या आतील असावे अशा अटी घालण्यात आल्या. प्राथमिक शिक्षणाची योजना पूर्ण कार्यक्षमतेने राबविली जावी. यासाठी महाराजांनी या सर्व उपाययोजना केलेल्या होत्या.

सन १९१७-१८ मध्ये सक्तीच्या प्राथमिक शिक्षण योजनेखाली २७ शाळांमधून १२९६ विद्यार्थी शिक्षण घेत होते. १९२१-२२ सालापर्यंत त्यात वाढ होवून शाळांची संख्या ४२० व विद्यार्थी संख्या २२,००७ इतकी झाली. १९२२ साली या योजनेवर होणारा खर्च तीन लाखापर्यंत गेला.

● **वतनदार शिक्षकांची योजना :**

शाहू महाराजांनी सुरूवातीस नवीन शाळा काढून तेथे वतनदार शिक्षक नेमण्याची योजना १९१२ च्या अखेरीस काढली. परंतु ही योजना अमलात येणे कठिण आहे हे १९१४ मध्ये त्यांच्या लक्षात आले. १९१७ नंतर वतनदार शिक्षकांची योजना त्यांनी सोडून दिली.

● **व्यावसायिक शिक्षण :**

**१) शिक्षकांचे प्रशिक्षण वर्ग :**

कोल्हापूर संस्थानात शिक्षक म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीमध्ये प्राथमिक शालांत परीक्षा (व्हर्न्याक्युलर फायनल परीक्षा) पास झालेले थोडेच शिक्षक असत. अशा अकुशल शिक्षकांना कुशल बनविण्यासाठी सहा महिने मुदतीचे प्रशिक्षण वर्ग नोव्हेंबर १९१२ पासून शाहू महाराजांनी सुरू केले. व्ह. फा. पास झालेले शिक्षकच प्रशिक्षणासाठी निवडले जात. व्ह. फा. पास न झालेल्या आणि वयाची चाळीशी न ओलांडलेल्या शिक्षकांनी दोन वर्षात व्ह. फा. परीक्षा पास झाले पाहिजे असा निर्बंध घातला. शिक्षणाची गुणवत्ता व दर्जा वाढविण्यासाठी शाहू महाराजांनी ही योजना केली होती.

**२) पाटील शाळा :**

शाहू महाराजांनी शिक्षणाच्या विविध अंगाकडे लक्ष दिलेले दिसते. पाटील संपूर्ण गावचा कारभार पाहत असल्याने अशिक्षित पाटीलांना कुशल, कार्यक्षम बनविण्यासाठी शाहू महाराजांनी १५ मे, १९१२ रोजी पाटील शाळा सुरू केली. दिल्ली दरबाराच्या स्मृत्यर्थ या शाळेस 'दिल्ली दरबार मेमोरियल पाटील स्कूल' असे नाव देण्यात आले. या शाळेत जमीन महसूल, फौजदारी काम, गावाचे हिशेब, आरोग्य हे विषय शिकविले जात. ही शाळा सात वर्षे सुरू होती.

**३) किंग एडवर्ड अॅग्रिकल्चरल इन्स्टिट्यूट :**

शेतकऱ्यांतही आधुनिक ज्ञानाचा प्रसार व्हायला पाहिजे यासाठी शाहू महाराजांनी 'किंग एडवर्ड अॅग्रिकल्चरल

इन्स्टिट्यूट' नावाची संस्था १९१२ मध्ये स्थापन केली. सुधारित शेतीपद्धती प्रसारात आणणे व शेतकऱ्यांमध्ये ती लोकप्रिय करणे हे या संस्थेचे ध्येय होते.

**४) सत्यशोधक शाळा :**

धार्मिक विधी कसे करावेत याचे सशास्त्र शिक्षण देणारी 'सत्यशोधक शाळा' शाहू महाराजांच्या पाठिंब्याने जुलै १९१३ मध्ये सुरू झाली. या शाळेतील सर्व विद्यार्थी ब्राह्मणेतरच होते.

**५) श्री शिवाजी वैदिक विद्यालय :**

१९२० मध्ये शाहू महाराजांनी धार्मिक विधीचे शिक्षण देण्यासाठी 'श्री शिवाजी वैदिक विद्यालय' ची स्थापनाही केली होती.

**६) जयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टिट्यूट :**

शाहू महाराजांनी जयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टिट्यूट (स्थापना १८८७) या कोल्हापूरच्या संस्थेच्या शिक्षणक्रमात लक्ष घातले. या संस्थेचा खर्च दरबाराकडून केला जात असे. या संस्थेत सुतारकाम, लोहारकाम, मेटल टर्निंग, ब्रास फाऊंडिंग, साधी इंजिन्स चालविणे, विद्युत विलेपन आणि विणकाम या विषयांचे शिक्षण दिले जात असे. अभियांत्रिकी आणि औद्योगिक शिक्षणाचा पाया घालण्याचे श्रेय या इन्स्टिट्यूटकडे जाते.

**७) इन्फंट्री स्कूल :**

मुलांना लष्करी शिक्षण देण्यासाठी एक 'इन्फंट्री स्कूल' सुरू केले होते.

**८) संस्कृत कॉलेज :**

डॉ. कुर्तकोटी (तत्कालीन करवीर पीठाचे शंकराचार्य) यांनी १९१७ मध्ये सर्व जातीच्या मुलांसाठी सुरू केलेल्या 'छत्रपती संस्कृत महाविद्यालया'स शाहू महाराजांनी मौजे उचगाव येथील पूर्वीच्या लेपर असायलमच्या (कुष्ठरोग निवारण केंद्र) इमारती व आजुबाजूची मोकळी जागा देणगी म्हणून दिली. परंतु लवकरच हे संस्कृत कॉलेज बंद पडले.

**९) विद्यापीठ हायस्कूल :**

शाहू महाराजांनी विद्यापीठ हायस्कूल स्थापन करण्यासाठी सर्व प्रकारची मदत केली. वा. द. तोफखाने व त्यांचे मित्र गंगाधर दिक्षित यांना त्यांच्या इच्छेनुसार साकवारबाईची थट्टीची जागा शाळेसाठी दिली, खर्चासाठी तीन हजार रुपये दिले व क्रिडांगणासाठी कळंब्याजवळ ४८ एकर जमीन दिली. ३ सप्टेंबर, १९१७ रोजी कोल्हापूरला विद्यापीठ हायस्कूल सुरू झाले.

**१०) इतर शाळांना मदत/इतर शैक्षणिक सुधारणा :**

१. शाहू महाराजांनी ग्रंथालयांना आर्थिक मदत केली होती. उदा. फेरिस मेडिकल लायब्ररीला रुपये २५० दिले होते. लॉ लायब्ररीला रुपये ३६६ दिले होते.

२. शाहू महाराजांनी अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी अस्पृश्यांच्या शैक्षणिक विकासाला प्राधान्य दिले. अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू केली, त्यांना अनेक सवलती दिल्या. सर्वात महत्त्वाचे म्हणजे १९१९ मध्ये अस्पृश्यांसाठी असणाऱ्या वेगळ्या शाळा बंद करण्याचा हुकूम जारी केला. त्यामुळे अस्पृश्यांची मुले स्पृश्यांच्या शाळेत त्यांच्याबरोबर शिक्षण घेवू लागली.

३. १९२०-२१ मध्ये मुंबई विद्यापीठाकडून मॅट्रिक परीक्षेचे केंद्र कोल्हापूरात प्रयोगादाखल शाहू महाराजांनी घेतले. परगावाहून परीक्षेसाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची राहण्याची व जेवणाची मोफत व्यवस्था दरबारने केली होती.

शाहू महाराजांनी बहुजन समाजात शिक्षणप्रसार करण्यासाठी विविध शैक्षणिक सुधारणा केलेल्या दिसून येतात.

**११) स्त्रीशिक्षण :**

छ. शाहू महाराजांनी स्त्रीयांच्या शिक्षणाकडेही विशेष लक्ष दिलेले होते.

१. कोल्हापूर संस्थानच्या शिक्षणाधिकारी मिस् लिटल यांच्या राजीनाम्यानंतर त्यांच्या जागी शाहू महाराजांनी कोल्हापूरातील 'फिमेल ट्रेनिंग स्कूल' मधील शिक्षिका सौ. रखमाबाई केळवकर या बुद्धीमान स्त्रीची नेमणूक केली. एका भारतीय स्त्रीची या पदावर नेमणूक होणे ही घटना महत्त्वपूर्ण होती.

२. भुदरगड-गडहिंग्लज सारख्या डोंगराळ भागात मुलींच्या शाळेची आवश्यकता वाटल्याने तेथे त्यांनी शाळा सुरू केली होती.

३. रखमाबाई केळवकरांच्या कन्या कृष्णाबाई यांना महाराजांनी मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये वैद्यकीय शिक्षणासाठी पाठविले व आर्थिक मदत दिली. शिक्षण पूर्ण होताच महाराजांनी त्यांची कोल्हापूरच्या अलबर्ट एडवर्ड मेमोरियल हॉस्पिटलमध्ये असिस्टंट डॉक्टर म्हणून नेमणूक केली (१९०२) लवकरच उच्च वैद्यकिय शिक्षणासाठी कृष्णाबाई इंग्लंडला गेल्या. शाहू महाराजांनी भारतीय स्त्रीयांसाठी राखीव असणारी शिष्यवृत्ती त्यांना मिळवून दिली. उच्च शिक्षण घेवून परत आल्यानंतर त्या कोल्हापूर संस्थानच्या सेवेत पुन्हा रुजू झाल्या.

४. शाहू महाराजांनी १९०७ मध्ये कोल्हापूरात चांभार व ढोर जातीतील मुलींकरिता स्वतंत्र शाळा सुरू करण्यास रुपये ९६ दरसाल मंजूर केले होते.

५. संस्थानातील मुलींच्या शिक्षणास उत्तेजन देण्यासाठी महाराजांनी आपली कन्या अक्कासाहेब महाराजांच्या विवाहप्रित्यर्थ त्यांच्या नावाने आणि भावनगरच्या महाराणी नंदकुंवर यांच्या नावाने शिष्यवृत्ती जाहीर केल्या होत्या.

६. राजाराम कॉलेजमध्ये शिकणाऱ्या मुलींना त्यांनी फी माफ केली होती.

७. मुलांच्या शाळेत शिकणाऱ्या मुलींना आणि त्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांना शाहू महाराजांनी प्रोत्साहन

दिले होते. अशा शिक्षकांना इनाम देण्याची पद्धत त्यांनी १९१४ पासून सुरू केली होती.

८. संस्थानाबाहेरील स्त्रीशिक्षण संस्थांनाही महाराज मदत करीत असत. १९१८ मध्ये हिंगणे येथील महिला आश्रमास त्यांनी ५०० रुपयांची मदत दिली होती. तसेच त्यांनी गुजरातमधील भावनगर संस्थानच्या खजिन्यात २४०० रुपयांची ठेव ठेवली होती व त्या रकमेच्या व्याजातून भावनगरच्या मुलींना लक्ष्मीबाई यांच्या नावे शिष्यवृत्ती देण्याची सोय केली होती.

९. शाहू महाराजांनी स्त्रियांच्या व्यावसायिक शिक्षणाकडेही लक्ष दिल्याचे दिसून येते. डिसेंबर १९१७ पासून कोल्हापूर अलबर्ट एडवर्ड हॉस्पिटलमध्ये नवीन नर्सिस कोर्स सुरू केला होता.

१०. १९१८ मध्ये शाहू महाराजांचे धाकटे पुत्र प्रिन्स शिवाजी यांचा मृत्यू झाल्यानंतर महाराजांनी राजपरिवाराच्या विरोधाला न जुमानता त्यांच्या विधवा सुनेला-इंदुमती राणीसाहेबांना शिक्षण देण्याचा निर्णय घेतला. महाराजांना आपल्या सुनेने उच्चवैद्यकिय शिक्षण घेवून गोरगरीबांची सेवा करावी असे वाटत होते. पण महाराजांच्या निधनामुळे त्यांचे हे स्वप्न पुरे होवू शकले नाही.

अशाप्रकारे शाहू महाराजांनी मुलींच्या शिक्षणासाठीही विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या. मुलींसाठी ग्रामीण भागात शाळा काढणे, त्यांना फीमध्ये सवलत देणे, शिष्यवृत्ती देणे, उच्चशिक्षणासाठी आर्थिक मदत देणे यासारख्या उपायांद्वारे स्त्रीशिक्षणास प्रोत्साहन दिले.

● **राजाराम कॉलेज (उच्च शिक्षण) :**

राजाराम कॉलेजची स्थापना सन १८८० मध्ये झाली होती. कोल्हापूर संस्थानातील जहागिरदारांच्या आर्थिक मदतीवर कॉलेज सुरू होते. परंतु शाहू महाराजांच्या हाती अधिकारसूत्रे येताच संस्थानिकांनी कॉलेजला दिली जाणारी आर्थिक मदत बंद केली. यामुळे कॉलेजच्या खर्चाचा सर्व भार संस्थानवर पडू लागला. प्राथमिक शिक्षणाकडे यामुळे जास्त लक्ष देता येत नव्हते. म्हणून शाहू महाराजांनी राजाराम कॉलेज व राजाराम हायस्कूल दोन्ही संस्था १ जून, १९१९ पासून पाच वर्षाच्या मुदतीने आर्य समाज संस्थेकडे सोपविल्या. दोन्ही संस्थांच्या खर्चासाठी दरबारने दरवर्षी २० हजार रुपये देण्याचे मान्य केले. यानंतर एक वर्षातच म्हणजे १९२० सालीच कॉलेज फुल ग्रेड झाले व बी. ए. पर्यंतच्या शिक्षणाची परवानगी मुंबई विद्यापीठाकडून मिळाली. १९२२ मध्ये शाहू महाराजांच्या प्रयत्नामुळे मुंबई विद्यापीठाकडून राजाराम कॉलेजला कायमची मान्यता आली. यावरून छ. शाहू महाराजांनी प्राथमिक, दुय्यम शिक्षणाप्रमाणेच उच्च शिक्षणाकडेही लक्ष दिलेले होते.

● **वसतिगृह चळवळ :**

बहुजन समाजात शिक्षणप्रसार होण्याच्या दृष्टीने शाहू महाराजांनी आणखी एक योजना अत्यंत विचारपूर्वक राबविली ती म्हणजे वसतिगृहांची स्थापना होय. कोल्हापूर शहरात विविध शैक्षणिक सोयी उपलब्ध असल्या तरी त्यांचा फायदा खेड्यातील गोरगरीब व मागासलेल्या विद्यार्थ्यांना शहरात राहण्या-जेवण्याच्या सुविधा अल्प खर्चात मिळत नसल्याने घेता येत नव्हता. म्हणून सन १८९६ मध्ये कोल्हापूर दरबारच्या खर्चाने सर्व जातीजमातीच्या विद्यार्थांसाठी राजाराम कॉलेजला जोडून एक वसतिगृह सुरू केले. परंतु या वसतिगृहात ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांना

प्रवेश न दिल्याने हे वसतिगृह ब्राह्मण विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित झाले. म्हणून छ. शाहू महाराजांनी वेगवेगळ्या जातीच्या विद्यार्थ्यांपुरतेच कोल्हापूरात स्वतंत्र वसतिगृहे सुरू करण्यास प्रोत्साहन दिले. शाहू महाराजांनी प्रत्येक जातीतील पुढारी व कार्यकर्ते बोलवून त्यांना आपापल्या जातीतील विद्यार्थ्यांसाठी कोल्हापूरात वसतीगृहे सुरू करण्यास प्रवृत्त केले. शिवाय प्रोत्साहनाबरोबरच जागा, इमारत, निधी, अनुदान अशाप्रकारची मदतही दिली. त्यामुळेच छ. शाहू महाराजांच्या कारकीर्दीत कोल्हापूरात निरनिराळ्या जातीसाठी व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी पुढील २० वसतिगृहे सुरू करण्यात आली.

व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग (१९०१), जैन बोर्डिंग (१९०५), मुस्लिम बोर्डिंग (१९०६), वीरशैव लिंगायत बोर्डिंग (१९०७), मिस क्लार्क होस्टेल (१९०८), दैवज्ञ बोर्डिंग (१९०८), नामदेव बोर्डिंग (१९१२), कायस्थ प्रभू बोर्डिंग (१९१२), पांचाल ब्राह्मण बोर्डिंग (१९१२), सारस्वत बोर्डिंग (१९१२), इंडियन ख्रिश्चन होस्टेल (१९१५), आर्यसमाज गुरूकुल (१९१८), वैश्य बोर्डिंग (१९१८), ढोर-चांभार बोर्डिंग (१९१९), शिवाजी वैदिक विद्यालय बोर्डिंग (१९२०), प्रिन्स शिवाजी मराठा फ्री बोर्डिंग (१९२०), सोमवंशीय आर्य क्षत्रिय बोर्डिंग (१९२०), श्री देवांग बोर्डिंग (१९२१), सुतार बोर्डिंग (१९२१), नाभिक बोर्डिंग (१९२१).

छ. शाहू महाराजांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या वसतिगृह चळवळीमुळे कोल्हापूर वसतिगृहांची जननी म्हणून ओळखले जाऊ लागले. आज बहुजन समाज शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रात नेतृत्व करताना दिसत आहे त्याचे बरेचसे श्रेय या वसतिगृह चळवळीला आहे.

**● कोल्हापूरबाहेरील शिक्षणसंस्थांना मदत :**

छ. शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाबाहेरील पुणे, नाशिक, अहमदनगर, नागपूर, पंढरपूर इ. ठिकाणच्या शिक्षणसंस्था, वसतिगृहे यांना सढळ हाताने मदत करून संस्थानाबाहेरील बहुजन समाजात शिक्षणप्रसार करण्याचे कार्य केले.

**● मूल्यमापन :**

छ. शाहू महाराजांच्या पुरोगामी शैक्षणिक धोरणामुळे शिक्षणाचा प्रसार झाला. कोल्हापूर संस्थानची किंबहुना महाराष्ट्राची प्रगतीकडे वाटचाल सुरू झाली, शिक्षण क्षेत्रातील उच्चवर्णियांची मक्तेदारी संपुष्टात येवून ब्राह्मणेतर व अस्पृश्यांतही शिक्षणाची आवड निर्माण झाली, त्यांच्या विद्यार्थीसंख्येत वाढ झाली. सन १८९४ मध्ये, महाराजांच्या राज्यारोहणाच्यावेळी ७९ कॉलेज विद्यार्थ्यांत ब्राह्मणेतर फक्त ६ होते. १९२२ मध्ये ही संख्या २६५ विद्यार्थ्यांपैकी ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांची संख्या १०० झाली.

शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्यापासून प्रेरणा घेवून बहुजन समाजातील अनेक नेत्यांनी आपआपल्या भागात बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षणसंस्थांची स्थापना केली. उदा. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्था, डॉ. पंजाबराव देखमुख यांनी विदर्भात श्री. शिवाजी एज्युकेशन सोसायटी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. याशिवाय कर्मवीर भाऊराव हिरे, कर्मवीर मामासाहेब जगाळे, व्ही. टी. पाटील यासारख्या अनेक नेत्यांनी शिक्षणसंस्था स्थापन करून बहुजन समाजात

शिक्षणप्रसार केला. त्यामुळे सामाजिक परिवर्तनास चालना मिळाली, महाराष्ट्राचा इतिहास शंभर वर्षानी पुढे गेला, आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण झाली. याचे श्रेय छत्रपती शाहू महाराज यांना आहे.

राजर्षी छ. शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्यामुळे कोल्हापूर हे दक्षिण महाराष्ट्रातील सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक सुधारणांचे केंद्र म्हणून उदयास आले.

● **स्वयंअध्ययन प्रश्न – २ :**

**योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी ‘सक्तीच्या प्राथमिक शिक्षणा’चा कायदा ......... साली पास केला.

अ) १९१७ ब) १९१८

क) १९२० ड) १९२१

२. ............ मध्ये केलेल्या जाहिरनाम्याने मागासवर्गीयांना नोकऱ्यांत ५० टक्के आरक्षण दिले.

अ) १९१७ ब) १९१८

क) १९०२ ड) १९०१

३. लष्करी शिक्षण देण्यासाठी शाहू महाराजांनी ............ स्कूल सुरू केले.

अ) ट्रेनिंग ब) इन्फंट्री

क) राजाराम ड) टेक्निकल

४. छ. शाहू महाराजांच्या विधवा सुनेचे नाव ............ होते.

अ) राधाबाईसाहेब ब) आऊसाहेब

क) रखमाबाईसाहेब ड) इंदुमतीसाहेब

५. मिस लिटल या शिक्षणाधिकाऱ्यांच्या जागी ............ यांची नेमणूक करण्यात आली होती.

अ) रखमाबाई केळवकर ब) कृष्णाबाई केळवकर

क) द्वारकाबाई केळवकर ड) यमुनाबाई केळवकर

● **शाहू महाराजांचे सामाजिक कार्य :**

शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानची राज्यसूत्रे ताब्यात घेतली तेव्हा समाजात जातिव्यवस्थेची बंधने कडक होती. कनिष्ठ जातीतील व्यक्तीला माणूस म्हणून जगण्याचे मूलभूत अधिकारही मिळत नव्हते. महाराष्ट्रात सामाजिक सुधारणा अगोदर की राजकीय सुधारणा हा वाद सुरू होता. टिळकांच्या मते, सामाजिक सुधारणा नंतर करता येतील, पण अगोदर स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. शाहू महाराजांच्या मते हा वादच मुळात चुकीचा असून

दोन्हीही सुधारणा समाजरथाची दोन चाके आहेत.

जातिभेद हा देशाच्या ऐक्याच्या व प्रगतीच्या मार्गातील अडसर आहे, तो दूर करण्यासाठी प्रत्येक जातीने शिक्षण व जागृती याद्वारे संघटितपणे प्रयत्नांची शिकस्त केली पाहिजे असे शाहू महाराजांनी सातत्याने बहुजन समाजाला सांगितले, जातिपरिषदांना उत्तेजन दिले, मात्र त्याचवेळी आपली दृष्टी दूरवर ठेवा, पायापुरते पाहू नका, जातिभेदाची तीव्रता वाढणार नाही याची दक्षता घेण्यास सांगितले. प्रत्येक जातीने आपली सुधारणा करून दर्जा वाढविण्याचा प्रयत्न करावा, त्यातून काही काळातच जातीभेद नष्ट होईल, असा महाराजांना विश्वास होता.

● **वेदोक्त संघर्षाचा परिणाम** :

शाहू महाराजांच्या जीवनात वेदोक्त प्रकरणामुळे आमूलाग्र क्रांती घडून आली. सन १८९९ च्या ऑक्टोंबर महिन्यात (कार्तिक मासात) पहाटे महाराज पंचगंगातीरी स्नानास गेले असता महाराजांचा एक आश्रित भटजीने (नारायण राजोपाध्ये) स्नान न करताच वैदिक मंत्र म्हणण्याऐवजी पुराणोक्त मंत्र म्हणत होता. ही गोष्ट राजारामशास्त्रीनी महाराजांच्या लक्षात आणून देताच महाराजांनी त्यास जाब विचारला. त्याने 'शुद्र' म्हणून शाहू महाराजांची हेटाळणी करून महाराजांना वेदोक्ताचे अधिकार नाकारले. प्रत्यक्ष राजाला अशी वागणूक मिळते, तर सामान्य लोकांना काय वागणूक मिळत असेल याची महाराजांना जाणीव झाली. याविरूद्ध महाराजांनी संघर्ष केला, हा संघर्ष सामाजिक हक्काच्या, न्यायाच्या प्रस्थापनेसाठी होता. या घटनेचे तीव्र पडसाद कोल्हापूर संस्थानात व संस्थानाबाहेर उमटले. वेदोक्त संघर्षामुळे ब्राह्मणेतरांचा स्वाभिमान जागृत झाला. पुढे ब्रह्मवृदांने महाराजांचे क्षत्रियत्व मान्य केले तरी या घटनेमुळे शाहू महाराजांना मागासलेल्या आर्थिक विकासासाठी आपल्या संस्थानातील नोकऱ्यांमध्ये राखीव जागा निर्माण केल्या, महाराज ब्राह्मणशाहीच्या वर्चस्वाविरूद्ध लढणाऱ्या सत्यशोधक समाज आणि हिंदूंना वेदाचा अधिकार देणाऱ्या आर्य समाजाकडे आकर्षित झाले.

● **अस्पृश्योद्धाराचे कार्य** :

वेदोक्त संघर्षामुळे वर्णवर्चस्वाविरूद्‌ध लढण्याची, शुद्रातिशूद्रांना मानसिक व सामाजिक गुलामगिरीतून बाहेर काढून सामाजिक समता प्रस्थापित करण्याची महाराजांची इच्छा अधिक प्रबळ झाली होती. हिंदुस्थानशिवाय कुठेही न आढळणारा अस्पृश्यता किंवा जातीभेद, जातीद्‌वेष हा लज्जास्पद आहे असे शाहू महाराजांचे मत होते. त्यामुळे अस्पृश्योद्‌धरासाठी शाहू महाराजांनी विविधांगी प्रयत्न केले. त्यांच्या शिक्षणाची सोय केली, वसतिगृहाची सोय केली, नोकऱ्यांमध्ये संधी दिली, महार वतन खालसा केले, विविध जाहिरनामे काढून अस्पृश्यता निवारणासाठी प्रयत्न केले.

● **अस्पृश्योद्धारासाठी केलेले शैक्षणिक कार्य** :

शाहू महाराजांना कोणत्याही समाजाच्या उन्नतीसाठी प्रथम शैक्षणिक सुधारणा होणे गरजेचे वाटत होते, त्यासाठी त्यांनी अस्पृश्यांच्यासाठीही विविध शिक्षणविषयक सुविधा केल्या.

१. सन १९०७ मध्ये कोल्हापूरातील चांभार व ढोर या अस्पृश्य समाजातील मुलींच्या शाळेसाठी मंजुरी देण्यात येऊन वार्षिक अनुदानाची तरतूदही केली.

२. अस्पृश्य मानलेल्या जातीत विद्या प्रसारक मंडळी नावाची संस्था स्थापन करून या संस्थेद्वारे सन १९०८ मध्ये अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी 'मिस क्लार्क वसतिगृहा'ची स्थापना केली. या वसतिगृहात विद्यार्थ्यांची राहण्याची व जेवणाची सोय मोफत होती.

३. सन १९११ मध्ये अस्पृश्य समाजातील विद्यार्थ्यांना सर्व प्रकारचे शिक्षण मोफत करण्यात आले. त्यांच्यातील हुशार विद्यार्थ्यांना दरबारकडून वेळोवेळी शिष्यवृत्या दिल्या जात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाही उच्च शिक्षणासाठी शाहू महाराजांनी आर्थिक सहकार्य केले होते.

४. १९१९ मध्ये अस्पृश्यांसाठी असणाऱ्या वेगळ्या शाळा बंद करण्याचा हुकूम जारी केला. त्यामुळे अस्पृश्यांची मुले स्पृशांच्या शाळेत त्यांच्याबरोबर शिक्षण घेवू लागली.

५. संस्थानाबाहेरील नाशिक, नागपूर येथील अस्पृश्यांच्या अनेक वसतिगृहांना आर्थिक मदत दिली.

● **हजेरी पद्धत बंद :**

शाहू महाराजांनी २७ जुलै १९१८ ला काढलेल्या आदेशाद्वारे अस्पृश्यांवर लादलेल्या अमानुष 'हजेरी' पद्धतीचे निर्मूलन केले. गुन्हेगार जातींच्या लोकांची हजेरी दररोज पोलिस पाटलाकडे होत असे. त्यामुळे या जातीच्या लोकांची फार गैरसोय होत असे. म्हणून शाहू महाराजांनी महार, मांग, रामोशी व बेरड या चार जातींच्या लोकांची हजेरी बंद केली. पण यातील जे कोणी गुन्ह्यात सापडून शिक्षा झालेले असतील त्यांना मात्र हजेरीची माफी नाही असा आदेश दिला.

● **वेठवरळा पद्धतीचे निर्मूलन :**

अस्पृश्यांवर, विशेषतः महार समाजावर 'वेठवरळा' ही अमानुष पद्धत लादली होती. यामध्ये पाटील-कुलकर्णी हे गावकामगार, सरकारी अधिकारी महारांस अनेक कामे सांगून त्यांना विनामोबदला राबवून घेत असत. वास्तविक महार हाही एक वतनदारच होता, त्यांना त्यांच्या कामासाठी इनाम व हक्क असत, पण हे वतन प्रतिष्ठेचे मानले जात नव्हते. महारांना इतर कामाबरोबर वेठवरळाचे कामही करावे लागे. शाहू महाराजांनी २६ जून, १९१८ च्या आदेशाने वेठवरळा पद्धत बंद केली. राजघराण्यातील लोकांशिवाय व स्टेट दप्तराच्या कामाशिवाय वेठवरळा घ्यायची नाही, अन्य कोणी वेठीस महार घेतला तर त्यास वतनातून कमी केले जाईल, असेही स्पष्ट केले.

● **महार वतन खालसा :**

महारांची वेठबिगारी महाराजांनी बंद केली तरी त्यांना वतनदारीची सरकार दरबारी असणारी कामे करावीच लागत. ही महारांची सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्यासाठी शाहू महाराजांनी मे १९२१ मध्ये महारकीचे वतन खालसा करून त्यांच्या जमिनी रयतावा करून त्यांच्या नावे करून दिल्या.

● **अस्पृश्यता निवारणासाठी विविध उपाययोजना :**

**१. अस्पृश्यता निवारणासाठी विविध जाहिरनामे :**

अस्पृश्यतेच्या रुढीस आपल्या संस्थानात तरी कायद्याने बंदी घालावी यासाठी शाहू महाराजांनी विविध

जाहिरनामे वेळोवेळी काढले. त्याद्वारे जाहिर केले की, संस्थानात जे अस्पृश्य नोकरी करतात त्यांना अधिकाऱ्यांनी प्रेमाने व आदराने वागविले पाहिजे, धर्मार्थ दवाखान्यात, शाळांमध्ये अस्पृश्यांची सर्व प्रकारची काळजी घेतली पाहिजे, त्यांना समानतेने वागविले पाहिजे, सार्वजनिक इमारती, सरकारी अन्नछत्रे व नदी, सार्वजनिक विहिरी येथेही कोणताही विटाळ मानायचा नाही.

**२. अस्पृश्यांना प्रत्यक्ष नोकरीत संधी :**

शाहू महाराज केवळ अस्पृश्यता निवारणाचे जाहिरनामे काढून स्वस्थ बसले नाहीत तर त्यांनी संस्थानच्या सरकारी नोकऱ्यां व खाजगी खात्यांतही अस्पृश्यांना संधी देऊन त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण केला, त्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्यास सुरूवात केली.

(१) संस्थानच्या लष्करी सेवेत चार अस्पृश्यांची नेमणूक केली.

(२) तलाठी म्हणून अस्पृश्यांची नेमणूक करण्याचा आदेश दिला. त्यासाठी तलाठी क्लास सुरू केला, त्यात अस्पृश्य उमेदवारांना शिष्यवृत्त्या दिल्या.

(३) कोल्हापूर म्युनिसिपालिटीच्या कार्यालयातही अस्पृश्यांची नेमणूक केली. पुढे म्युनिसिपालिटीच्या चेअरमनपदी अस्पृश्य समाजातील दत्तोबा पवार यांची नेमणूक झाली होती.

(४) सरकारी पागेत, पील (हत्ती) खान्यात, शिकार खात्यात, टपाल खात्यात सर्वत्र अस्पृश्य व्यक्तींची नेमणूक केली. काहींना माहूत म्हणून कामावर घेतले. १९०८ मध्ये आपली कन्या राधाबाईसाहेब यांच्या लग्नाच्या वरातीत घोडागाडीवर कोचमन म्हणून अस्पृश्य समाजातील व्यक्तीला बसविले.

(५) शिक्षीत अस्पृश्य लोकांना वकिलीच्या सनदा दिल्या.

**३. जाठ, सरदार आणि पंडित पैलवान :**

अस्पृश्य समाजातील व्यक्तींची आडनावे जातिवाचक असल्याने बऱ्याचदा अडचणी येत. कुस्त्यांच्या मैदानात त्यांना जोडीदार मिळणे अवघड होत असे. त्यासाठी अस्पृश्य मल्लाची जात लक्षात येऊ नये म्हणून शाहू महाराजांनी महार पैलवानांना 'जाठ', चांभारांना :सरदार' आणि भंग्यांना 'पंडित' अशी नावे दिली होती.

**४. अस्पृश्यांच्या हातच्या अन्नाचा स्विकार :**

शाहू महाराजांनी अस्पृश्यता निवारणासाठी अस्पृश्यांच्या हातचे अन्न वेळोवेळी जाहिरपणे स्विकारून या रूढीविरुद्ध मोठे पाऊल उचलले. सोनतळी कॅम्पवर अस्पृश्यांबरोबर भोजनाचा कार्यक्रम घडवून आणला. १९२० मध्ये नागपूर येथे झालेल्या अखिल भारतीय बहिष्कृत परिषदेवेळी आणि नाशिक येथे झालेल्या अस्पृश्य विद्यार्थी वसतिगृहाच्या पायाभरणी समारंभावेळी अस्पृश्यांच्या हातचा चहा महाराजांनी सर्वांसमोर घेतला होता.

**५. गंगाराम कांबळेना मदत :**

सरकारी पागेत मोतद्दार म्हणून काम करणाऱ्या गंगाराम कांबळे याने मराठ्यांसाठी असलेल्या पाण्याच्या

हौदाला स्पर्श केला म्हणून मराठ्यांनी त्याला रक्तबंबाळ होईपर्यंत मारले. शाहू महाराजांना हे समजताच शाहू महाराजांनी मारहाण करणाऱ्या व्यक्तीस बोलावून घेऊन सर्वांसमोर त्याची पाठ फोडून काढली. तसेच गंगारामची नोकरी माफ करून त्यास स्वतंत्र व्यवसाय करण्यास सांगितले व लागेल ती मदत करण्याचे आश्वासन दिले.

पुढे गंगारामने शाहू महाराजांच्या प्रोत्साहनाने कोल्हापूरात हमरस्त्यावर 'सत्यसुधारक' हॉटेल सुरू केले. महाराज स्वतः या हॉटेलमधील चहा घेत व इतरांनाही तो चहा आग्रहाने प्यायला लावत. पुढे हेच गंगाराम अस्पृश्योद्धाराच्या कार्यात महाराजांचे कार्यकर्ते बनले. महाराजांच्या निधनानंतर हेच गंगाराम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सच्चे सहकारी म्हणून काम करीत होते.

**६. अस्पृश्यांच्या परिषदेचे अध्यक्षपद :**

शाहू महाराजांनी १९२० मध्ये कोल्हापूर संस्थानातील माणगाव येथे अस्पृश्यांची परिषद भरविली. तसेच नागपूर व दिल्ली येथे भरलेल्या अस्पृश्यांच्या परिषदेचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. या परिषदांमधून महाराजांनी सामाजिक सुधारणेचे विचार मांडले.

शाहू महाराजांनी अस्पृश्योद्धारासाठी केवळ विचार मांडले नाहीत तर प्रत्यक्ष कृती केली, विविधांगी मार्गाने अस्पृश्यता निवारण्यासाठी प्रयत्न केले. हे कार्य करीत असताना त्यांना प्रचंड टिकेलाही सामोरे जावे लागले, तरीही ती आपल्या विचार व कार्यापासून मागे हटले नाहीत. त्यांच्या या कार्यामुळे अस्पृश्य समाज त्यांना 'देव' मानू लागला होता. महर्षी शिंदेही महाराजांच्या या अस्पृश्योद्धाराच्या कार्याने भारावून गेले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही महाराजांच्या अस्पृश्योद्धाराच्या कार्याविषयी कृतज्ञतेने म्हटले आहे *''शाहू महाराजांसारखा सखा अस्पृश्यांना पूर्वी लाभला नव्हता व पुढे लाभेल की नाही याबद्दल आम्हास शंका आहे.''*

● **स्त्रियांच्या उन्नतीसाठी केलेले कार्य :**

बहुजन समाज, अस्पृश्यांसाठी केलेल्या कार्याप्रमाणे शाहू महाराजांनी स्त्रियांच्या उन्नतीसाठीही प्रयत्न केले. त्याकाळात स्त्रियांना समाजात दुय्यम स्थान होते, स्त्रियांवर अनेक बंधने लादलेली होती, त्यामुळे स्त्रियांच्या उन्नतीसाठी शाहू महाराजांनी स्त्री शिक्षणास चालना दिली. स्त्री शिक्षीत झाल्यास कुटूंब, समाज व पर्यायाने देशाचा विकास होईल असा त्यांचा विश्वास होता. म्हणून शाहू महाराजांनी मुलींसाठी शाळा काढल्या, संस्थानातील मुलींच्या उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या, आर्थिक सहाय्य वेळोवेळी केले, राजाराम कॉलेजमध्ये शिकणाऱ्या मुलींना फी माफ केली, संस्थानाबाहेरील स्त्री शिक्षणसंस्थांना आर्थिक मदत केली, स्त्रियांच्या व्यावसायिक शिक्षणाची सोय केली.

स्त्रियांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी शाहू महाराजांनी विधवा पुनर्विवाहाचा कायदा, क्रुरपणाच्या वर्तनास प्रतिबंध करणारा कायदा, घटस्फोटाचा कायदा, वारसाचा कायदा इत्यादी विविध कायदे करून स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न केले.

● **आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार :**

जातीभेद निर्मूलनासाठी शाहू महाराजांनी जाती-जातीतील रोटीबेटी व्यवहाराला चालना दिली. त्यांनी

आपल्या संस्थानात आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. त्यांनी आपल्या जनक घराण्यातील-कागलकर घाटगे घराण्यातील चुलत भगिनी चंद्रप्रभाबाई यांचा विवाह इंदूरच्या तुकोजीराव होळकरांचे पुत्र यशवंतराव यांच्याशी केला. महाराजांच्या योजनेप्रमाणे कोल्हापूर व इंदूर संस्थानांच्या दरम्यान असे २५ मराठा-धनगर आंतरजातीय विवाह संपन्न झाले.

● **व्यवसाय बंदी उठविली :**

जातीव्यवस्थेच्या निर्बंधाप्रमाणे प्रत्येक जातीला परंपरेने चालत आलेला आपल्या जातीचा व्यवसाय करावा लागत असे. एखाद्या व्यक्तीने आपल्या जातीबाहेरचा व्यवसाय केला तर तो गुन्हा समजला जात असे. शाहू महाराजांनी २२ फेब्रुवारी १९१८ रोजी संस्थानातील बलुतेदार पद्धती खालसा करून ग्रामीण भागातील बलुतेदार-अमलदारांना हवा तो व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य दिले, त्यांच्या जमिनी रयतावा केल्या.

● **भटक्या व विमुक्त जातींचा उद्धार :**

शाहू महाराजांनी कुंचीकोरवी, वडर, डोंबारी, रजपूत भामटा, फासेपारधी इत्यादी गुन्हेगार समजल्या जाणाऱ्या जमातींच्या उद्धाराचेही कार्य केले. कष्टाची कामे करणाऱ्या वडर व रजपूत भामट्या लोकांना त्यांनी घरांसाठी जागा देऊन स्थिर केले, ज्यांच्या मालकीची घरे होती त्यांना माणसात आणण्याचे काम केले. डोंबाऱ्यांनाही जागा देऊन त्यांची एक वस्ती बनविली, कलाकुसरीच्या वस्तू बनविण्यास त्यांना प्रोत्साहन दिले. कुंचीकोरवी लोक शिकारीत तरबेज असल्याने त्यांना शिकारखान्यात नोकरीस घेतले. कोरव्यांच्या रामू नावाच्या धष्टपुष्ट मुलास आपल्या राजवाड्याच्या आखाड्यात आणून पैलवानी खुराक सुरू करून त्याला नामांकित पैलवान बनविले.

शिकार व चोरी करून पोट भरणाऱ्या, नेमबाजीत तरबेज असणाऱ्या फासेपारधी जमातीतील लोकांना शाहू महाराजांनी सोनतळी कॅम्पच्या खास पहाऱ्यावर नेमले, काही फासेपारध्यांना शिकारखान्यात कुत्तेवान म्हणून घेतले, काहींना पोलीस खात्यात नेमले, काहींना रस्तेबांधणी, विहिर खोदाई, घरबांधणी यासारख्या कामावर ठेवले, तर काहींना राधानगरीच्या धरणाच्या कामावर पाठविले. सोनतळी कॅम्पवर काम करणाऱ्या फासेपारध्यांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय केली, त्यातील काही हुशार मुलांना आर्य समाजाच्या गुरूकुलात पाठविले. महाराजांनी कोल्हापूरातील कोटीतीर्थच्या माळावर, तसेच रायबाग येथे काही फासेपारध्यांना, कांजारभाट लोकांना घरासाठी जागा अथवा जमिनी दिल्या, त्यांना स्थिर केले. हे शाहू महाराजांनी उचललेले क्रांतीकारक पाऊल होते, त्यामुळे भटक्या विमुक्त जमातीचे लोक त्यांना देव मानत असत.

शाहू महाराजांनी जातीभेद निर्मूलन, अस्पृश्योद्धार, स्त्री शिक्षण, आंतरजातीय विवाह कायदा या उपायांद्वारे सामाजिक सुधारणा केल्या. हे कार्य करीत असताना त्यांना टीकाही सहन करावी लागली, तरीही ते आपल्या कार्यापासून विचलित झाले नाहीत.

● **स्वयंअध्ययन प्रश्न- ३.**

**योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. शाहू महाराजांनी ............ रोजीच्या आदेशाद्वारे गुन्हेगार जातींच्या लोकांच्या 'हजेरी' पद्धतीचे निर्मूलन केले.

अ) २६ जून १९१८ ब) २७ जुलै १९१८

क) २२ फेब्रुवारी १९१८ ड) ०२ मे १९२१

२. शाहू महाराजांनी ............ च्या आदेशाने वेठवरळा पद्धत बंद केली.

अ) २६ जून १९१८ ब)२७ जुलै १९१८

क) २२ फेब्रुवारी १९१८ ड) ०२ मे १९२१

३. शाहू महाराजांनी ............ मध्ये कोल्हापूर संस्थानातील माणगाव येथे अस्पृश्यांची परिषद भरविली.

अ) १९१७ ब) १९१८

क) १९१९ ड) १९२०

४. ............ मध्ये शाहू महाराजांनी अस्पृश्यांसाठी असणाऱ्या वेगळ्या शाळा बंद केल्या.

अ) १९१७ ब) १९१८

क) १९१९ ड) १९२०

५. शाहू महाराजांनी ............ रोजी संस्थानातील बलुतेदार पद्धती खालसा केली.

अ) २६ जून १९१८ ब) २७ जुलै १९१८

क) २२ फेब्रुवारी १९१८ ड) ०२ मे १९२१

### ३.२.२ महिलांसाठी कायदे :

भारतीय पुरूषप्रधान संस्कृती असल्याने स्त्रियांना नेहमीच दुय्यम वागणूक दिली जात होती. वर्णाश्रमधर्मातही स्त्रियांना शुद्रच मानले गेले होते, स्त्रिया परावलंबी होत्या, शिवाय बालविवाह, पुनर्विवाह प्रतिबंध, केशवपन, पडदापद्धती अशा अनेक प्रथांमुळे स्त्रिया असहाय बनल्या होत्या. स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरूद्ध आवाज उठविण्याचे कार्य महात्मा फुलेंपासून आगरकरांपर्यंत अनेक सुधारकांनी केले. शिक्षणाशिवाय स्त्रियांची स्थिती सुधारणार नाही, त्या सक्षम होणार नाहीत हे ओळखून महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाी चळवळ सुरू केली. महात्मा फुलेंप्रमाणेच शाहू महाराजांनीही आपल्या संस्थानात स्त्री शिक्षणास प्रोत्साहन तर दिलेच, शिवाय स्त्रियांच्या नैसर्गिक हक्कांचे संरक्षण करणारे अनेक कायदेही अमलात आणून स्त्रियांची समाजाकडून, कुटूंबाकडून होणारी पिळवणूक थांबविण्याचे प्रयत्न केले, स्त्री मुक्ती चळवळीस हातभार लावला.

- **विधवा पुनर्विवाह कायदा :**

कनिष्ठ जातींमध्ये विधवांना पुनर्विवाह करण्याचे स्वातंत्र्य होते. तथापि, उच्चवर्णीय जातींमध्ये विधवांना

पुनर्विवाह करता येत नसे, शिवाय त्यांना केशवपन करावे लागत असे. अशा विधवेने पुनर्विवाह केला तर त्यास समाज व कायद्याची मान्यता नव्हती. शाहू महाराजांनी जुलै १९१७ मध्ये आपल्या संस्थानात विधवांच्या पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता देणारा कायदा संमती दिली. त्यामुळे विधवा पुनर्विवाहाबाबतच्या अनेक अडचणी दूर झाल्या, तसेच या कायद्यानुसार विवाहाची नोंद करण्याची पद्धतही सुरू केली. विधवा पुनर्विवाह हा समाजाच्या स्वास्थ्यासाठी आवश्यक आहे असे मत महाराजांनी १९१९ च्या कानपूरच्या कुर्मी क्षत्रिय परिषदेत व्यक्त केले होते.

● **पडदा पद्धतीचा निषेध :**

महाराष्ट्रातील उच्चवर्णीयांत, विशेषतः राजघराणी, सरदार व वतनदार घराणी यांच्यामध्ये पडदा पद्धती प्रचलित होती. या पद्धतीमुळे स्त्रियांमधील उपजत गुण दडपले जातात असे शाहू महाराजांचे मत होते. कानपूरच्या कुर्मी क्षत्रिय परिषदेतच महाराजांनी या पद्धतीचा निषेध केला होता. त्यांच्या मते, राजमाता जिजाबाईसाहेब, महाराणी ताराबाईसाहेब, महाराणी सती अहिल्याबाई इत्यादी क्षत्रिय स्त्रियांनी राज्य चालविले, रणांगणावर शत्रूशी लढा दिला. हे कार्य पडद्यात राहून करणे अशक्य होते. सध्या देशात काही प्रांतामध्येच पडदापद्धती आहे. या पद्धतीमुळे स्त्रियांच्या शूरतादी गुणांचा नाश होतो.

● **आंतरजातीय विवाह कायदा :**

१२ जुलै, १९१९ रोजी आंतरजातीय विवाह कायदा कोल्हापूर गॅझेटमध्ये प्रसिद्ध झाला. या कायद्यानुसार संस्थानातील हिंदू व जैन या दोन मुख्य धर्मांच्या लोकांना ''जातिनिर्बंध न पाळता सदरहू दोहोंपैकी आपआपल्या कोणत्याही धर्मांच्या मनुष्याशी विवाह करण्याची मुभा'' दिली होती. तसेच विवाहावेळी पुरूषाचे वय १८ वर्षे पूर्ण व स्त्रीचे वय १४ वर्षे पूर्ण असले पाहिजे असा निर्बंध घातला होता. त्याकाळात बालविवाह पद्धत रुढ असल्याने मुलींचे विवाह १० वर्षांच्या आतच होत असत. ब्रिटिश सरकारने १८९१ मध्ये केलेल्या संमती वयाच्या कायद्यापेक्षा हा कायदा अधिक पुरोगामी होता. तसेच या कायद्यानुसार १८ वर्षे पूर्ण झालेल्या स्त्रीला विवाहासाठी पालकांच्या संमतीची गरज असणार नाही, तिला आपला जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले होते. या कायद्यानुसार केलेल्या विवाहाची रीतसर नोंदणीही होणार होती. यावरून शाहू महाराजांचे व्यक्तीस्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे विवाहविषयक धोरण पुरोगामी असल्याचे दिसून येते.

● **क्रुरपणाच्या वर्तनास प्रतिबंध करणारा कायदा :**

काही कुटूंबात स्त्रियांवर अनेक प्रकारचे अत्याचार होत असत, त्याला कायदासुद्धा काही शिक्षा करू शकत नसे. शाहू महाराजांनी स्त्रियांवर होणाऱ्या कौटुंबिक अत्याचाराला प्रतिबंध करणारा कायदा २ ऑगस्ट, १९१९ रोजी आपल्या संस्थानच्या गॅझेटमध्ये प्रसिद्ध केला. महाराजांच्या मते, हिंदू शास्त्रकारांनी कुटूंबप्रमुखास प्रसंगी हलकेसे शासन करण्याची परवानगी दिली आहे, पण याचा दुरूपयोग करून ते स्त्रियांना वाईट पद्धतीने वागवितात, त्याला प्रतिबंध करण्यासाठी हा कायदा केला आहे. वरिष्ठ वर्गाच्या लोकांत जुलूम केला तरी त्याबद्दल कोणी तक्रार करत नाही, त्या स्त्रियाही पुढे येत नाहीत. म्हणून शाहू महाराजांनी क्रुरपणाच्या वागणूकीचे जे प्रकार आहेत

त्या सर्वांचा या कायद्यात समावेश केला होता. ११ कलमांच्या या कायद्यात स्त्रीला क्रुरपणे वागविणाऱ्यास ६ महिने कारावास व २०० रुपयेपर्यंत दंड अशी शिक्षा देण्याची तरतूद केली होती.

- **घटस्फोटाचा कायदा :**

शाहू महाराजांनी याच काळात घटस्फोटासंबंधीचा कायदा आपल्या संस्थानात केला. त्यामध्ये स्त्रीच्या हक्काचे संरक्षण कसे होईल, घटस्फोटानंतर तिच्या उदरनिर्वाहाची सोय कशी होईल याची तरतूद केली होती. तसेच घटस्फोटानंतर संततीच्या ताब्याची, पोटगीची व शिक्षणाविषयीची व्यवस्थाही या कायद्याने केली होती. या कायद्ययाने जातपंचायतीला असणारे घटस्फोटाचे अधिकार काढून घेतले होते.

- **वारसाचा कायदा :**

जानेवारी १९२० मध्ये वारसा हक्काच्या कायद्यात दुरूस्ती केली. त्यानुसार शुद्राची अनौरस संतती आणि ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या तीन वरिष्ठ वर्णांची अनौरस संतती यांना मिळणाऱ्या वारसाहक्कातील फरक काढून टाकला गेला. सर्व वर्णांच्या अनौरस संततील जनक पित्याच्या संपत्तीत वारसाहक्क दिला गेला. ही बाब स्त्रियांच्यादृष्टीने महत्वाची होती.

- **देवदासी प्रतिबंध कायदा :**

देवाच्या नावावर मुली सोडण्याच्या प्रथेतून देवदासींचा वर्ग निर्माण झाला. देवदासींमध्ये जोगतीण, मुरळी, भावीण असे प्रकार असत. देवाच्या नावाने मुली सोडल्या की त्यांच्या आईवडिलांच्या संपत्तीवर वारसा हक्क राहत नसे, तसेच देवस्थानात तिला काही हक्क व दर्जा मिळत असे, अर्थात त्यांचा दर्जा हीन असे. शाहू महाराजांनी १७ जानेवारी १९२० रोजी खास कायदा करून देवदासींचा हा हक्क व दर्जा अमान्य केला, तसेच त्यांना आपल्या आईवडिलांच्या संपत्तीत वारसा हक्क मिळवून दिला. त्यामुळे ही प्रथा बंद होऊन स्त्रिया स्वतंत्र जीवन जगू शकतील असे शाहू महाराजांना वाटत होते.

शाहू महाराजांनी स्त्रियांच्या स्वातंत्र्यरक्षणासाठी, स्त्रिला माणूस म्हणून जगण्याचे अधिकार मिळवून देण्यासाठी केलेले विविध कायदे त्यांच्या पुरोगामीत्वाची साक्ष देतात. प्रगत ब्रिटिश राजवटीतही परंपरावादी समाजाचा रोष ओढवू नये म्हणून स्त्रियांसाठी जे कायदे केले नव्हते, ते कायदे शाहू महाराजांनी करून स्त्रियांच्या उद्धारास हातभार लावला.

- **स्वयंअध्ययन प्रश्न– ४ :**

**योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. राजर्षी शाहू महाराजांनी जुलै १९१७ मध्ये कोल्हापूर संस्थानात ............ कायदा संमत केला.

अ) विधवा पुनर्विवाह ब) आंतरजातीय विवाह

क) घटस्फोट ड) देवदासी प्रथा प्रतिबंध

२. राजर्षी शाहू महाराजांनी ............ रोजी आंतरजातीय विवाह कायदा कोल्हापूर गॅझेटमध्ये प्रसिद्ध केला.

अ) २ ऑगस्ट १९१९ ब) २६ जून १९१८

क) १२ जुलै १९१९ ड) २७ जुलै १९१८

३. शाहू महाराजांनी स्त्रियांवर होणाऱ्या कौटुंबिक अत्याचाराला प्रतिबंध करणारा कायदा ............ रोजी केला.

अ) २ ऑगस्ट १९१९ ब) २६ जून १९१८

क) १२ जुलै १९१९ ड) २७ जुलै १९१८

४. शाहू महाराजांनी १७ जानेवारी १९२० रोजी ............ कायदा केला.

अ) विधवा पुनर्विवाह ब) आंतरजातीय विवाह

क) घटस्फोट ड) देवदासी प्रथा प्रतिबंध

५. शाहू महाराजांनी जानेवारी १९२० मध्ये ............ कायद्याने सर्व वर्णातील अनौरस संततीला वडिलांच्या संपत्तीत हक्क मिळवून दिला.

अ) विधवा पुनर्विवाह ब) वारसा हक्क

क) घटस्फोट ड) देवदासी प्रथा प्रतिबंध

### ३.२.३ वसतिगृह चळवळ :

शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानची राज्यसुत्रे हाती घेतल्यापासून (इ. स. १८९४) सामान्य जनतेची सर्वांगिण प्रगती साधण्यासाठी प्रशासन, शेती, उद्योगधंदे, आरोग्य, शिक्षण इत्यादी क्षेत्रात मोठ्या सुधारणा घडवून आणण्यास सुरवात केली.

महात्मा फुले यांनी समाजातील जातीभेद, उच्चनीचता दूर करण्याचा प्रयत्न केला. बहुजन समाजात शिक्षणप्रसार करण्यास प्रारंभ केला. त्यांचे अपुरे कार्य पुढे छ. शाहू महाराज यांनी हाती घेतले. राज्यारोहणानंतर छ. शाहू महाराजांनी बहुजन समाजाच्या प्रगतीसाठी सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक सुधारणा करण्यावर भर दिला. सामाजिक परिवर्तनाचे माध्यम म्हणून त्यांनी शैक्षणिक सुधारणांना प्राधान्य दिले. त्यांनी विविध शैक्षणिक संस्थांची स्थापना केली, विद्यार्थ्यांना सवलती दिल्या, कोल्हापूर शहरात विद्यार्थी वसतिगृहे सुरू केली, संस्थानाबाहेरील शिक्षणसंस्थांना मदत केली.

कोल्हापूरात सुरू झालेली विविध जातींची विद्यार्थी वसतिगृहे हा शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्यातील एक वैशिष्ट्यपूर्ण प्रयोग होता. बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना अल्पखर्चात शहरात राहून शिक्षण घेता यावे हा या

वसतिगृहांचा उद्देश होता. शाहू महाराजांच्या प्रोत्साहनामुळे कोल्हापूर शहरात विविध जातीच्या विद्यार्थ्यांसाठी वीस वसतिगृहे सुरू झाली. त्यामुळे कोल्हापूर शहर 'वसतिगृहांची जननी' म्हणून ओळखले जाऊ लागले व शाहू महाराजांनाही याचा फार अभिमान वाटत असे.

**● वसतिगृह चळवळीची पार्श्वभूमी :**

बहुजन समाजात शिक्षणप्रसार होण्याच्या दृष्टीने शाहू महाराजांनी अत्यंत विचारपूर्वक राबविलेली योजना म्हणजे वसतीगृहांची स्थापना होय. कोल्हापूर शहरात विविध शैक्षणिक सोयी उपलब्ध असल्या तरी त्यांचा फायदा खेड्यातील गोरगरीब व मागासलेल्या विद्यार्थ्यांना शहरात राहण्या-जेवण्याच्या सुविधा अल्प खर्चात मिळत नसल्याने घेता येत नव्हता. म्हणून सन १८९६ मध्ये कोल्हापूर दरबारच्या खर्चाने सर्व जातीजमातीच्या विद्यार्थ्यांसाठी राजाराम कॉलेजला जोडून एक वसतिगृह सुरू केले. परंतु या वसतिगृहात ब्राह्मणेत्तर विद्यार्थ्यांना प्रवेश न दिल्याने हे वसतिगृह ब्राह्मण विद्यार्थ्यापुरतेच मर्यादित झाले. म्हणून छ. शाहू महाराजांनी सन १९०० मध्ये काही ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांची आपल्या राजवाड्यातच राहण्या-जेवण्याची व्यवस्था केली. त्यांना शाळेला जाण्यायेण्यासाठी टांगा-बैलगाड्या यांची व्यवस्था केली. पण शिक्षणापेक्षा राजवाड्यातील सरदारी थाट मुले लवकर शिकली. म्हणून ही व्यवस्था महाराजांनी बंद करून वेगवेगळ्या जातीच्या विद्यार्थ्यांसाठी कोल्हापूरात स्वतंत्र वसतिगृहे सुरू करण्यास प्रोत्साहन दिले. जातवार वसतिगृहे सुरू करण्यामागे शाहू महाराजांचा त्या-त्या जातीतील पुढाऱ्यांचे व कार्यकर्त्यांचे सहाय्य मिळविणे हा हेतू होता. आपल्या जातीच्या उन्नतीसाठी व्यक्ती सर्व प्रकारची मदत करण्यास तयार असते. हे ओळखून शाहू महाराजांनी प्रत्येक जातीतील पुढारी व कार्यकर्ते बोलवून त्यांना आपापल्या जातीतील विद्यार्थ्यांसाठी कोल्हापूरात वसतिगृहे स्थापण्यास प्रवृत्त केले. शिवाय प्रोत्साहनाबरोबरच जागा, इमारत, निधी, अनुदान अशाप्रकारची मदतही दिली. या योजनेस विविध जातीच्या कार्यकत्यांकडून उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला आणि त्यामुळेच छ. शाहू महाराजांचया कारकीर्दीत कोल्हापूरात निरनिराळ्या जातीसाठी व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी पुढील २० वसतीगृहे सुरू करण्यात आली.

व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग (१९०१), जैन बोर्डिंग (१९०५), मुस्लिम बोर्डिंग (१९०६), विरशैव लिंगायत बोर्डिंग (१९०७), मिस क्लार्क होस्टेल (१९०८), दैवज्ञ बोर्डिंग (१९०८), नामदेव बोर्डिंग (१९११), कायस्थ प्रभू बोर्डिंग (१९१२), पांचाल ब्राह्मण बोर्डिंग (१९१२), सारस्वत बोर्डिंग (१९१२), इंडियन ख्रिश्चन होस्टेल (१९१५), आर्यसमाज गुरूकुल (१९१८), वैश्य बोर्डिंग (१९१८), ढोर-चांभार बोर्डिंग (१९१९), शिवाजी वैदिक विद्यालय बोर्डिंग (१९२०), प्रिन्स शिवाजी मराठा फ्री बोर्डिंग (१९२०), सोमवंशीय आर्य क्षत्रिय बोर्डिंग (१९२०), श्री देवांग बोर्डिंग (१९२१), सुतार बोर्डिंग (१९२१), नाभिक बोर्डिंग (१९२१).

**१. व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग :**

कोल्हापूर संस्थानात मराठा समाज बहुसंख्येने होता. पण इतर समाजाप्रमाणेच मराठ्यांना शिक्षणाचे महत्त्व माहित नव्हते. काहींना आर्थिक अडचणीमुळे कोल्हापूरात राहून उच्च शिक्षण घेता येत नव्हते. अशा विद्यार्थ्यांची शिक्षणाची काही सोय करता येईल का या विचारात छ. शाहू महाराज होते.

सन १८९९ मध्ये शाहू महाराजांना वर्तमानपत्रातून वडगावचा पांडुरंग चिमणाजी पाटील हा राजाराम

हायस्कूलचा विद्यार्थी मॅट्रिक पास झाल्याची बातमी समजली. त्या काळात बहुजन समाजातील एक मुलगा शिकणे, मॅट्रिक पास होणे ही खूप मोठी कौतुकाची गोष्ट होती. महाराजांनी लगेचच स्वार पाठवून पाटलाच्या मुलास बोलावून घेतले. त्याची राहण्या-जेवण्याची चौकशी केली. तेव्हा पांडुरंग पाटीलांनी राहण्या-जेवण्यासंदर्भातील, शिक्षणाच्या खर्चासंदर्भातील आपल्या अडचणी सांगताच शाहू महाराजांनी त्यांना पुढील शिक्षणासाठी आपण खर्च देऊ असे सांगितले. दुसऱ्या दिवशी महाराजांनी रावसाहेब दाजीराव विचारे, एक्झिक्युटिव्ह व रावसाहेब भास्करराव जाधव, असिस्टंट सरसुभे यांना बोलावून घेवून मराठा विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह स्थापन करण्याबाबत विचारविनिमय केला. तसेच न्या. रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, पुण्याचे डेक्कन मराठा एज्युकेशन सोसायटीचे प्रमुख गंगारामभाऊ मस्के, मुंबई इलाख्याचे शिक्षण संचालक ई गाईल्स यांच्याशी यासंदर्भात चर्चा केली होती.

१८ एप्रिल १९०१ रोजी शाहू महाराजांच्या आज्ञेने महाराजांचे काका दत्ताजीराव घाटगे यांच्या अध्यक्षतेखाली मराठा समाजातील प्रमुख व्यक्तीची सभा भरून 'मराठा एज्युकेशन सोसायटी'ची व त्यामार्फत 'व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊस'ची स्थापना करण्यात आली. शाहू महाराजांच्या वडिलांना महाराणी व्हिक्टोरियाने आपल्या दरबारी आदरातिथ्यपूर्वक वागविले होते आणि स्वतः शाहूंना 'महाराज' ही परंपरागत पदवी बहाल केली होती. शिवाय तिच्याच कारकीर्दीत शिक्षणाचे दरवाजे सर्वांना खुले झाले होते. यामुळे महाराणी व्हिक्टोरियाचे नाव वसतिगृहास देण्यात आले. शाहू महाराजांनी दसरा चौकाजवळील पंचवीस हजार रूपये किंमतीची इमारत व विस्तीर्ण अशी जागा संस्थेला दिली. वसतिगृहाच्या कायमनिधीसाठी चार हजार रूपयांची देणगी दिली, ५०० रुपयांचे वार्षिक अनुदान सुरू केले, वसतिगृहाच्या वाढीसाठी ८०० रुपये किमतीची मालमत्ता दिली. याशिवाय १९०४-०५ मध्ये आणखी ३००० रुपये किंमतीची इमारत जयंती नाल्याजवळ दिली. तसेच आणखी १५०० रुपयेची देणगीही दिली. पुढे वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप देण्यासाठी भेडसगाव येथील जमीन वसतीगृहास दिली.

या संस्थेच्या नावात 'मराठा' शब्द असला तरीही अगदी सुरूवातीपासून शिंपी, मुसलमान, ब्राह्मण, गवळी, माळी, धनगर यासारख्या इतर जातीतील गरीब व लायक विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश दिला जात होता.

**२. मुस्लिम बोर्डिंग :**

इतर समाजाच्या तुलनेत मुस्लिम समाजात शिक्षणाबद्दल फारच अनास्था होती. मुस्लिम विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृह काढण्याचे शाहू महाराजांचे प्रयत्न १९०२ सालापासून सुरू होते. पण एकंदर हा समाज मागासलेला असल्यामुळे कोणीच बोर्डिंग चालविण्याची जबाबदारी घेतली नाही. म्हणून शाहू महाराजांनी दहा होतकरू मुसलमान विद्यार्थ्यांना प्रथम व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंगमध्येच ठेवले. शेवटी १५ नोव्हेंबर १९०६ रोजी महाराजांनी स्वतःच पुढाकार घेवून शहरातील प्रमुख मुस्लिम मंडळींची सभा बोलविली, त्याच सभेत 'मोहामेडन एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना होऊन तिच्यातर्फे 'मुस्लिम बोर्डिंग' सुरू करण्यात आले. दसरा चौकाजवळील (२५०० चौ. फूट) जागा महाराजांनी वसतिगृहाच्या इमारतीसाठी दिली. मुस्लिम विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्यासाठी वार्षिक २५० रुपयांचे अनुदान दिले. १९०९ मध्ये १,५०० रुपयांची देणगीही संस्थेसाठी महाराजांनी दिली. त्याचबरोबर महाराजांनी मुस्लिम देवस्थानचे उत्पन्न मुस्लिम बोर्डिंगकडे दिले होते. या वसतिगृहात मुसलमानांबरोबरच मराठे व अस्पृश्य विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची तरतूद केली होती. शाहू महाराजांनी स्वतः मोहामेडन एज्युकेशन सोसायटीचे पदसिद्ध अध्यक्षपद स्विकारले होते.

### ३. मिस क्लार्क होस्टेल :

शाहू महाराजांनी अस्पृश्य समाजात शिक्षणप्रसार करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. महाराजांना अस्पृश्यांसाठी वसतिगृह स्थापन करावयाचे होते. पण अस्पृश्यांची शैक्षणिक स्थिती पाहता त्यांना अस्पृश्यांत शिक्षणप्रसार करणारे व वसतिगृह स्थापन करण्यात पुढाकार घेणारे या समाजातील कार्यकर्ते मिळणे कठीण होते. त्यामुळे शाहू महाराजांच्या प्रेरणेने सवर्ण समाजातील भास्करराव जाधव, महादेव डोंगरे, श्रीपतराव शिंदे, खंडेराव बागल, गणपतराव कदम या काही प्रमुख मंडळींनी पुढाकार घेऊन अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी 'मिस क्लार्क होस्टेल' स्थापन केले. मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यांची कन्या मिस व्हायोलेट क्लार्क यांनी मुंबई येथे एक नृत्याचा कार्यक्रम करून त्याद्वारे मिळालेले ५,००० रुपये या वसतिगृहासाठी देणगी म्हणून दिले. दुर्दैवाने १९०८ च्या अखेरीस या तरूण समाजसेविकेचे अचानक निधन झाले. शाहू महाराजांनी तिची स्मृती चिरंतन राहावी म्हणून अस्पृश्य वसतिगृहास 'मिस क्लार्क होस्टेल' असे नाव दिले.

नंतर शाहू महाराजांनी महार तलावाजवळील विस्तीर्ण जागा व मोठी इमारत वसतिगृहासाठी दिली, वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप देण्यासाठी दरमहा २५ रुपयांची ग्रँट मंजूर केली. तसेच अस्पृश्य विद्यार्थ्यांना शाळा कॉलेजमध्ये फी माफी दिली होती. अस्पृश्य समाजातील विद्यार्थ्यांसाठी सुरू झालेले पहिले वसतिगृह म्हणून या संस्थेस विशेष महत्त्व आहे.

### ४. श्री शिवाजी क्षत्रिय वैदिक विद्यालय व वसतिगृह :

शाहू महाराजांना वैदिक विद्यालय स्थापन करण्याची प्रेरणा 'वेदोक्त' वादामुळे मिळाली. धार्मिक क्षेत्रातील ब्राह्मण पुरोहितांच्या वर्चस्वास शह देण्यासाठी त्यांनी ऑगस्ट १९१९ मध्ये ब्राह्मणेतरांना वैदिक शिक्षण देण्याचे वर्ग जुन्या राजवाड्यात सुरू केले. जुन्या व नव्या राजवाड्यात, पूर्वजांच्या छत्रीवर वगैरे सर्व पूजाअर्चा मराठ्यांच्या हस्ते करावी व त्याकरिता मराठा विद्यार्थी शिकवून तयार करावे अशी महाराजांनी आज्ञा दिली. जुन्या राजवाड्यातील वैदिक शिक्षणवर्गातील विद्यार्थ्यांची संख्या ४० पर्यंत वाढल्यावर जुलै १९२० मध्ये शिवाजी क्षत्रिय वैदिक विद्यालय व वसतिगृह सुरू करण्यात आले. विद्यार्थ्यांची राहण्याची व जेवण्याची सर्व व्यवस्था मोफत करण्यात आली होती. नंतर हे वसतिगृह शाहू महाराजांनी रविवार पेठ वेशीजवळ तुरुंगाच्या पूर्वेकडील दिलेल्या जागेत स्थलांतरीत करण्यात आले. ब्राह्मणेतर समाजाला वैदिक धर्माचे सशास्त्र शिक्षण देणारी ही भारतातील एक आद्य संस्था होय.

### ५. श्री प्रिन्स शिवाजी मराठा फ्री बोर्डिंग हाऊस :

छ. शाहू महाराजांनी विविध जातीधर्माच्या वसतिगृहांची स्थापना करण्यास प्रोत्साहन दिले तरी अत्यंत गरीब विद्यार्थ्यांची काहीतरी सोय करणे त्यांना आवश्यक वाटत होते. शाहू महाराजांनी पुणे येथे गुरूवर्य बापूराव बच्चाजी शिंदे यांनी गरीब विद्यार्थ्यांसाठी मोफत चालविलेल्या वसतिगृहास भेट दिली होती. या वसतिगृहातील मुले माधुकरी मागून अन्न आणीत व सामुहिक भोजन करून शिक्षण घेत असत. त्यानंतर अशा प्रकारचे बोर्डिंग कोल्हापूरात सुरू करावे म्हणून श्रीपतराव शिंदे यांच्यामागे शाहू महाराजांनी तगादा सुरू केला. त्यामधूनच श्रीपतराव

शिंदे, खंडेराव बागल, रावसाहेब सरदेसाई, श्रीपतराव मंडलिक, मामासाहेब मिणचेकर इ. कार्यकर्त्यांनी मिळून गरिबीमुळे शिक्षणाला वंचित होत असलेली १० मुले सुरूवातीस निवडली व 'श्री प्रिन्स शिवाजी मराठा फ्री बोर्डिंग हाऊस'ची स्थापना केली. या वसतिगृहास १९१८ मध्ये शिकारीत अपघाताने मरण पावलेले शाहू महाराजांचे धाकटे पुत्र कै. प्रिन्स शिवाजी यांच्या स्मरणार्थ 'श्री प्रिन्स शिवाजी मराठा फ्री बोर्डिंग हाऊस' असे नाव देण्यात आले.

संस्थेचे चालक वसतीगृहातील मुलांना बरोबर घेवून घरोघरी जाऊन अन्न जमा करीत. थोड्या दिवसानंतर संस्थेच्या कार्यकर्त्यानी संस्थेची उपयुक्तता व गरजा लोकांना पटवून देवून विद्यार्थ्यांना 'वार' देण्याची पद्धत रुढ केली. त्यानुसार सधन व दानशूर गृहस्थांकडे ठराविक दिवशी विद्यार्थी जेवण घेत. यासाठी काही लोक आपणहून मदत करू लागले. या संस्थेस स्थिरता येण्यासाठी 'कोठीशाळा' नावाची इमारत संस्थेस दिली, दहा विद्यार्थ्यांचा शिधा खासगीतून मंजूर केला, सरकारी अनुदानित शाळेत या संस्थेतील विद्यार्थ्यांना मोफत घ्यावे असा हुकूम दिला, संस्थेच्या नावे हुजूर खजिन्यात ७ हजार रुपये ठेवले, नंतर गडहिंग्लज तालुक्यातील नूल येथील रामनाथगिरी मठाची सुमारे २०० एकर जमीन संस्थेस दिली. सात हजार रुपयांच्या निधीतून मिळणारे व्याज व नूल येथील जमिनीतून मिळणाऱ्या उत्पन्नातून गरीब विद्यार्थ्यांच्या राहण्या-जेवण्याची व शैक्षणिक सुविधा देण्याची व्यवस्था केली. गरीब विद्यार्थ्यांना येथे मोफत राहून शिक्षण घेणे शक्य झाले. या संस्थेच्या नावात 'मराठा बोर्डिंग हाऊस' असे शब्द असले तरीही सुरूवातीपासून सर्व जातीधर्माच्या विद्यार्थ्यांना या संस्थेत प्रवेश दिला जातो.

● **कोल्हापूर बाहेरील वसतीगृहांना आर्थिक मदत :**

छ. शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाबाहेरील पुणे, नाशिक, अहमदनगर, नागपूर, पंढरपूर इ. ठिकाणच्या शिक्षणसंस्था, वसतीगृहे यांना सढळ हाताने मदत करून संस्थानाबाहेरील बहुजन समाजात शिक्षणप्रसार करण्याचे कार्य केले.

पुण्याच्या छत्रपती मराठी वसतिगृहास सुरूवातीस ३०० रुपयांची भांडी शाहू महाराजांनी देणगी दिली. पुण्यातील शुक्रवार पेठेतील शिवाजी स्कूल बोर्डिंगला महाराणी ताराबाईंचे स्मारक म्हणून १९२१ मध्ये १५ हजार रुपये दिले.

नाशिक येथील उदाजी मराठा वसतिगृहास शाहू महाराजांनी देणगी दिली होती. एप्रिल१९२० मध्ये येथीलच संत सेना नाभिक विद्यार्थी वसतिगृहास ५ हजार रुपयांची देणगी दिली. त्याचप्रमाणे नाशिक येथील डिप्रेस्ड क्लास बोर्डिंगला ५,००० रुपये देणगी जुलै १९२० मध्ये दिली.

अहमदनगर येथील 'कोल्हापूरचे छत्रपती चौथे शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस'ला २,००० रुपयांची देणगी दिली.

नागपूर येथील ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस बोर्डिंगकरिता ५,००० रुपयांची देणगी शाहू महाराजांनी पाठविली होती.

लंडनमधील विद्यार्थ्यांसाठी तेथे एखादे स्वस्त वसतिगृह स्थापन करण्याविषयीचा विचारही त्यांनी केला होता.

● **जातवार वसतिगृहांची आवश्यकता :**

जातीभेद निवारणासाठी प्रयत्न करणाऱ्या शाहू महाराजांनी प्रत्येक जातीसाठी स्वतंत्र वसतिगृहे सुरू करण्यास सहाय्य केले म्हणून त्यांच्यावर टीकाही केली जाते. पण त्यांनी सुरू केलेली वसतिगृहे ही त्या काळची सामाजिक गरज होती. तसेच त्यातून या सर्व समाजाची आर्थिक प्रगती होणे शक्य होते. जातीव्यवस्थेची बंधने त्याकाळात इतकी कडक होती की, समाजामध्ये एका रात्रीत बदल होणे शक्य नव्हते. ब्राह्मण-ब्राह्मणेतर यांच्यातच केवळ जातीभेद होता असे नाही तर ब्राह्मणेतरांतही जातीभेद तीव्र होता. महाराजांना जातीव्यवस्थेचा सकारात्मक उपयोग करून घ्यावा लागला. तथापि, हा निर्णय त्यांनी पूर्ण विचारांती व दुरदृष्टीने घेतला होता. महाराजांना प्रत्येक जातीतील मुले प्रथम सुशिक्षित होणे आवश्यक वाटत होते. त्याआधारे त्यांच्यात व्यापक दृष्टीकोन निर्माण होवून जातीभेद हळू-हळू नष्ट होत जाईल व त्यानंतर जातिवाचक बोर्डिंग काढण्याची आवश्यकता राहणार नाही असे महाराजांना वाटे.

● **जातिवाचक बोर्डिंग काढण्यामागे राष्ट्रीय दृष्टी :**

जातिवाचक बोर्डिंग काढण्यामागे शाहू महाराजांची दृष्टी पूर्णपणे राष्ट्रीय होती. हे १५ ऑगस्ट १९२० रोजी कोल्हापूर येथील आर्य क्षत्रिय परिषदेतील त्यांच्या भाषणावरून स्पष्ट होते. ते म्हणतात, *''जातिभेद हा हिंदुस्थानास लागलेला मोठा रोग आहे, .... काही पर्यायापर्यंत जातिभेद व जात्याभिमान सुटत नाही. ....जातीचा अभिमान अगदी मर्यादित असावा. आपण हिंदी आहोत, देशाची उन्नती करण्याची जबाबदारी आपणावर आहे याची विस्मृती होऊ देता कामा नये. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे जात्याभिमान हा राष्ट्रकार्यास पोषक असावा, राष्ट्रसेवा नजरेआड करणारा नसावा.''*

शाहू महाराजांनी जातिवाचक बोर्डिंग काढली, तरी त्यांच्यात वेगळेपणाची भावना राहू नये म्हणून ही वसतिगृहे शक्य तो शेजारी-शेजारी ठेवली. त्यांनी कोल्हापूरात गंगावेशमधून रंकाळावेशकडे जाणाऱ्या रस्त्यावर सहा वसतिगृहांना व दसरा चौक परिसरात सात वसतिगृहांना जागा व काहीना इमारतीसह जागा दिल्या. वसतिगृहांच्या या दोन वसाहतीच होत्या. याशिवाय बोर्डिंगमधील विद्यार्थ्यांत जातीभेदाची भावना वाढू नये म्हणून आवश्यक व्यवस्था महाराजांनी केली होती. उदा. व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंगमध्ये सुरूवातीसच ब्राह्मण, मुसलमान, मराठा, शिंपी विद्यार्थी होते. शिवाय दहा मुसलमान विद्यार्थी व्हि. म. बोर्डिंगमध्ये ठेवण्याचा आदेश महाराजांनी दिला होता. अन्य काही बोर्डिंगमध्ये अशी व्यवस्था होती. त्याचप्रमाणे मुस्लिम बोर्डिंग चालविण्यास सुरूवातीस त्या समाजातील सुशिक्षित कार्यकर्ते उपलब्ध नसल्याने काही काळ हे वसतिगृह रावबा विचारे या मराठा पुढाऱ्याच्या देखरेखेखाली सुरू ठेवले.

वसतिगृहांची चळवळ जातीविशिष्ट मानली तर महाराजांनी मराठा असूनही जैन, लिंगायत, मुसलमान, शिंपी, दैवज्ञ, सारस्वत व पांचाल ब्राह्मण वसतिगृहांना मदत केली नसती. अस्पृश्य वसतिगृहाच्या स्थापनेत मराठे, जैन व इतर लोक पुढे आले नसते. या चळवळीचा दृष्टीकोन अतिशय व्यापक होता.

● **वसतिगृह चळवळीचे मूल्यमापन :**

छ. शाहू महाराजांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या वसतिगृहे चळवळीमुळे कोल्हापूर वसतिगृहांची जननी

म्हणून ओळखले जाऊ लागले. या वसतिगृहातून शिकून तयार झालेल्या विद्यार्थ्यांनी नंतरच्या काळात सार्वजनिक कार्यात आपला ठसा उमटविला, महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. आज बहुजन समाज शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रात नेतृत्व करताना दिसत आहे त्याचे बरेचसे श्रेय या वसतिगृह चळवळीला आहे.

त्याकाळात शाहू महाराजांइतकी विचारपूर्वक आखलेली योजना इतरत्र कोठेच आढळून येत नाही. स्वतः शाहू महाराजांना याचा अभिमान होता. कोल्हापूर ही वसतिगृहांची जननी आहे असा ते अभिमानाने उल्लेख करीत असत. १५ ऑगस्ट १९२० रोजी कोल्हापूरातील आर्यक्षत्रिय परिषदेत बोलताना ते म्हणतात, *''विद्यार्थी वसतिगृहे स्थापणे हे कोल्हापूरचे एक विशेष आहे. येथे वसतिगृहांची जितकी संख्या आहे तितकी दुसऱ्या ठिकाणी क्वचितच असेल.''* कोल्हापूर बाहेरील वसतिगृहे कॉलेज किंवा शैक्षणिक संस्थेस जोडून होती. पण शाहू महाराजांनी सर्व जातीसाठी, सर्व शाळा-कॉलेजमधील मुलांसाठी एकत्र राहण्या-जेवण्याची सोय असलेली स्वतंत्र वसतिगृहे स्थापण्यास मदत केली. म्हणून ते भारतातील विद्यार्थी वसतिगृहाचे आद्यजनक होत, असे संशोधक मानतात.

शाहू महाराजांच्या काळात कोल्हापूरात सुरू झालेल्या या वसतिगृहांचा कोल्हापूर संस्थानातील तसेच संस्थानाबाहेरील हजारो विद्यर्थ्यांना उपयोग झाला व आजही होत आहे. बहुजन समाजातील तीन-चार पिढ्या या वसतिगृहांनी घडविल्या व आजही हे कार्य सुरू आहे. शेतीतज्ज्ञ डॉ. पी. सी. पाटील, महाराष्ट्राचे माजी सहकार मंत्री ना. यशवंतराव मोहिते, प्राचार्य एम्, आर. देसाई, कुस्तीवीर खाशाबा जाधव, डॉ. एन्. डी. पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. जे. पी. नाईक, लोकनेते बाळासाहेब देसाई, भारत सरकारच्या परराष्ट्र सेवेतील वरिष्ठ अधिकारी ज्ञानेश्वर मुळे यासारख्या अनेक नामवंत व्यक्तींचा वसतिगृहांच्या विद्यार्थ्यांत समावेश होतो.

या वसतिगृह चळवळीचे आणखी एक योगदान म्हणजे छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा प्रभाव या वसतिगृहातून शिकून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांवर पडला होता. या विद्यार्थ्यांपैकी एक विद्यार्थी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सर्वात महत्त्वाची कामगिरी केली. त्यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून खेड्यापाड्यात शिक्षणाचा प्रसार केला. याशिवाय बापूजी साळुंखे यांनी स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्था, कोल्हापूर, व्हि. टी. पाटील यांनी ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर, नागनाथआण्णा नायकवडी यांनी किसन अहिर शिक्षण संस्था, वाळवे या शिक्षणसंस्थांची स्थापना केली.

● **स्वयं-अध्ययन प्रश्न -५ :**

योग्य पर्याय निवडन रिकाम्या जागा भरा.

१. 'व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊस'ची स्थापना ............ मध्ये झाली.

अ) १९०१ | ब) १९०२
क) १९०६ | ड) १९०८

२. शाहू महाराजांनी स्वतः ............ या संस्थेचे पदसिद्ध अध्यक्षपद स्वीकारले होते.

अ) व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग ब) मिस क्लार्क होस्टेल

क) मोहामेडन एज्युकेशन सोसायटी ड) इंडियन ख्रिश्चन होस्टेल

३. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर येथे अस्पृश्यांच्या मुलांसाठी ........... काढले.

अ) व्हिक्टोरिया बोर्डिंग ब) मिस क्लार्क होस्टेल

क) प्रिन्स शिवाजी बोर्डिंग ड) इंडियन ख्रिश्चन होस्टेल

४. राजर्षी शाहू महाराजांनी जुलै, ............ मध्ये शिवाजी क्षत्रिय वैदिक विद्यालय व वसतिगृह सुरू केले.

अ) १९१९ ब) १९२०

क) १९२१ ड) १९१८

५. ............ वसतिगृहातील विद्यार्थी 'वार' लावून जेवण घेत असत.

अ) व्हिक्टोरिया बोर्डिंग ब) मिस क्लार्क होस्टेल

क) प्रिन्स शिवाजी बोर्डिंग ड) इंडियन ख्रिश्चन होस्टेल

**३.४ पारिषाषिक शब्द–शब्दार्थ :**

रीजंट – राजनैतिक प्रतिनिधी

बहुजन समाज – ब्राह्मण, प्रभू, पारशी व शेणवी सोडून इतर जाती

केशवपन – मंडण करणे

पडदा पद्धत – बुरखा घेण्याची पद्धत

देवदासी – देवाला वाहिलेली स्त्री

पुरोहित – धार्मिक विधी करणारा

पागा – घोडा बांधण्याची जागा

रयतावा – कुळाच्या वहिवाटीची

मोतद्दार – घोड्याची काळजी घेणारा

कुत्तेवार – शिकारीच्यावेळी कुत्री सांभाळणारा

डिस्प्रेस्ड क्लास मिशन – निराश्रीत सहाय्यकारी मंडळ

### ३.५ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयं–अध्ययन प्रश्न –१:**

| | | |
|---|---|---|
| १. यशवंतराव | २. घाटगे | ३. १७ मार्च १८८४ |
| ४. स्टुअर्ट फ्रेजर | ५. २ एप्रिल १८९४ | |

**स्वयं–अध्ययन प्रश्न –२ :**

| | | |
|---|---|---|
| १. १९१७ | २. १९०२ | ३. इन्फंट्री |
| ४. इंदूमतीसाहेब | ५. रखमाबाई केळवकर | |

**स्वयं–अध्ययन प्रश्न –३:**

| | | |
|---|---|---|
| १. २७ जुलै १९१८ | २. २६ जुन१९१८ | ३. १९२० |
| ४. १९१९ | ५. २२ फेब्रुवारी १९१८ | |

**स्वयं–अध्ययन प्रयन –४:**

| | | |
|---|---|---|
| १. विधवा पुनर्विवाह | २. १२ जुलै १९१९ | ३. २ ऑगस्ट १९१९ |
| ४. देवदासी प्रथा प्रतिबंध | ५. वारसा हक्क | |

**स्वयं–अध्ययन प्रश्न –५:**

| | | |
|---|---|---|
| १. १९०१ | २. मोहामेडन एज्युकेशन सोसायटी | ३. मिस क्लार्क होस्टेल |
| ४. १९२० | ५. प्रिन्स शिवाजी बोर्डिंग | |

### ३.६ सारांश :

शाहू महाराजांनी आपल्या २८ वर्षांच्या कारकीर्दीत (इ. स. १८९४ ते इ. स. १९२२) केलेल्या विविधांगी कार्यामुळे कोल्हापूर संस्थानामध्येच नव्हे तर महाराष्ट्रात सामाजिक परिवर्तनाला सुरूवात झाली. महात्मा फुलेंनी समाजातील जातीभेद, उच्चनीचता दूर करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांचे अपूरे कार्य पुढे छ. शाहू महाराजांनी हाती घेतले. वेदोक्त चळवळ, अस्पृश्यता निवारण, मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण, विद्यार्थी वसतिगृहांची चळवळ, अस्पृश्योद्धार याद्वारे सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक क्षेत्राात विविधांगी कार्य केले.

छ. शाहू महाराजांच्या पुरोगामी शैक्षणिक धोरणामुळे शिक्षणाचा प्रसार झाला. शिक्षण क्षेत्राातील उच्चवर्णियांची मक्तेदारी संपुष्टात येवून ब्राह्मणेतर व अस्पृश्यांतही शिक्षणाची आवड निर्माण झाली, त्यांच्या विद्यार्थीसंख्येत वाढ झाली. त्यांच्या शैक्षणिक कार्यापासून प्रेरणा घेवून बहुजन समाजातील अनेक नेत्यांनी आपआपल्या भागात बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षणसंस्थांची स्थापना केली. उदा. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेली रयत शिक्षण संस्था शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी स्थापन केलेली श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था.

शाहू महाराजांनी जातीभेद निर्मूलन, अस्पृश्योद्धार, स्त्री शिक्षण, आंतरजातीय विवाह कायदा या उपायाद्वारे बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी सतत प्रयत्न केले. हे कार्य करीत असताना त्यांना टीकाही सहन करावी लागली, तरीही ते आपल्या कार्यापासून विचलित झाले नाहीत.

शाहू महाराजांनी स्त्रियांच्या स्वातंत्र्यरक्षणासाठी, स्त्रीला माणूस म्हणून जगण्याचे अधिकार मिळवून देण्यासाठी केलेले विविध कायदे त्यांच्या पुरोगामीत्वाची साक्ष देतात.

शाहू महाराजांच्या काळात कोल्हापूरात सुरू झालेल्या वसतिगृहांचा कोल्हापूर संस्थानातील तसेच संस्थानाबाहेरील हजारो विद्यार्थ्यांना उपयोग झाला व आजही होत आहे. बहुजन समाजातील तीन-चार पिढ्या या वसतिगृहांनी घडविल्या व आजही हे कार्य सुरू आहे. शेतीतज्ज्ञ डॉ. पी. सी. पाटील, महाराष्ट्राचे माजी सहकार मंत्री ना. यशवंतराव मोहिते, प्राचार्य एम्. आर. देसाई, कुस्तीगीर खाशाबा जाधव, डॉ. एन्. डी. पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. जे. पी. नाईक, लोकनेते बाळासाहेब देसाई, भारत सरकारच्या परराष्ट्र सेवेतील वरिष्ठ अधिकारी ज्ञानेश्वर मुळे यासारख्या अनेक नामवंत व्यक्तींचा वसतिगृहांच्या विद्यार्थ्यांत समावेश होतो.

शाहू महाराजांनी केलेल्या विविधांगी सुधारणांमुळे कोल्हापूर हे शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक सुधारणांचे केंद्र म्हणून ओळखले जाऊ लागले. शाहू महाराजांच्या कार्यापासून प्रेरणा घेवून नवनेतृत्त्व आधुनिक महाराष्ट्राच्या, किंबहुना आधुनिक भारताच्या उभारणीमध्ये मोलाची कामगिरी बजावली.

**३.७ सरावासाठी स्वाध्याय :**

**अ) लघुत्तरी प्रश्न :**

१. वेदोक्त प्रकरण

२. शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य

३. शाहू महाराज आणि स्त्री शिक्षण

४. राजर्षी शाहू महाराजांची वसतिगृह चळवळ

५. शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य

६. राजर्षी शाहू महाराजांनी कनिष्ठ वर्गाच्या सामाजिक उद्धारासाठी केलेले कार्य

७. शाहू महाराजांनी स्त्रियांसाठी केलेले विविध कायदे

**ब) दीर्घोत्तरी प्रश्नः**

१. राजर्षी शाहू महाराजांनी कनिष्ठ वर्गाच्या शैक्षणिक उद्धारासाठी केलेले कार्य स्पष्ट करा.

२. राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक कार्याची माहिती द्या.

३. शाहू महाराजांनी स्त्रियांसाठी केलेल्या विविध कायद्यांचा आढावा घ्या.

४. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या वसतिगृह चळवळीचे मूल्यमापन करा.

## ३.८ संदर्भ :


१. कीर धनंजय; राजर्षी शाहू छत्रपती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, १९७९.

२. सुर्यवंशी कृ. गो; राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, १९८४.

३. पवार जयसिंगराव (सं.); राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, दुसरी आवृत्ती, २००७.

४. जाधव रमेश; लोकराजा शाहू छत्रपती, सुरेश एजन्सी, पुणे, प्रथमावृत्ती, १९९७.

५. भगत रा. तु; राजर्षी शाहू छत्रपती : जीवन व शिक्षण कार्य, सिद्धराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००३.

६. जाधव भ. बा. (सं); राजर्षी श्रीशाहू महाराजांची भाषणे, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, १९७१.

७. कुलकर्णी मीना, कुलकर्णी ब. शि.; श्री. शाहू छत्रपतीचे अर्थकारण, गौरी-नंदन पब्लिकेशन, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, १९७५.

८. संगवे विलास आणि खणे बी. डी. (सं.); राजर्षी शाहू छत्रपती पेपर्स, भाग २, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९८३.

९. कोल्हापूर स्टेट ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट, १९०१-०२, पृ. ४८ व १९१०-१९११, पृ. ५२.

१०. धाटावकर भास्कर (सं.); राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग-१, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८.

११. मुडबिद्रीकर बी. एस्. (सं.); राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक व सामाजिक हुकूमनामे, कोल्हापूर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ, कोल्हापूर, १९९४-९५.

१२. देसाई संजीव (सं.); राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग-२, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८९.

१३. कोल्हापूर पुराभिलेखागार, हुजूर ऑफिस, मुलकी ठराव बुक.

१४. येडेकर श्याम; राजर्षी एक व्यक्तिदर्शन, प्रकाशक सतीश येडेकर, कोल्हापूर.

१५. लठ्ठे आ. बा.; श्रीमच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र, प्रकाशक बा. ल. पाटील, कोल्हापूर, १९२५.

१६. घुगे वि. बा; छत्रपती शाहूंचे समाजवादी आर्थिक धोरण, द. कोल्हापूर रायटर्स को. ऑपरेटिव्ह सोसायटी लि., कोल्हापूर, प्रथमावृत्ती, १९७५

१७. भगत रा. तु.; शिक्षणमहर्षी राजर्षी शाहू महाराज, सिद्धराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९९९.

१८. तोफखाने वा. द.; राजर्षी शाहू छत्रपती यांचे अंतरंग, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, १९६३.

१९. सुर्यवंशी गणपतराव; राजर्षी शाहू आणि समाज प्रबोधन, रणजित प्रकाशन, इचलकरंजी, पहिली आवृत्ती, १९७८.

२०. पवार वसुधा; राजर्षी शाहू छत्रपती : एक अभ्यास, सुमेरू प्रकाशन, डोंबिवली, पहिली आवृत्ती, २००४.

२१. जाधव अर्चना श्रीराम; कोल्हापूरातील आर्य समाजाचे कार्य, अप्रकाशित एम्. फिल्. शोधनिबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, डिसेंबर २००१.

२२. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपतीः जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २०१६.

२३. भोसले शा. सं. (सं.); श्री शाहू छत्रपती मराठा विद्यार्थी वसतिगृह, कोल्हापूर, सुवर्ण महोत्सव ग्रंथ, १९५४, पृ. ८–९.

❖❖❖

## घटक – ४

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१८९१–१९५६)

### अ) जाती निर्मूलनाचे विचार
### ब) महाड सत्याग्रह आणि मंदिर प्रवेश
### क) सामाजिक न्याय आणि भारतीय राज्यघटना

**अनुक्रमणिका :**


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ जाती निर्मूलनाचे विचार

४.२.२ महाड सत्याग्रह आणि मंदिर प्रवेश चळवळ

४.२.३ सामाजिक न्याय आणि भारतीय राज्यघटना

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द

४.५ स्वयंः अध्ययनासाठी प्रश्न.

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


**४.० उद्दिष्ट्ये :**

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला पुढील उदिदष्ट्ये सांगता येतील.

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जाती निर्मूलनाचा विचार समजून येईल.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा महाड सत्याग्रहाचा दृष्टीकोण समजेल.

३. मंदिर प्रवेश चळवळीची भूमिका समजेल.

४. मनूस्मृती दहनांची भूमिका समजून येईल.

५. भारतीय राज्यघटना आणि राज्यघटनेची वैशिष्ट्ये समजून येतील.

### ४.१ प्रास्ताविक :

आधुनिक भारतातील सामाजिक क्रांतीचे उद्‌गाते भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, ग्रंथकार आणि सामाजिक विज्ञानाच्या प्रमूख ज्ञानशाखातील तत्वचिंतक डॉ. भिमराव रामजी आंबेडकर यांचा जन्म मध्य प्रदेशातील 'महू' येथे १४ एप्रिल १८८१ रोजी अस्पृश्य कुटुंबात झाला. त्यांच्या आईचे नांव भिमाबाई असे होते. त्यांचे वडील रामजी सकपाळ हे त्यावेळी महू येथे सैन्यात सुभेदारच्या हुद्यावर होते. आंबेडकरांच्या घराण्याचे मूळ गांव कोकणात रत्नागिरी जिल्ह्यातील आंबावडे हे होते.

डॉ. आंबेडकरांचे प्राथमिक शिक्षण सातारा येथे झाले. त्यानंतर त्यांनी माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षण मुंबई येथे एलफिन्स्टन हायस्कूल आणि कॉलेजमध्ये पूर्ण केले. डॉ. आंबेडकर इ.स. १९१३ मध्ये अमेरिकेला शिक्षणासाठी गेले आणि तेथील कोलंबिया विद्यापीठातून त्यांनी अर्थशास्त्रातील एम.ए. व पीएच्.डी. पदव्या संपादन केल्या.

मुंबई येथे इ.स. १९२० मध्ये डॉ. आंबेडकरांनी 'मूकनायक' नावाचे पाक्षिक काढले आणि तेव्हापासून त्यांनी अस्पृश्य समाजात जागृती करण्याचे अनेक उपक्रम हाती घेतले. माणगांव आणि नागपूर येथे त्यांनी अस्पृश्य समाजाच्या परिषदा भरविल्या आणि अखिल भारतीय पातळीवर आपले नेतृत्व प्रस्थापित केले.

मूकनायक नंतर त्यांनी 'बहिष्कृत भारत' व 'जनता' ही वृत्तपत्रे चालविली. जनसंघटन करण्यासाठी आरंभीच्या काळात त्यांनी 'बहिष्कृत हितकारिणी सभा' इ.स. १९२४ रोजी स्थापन केली. इ.स. १९४२ मध्ये ऑल इंडिया शेड्युल्ड कास्ट फेडरेशन पक्ष स्थापन केला. स्वातंत्र्योत्तर काळात दलित, शेतमजूर, गरीब, कामगार इ. विविध अन्यायग्रस्त समाजघटकांचा एक व्यापक पक्ष स्थापण्याचा निर्णय डॉ. आंबेडकरांनी घेतला होता. त्याचं रिपब्लिकन पक्ष असं नांवही त्यांनी निश्चित केले होते, मात्र प्रत्यक्ष पक्ष स्थापना त्यांच्या मृत्यूनंतर म्हणजे इ.स. १९५७ साली झाला.

दलित समाजात जागृती होऊन हक्कासाठी झगडण्याची प्रेरणा निर्माण झाल्याखेरीज अन्याय निवारण होणार नाही अशी डॉ. आंबेडकरांची धारणा होती. त्यामुळे दलित समाजाला संघटित करण्यासाठी अनेक सामाजिक चळवळी निर्माण करून जातिनिर्मूलन करण्याचा प्रयत्न केला. आणि म्हणून महाड सत्याग्रह, मंदिर प्रवेश चळवळ आणि भारतीय राज्यघटना याविषयांचा आढावा आपण घेणार आहोत.

### ४.२ विषय विवेचन :

#### ४.२.१ जाती निर्मूलनाचे विचार (Thought on Annihilation of Caste) :

जाती व्यवस्थेचे निर्मूलन (ॲनिहिलेशन ऑफ कास्टस्) हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले प्रसिद्ध भाषण आहे. १५ मे १९३६ मध्ये लाहोर येथे 'जातपात तोडक मंडळाच्या' संयोजकांनी वार्षिक परिषदेसाठी डॉ. आंबेडकरांना अध्यक्ष म्हणून निमंत्रित केले होते. डॉ. आंबेडकरांची प्रकृती बरी नसताना केवळ स्वागत समितीच्या आग्रहामुळे हे निमंत्रण स्विकारले होते. परंतु अध्यक्षीय भाषणातील वेदावरील व हिंदू धर्माच्या पवित्र

ग्रंथाविषयीच्या व्यक्त झालेल्या मतांबद्दल संयोजन समितीचे प्रतिनिधी हर भगवान यांनी ही मते अध्यक्षीय भाषणातून काढून टाकावीत, असे त्यांना सुचविले. त्यांना आपल्या भाषणातील एक कानामात्रा अगर स्वल्पविरामही मी बदलणार नाही असे डॉ. आंबेडकरांनी उत्तर दिले. तसेच स्वागत समितीने माझी मते पटली नाही तर असहमतीचा ठराव मांडून आपली नाराजी दाखविली तरी मी त्याचे स्वागत करेन. पुढे ही परिषद झाली नाही व अध्यक्षीय भाषणही झाले नाही. एवढे सर्व झाल्यावर स्वागत समितीने अध्यक्षीय भाषणात एका अक्षरात बदल न करता स्वीकारले तरी मी येणार नाही असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट सांगितले. या सर्व प्रकरणातून तत्कालीन समाजसुधारकांचा जाती निर्मूलनाकडे पाहण्याचा दृष्टीकोण किती पारंपारिक व संकुचित होता हेच लक्षात येते. ही परिषद शेवटी झालीच नाही. तोपर्यंत डॉ. आंबेडकरांचे अध्यक्षीय भाषण छापून तयार झाले होते. नंतर त्यांनी 'जाती व्यवस्थेचे निर्मूलन या नावाने पुस्तक प्रसिद्ध केले. त्या विषयी आपण थोडक्यात माहिती घेवू.

**१) वेद आणि धर्मशास्त्राना नकार :**

डॉ. आंबेडकर म्हणतात, 'जर तुम्ही जाती व्यवस्था नष्ट करू पहात असाल तर यासाठी तुम्हाला वेदांना आणि धर्मशास्त्रांना नकार द्यावा लागेल. कारण वेद आणि धर्मशास्त्र समाजात विषमता निर्माण करतात. त्यामुळे समाजात जातीभेद निर्माण होतो.'

**२) जातीभेदाचे उच्चाटन केले पाहिजे :**

हिंदू समाजाच्या पुनर्रचनेसाठी जातीचे उच्चाटन केले पाहिजे असा उपदेश म. जोतीबा फुले आणि डॉ. आंबेडकर यांनी केला आहे.जातीभेदामुळे हिंदू एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेस मुकले आहेत. देशभक्तीच्या आणि ऐक्याच्या भावनेस पारखे झाले आहेत. जातीव्यवस्था हा भारताला एक शाप आहे. मनुष्याची निष्ठा ही जातीपूरतीच मर्यादित राहते. मनुष्याचे सद्गुण आणि निती ही सुद्धा जातिबंधनात आवळलेली असते. त्यामुळे राष्ट्राच्या एकात्मतेसाठी आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी जातीचे उच्चाटन केले पाहिजे.

**३) जातीभेद मानवाच्या विकासातील अडसर :**

हिंदू समाज हा चार वर्णात विभागलेला होता. ते चार वर्ण म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र होय. या चार वर्णाचे नंतर जातीमध्ये रुपांतर झाले आणि यातून श्रमाची विभागणी झाली. त्यामध्ये ब्राह्मण समाजाने ज्ञान संपादन करावे, क्षत्रियांनी समाजाच्या संरक्षणाचे काम करावे, वैश्यांनी व्यापार करावा आणि शुद्रांनी सर्व समाजाची सेवा करावी, चातुर्वर्ण्याच्या नियमाप्रमाणे शुद्राला ज्ञान संपादन करण्यास बंदी आहे. आर्थिक उत्पादनाचा धंदा त्यांना करता येत नाही. त्यांना शस्त्रे बाळगता येत नाहीत. त्यामुळे त्यांना कधीही बंड करता आले नाही. यामुळे एकूणच जातीभेद व्यवस्था मानवाच्या विकासातील अडसर बनला आहे. असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले आहे.

**४) सामाईक कार्यक्रमात सहभाग असला पाहिजे :**

व्यक्तीजवळ एकमेकासारख्या सामाईक गोष्टी असणे शक्य होण्यासाठी आपापसात सतत व्यवहार हाच

एकमेव मार्ग आहे. व्यवहारामुळे समाजाचे अस्तित्व टिकून राहते. लोकांनी दुसऱ्याच्या कृतीशी अनुरूप अशी कृती करणे पुरेसे नाही. समांतर कार्यक्रम जरी तो सारखा असला तरी व्यक्तीना समाज म्हणून एकत्र बांधण्यास पुरेसा नाही. हिंदू मधल्या विविध जातीत साजरे केले जाणारे सण सारखेच आहेत. या वस्तुस्थितीमुळे हेच सिद्ध होते, विविध जातींनी एक-सारखे सण समांतर पद्धतीने साजरे करूनही त्या संपूर्ण एकजीव होऊ शकल्या नाहीत. यासाठी व्यक्तीने सामाईक कार्यक्रमामध्ये सहभागी होऊन आपला वाटा उचलला पाहिजे. जेणेकरून इतरांमध्ये निर्माण झालेली चेतना त्यालाही उत्साहित करील.

व्यक्तीला सामुदायिक कार्यक्रमामध्ये सहभागी करावे, जेणेकरून त्याला समुदायाचे यश हे आपले यश आणि त्यांचे अपयश हे आपले अपयश वाटेल. व्यक्तींना एकत्र बांधून त्यातून एक समाज निर्माण करणारी हीच गोष्ट आहे.

**५) समाज बदलणे जीवनाचा नियम आहे :**

कोणतीही गोष्ट निश्चित नाही, कुठलीही गोष्ट शाश्वत नाही. प्रत्येक गोष्ट बदलत असते. व्यक्ती तसेच समाजासाठीही बदल हाच जीवनाचा नियम आहे. हे मान्य करायला पाहिजे. बदलत्या समाजात, रूढी, परंपरात सतत क्रांती घडविली पाहिजे. आणि त्यांच्यामध्ये होणारे बदल प्रत्येक व्यक्तीनी स्विकारले पाहिजे.

एकंदरीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील जाती संस्थेची वैशिष्ट्ये, विकास व कार्यपद्धतीत यामध्ये विचार मांडले आहेत.

## ४.२.२ महाड सत्याग्रह आणि मंदिर प्रवेश चळवळ

● **महाड सत्याग्रह :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपल्या कुशल, प्रेरक आणि दूरदर्शी नेतृत्वाखाली असे एक सार्वजनिक आंदोलन सुरू करावयाचे होते जे दलितांना आपल्या उद्धारासाठी संघटितपणे सामाजिक क्रांती करण्याची हमखास प्रेरणा देत राहू शकेल. अन्यायकारी सामाजिक बंधनातून मुक्त होण्यासाठी आणि आपली सामाजिक, राजकीय व आर्थिक प्रगती करून आपल्या सामाजिक क्रांतीची सुरूवात करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी महाड या महत्त्वपूर्ण ठिकाणाची निवड केली.

● **महाड क्रांतीची सामाजिक कारणे :**

**१) कोकणात दलितांची संख्या जास्त होती :**

डॉ. आंबेडकरांच्या दृष्टीने महाड हे ठिकाण महत्त्वपूर्ण असण्याची काही कारणे होती. पहिले कारण असे की, महाड येथे आणि संपूर्ण कोकणात दलित लोकांची संख्या जास्त होती. बरेच अस्पृश्य इंग्रजी सैन्यात सैनिक होते. अन्यायकारी प्रतिपक्षाशी धैर्याने, निर्भयपणे व शौर्याने लढत रहाण्याची वृत्ती त्यांच्याकडे होती. असे हे कोकणातील शूर लोक महाड येथील सामाजिक क्रांतीच्या आंदोलनात उत्साहाने सहभागी होतील असे जर

घडले तर संपूर्ण कोकणात आणि मुंबई प्रांतात अस्पृश्यांचा उद्धार होऊ शकेल अशी सामाजिक क्रांती होत राहिल असा डॉ. आंबेडकरांना विश्वास होता.

**२) ब्रिटिश कायदा अनुकूल :**

कायद्याच्या दृष्टीनेही महाड हे ठिकाण अगदी योग्य होते. कायद्याच्या विरुद्ध जाणे, म्हणजे इंग्रज सरकारच्या विरुद्ध जाणे होय. डॉ. आंबेडकरांनी विचार केला होता की, महाड येथील सामाजिक क्रांतीचे आंदोलन कायद्याला अनुकूल असेच असेल. त्यामुळे इंग्रज सरकार आपल्या सामाजिक क्रांतीच्या आंदोलनाला संरक्षणात्मक सहकार्यच करीत राहिल. इंग्रज सरकार आपल्या न्याय बाजूला संरक्षणच देईल.

**३) सिताराम बोलेंचा कायदेमंडळ ठराव :**

मुंबई कायदेमंडळाचे सदस्य असलेले समाजसुधारक रावबहादूर सिताराम केशव बोले यांनी सामाजिक क्रांतीचा महत्त्वाचा आधार होतील असे दोन ठराव मुंबई कायदे मंडळात मांडून मंजूरही करून घेतले होते. त्यांनी ४ ऑगस्ट १९२३ रोजी जो पहिला ठराव मांडला होता तो असा होता, ''सार्वजनिक पैशांनी बांधलेल्या किंवा देखरेख होत असलेल्या किंवा सरकारने नेमलेल्या मंडळाकडून चालविलेल्या किंवा राज्याने निर्माण केलेल्या सर्व सार्वजनिक पाण्याच्या जागा, विहिरी, धर्मशाळा, सार्वजनिक शाळा, कोर्ट, कचेऱ्या व दवाखाने वापरण्यासाठी अस्पृश्यांना परवानगी असावी.''

**४) शासकीय आदेश :**

पहिल्या ठरावाची अंमलबजावणी होत रहावी म्हणून मुंबई सरकारने सरकारी अधिकाऱ्यांना उद्देशून एक शासकीय आदेश पाठवून दिला. याचा अर्थ असा की, पहिल्या ठरावाच्या अंमलबजावणीस सरकारचा संरक्षणात्मक पाठिंबा होता.

**५) महाड नगरपालिकेचा ठराव :**

महाडच्या नगरपालिकेने पहिला ठराव मान्य असल्याचा ठराव मंजूर करून महाड येथील चवदार तळे पाण्याच्या वापरासाठी दलितांना खुले केल्याचे जाहीर केले. याचा अर्थ असा, की आता दलितांना तळ्याच्या पाण्याचा वापर करण्यास कोणीही प्रतिबंध करू शकणार नाही. आणि जर कोणी प्रतिबंध केलाच तर सरकारच त्यांचा बंदोबस्त करून दलितांना संरक्षणही देणार आणि न्यायही देणार.

उपरोक्त पाचही कारणे महाड येथे सामाजिक क्रांतीचे आंदोलन करण्यास अनुकूल अशीच होती. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या अस्पृश्य आणि इतर समाजाच्या सहकाऱ्यांशी विचार विनिमय करून महाड येथे सामाजिक क्रांतीचे आंदोलन सुरू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला.

**● कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद – मार्च १९२७ :**

महाड येथे जे सामाजिक क्रांतीचे आंदोलन सुरू करावयाचे हेते ते 'कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद, अधिवेशन पहिले' अशा नावाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली १९ आणि २० मार्च १९२७

रोजी सुरू करण्याचे निश्चित केले. या अधिवेशनाच्या रूपाने महाडपासून सामाजिक क्रांतीचे आंदोलन सुरू होणार होते.

दि. १९ मार्च १९२७ रोजी महाड येथे डॉ. आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषदेचे पहिले क्रांतीकारी अधिवेशन सुरू झाले. डॉ. आंबेडकरांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून माणुसकीचे व सन्मानाचे जीवन जगण्यासाठी महत्त्वाचा संदेश दिला. ते म्हणाले ''आता अस्पृश्यांनी स्पृश्यांच्या बंधनात जगणे सोडून दिले पाहिजे त्यासाठी संघर्ष करावा लागला तरी धाडसाने तो संघर्ष करीत राहिले पाहिजे. आपल्या न्याय हक्काचे रक्षण करण्यासाठी सरकारचे सहकार्य मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपली सामाजिक, राजकीय, आर्थिक प्रगती करीत राहिले पाहिजे. शिक्षण तर घेतले पाहिजेच निरनिराळ्या पदांच्या सरकारी नोकऱ्या मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सार्वजनिक पाण्याच्या जागा, विहिरी, तळी यांचा पाण्याच्या वापरासाठी प्रयत्न केला पाहिजे. जेणेकरून आर्थिक दृष्टीने स्वावलंबी होता येईल असा प्रयत्न केला पाहिजे.'' अशा प्रकारचा महत्त्वपूर्ण संदेश सामाजिक क्रांती करण्यासाठी प्रेरणा देत राहिला.

**● चवदार तळ्याचे पाणी पिऊन समतेचा हक्क मिळविला :**

२० मार्च १९२७ रोजी सामाजिक क्रांतीच्या दृष्टीने काही महत्त्वाचे ठराव मंजूर करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृवाखाली चवदार तळ्यावर जावयाचे आणि सर्वांनी मिळून चवदार तळ्याचे पाणी पिऊन आपला माणूसकीचा आणि समतेचा हक्क सिद्ध करावयाचा, असा सामूहिक निर्णय घेण्यात आला. त्या निर्णयानुसार सर्वजण उत्साहाने चवदार तळ्यावर गेले. प्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या हाताच्या ओंजळीत पाणी घेतले आणि ते पाणी त्यांनी प्राशन करून सामाजिक क्रांतीच्या आंदोलनाचा ऐतिहासिक शुभारंभ केला. त्यानंतर सर्वांनी चवदार तळ्याचे पाणी पिण्याचा विक्रम केला.

पण महाडमधील स्पृश्यांना हे आंदोलन सहन झाले नाही. म्हणून त्यांनी आंदोलनकर्त्यांना संतापाने मारहाण केली. डॉ. आंबेडकरांनी आपली बाजू न्यायाची व सत्याची असल्यामुळे सरकारच्या विरोधात आपली कृती होऊ नये म्हणून आंदोलनकारी दलितांनी प्रतिहल्ला करू नका असा सल्ला दिला. याचा चांगला परिणाम म्हणून सरकारचे प्रतिनिधी असलेल्या महाडच्या मामलेदार व पोलीस सब इन्स्पेक्टर यांनी स्पृश्यांना होणाऱ्या गंभीर परिणामाची जाणीव करून दिली आणि शांत रहाण्याचा सल्ला दिला.

महाडचा सत्याग्रह यशस्वी करण्यासाठी अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष संभाजी तुकाराम गायकवाड, रामचंद्र बाबाजी मोरे, शिवराम गोपाळ जाधव, सुभेदार विश्राम गंगाराम सवादकर, आडेकर यांचे बरोबर अनंतराव विनायक चित्रे, सुरेंद्र गोविंद टिपणीस, गंगाधर निलकंठ सहस्त्रबुद्धे, कमलाकांत चित्रे, बाळाराम आंबेडकर या समाजसेवकांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले. तसेच दलित स्त्री-पुरुष व तरूण मुले बहुसंख्येने अधिवेशनात सहभागी झाले होते.

आपला कायदेशीर हक्क अंमलात आणण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी आंदोलनकारी अस्पृश्यांना आपल्याबरोबर घेऊन सामुदायिकरितीने चवदार तळ्याचे पाणी पिण्याचे आंदोलन यशस्वी केले. याचा अर्थ असा की, डॉ.

आंबेडकर हिंदू समाजाच्या आणि भारताच्या कल्याणासाठी भेदाभेद मिटविण्याचा प्रयत्न करत होते. हे त्याच्या सामाजिक क्रांतीच्या आंदोलनाचे यश आहे.

● **सामाजिक क्रांती आंदोलन २५/२६ डिसेंबर १९२७ :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९ व २० मार्च १९२७ रोजी महाड चवदार तळ्याच्या सत्याग्रहाचे आपल्या अनुयायांसह यशस्वी आंदोलन केले होते. त्या आंदोलनाला आणखी गती देण्याच्या उद्देशाने २५ आणि २६ डिसेंबर १९२७ रोजी सामाजिक क्रांतीच्या आंदोलनाचे आयोजन केले. त्यामुळे दलितांना आपल्या समानतेचे व माणूसकीचे हक्क मिळणार होते.

२० मार्च १९२७ रोजी ''अस्पृश्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतीकारी नेतृत्वाखाली चवदार तळ्याचे पाणी सर्वांनी मिळून संघटितपणे पिण्याचेआंदोलन यशस्वी केले. पण त्यानंतर चवदार तळ्यावर अस्पृश्यांनी पाणी पिल्यामुळे ते तळे बाटले अशी समजूत करून घेऊन सवर्णांनी चवदार तळे विधीपूर्वक शुद्ध करून घेतले आणि समतेचे व माणूसकीचे हक्क नाकारले. त्यामुळे अस्पृश्य चवदार तळ्यावर पाणी भरण्याची किंवा पाणी पिण्याची वहिवाट पाडू शकले नाहीत. आणि म्हणून चवदार तळ्यावर पाणी भरण्याची व पाणी पिण्याची वहिवाट निर्भयपणे प्रस्थापित करण्याकरीता प्रेरणा देण्याच्या उद्देशाने डॉ. आंबेडकरांनी महाड येथे पुन्हा सामाजिक क्रांतीचे आंदोलन आयोजित केले.

● **मनुस्मृती दहन :**

आंदोलनकारी दलितांना न्याय मिळावा म्हणून डॉ. आंबेडकर यांनी समतेच्या आणि माणुसकीच्या हक्काच्या पुर्ततेसाठी आंदोलनाच्या माध्यमातून यश मिळेपर्यंत धैर्याने, नेटाने व उत्साहाने लढत रहा असा संदेश देण्याच्या विचारात होते. शिवाय त्या आंदोलनमय अधिवेशनात जागृत होत असलेल्या दलितांना आपल्या उद्धारासाठी नवीन पद्धतीने विचार, उच्चार आणि आचार करण्याची प्रेरणा मिळू शकेल असा मनुस्मृती दहनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. हे दोन दिवसीय आंदोलन डॉ. आंबेडकरांनी स्थापन केलेल्या बहिष्कृत हितकारिणी सभेच्यावतीने आयोजित केलेले होते. स्वत: डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'बहिष्कृत भारत' या सभेच्या वृत्तपत्रातून लेख लिहून दलित बांधवाना अधिवेशनाचे महत्त्व समजावून सांगत होते. त्यामुळे या अधिवेशनाला मुंबईहून व कोकणातील बहुसंख्येने लोक उपस्थित होते. याबाबतीत अनंत विनायक चित्रे यांचे सहकार्य अधिक महत्त्वाचे होते.

अधिवेशनाच्या मंडप उभारणीसाठी महाडच्या जवळच फत्तेखान नावाच्या मुसलमान गृहस्थाची जमिन मिळाली होती. २५ डिसेंबर १९२७ रोजी डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली विषमतेची शिकवण देणाऱ्या 'मनुस्मृती' या ग्रंथाचे बापूसाहेब सहस्त्रबुद्धे यांच्या हस्ते परिषदेच्या मंडपासमोर दहन करण्यात आले.

● **डॉ. आंबेडकांचे स्त्री जागृतीपर भाषण :**

ह्या अधिवेशनासाठी अस्पृश्य स्त्रिया देखील मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. २६ डिसेंबर १९२७ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर आपल्या भाषणात म्हणाले ''तुमच्या पुरुषांप्रमाणे तुम्ही सुद्धा समाजोन्नतीचा निश्चय

करा, तुमच्या वागणूकीच्या जुन्या चालीरिती बदलल्या पाहिजेत, तुम्ही अस्पृश्य आहात, असे ज्यामुळे वाटते ते सर्व बदलले पाहिजे. तुम्ही लुगडी नेसण्याची पद्धत बदलली पाहिजे, कोपरभर व गळाभर कथलाचे किंवा चांदीचे दागिणे घालण्यापेक्षा कमीत कमी आणि सोन्याचे दागिणे घातले पाहिजे, आपल्या मुलांना शिक्षण दिले पाहिजे. पुरुषांच्या बरोबर तुम्हा स्त्रियांकडेही विद्या व ज्ञान असले पाहिजे, आपली पुढची पिढी सुधारण्यासाठी तुम्ही आपल्या मुलींना शिक्षण दिले पाहिजे, अशा प्रकारे डॉ. आंबेडकरांनी उपदेशपर भाषण करून अस्पृश्य स्त्रियांना अस्पृश्योद्धार होईल अशी परिवर्तनाची दिशा दिली.

**● न्यायालयीन विजय :**

आपल्या अस्पृश्योद्धाराच्या सामाजिक क्रांतीच्या आंदोलनाला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. महाडच्या चवदार तळ्याची जमीन सरकारी मालकीची आहे. म्हणजेच सार्वजनिक आहे. म्हणून महाडच्या त्या सरकारी जमिनीवरचे चवदार तळे सार्वजनिक आहे. त्यामुळे अस्पृश्यांना चवदार तळ्याचे पाणी पिण्याचा व पाणी वापराचा कायदेशीर हक्क आहे. हे महाडच्या कोर्टाच्या निकालाने ८ जून १९३१ रोजी, ठाण्याच्या जिल्हा न्यायालयाच्या निकालाने, ३० जानेवारी १९३३ रोजी आणि मुंबईच्या उच्च न्यायालयाच्या निकालाने, १७ मार्च १९३७ रोजी मान्य केले. आणि अस्पृश्य लोकांचा चवदार तळ्यावर पाणी भरण्याचा व पाणी पिण्याचा कायदेशीर हक्क प्रस्थापित झाला हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आणि अस्पृश्य समाजाच्या सामाजिक क्रांतीच्या आंदोलनाचा फार मोठा न्यायीक विजय होता.

**● मंदिर प्रवेश चळवळ :**

अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशाच्या चळवळीतून सामाजिक समता निर्माण होणार असेल तर मंदिर प्रवेशासाठी अस्पृश्यांनी सत्याग्रह करावा, असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. म्हणून तर त्यांनी अमरावती येथील अंबादेवीच्या मंदिरात प्रवेश करण्यासाठी तेथील अस्पृश्यांनी सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला होता. त्याला महत्त्वपूर्ण वैचारिक बैठक देण्याकरीता बहिष्कृत भारताच्या २१ नोव्हेंबर १९२७ च्याअंकात अत्यंत महत्त्वाचा अग्रलेख लिहिला होता. त्या अगोदर त्यांनी १३ नोव्हेंबर १९२७ रोजी अमरावती येथे अस्पृश्यांच्या सत्याग्रहाविषयी परिषदेत अध्यक्षीय भाषण करून अस्पृश्यांच्या अंबादेवीच्या मंदिर प्रवेशाच्या सत्याग्रहास प्रोत्साहन दिले होते.

**● पर्वती टेकडी मंदिर प्रवेश :**

पुणे येथे अस्पृश्य आणि स्पृश्य यांनी मिळून सामाजिक समता स्थापन करण्याच्या उद्देशाने पर्वतीच्या टेकडीवर असलेल्या मंदिरात प्रवेश करण्याकरीता १३ ऑक्टोबर १९२९ रोजी दसऱ्याच्या दिवशी सत्याग्रह सुरू केला. समाजसेवक शिवराम जानबा कांबळे यांनी टेकडीच्या पायथ्याशी सत्याग्रह करण्यास जमा झालेल्या अस्पृश्यांना शांततेने सत्याग्रह करावा, असे समजावून सांगितले. त्या मंदिर प्रवेशाच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा प्रत्यक्ष सहभाग नव्हता. जरी असे असले तरी त्या सत्याग्रहाची जी प्रेरणा होती ती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सत्याग्रह विषयक विचारांचीच होती.

पोलीसांचे संरक्षण मिळूनही टेकडीवरच्या मंदिरात अस्पृश्य सत्याग्रहींचा प्रवेश होऊ शकला नाही. कारण

मंदिराचे दरवाजे बंद ठेवण्यात आले होते. पोलीसांनी कायदा आणि आदेशाचे पालन दोन्ही बाजूकडून होईल, याची खबरदारी घेतली हेती. म्हणून किरकोळ गडबड सोडता गंभीर असे काही न घडता तो सत्याग्रह त्या दिवशी शांततेने पार पडला. हा सत्याग्रह रोज शांततेने होत राहिला. पण पर्वती मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळू शकला नाही. अखेर २० जानेवारी १९३० पासून सत्याग्रह बंद करण्यात आला.

**● नाशिक काळाराम मंदिर प्रवेश – ३ मार्च १९३० :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी विचारविनिमय करून नाशिक जिल्ह्यातील अस्पृश्यांच्या पुढाऱ्यांनी नाशिक येथील काळाराम मंदिरात अस्पृश्यांनी प्रवेश करावा आणि आवश्यकता वाटल्यास सत्याग्रह करावा असा निर्णय घेतला.

नाशिकच्या पुढाऱ्यांशी विचारविनिमय करताना डॉ. आंबेडकर यांनी समजावून सांगितले की, मंदिर प्रवेशाच्या सत्याग्रहासाठी आपली एकजुटीची शक्ती वापरून संपविण्यापेक्षा अस्पृश्यांना राजकीय हक्क मिळविण्याकरीता अस्पृश्यांची एकजुटीची शक्ती सुरक्षित रहाणे महत्त्वाचे आहे. कारण भारतात किंवा लंडनमध्ये अस्पृश्यांना राजकीय हक्क देण्याच्या बाबतीत वाटाघाटी सुरू होतील असे मला वाटते.

नाशिकच्या अस्पृश्य पुढाऱ्यांनी डॉ. आंबेडकांना आश्वासन दिले की, ते नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेश मिळविण्याकरीता सत्याग्रहही करीत राहतील आणि अस्पृश्यांसाठी राजकीय हक्क मिळविण्याच्या कार्यातही सक्रिय सहभागी होतील. नाशिकच्या अस्पृश्य पुढाऱ्यांचा अशा प्रकारचा उत्साह पाहून डॉ. आंबेडकरांनी नाशिककरांना काळाराम मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह करण्यास आनंदाने संमती दिली. आणि त्या सत्याग्रहाचे नेतृत्वही स्विकारण्याची तयारी दर्शविली.

नाशिकच्या अस्पृश्य पुढाऱ्यांनी नाशिक येथे सत्याग्रह कमिटी स्थापन केली आणि भाऊराव कृष्णाजी गायकवाड यांना त्या सत्याग्रह कमिटीचे चिटणीस केले. अस्पृश्यांना काळाराम मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून सत्याग्रह कमिटीने जी नोटीस दिली होती, तिची दखल पाच महिन्यांचा काळ उलटून गेला तरी काळाराम मंदिराच्या पंचानी घेतली नाही. पहिला रितसर मार्ग खुला झाला नसल्यामुळे सत्याग्रह कमिटीला काळाराम मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह सुरू करण्याचा निर्णय घ्यावा लागला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली ३ मार्च १९३० रोजी नाशिक येथे सभा झाली. अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले ''शांततेने सत्याग्रह करावा आणि यश मिळेपर्यंत सत्याग्रहाचा लढा चालू ठेवावा. उत्तर, पूर्व, दक्षिण व पश्चिम या चार ही दिशांना मंदिराचे दरवाजे होते. सत्याग्रही चार गटात विभागून चारही दरवाजांवर धरणे धरून बसले होते. चारही दरवाजे बंद असल्यामुळे मंदिरात सत्याग्रहींचा प्रवेश होऊ शकला नाही. जवळ जवळ चार वर्षे सत्याग्रहाचा लढा भाऊराव गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली चालू राहिला. तरी देखील काळाराम मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळाला नाही. म्हणून डॉ. आंबेडकर यांनी ३ मार्च १९३४ रोजी भाऊराव गायकवाड यांना पत्र पाठविले. आणि सत्याग्रह चालू ठेवून शक्ती वाया घालविण्यापेक्षा ती शक्ती राजकीय हक्क आणि

शिक्षण घेण्याची सोय मिळविण्यासाठी वापरावी, म्हणून आता सत्याग्रह बंद करण्यात यावा. डॉ. आंबेडकरांच्या पत्रानुसार भाऊराव गायकवाड यांनी काळाराम मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह बंद केला. पुन्हा तो सत्याग्रह सुरू करण्यात आला नाही.

**● मंदिर प्रवेशातील फलनिष्पत्ती :**

अमरावती, पुणे व नाशिक येथे मंदिर प्रवेशासाठी जे सत्याग्रह केले त्याची फलनिष्पत्ती खालीलप्रमाणे-

**१) सर्व मंदिरे सार्वजनिक आहेत :**

अस्पृश्यांना ज्या ज्या मंदिरात प्रवेश करावयाचा होता ते ते मंदिर सार्वजनिक आहेत. सार्वजनिक मंदिरात सर्वांनाच म्हणजे स्पृश्यांना व अस्पृश्यांनाही प्रवेश करण्याचा कायदेशीर हक्क आहे. अस्पृश्यांनी मंदिरात प्रवेश मिळविण्यासाठी सत्याग्रह करणे न्याय आहे. ही वस्तुस्थिती अस्पृश्य लोकांना पटवून देण्यात आणि त्यांच्यात हक्कासाठी लढा देण्याची वैचारिक जागृती करण्यात डॉ. आंबेडकर यशस्वी झाले.

**२) सामाजिक समता आणि संघटन :**

सामाजिक समतेच्या स्थापनेसाठी अस्पृश्यांना स्पृश्यांशी दिर्घ काळापर्यंत लढत रहावे लागेल, ही जाणीवही अस्पृश्यांना करून दिली. त्याचबरोबर सामाजिक आंदोलनाचा लढा चालू ठेवावा लागणार आहे. त्याकरीता अस्पृश्यांनी संघटित होणे आणि प्रबळ संघशक्ती उभी करणे हे किती आवश्यक आहे, याचीही जाणीव करून दिली.

**३) राजकीय हक्क आणि विवेक :**

राजकीय सवलतीचे हक्क मिळविण्यासाठी संघटित लढावे लागणार आहे. तसेच अस्पृश्यांचा हक्काचा लढा जसा स्पृश्यांशी चालू रहाणार आहे तसाच तो सरकारबरोबरही चालू रहाणार आहे. त्यामुळे सावधगिरी व विवेकाने लढावे लागणार आहे याचीही जाणीव झाली.

## ४.२.३ सामाजिक न्याय आणि भारतीय राज्यघटना :

भारतीय राज्यघटना निर्मितीचे कार्य अत्यंत अवघड होते, आव्हान देणारे होते. देशाचा नुसता खंडप्राय आकारच नव्हे, तर इथल्या प्रश्नांची विविधता आणि गुंतागुंत, राष्ट्रीय ऐक्य, स्थैर्य यांची निकड इ. असंख्य कारणामुळे घटना समितीचे कार्य हे अधिकच अवघड झाले होते. जी लोकशाहीबरोबर सामाजिक न्यायाची हमी देऊ शकेल. समाज जीवनात आधुनिकीकरणाचे प्रवाह सुरू करून जी सामाजिक क्रांतीला चालना देऊ शकेल, जी सामाजिक परिवर्तनासाठी व राष्ट्रात नवे चैतन्य आणण्यासाठी आवश्यक असलेले स्थैर्य व ऐक्य निर्माण करू शकेल, अल्पसंख्यांकांच्या हितसंबंधाना जी संरक्षण देऊ शकेल अशी घटना तयार करणे हे घटनाकारासमोरील उद्दिष्ट होते.

आदर्शवाद आणि व्यवहारी दृष्टी यांचा समन्वय भारतीय राज्यघटनेच्या कलमांमधून आढळतो. मार्गदर्शक

तत्वे, मूलभूत हक्क, न्यायालयीन व्यवस्था इ. तरतूदीमधून जो आदर्शवाद दिसतो स्वातंत्र्य चळवळीला असलेल्या व्यापक सामाजिक संदर्भातून आलेला आहे.

● **भारतीय राज्यघटनेची पार्श्वभूमी :**

भारतीय घटनेच्या इतिहासात इ.स. १७७३ च्या रेग्युलेटिंग अ‍ॅक्टला महत्त्व आहे. ब्रिटिशांच्या भारतातील सर्व प्रदेशाचे एकीकरण करण्यात आले. संपूर्ण भारतीय प्रदेशाचा गव्हर्नर जनरल म्हणून बंगालच्या गव्हर्नरला नेमण्यात आले. त्याला मदत करण्यासाठी चार सदस्यांचे मंडळ नेमून त्यांच्याकडे कायदेविषयक व कार्यकारी विषयक अधिकार देण्यात आले. असे विविध स्वरूपाचे कायदे करून दुरुस्त्या आणि सुधारणा केल्यामुळे भारताच्या लिखित राज्यघटनेचा प्रारंभ झाला असे म्हणता येईल.

**१) राणीचा जाहिरनामा :**

१ नोव्हेंबर १८५८ रोजी व्हिक्टोरिया राणीचा जाहिरनामा सादर करण्यात आला. राज्यकारभाराची सर्व सुत्रे लंडन येथे केंद्रित झाली. या जाहीरनाम्यानुसार पुढील आश्वासने देण्यात आली.

अ) भारतातील संस्थानिकांना त्यांच्या प्रदेशाची हमी देण्यात आली.

ब) ब्रिटीश नागरिकांप्रमाणे भारतीयांना वागणूक आणि नि:पक्षपातीपणे न्याय देण्याची हमी दिली.

क) भारतीयांच्या प्राचीन रूढी, परंपरा व रितीरिवाजांचा आदर केला जाईल.

ड) धर्म, वंश, जात, लिंग असा भेदभाव न करता सर्वांना सार्वजनिक सेवेत प्रवेश दिला जाईल.

वरील प्रमाणे आवश्वासने ब्रिटीशांनी दिली होती. पण त्यांचे पालन केले नाही. पुणे १८९२ च्या इंडियन कौन्सिल अ‍ॅक्ट ब्रिटीश पार्लमेंटने मंजूर केला कायदेमंडळाला कार्यकारी मंडळावर नियंत्रण देण्याचे अधिकार देण्यात आले. म्हणून या कायद्याने अप्रत्यक्ष का होईने निवडणूकीचे तत्व मान्य केले असे म्हणता येईल.

**२) मोर्ले मिंटो सुधारणा (१९०९) :**

ब्रिटिशांच्या सुधारणा कायद्यांनी जनतेचे समाधान झाले नव्हते. तसेच भारतात कारखानदारी व उद्योगधंद्याची सुरूवात होऊन त्यांच्या त्यांच्यात स्पर्धा सुरू झाली. या सर्व कारणांमुळे जनतेत राष्ट्रीय स्वातंत्र्याची इच्छा निर्माण झाली व ती पुर्ण करण्यासाठी इ.स. १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना झाली. बंगालची फाळणी करून ब्रिटिशांनी फोडा व झोडा या तत्त्वांचा अवलंब करून हिंदू-मुस्लीम तेढ वाढविण्याचा प्रयत्न केला. या सर्व कारणांमुळे भारतीयांच्यात असंतोष वाढू लागला हा असंतोष कमी करण्यासाठी ब्रिटीश पार्लमेंटने १९०९ साली मोर्ले मिंटो सुधारणा कायद्याला मंजूरी दिली. या कायद्याने निवडणूकीच्या तत्त्वांचा प्रत्यक्षात अवलंब केला. मुसलमानांना स्वतंत्र मतदारसंघ देण्यात आले. सदर कायद्यान्वये ब्रिटीशांच्या अनियंत्रित राज्य सत्तेला लगाम बसला म्हणून या कायद्याला भारताच्या घटनात्मक प्रगतीत अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.

### ३) मॉंटेग्यू – चेम्सफर्ड सुधारणा – १९१९ :

भारतीय घटनेच्या विकासात्मक इतिहासातील मोर्ले मिंटो कायद्यानंतरचा हा महत्त्वाचा कायदा मानला जातो. हा कायदा इ.सन १९१९ ला मंजूर करण्यात आला. त्यालाच 'मॉंटेग्यू–चेम्सफर्ड' सुधारणा कायदा म्हणतात. या कायद्यानुसार केंद्रिय कायदेमंडळाची द्विगृहे प्रस्थापित झाली. तसेच प्रांतात द्विदल राज्यपद्धतीचा स्वीकार करण्यात आला. भारतात जबाबदार शासनपद्धती व संसदीय लोकशाहीचा प्रयोग सुरू करण्याच्या दृष्टीने हा कायदा महत्त्वाचा ठरतो.

### ४) भारतीय प्रशासन कायदा १९३५ :

भारतीय जनतेला स्वयंशासनाचा अधिकार देऊन त्यांच्यातील ब्रिटीश सत्तेविरुद्ध असलेला असंतोष दूर करण्यासाठी तिसऱ्या गोलमेज परिषदेच्या योजनेच्या आधारे मार्च १९३३ मध्ये श्वेत पत्रिका प्रसिद्ध करून एक विधेयक तयार करून ब्रिटीश पार्लमेंटकडून इ.स. १९३५ मध्ये संमत करून त्याचे कायद्यात रुपांतर केले. या कायद्याचा फार मोठा प्रभाव भारतीय राज्यघटनेवर आढळून येतो. १९३५ च्या कायद्यात पुढीलप्रमाणे तरतुदी आहेत.

अ) संघराज्य शासन पद्धती निर्माण केली.

ब) केंद्रिय पातळीवर द्विगृही कायदे मंडळाची तरतूद करण्यात आली.

क) भारतीय संघराज्यासाठी सांधिक न्यायालयाची स्थापना करण्यात आली.

ड) केंद्रिय पातळीवर द्विस्तरीय राज्यपद्धती अस्तित्वात आणली.

इ) या कायद्याने १० टक्के लोकांना मतदानाचा अधिकार मिळाला. ब्रिटीशांच्या सत्ता विसर्जनाचा आणि भारतीय जनतेने विरोध दर्शविला. याच कालावधीत म. गांधीनी 'चले जाव' चळवळ सुरू केली आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी 'आझाद हिंद' सेनेची स्थापना करून स्वातंत्र्य चळवळ गतीमान केली. १९४६ मध्ये पंतप्रधान ॲटली यांनी भारतातील घटनात्मक पेचप्रसंग सोडविण्यासाठी आपल्या मंत्रिमंडळातील तीन मंत्र्यांना भारतात पाठविले. यांनी येथील परिस्थितीचा अभ्यास करून त्रिमंत्री योजना तयार केली. या योजनेत पुढील महत्त्वाच्या सुचना करण्यात आल्या होत्या.

१) भारतासाठी संघराज्य निर्माण करण्याची तरतूद

२) स्वतंत्र कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ असेल.

३) शेषाधिकार प्रांतिक सरकारकडे सोपविले जातील.

४) केंद्रीय हंगामी सरकार स्थापन केले जाईल. तसेच ब्रिटीश राष्ट्रमंडळाकडून बाहेर पडण्याचा भारताला अधिकार असेल.

ही योजना स्विकारली असली तरीही भारतीय राजकीय पक्षांना ती पसंत नव्हती. कारण यात केंद्रसत्ता दुर्बल

बनवून संघराज्य व्यवस्थेला तडा दिला होता.

वरील सर्व घटनाक्रमांचा विचार करून लॉर्ड माऊंट बॅटन यांनी मंत्रिमंडळाशी चर्चा करून भारताची फाळणी सुचविली. त्यांच्या योजनेनुसार ४ जुलै १९४७ रोजी एक विधेयक ब्रिटीश पार्लमेंटपुढे ठेवण्यात आले आणि ते मान्य करण्यात आले, या कायद्यानुसार भारतावरील ब्रिटीश सत्ता पुर्णपणे संपुष्टात येईल आणि अखंड भारताची फाळणी करून भारत आणि पाकिस्तान अशी दोन स्वतंत्र राज्य स्थापनेची तरतूद केली. १५ ऑगस्ट १९४७ पासून दोन्ही देशावर ब्रिटीश सरकारचे काहीही अधिकार राहणार नाहीत. संस्थानिकांचे सार्वभौमत्व १५ ऑगस्ट १९४७ पासून रद्द ठरतील असे जाहीर केले. अशाप्रकारे १९४७ या भारतीय स्वातंत्र्याचा कायदा हा भारत व ब्रिटीश सत्ता संबंधातील शेवटचा टप्पा होय. भारत व पाकिस्तान अशी दोन नवी सार्वभौम राज्ये स्थापन झाली.

**● भारतीय राज्यघटनेची वैशिष्ट्ये :**

१९४६ च्या कॅबिनेट मिशन योजनेनुसार घटना समितीच्या निर्मितीच्या प्रक्रियेस व्यावहारिक पातळीवर सुरूवात झाली. भारतीय घटना समितीच्या निर्मितीसाठी निवडणूका होतील ही घटना समिती प्रातिनिधीक असेल व त्यात जे निर्वाचित होतील, त्यांचाच समावेश असेल. या समितीत एकूण ३८९ सभासद असतील त्यापैकी २९२ प्रतिनिधी ब्रिटीश प्रांतातील असतील चार प्रतिनिधी चीफ कमिशनरच्या प्रांतामधून तर ९३ प्रतिनिधी संस्थानिकांचे असतील.

यानुसार जुलै १९४६ मध्ये ब्रिटीश प्रांतातील प्रतिनिधींसाठी निवडणूका घेण्यात आल्या. २९२ जागांपैकी २११ जागा काँग्रेसला आणि मुस्लीम लिगचे ७३, इतर पक्षांचे व स्वतंत्र असे १५ प्रतिनिधी निर्वाचित झाले. राहिलेल्या ९३ जागा संस्थानिकांकडून पूर्णपणे भरल्या गेल्या नाही. एकंदरीत घटना समिती सार्वभौम नव्हती. कारण यातील प्रतिनिधीची निवड जनतेकडून प्रत्यक्ष मतदान पद्धतीने न होता प्रांताच्या विधिमंडळातील प्रतिनिधी मार्फत झालेली होती.

संविधान समितीची पहिली बैठक दिल्ली येथे ९ डिसेंबर १९४६ रोजी घेण्यात आली. तात्पुरते अध्यक्षपद डॉ. सचिदानंद सिन्हा यांच्याकडे देण्यात आले होते. ११ डिसेंबर १९४६ रोजी डॉ. राजेंद्रप्रसाद यांची संविधान समितीचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

**● घटना समितीचे कामकाज :**

२९ ऑगष्ट १९४७ रोजी घटना परिषदेच्या भरलेल्या बैठकीत घटनेच्या मसूदा समितीची निर्मिती करण्यात आली. मसूदा समितीच्या अध्यक्षपदी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची निवड करण्यात आली. या समितीत के. एम. मुन्शी, एन. गोपालस्वामी अय्यंगार, अल्लादि कृष्णस्वामी अय्यर, सय्यद मोहमंद सादुल्ला, टी. टी. कृष्णामाचारी असे इतर सदस्य होते.

मसुदा समितीने २१ फेब्रुवारी १९४८ रोजी घटनेचा मसुदा घटना समितीकडे पाठविला. घटनेच्या मसुद्यावर विचार विनिमय करून सुचना करण्यासाठी 'ड्राफ्ट-रिपोर्ट' प्रकाशित करण्यात आला. १५ नोव्हेंबर १९४८ ते ऑक्टोबर १९४९ या काळात संविधान परिषदेत चर्चा केली. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या

सहीने घटनेला मंजूरी देण्यात आली. या नव्या राज्यघटनेची अंमलबजावणी २६ जानेवारी १९५० पासून सुरू करण्यात आली. राज्यघटना निर्माण करण्यासाठी २ वर्षे ११ महिने १८ दिवस इतका कालावधी लागला.

**१) लिखित राज्यघटना :**

भारताची राज्यघटना ही जगातील सर्वात मोठी अशी लिखित राज्यघटना आहे. या राज्यघटनेत ३९५ कलमे लिखित स्वरूपात आहेत. घटनेला १४ परिशिष्टे जोडण्यात आलेली आहेत. जगातील इतर देशांच्या राज्यघटनेशी तुलना करता भारताची राज्यघटना विस्तृत आहे हे स्पष्ट होते. घटना विस्तृत होण्याचे कारण असे की, राज्यघटनेतील तत्त्वे अधिक तपशीलवारपणे स्पष्ट करण्यात आली आहेत. राज्यघटनेत केंद्रिय व घटक राज्याच्या शासन व्यवस्थेचा सविस्तर तपशील दिला आहे, मूलभूत हक्कांचे तपशीलवार विवेचन करण्यात आले आहे, निर्वाचन आयोग, लोकसेवा आयोग, महालेखापाल, भाषा आयोग इ. ची तरतूद, मागासलेल्या जाती आणि जमातीला दिलेल्या विशेषाधिकाराचा उल्लेख, घटना दुरुस्तीची पद्धत इ. भाग तपशीलवार स्पष्ट करण्यात आलेला आहे.

**२) अंशत: परिवर्तनिय व अंशत: परिदृढ राज्यघटना :**

सामान्यत: राज्यघटना दुरुस्ती पद्धतीवरून राज्यघटनेचे दोन प्रकार आढळतात.

अ) लवचिक (परिवर्तनीय)

ब) ताठर (परिदृढ)

**अ) लवचिक (परिवर्तनीय) राज्यघटना :** ज्या राज्यघटनेतील तरतूदीत बदल करताना सर्वसाधारण कायदे व घटनात्मक कायदे असा फरक न करता सर्वच कायदे सामान्य समजून ते कायदेमंडळाच्या साध्या बहुमताने संमत करून बदलता येतात. त्यांना लवचिक राज्यघटना असे म्हणतात. उदा. इंग्लंडची राज्यघटना परिवर्तनीय राज्यघटना आहे.

**ब) ताठर (परिदृढ) राज्यघटना :** ज्या राज्यघटनेतील तरतूदीत बदल करताना सर्वसाधारण कायदे व घटनात्मक कायदे असा फरक न करता सर्वच कायदे घटनात्मक समजून कायदेमंडळाच्या विशिष्ट बहुमताने संमत करून बदलता येतात. त्यांना ताठर (परिदृढ) राज्यघटना असे म्हणतात. उदा. अमेरिकेची राज्यघटना.

आतापर्यंत भारतीय राज्यघटनेत घटना दुरुस्ती करण्यासाठी १२३ विधेयके मांडण्यात आली आहेत.

**३) जनतेचे सार्वभौमत्व :**

भारतीय घटनेने जनतेच्या सार्वभौमत्वाचा पुरस्कार केलेला आहे. घटनेच्या उद्देशपत्रिकेत स्पष्ट म्हटले आहे की, ''आम्ही भारतीय जनता (We, the people of India) ही घटना आमच्यासाठी निर्माण करून मान्य व स्वीकृत करीत आहोत.'' वास्तविक भारतीय राज्यघटना समितीने निर्माण केलेली आहे. घटना समितीमधील सदस्य जनतेने प्रत्यक्ष निवडून दिलेले नव्हते. तसेच घटना तयार केल्यानंतर ती जनतेपुढे मान्यतेसाठी ठेवली नव्हती. तरीही घटनाकारांनी ही राज्यघटना भारतीय जनतेला मान्य आहे असे गृहीत धरलेले आहे. भारतीय घटनेने

अंतिम सत्ता जनतेला दिलेली आहे. आम्ही भारतीय जनता असे म्हणून घटनाकारांनी घटनेची निर्मिती, मान्यता व स्विकृती यांची जबाबदारी भारतीय जनतेवर टाकली आहे.

**४) संसदीय शासनव्यवस्था :**

भारताने इंग्लंडच्या संविधानानुसार संसदीय शासन पद्धतीचा स्वीकार केला आहे. भारतात राष्ट्रपती हा घटनात्मक अथवा नामधारी प्रमुख असून पंतप्रधान हा वास्तविक सत्ता प्रमुख आहे. संसदीय शासन पद्धतीनुसार कायदेमंडळातील लोकसभा या कनिष्ठ सभागृहात ज्या राजकीय पक्षाला बहुमत प्राप्त होते त्या पक्षाचा नेता मंत्रिमंडळ बनवितो. पंतप्रधान आपल्या सर्व सहकारी मंत्र्यांसह संयुक्तपणे लोकसभेला नेहमी जबाबदार असतो. लोकसभेने मंत्रीमंडळाविरुद्ध अविश्वासाचा ठराव संमत केला तर मंत्रीमंडळाला राजीनामा द्यावा लागतो. तसेच सामूहिक जबाबदारीच्या तत्त्वानुसार पंतप्रधानाचा राजीनामा म्हणजे संपूर्ण मंत्रीमंडळाचा राजीनामा समजला जातो, अशा प्रकारची संसदीय शासन पद्धती केंद्र व राज्य स्तरावर स्विकारलेली आहे.

**५) मूलभूत अधिकारांचा समावेश :**

भारतीय घटनेच्या तिसऱ्या विभागात कलम १४ ते ३५ या कलमांद्वारे मूलभूत अधिकार स्पष्ट केलेले आहेत. भारतीय घटनेने पुढील सात प्रकारचे 'मूलभूत अधिकार' भारतीय नागरिकांना दिलेले आहेत.

१) समतेचा अधिकार

२) स्वातंत्र्याचा अधिकार

३) शोषणाविरुद्धचा अधिकार

४) धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार

५) सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार

६) मालमत्तेचा अधिकार

७) घटनात्मक उपाय योजनेचा अधिकार

वरील सर्व अधिकारांचा उद्देश न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या आधारावर भारताचे कल्याणकारी राज्य निर्माण करणे हाच आहे.

**६) मार्गदर्शक तत्त्वे :**

भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या भागात ३६ ते ५१ या कलमांत राज्याच्या धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे केली आहेत. शासन संस्थेने लोकशाही प्रक्रिया सामान्य स्तरापर्यंत नेण्यासाठी राज्यघटनेने शासनाला काही मार्गदर्शक करणारी तत्त्वे स्पष्ट केली आहेत ही तत्त्वे पुढीलप्रमाणे आहेत.

१) राज्यातील सर्व स्त्री-पुरुषांना समानतेचे धोरण.

२) १४ वर्षाखालील मुलामुलींना सक्तीचे व मोफत शिक्षण देण्यात येईल.

३) देशातील साधनसंपत्तीचे समाज विकासाच्या दृष्टीने वाटप करणे.

४) समान न्यायाची हमी देणे.

५) सार्वजनिक व बाल आरोग्य सुधारणे.

६) अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्गीय व दुर्बल घटक यांना आर्थिक व शैक्षणिक सवलती योजना त्यांचा विकास घडवून आणणे.

७) शेती व पशुसंवर्धनाच्या बाबतीत अत्याधुनिक व शास्त्रीय तंत्राचा वापर करणे.

८) सर्वांना रोजगार मिळेल अशी व्यवस्था करणे.

९) आंतरराष्ट्रीय क्षेत्रात शांतता प्रस्थापित करणे.

**७) धर्मनिरपेक्ष राज्य :**

धर्मनिरपेक्ष राज्य हे भारतीय संविधानाचे महत्त्वाचे वैशिष्ट आहे. भारत कोणत्याही धर्माचा पुरस्कार करणार नाही तर सर्वधर्मांना समान मानून राज्यघटनेला महत्त्वाचे स्थान दिले आहे. भारतातील प्रत्येक व्यक्तीला स्वेच्छेनुसार कोणताही धर्म स्वीकारता येईल किंवा स्विकारलेल्या धर्माचा त्याग करता येईल. सर्व नागरिकांना त्यांच्या धर्म, जात वंश, लिंग असा भेद न करता सर्वांना समानतेची वागणूक दिली जाईल.

**८) संघराज्यात्मक शासन व्यवस्था :**

भारतीय राज्यघटनेत संघराज्य असा कोठेही उल्लेख नाही. तर राज्याचा संघ असा उल्लेख केला आहे. भारतामध्ये संघराज्याची पुढील लक्षणे आढळतात.

१) लिखित राज्यघटना
४) सत्ताविभाजन
२) घटनेची सर्वश्रेष्ठता
५) दुहेरी शासन.
३) सर्वोच्च न्यायालय

परंतु भारत हे खऱ्या अर्थाने संघराज्य नाही. कारण तेथे शक्तीशाली केंद्र सरकार आहे. कारण अधिकार विभागणीतील सामायिक सूचितील विषयासंबंधी केंद्र व राज्य सरकार भिन्न स्वरूपाचे कायदे केले असतील तर केंद्राचा कायदा श्रेष्ठ मानला जातो.

**९) स्वतंत्र न्यायदान पद्धती :**

भारतीय घटनेने न्यायालयाचे स्वातंत्र्य व श्रेष्ठत्व मान्य केलेले आहे. न्यायालयीन स्वातंत्र्य सुरक्षित ठेवण्यासाठी राज्यघटनेत खास तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. न्यायाधिशांच्या नेमणूका, त्यांच्या अधिकारांची शाश्वती, वेतन, भत्ते इ. विषयक तरतूदी केल्या आहेत. भारतात न्यायदान पद्धती एकेरी स्वरूपाची आहे. न्यायमंडळाच्या सर्वोच्च पदी सुप्रिम कोर्ट, त्याच्या खालोखाल हायकोर्ट (उच्च न्यायालय) उच्च न्यायालयाच्या नियंत्रणाखाली कनिष्ठ (दुय्यम) न्यायालये अशी न्यायदानाची एकेरी पद्धती स्विकारलेली आहे.

**१०) प्रौढ मताधिकार :**

भारतीय राज्यघटनेने प्रातिनिधी संसदीय लोकशाही शासन व्यवस्था स्वीकारल्यामुळे नागरिकांचा राजकारणातील

सहभाग वाढावा व राजकीय शिक्षण मिळावे या उद्देशाने प्रौढ मताधिकार तत्त्वाचा समावेश केला आहे. भारतात शिक्षण, संपत्ती, लिंग, धर्म असा कोणताही भेदभाव न करता २१ वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक भारतीय स्त्री-पुरुषांना मताधिकार दिलेला आहे. या अधिकारानेच घटनेने भारतात राजकीय लोकशाहीची स्थापना केलेली आहे. १९८९ ला ६१ व्या घटनादुरुस्तीने यात बदल करण्यात आला आहे. वयाची अट २१ वर्षावरून १८ वर्षे करण्यात आली आहे. त्यामुळे सध्या १८ वर्षे पूर्ण केलेल्या भारतातील प्रत्येक स्त्री-पुरुषाला मताधिकार दिला.

**११) स्वतंत्र आयोगाची निर्मिती :**

स्वतंत्र न्यायव्यवस्थेबरोबरच अनेक स्वतंत्र आयोगाची निर्मिती भारतीय राज्यघटनेचे वैशिष्टे आहे. स्वतंत्र निर्वाचन आयोग त्यापैकी एक आहे. तसेच नियमक व महालेखापरिक्षक, लोकसेवा आयोग, वित्त आयोग इत्यादी स्वतंत्र व्यवस्था निर्माण केलेली आहे. निवडणूका स्वतंत्रपणे व निर्भयपणे पार पाडल्या जाव्यात, आर्थिक कामे चोखपणे व्हावीत, प्रशासनात गुणवत्तेच्या निकषावर भरती केली जावी आणि प्रशासन जनताभिमुख व्हावे या उद्देशाने वरील स्वतत्र आयोगाची निर्मिती राज्यघटनेने केली आहे.

**१२) समता, स्वातंत्र्य व बंधुता :**

भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेत समता, स्वातंत्र्य व बंधुता या लोकशाही तत्त्वांचा पुरस्कार केलेला आहे. भारतात लोकशाही यशस्वी करावयाची असेल तर सामाजिक, राजकीय, आर्थिक अशा सर्व क्षेत्रांत समता प्रस्थापित झाली पाहिजे. सर्व नागरिकांना समानतेची वागणूक मिळाली पाहिजे, कायद्यासमोर सर्व व्यक्ती समान मानल्या गेल्या पाहिजेत, सामाजिक न्याय प्रस्थापित होऊन समाजाचा सर्वांगीण विकास साधला पाहिजे. घटनाकारांनी हाच उद्देश गृहित धरून समतेचे तत्त्व स्विकारले आहे.

व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्ट्राचे ऐक्य दाखवणारी बंधुत्वाची भावना नागरिकांत निर्माण झाली पाहिजे. राष्ट्रीय एकात्मकता टिकविण्यासाठी बंधुत्वाची भावना आवश्यक आहे. त्याच बरोबर भारतीय घटनेने नागरिकांना स्वातंत्र्याचा हक्क दिलेला आहे. घटनेने नागरिकांच्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी विविध तरतूदी केल्या आहेत.

**१३) अल्पसंख्यांक व मागासवर्गीय लोकांना सवलती :**

भारतीय सामाजिक, न्याय व समता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने घटनाकारांनी अल्पसंख्यांक जातिजमातीसाठी व मागासलेल्या वर्गांसाठी काही तरतूदी करून ठेवलेल्या आहेत. विधीमंडळात अनुसूचित जाती जमातीसाठी खास जागा राखून ठेवलेल्या आहेत. लोकसभा व विधानसभेत राखीव जागांची व्यवस्था करण्यात आलेली आहे. राजकीय लोकशाही बरोबरच सामाजिक व आर्थिक लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी अल्पसंख्यांक व मागासवर्गीयांना विशेष सवलती व व्यवस्था करण्यात आलेली आहे.

भारतीय राज्यघटनेच्या वरील वैशिष्ट्यांचा अभ्यास केला असता असे स्पष्ट होते की, राज्यघटना काही प्रमाणात स्थिर व यशस्वी झालेली आहे. कारण भारतीय राज्यव्यवस्थेत प्रदेशवाद, धर्मवाद, जातिवाद, सत्तावाद असे अनेक प्रश्न वरचेवर उद्‌भवतात. त्यामुळे लोकशाही व्यवस्था व राष्ट्रीय एकात्मतेला काही वेळा तडा

जाण्याची शक्यता निर्माण होते. एकंदरीत राज्यघटनाकर्त्यांचा उद्देश राजकीय, सामाजिक, आर्थिक, लोकशाही, प्रस्थापित व्हावी व राज्यघटनेच्या तरतुदींचा वापर राज्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे करावा असा होता.

### ४.३ सारांश :

आधुनिक भारतातील सामाजिक क्रांतीचे उद्गाते, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ओळख आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाचे वैचारिक प्रबोधन करण्यासाठी आणि देशातील विविध सामाजिक चळवळीची माहिती बहुजन समाजाला होण्यासाठी मूकनायक बहिष्कृत भारत, जनता या नावाची वृत्तपत्रे चालविली. 'जाती निर्मूलनाचे विचार' हे डॉ. आंबेडकरांचे लिहिलेले भाषण प्रसिद्ध आहे. चवदार तळ्याचे पाणी पिऊन मानवी हक्क मिळविला. त्याचबरोबर मंदिर प्रवेश चळवळीने सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. भारतीय राज्यघटनेमुळे भारतीय लोकशाही बरोबर सामाजिक न्याय आणि समता प्रस्थापित झाली.

### ४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

न्यायीक : कायदेशीर

तेढ : कामात अडथळे निर्माण करणे.

प्रबोधन : समाजाला बुद्धीनिष्ठ आणि विज्ञाननिष्ठ जागृत करणे.

सामाजिक न्याय : सर्वांना समान न्याय देऊन सामाजिक समता प्रस्थापित करणे.

### ४.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :

**योग्य पर्याय निवडून खालील विधाने पून्हा लिहा.**

१. जाती निर्मूलनाचे विचार हे पुस्तक ............ यांनी लिहिले.

अ) डॉ. सच्चिदानंद सिन्हा ब) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

क) डॉ. राजेंद्र प्रसाद ड) पंडित जवाहरलाल नेहरू

२. ............ येथे जातपात तोडक मंडळाची परिषद आयोजित केली होती.

अ) लाहोर ब) दिल्ली क) मुंबई ड) कलकत्ता

३) ............ हा भारताला शाप आहे.

अ) धर्म ब) वर्ण क) वंश ड) जात

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म ............ येथे झाला.

अ) आंबावडे ब) मुंबई क) महू ड) सातारा

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे प्राथमिक शिक्षण ............ येथे झाले.

अ) रत्नागिरी ब) सातारा क) मुंबई ड) दापोली

६) मुंबई येथे सन ............ मध्ये डॉ. आंबेडकरांनी मूकनायक नावाचे पाक्षिक काढले.

अ) १९२० ब) १९२२ क) १९२५ ड) १९२६

७) ऑल इंडिया शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन पक्ष ............ मध्ये स्थापन झाला.

अ) १९४० ब) १९४२ क) १९४४ ड) १९५०

८) कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद ............ मध्ये झाली.

अ) १९२७ ब) १९२८ क) १९३० ड) १९३५

९) चवदार तळे ............ येथे आहे.

अ) रत्नागिरी ब) दापोली क) राजापूर ड) महाड

१०) मनुस्मृती ग्रंथाचे दहन महाड येथे ............ रोजी करण्यात आले.

अ) २३ डिसेंबर १९२७ ब) २४ डिसेंबर १९२७

क) २२ डिसेंबर १९२७ ड) २६ डिसेंबर १९२७

११. ............ येथे अंबादेवीच्या मंदिरात प्रवेश सत्याग्रह झाला.

अ) कोल्हापूर ब) अमरावती क) नाशिक ड) पुणे.

१२. पर्वती टेकडी मंदिर प्रवेश सत्याग्रह ............ मध्ये झाला.

अ) १९२५ ब) १९२६ क) १९२७ ड) १९२९

१३. काळाराम मंदिर ............ येथे आहे.

अ) कोल्हापूर ब) सांगली क) नागपूर ड) नाशिक

१४. काळाराम मंदिर प्रवेश चळवळीचे चिटणीस ............ हे होते.

अ) भाऊराव गायकवाड ब) अनंतराव चित्रे

क) संभाजी गायकवाड ड) रामचंद्र मोरे

१५. काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह ............ मध्ये झाला.

अ) १९२५ ब) १९२६ क) १९२८ ड) १९३०

१६. ब्रिटीश पार्लमेंटने मोर्ले मिंटो सुधारणा कायदा ............ साली मंजूर झाला.

अ) १९०९ ब) १९१९ क) १९३५ ड) १९४९

१७. माँटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणा कायदा ............ साली मंजूर झाला.

अ) १९०९ ब) १९१९ क) १९३५ ड) १९४९

१८. भारतीय घटना परिषदेचेअध्यक्ष ............ हे होते.

अ) डॉ. सच्चिदानंद सिन्हा ब) डॉ. राजेंद्र प्रसाद

क) पंडित जवाहरलाल नेहरू ड) सरदार वल्लभभाई पटेल.

१९. भारतीय घटना मसुदा समितीचे अध्यक्ष ............ हे होते.

अ) के.एम. मुन्शी ब) डॉ. राजेंद्रपसाद

क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर ड) टी. टी. कृष्णम्माचारी

२०. भारतीय संविधानात ............ कलमे आहेत.

अ) ३६० ब) ३७० क) ३७२ ड) ३९५

२१. भारतीय राज्यघटनेत ............ परिशिष्टे आहेत.

अ) १२ ब) १३ क) १४ ड) १५.

२२. भारताने ............ शासन पद्धती स्वीकारलेली आहे.

अ) संसदीय ब) संमिश्र क) अध्यक्षीय ड) सर्वकष

२३. भारतीय घटनेने ............ वय पूर्ण असणाऱ्या प्रत्येक स्त्री पुरुष नागरिकाला प्रौढ मताधिकार दिला आहे.

अ) १८ वर्षे ब) २१ वर्षे क) २० वर्षे ड) २२ वर्षे

**४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे.**

**योग्य पर्याय निवडून खालील विधाने पून्हा लिहा.**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर २) लाहोर ३) जात

४) महू ५) सातारा ६) १९२० ७) १९४२

८) १९२७ ९) महाड १०) २२ डिसेंबर १९२७

११) अमरावती १२) १९२७ १३) नाशिक १४) भाऊराव गायकवाड

१५) १९३०   १६) १९०९   १७) १९१९   १८) डॉ. राजेंद्र प्रसाद

१९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर   २०) ३९५   २१) १४

२२) संसदीय   २३) १८ वर्षे.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय :

अ) लघुत्तरी प्रश्न / टीपा लिहा.

१. जातपात तोडक मंडळ

२. महाड सत्याग्रह

३. कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद - १९२७

४. मनुस्मृती दहन

५. नाशिक काळाराम मंदिर प्रवेश

६. भारतीय प्रशासन कायदा १९३५

७. भारतीय स्वातंत्र्याचा कायदा

८. भारतीय राज्यघटना.

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जाती निर्मूलनाचे विचार याविषयी सविस्तर माहिती सांगा.

२. महाड क्रांतीची सामाजिक कारणे स्पष्ट करा.

३. काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह आणि मंदिर प्रवेश फलनिष्पत्ती सविस्तर सांगा.

४. भारतीय राज्यघटनेची पार्श्वभूमी थोडक्यात सांगा.

५. भारतीय राज्यघटनेची वैशिष्ट्ये स्पष्ट सांगा.

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके–


१. डॉ. आंबेडकर बी. आर. जातिव्यवस्तेचे निर्मूलन - डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, प्रथमावृत्ती - २०१५

२. खैरमोडे चांगदेव भवानराव - डॉ. भिमराव रामजी आंबेडकर - खंड-२, प्रकाशक सुगावा प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती, ऑगस्ट २००३.

३. खैरमोडे चांगदेव भवानराव - डॉ. भिमराव रामजी आंबेडकर खंड - ३, प्रकाशक सुगावा प्रकाशन पुणे, तृतीय आवृत्ती, ऑगस्ट २००३

४. नवलकर ह. ना. - शिवराम जानका काबंळे, प्रकाशक सुगावा प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण, १९९७.

५. डॉ. रासम वासंती, डॉ. दादासाहेब शिरगांवे - भारतीय शासन व राजकारण, प्रकाशक - निराली प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, जानेवारी २००९.

६. प्रा. पाटील बी. बी., भारतीय शासन प्रकाशन, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, ऑगस्ट १९९७.

७. डॉ. भोळे भास्कर लक्ष्मण, भारतीय गणराज्याचे शशसन आणि राजकारण, प्रकाशक - अशोक पिंपळापुरे, नागपूर दुसरी आवृत्ती, मार्च २०१०

८. वराडकर रघुनंदन घ. - भारतीय शासन आणि राजकारण, प्रकाशक- सुनील अनिल मेहता, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती १९९२.

❖❖❖

## घटक – १

# सामाजिक सुधारणांचा प्रारंभ

**अनुक्रमणिका :**


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

  १.२.१ सामाजिक परिस्थिती

  १.२.२ परमहंस मंडळी (परमहंस सभा)

  १.२.३ प्रार्थना समाज

१.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ संदर्भ ग्रंथ


### १.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास खालील उद्दिष्ट्ये पूर्ण करता येतील.

- एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील महाराष्ट्राचे भौगोलिक वेगळेपण ज्ञात होईल.
- महाराष्ट्राचा प्राचीन काळापासूनचा इतिहास, येथील राजवंश व इतर सत्ता आणि इंग्रज सरकारचा महाराष्ट्रावर अंमल प्रस्थापित होणे इत्यादी घटकांचा परिचय होईल.
- एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थितीचे आकलन होईल.
- परमहंस मंडळी (परमहंस सभा) या संस्थेच्या स्थापनेची पार्श्वभूमी, तत्त्वप्रणाली आणि कामगिरी इत्यादीचा परिचय होईल.
- प्रार्थना समाजाच्या स्थापनेमागील प्रेरणा, तत्त्वे, कार्यप्रणाली आणि धार्मिक सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील कार्य इत्यादी घटकांचे ज्ञान होईल.

## १.१ प्रास्ताविक :

एकोणिसावे शतक महाराष्ट्राच्या सर्वांगीण जीवनात अनेक दृष्टीने स्थित्यंतराचे शतक ठरले. इ.स. १८१८ मध्ये मराठेशाहीचा अस्त झाला आणि महाराष्ट्रात इंग्रजी सत्तेचा अंमल सुरू होऊन ती स्थिर झाली. या राजकीय परिवर्तनाचे दूरगामी परिणाम येथील समाजजीवनाच्या सर्वच अंगावर झाले. पेशवेकालीन राजकीय जीवनातील अस्थैर्य, अराजकता आणि अशांततेची परिस्थिती नष्ट होऊन इंग्रजांच्या सुनियोजित व सुव्यस्थित अशा कार्यक्षम शासन व्यवस्थेस सुरूवात झाली. आधुनिक शस्त्रे आणि शास्त्रे, नवीन सामाजिक व्यवस्था, उत्पादनाची नवी साधने व शक्ती, विविध स्वरूपाची वस्तुनिष्ठ माहिती आणि नवे विचार प्रवाह इत्यादी घटकांमुळे पुरोगामी बनलेल्या इंग्रज राज्यकर्त्यांनी येथील प्रजेवर एक वेगळा प्रयोग सुरू केला. परिणामी अंधश्रद्धा, अनिष्ठ रूढी परंपरा आणि जातीव्यवस्था यांनी बद्ध असलेल्या समाजाला सामाजिक समतेचा साक्षात्कार झाला. इंग्रजी राजवटीचा प्रारंभ हा जुन्या मूल्यांचा अस्त ठरला आणि नव्या विचारांचे वारे वाहू लागले. महाराष्ट्रीयन समाज एका नव्या संक्रमण अवस्थेतून वाटचाल करू लागला. या परिवर्तनामुळे येथील धार्मिक, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवन ढवळून निघाले. तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी यांच्या मते, ''इंग्रजी राज्याचे आधुनिक शिक्षण, भौतिक सुधारणा आणि सुधारलेली राज्यव्यस्था यांची स्थापना करून इंग्रजांनी भारतातील काल्पनिक विश्वाला भूकंपाचा हादरा दिला.'' पाश्चात्याचे आधुनिक, वैज्ञानिक, प्रगत व पुरोगामी विचार आत्मसात करणे, येथील समाजाला जड गेले. असे असले तरी पाश्चिमात्य विचार व परिवर्तनाला येथील समाज पूर्णपणे विरोधही करू शकला नाही. त्यामुळे एक प्रकारची वैचारिक कोंडी निर्माण झाली. ही वैचारिक कोंडी फोडण्याचे कार्य एकोणिसाव्या शतकात केल्यामुळे हे शतक महाराष्ट्राच्या सर्वांगीन जीवनात महत्त्वपूर्ण ठरले. इंग्रजी सत्तेचे राजकीय स्वरूप वेगळे व आकर्षक असले तरी या मागचा त्यांचा आर्थिक हेतू वेगळाच आहे याची जाणीव नवशिक्षितांना याच काळात झाली. इंग्रजांची विज्ञान निष्ठा, शिक्षण व्यवस्था व जीवन पद्धतीचे येथील नवशिक्षितांना आकर्षण वाटू लागले. आपली राजवट व इंग्रजांची राजवट, पौर्वात्य व पाश्चात्य कुटुंब व्यवस्था, तेथील सामाजिक समता आणि त्या तुलनेत आपल्या देशातील टोकाची जाती व्यवस्था, आचारां-विचारातील बंधने, संकुचित वृत्ती यामधील तफावत त्यांच्या लक्षात येऊ लागली. आणि त्यांनी आपल्या कुवतीनुसार महाराष्ट्रीयन समाजाच्या जगण्याच्या, विचार करण्याच्या पद्धतीत बदल घडवून आणण्याचा निर्धार केला. त्यातूनच प्रबोधनाला सुरूवात झाली. म्हणूनच या शतकाच्या प्रारंभीच्या सामाजिक परिस्थितीचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे.

### ● महाराष्ट्र : भौगोलिक वैशिष्ट्य :

महाराष्ट्र हा डोंगरदऱ्यांचा पठारांचा व छोट्या छोट्या नद्यांच्या काठचा सुपीक खोऱ्याचा प्रदेश आहे. सह्याद्रीच्या असंख्य डोंगर रांगा, उंच शिखरे, खोल दऱ्या, घनदाट अरण्ये व त्यातील हिंस्र श्वापदे इत्यादींमुळे निर्माण झालेली दुर्गमता हे महाराष्ट्राचे खास भौगोलिक वेगळेपण आहे. त्यामुळेच स्वराज्य स्थापनेचा पहिला प्रयत्न येथे झाला आणि आपले स्वातंत्र्य टिकविण्याचा प्रयत्न या प्रदेशाच्या भौगोलिकतेमुळेच शक्य झाला. यामुळेच इस्लामी सत्तेचे वर्चस्व उत्तर भारतात प्रस्थापित होण्यास इ. सनाच्या आठव्या शतकात सुरूवात झाली

असली तरी महाराष्ट्रावर आपले राजकीय वर्चस्व प्रस्थापित करण्यास त्यांना इ. सनाच्या चौदाव्या शतकापर्यंत यश आले नाही. महाराष्ट्राला भौगोलिक विविधता लाभली आहे. पश्चिम किनारपट्टीवर समुद्र सपाटीचा प्रदेश तर किनाऱ्यापासून वीस-पंचवीस मैलांवर चार हजार उंचीचा प्रदेश, काही ठिकाणी २५० ते ३०० इंच पाऊस तर काही ठिकाणी पंधरा ते पंचवीस इंच पाऊस, काही ठिकाणी डोंगर पठारे व माळराने तर काही ठिकाणी सुपीक खोरी, काही ठिकाणी नापीक प्रदेश तर काही ठिकाणी काळी कसदार जमीन अशा विविधतेने महाराष्ट्र नटलेला आहे.

आजच्या महाराष्ट्र राज्याची निर्मिती भाषावर प्रांतरचनेच्या तत्त्वानुसार १ मे, १९६० रोजी झाली. महाराष्ट्राच्या उत्तरेस गुजरात व मध्य प्रदेश, पूर्वेस मध्य प्रदेश व आंध्र प्रदेश, दक्षिणेस आंध्र प्रदेश, कर्नाटक व गोवा ही राज्ये आहेत. पश्चिमेला अरबी समुद्र आहे. आजच्या महाराष्ट्र राज्याचे कोकण, देश, विदर्भ व मराठवाडा हे चार प्रमुख विभाग आहेत. त्यापैकी कोकण व देश या विभागांचा इंग्रजी राजवटीत मुंबई इलाख्यात समावेश केलेला होता. विदर्भचा प्रदेश मध्य प्रांत व बिदर या राज्यांशी जोडला होता तर मराठवाड्याचा समावेश निजामाच्या हैदराबाद संस्थानात होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महाराष्ट्र राज्याची निर्मिती होऊन त्यात मराठी भाषिक प्रदेशांचा समावेश करण्यात आला.

● **महाराष्ट्राचा इतिहास :**

आधुनिक काळात करण्यात आलेल्या उत्खनन व संशोधनावरून महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासाची माहिती मिळते. गोदावरी व प्रवरा नद्यांच्या काठी नाशिक व गंगावाडी येथे अश्मयुगीन वसाहतींचे संदर्भ मिळतात. संगमेश्वर जवळ जोर्वे, कोल्हापूरमधील ब्रह्मपूरी, कराड या प्राचीन मानवी वसाहती समाज व त्यांच्या सांस्कृतिक प्रगतीची माहिती देणारी ठिकाणे आहेत. महाराष्ट्राची भूमी प्राचीन काळी दंडकारण्य म्हणून ओळखली जात होती. या प्रदेशातील स्थायिक लोक मरहट्ट, मरहठ्ठ, महारठ्ठ अशा वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाऊ लागले. यावरून या प्रदेशाला महाराष्ट्र हे नाव प्राप्त झाले असावे. मराठी ही महाराष्ट्राची लोकभाषा होय.

अशोकाच्या शिलालेखात आलेल्या वर्णनावरून इ.स. पूर्व तिसऱ्या शतकात मौर्य साम्राज्य महाराष्ट्राच्या काही भागात पसरले होते. त्यानंतर इ.स. पूर्व २३० ते इसवीसन २३० पर्यंत येथे सातवाहनांची सत्ता होती. गोदावरीचे खोरे हा या साम्राज्याचा गाभा व प्रतिष्ठान (पैठण) ही राजधानी होती. त्यानंतर महाराष्ट्रात वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकुट, यादव इत्यादी राजघराण्यांनी राज्य केले. १२९४ मध्ये अल्लाउद्दीन खिलजीने देवगीरीच्या यादवांचा पराभव करून महाराष्ट्रात प्रथमच इस्लामी सत्तेचे वर्चस्व प्रस्थापित केले. त्यानंतरच बहामनी राज्याने इस्लामी सत्तेला बळकटी आणली. पुढे इसवी सनाच्या पंधराव्या शतकाच्या शेवटी बहामनी राज्याचे विघटन होऊन वऱ्हाडची इमादशाही, अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही, बीदरची बरीदशाही व गोवळकोंड्याची कुतुबशाही अशी स्वतंत्र राज्ये उदयास आली. येथील इस्लामी सत्ताधीशांनी मराठा सरदारांच्या मदतीने आपली सत्ता टिकवली व वाढवली.

प्रतिकारहीन बनलेल्या येथील हिंदू समाजावर या इस्लामी राजवटींनी अन्याय, अत्याचार, जुलूम व जबरदस्ती केली. सतराव्या शतकात अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतंत्र

राज्याची, स्वराज्याची स्थापना केली. स्वराज्याची स्थापना ही महाराष्ट्राच्या सर्वांगिण जीवनात बदल घडवून आणणारी क्रांतिकारी घटना ठरली. छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठमोळ्या माणसांचे संघटन करून त्यांना स्वातंत्र्याच्या विचाराने भारावून स्वराज्य, स्वधर्म, स्वदेश, स्व-संस्कृती व स्वभाषेच्या रक्षणासाठी लढण्याची प्रेरणा दिली. आदिलशाही, कुतुबशाही, मुघल यासारख्या एत्तदेशीय व पोर्तुगिज, सिद्धी, इंग्रज इत्यादी परकीय सत्तांशी संघर्ष करून मराठी सत्तेला स्थिर पायावर उभे केले. त्यानंतर छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज आणि महाराणी ताराबाई यांनी दैदिप्यमान स्वातंत्र्यसंग्राम उभारून मुघल बादशहा औरंगजेब याचा प्रतिकार करून स्वराज्य अबादित राखले. पुढे छत्रपती शाहू महाराजांच्या काळापासून छत्रपतींच्या सत्ता व अधिकारांचा संकोच होऊन पेशवे प्रबळ बनले. पेशवाईच्या सुरूवातीस मराठ्यांच्या सत्तेचा विस्तार उत्तर भारतात होऊन मराठी सत्तेला श्रेष्ठ व सामर्थ्यशाली सत्ता म्हणून प्रतिष्ठा प्राप्त झाली. त्यानंतरच्या काळात इ.स. १७६१ च्या पानिपतच्या तिसऱ्या युद्धानंतर मराठी सत्तेला उतरती कळा लागली.

**● इंग्रजी सत्तेचा उदय व विस्तार :**

इंग्लंड मधील काही व्यापाऱ्यांनी ३१ डिसेंबर, १६०० रोजी लंडन येथे पूर्वेकडील देशांशी व्यापार करण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना केली. इंग्रज भारतात प्रथम व्यापाराच्या हेतूने आले. ईस्ट इंडिया कंपनीने भारतात सुरत, मद्रास, मुंबई व कलकत्ता इत्यादी ठिकाणी आपल्या वखारी स्थापन करून व्यापारास सुरूवात केली. व्यापार वृद्धीसाठी येथील राजकीय सत्ता आपल्या हाती असणे आवश्यक आहे याची जाणीव त्यांना झाली. हिंदुस्थान मध्ये प्रभावी मध्यवर्ती सत्तेचा अभाव, एतद्देशीय सत्तांमधील परस्पर संघर्ष, त्यातून आलेली दुर्बलता या बाबी इंग्रजांना अनुकूल ठरल्या. इ.स. १७०५ मध्ये प्लासीच्या लढाईत विजय मिळवून त्यांनी बंगालमध्ये आपल्या राजकीय सत्तेचा पाया घातला. इंग्रजांनी फ्रेंच, डच व पोर्तुगीज या युरोपियन स्पर्धकांनाही पराभूत केले. लॉर्ड वेलस्ली याने इंग्रजी सत्तेच्या विस्तारासाठी आक्रमक धोरणाचा स्वीकार करून तैनाती फौज पत्करण्यास अनेक सत्ताधीशांना भाग पाडले. वॉरन हेस्टींग याने विलीनीकरणाचे धोरण अवलंबून अनेक राज्ये खालसा केली.

भारतात अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्रजांना विरोध करणारी मराठ्यांची एकमेव सत्ता होती. पण याच शतकाच्या शेवटच्या शतकात सवाई माधवराव, महादजी शिंदे, नाना फडणवीस इत्यादी कर्त्या पुरुषांच्या मृत्युने पेशवाईतील कर्तबगार पिढी संपली. अंगी कर्तृत्व नसलेल्या दुसऱ्या बाजीराव पेशवा याने शिंदे, भोसले व होळकर इत्यादी सरदारांबरोबर वैर पत्करले. त्याने सन १८०२ मध्ये इंग्रजांबरोबर वसईचा तह करून, तैनाती फौज स्वीकारली व आपले स्वातंत्र्यही गमावले. इ.स. १८१८ मध्ये इंग्रजांनी पेशव्यांची उरली सुरली सत्ता संपुष्टात आणली आणि महाराष्ट्रात इंग्रजी सत्तेचा अंमल सुरू झाला.

## १.२ विषय विवेचन :

### १.२.१ एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीची सामाजिक परिस्थिती :

एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रातील समाजात वर्णव्यवस्था व जाती व्यवस्थेतील कडक निर्बंधांना विशेष

महत्त्व प्राप्त झाले होते. माणसाच्या अथांग बुद्धीला चतुर्वर्ग, चिंतामणी, निर्णयसिंधू, धर्मसिंधु इत्यादी ग्रंथांनी जखडून टाकले होते. वैज्ञानिक दृष्टिकोण व बुद्धीप्रामाण्यवाद यापेक्षा समाज जीवनातील चालीरीती, रूढी, परंपरा व ग्रंथ प्रामाण्याला विशेष महत्त्व होते. धर्ममार्तंड आणि वर्ण व जातिव्यवस्थेमुळे गावे दुभंगून एका वेशीच्या आतील गाव व वेशीच्या बाहेरील दुसरे गाव अशी स्थिती बनली होती. त्यामुळे गावाबरोबरच माणसांची मनेही दुभंगलेली होती. अस्पृश्यांचे पाणवठे व मसनवटे वेगवेगळी होती. अशाप्रकारे येथील समाज जाती-धर्मव्यवस्थेने बंदिस्त केला होता. या परिस्थितीबद्दल कुमार केतकर आगरकरांचे विधान उद्‌धृत करताांना लिहितात, ''आमची गृहपद्धती, आमची शास्त्रे, आमच्या कला, आमचे वर्ण संबंध, आमच्या चालिरिती इंग्रज येईपर्यंत आमचे सारे व्यक्तीजीवन व राष्ट्रजीवन ठशात घालून ओतलेल्या पोलादासारखे किंवा निर्भिड शृंखलाबद्ध बंदिवानासारखे अथवा उदकाचा नित्य आघाताने झालेल्या लाकडासारखे किंवा हडकासारखे शेकडो वर्षे होऊन राहिले.''

**१) धार्मिक स्थिती :**

या काळातील समाज जीवनावर धार्मिक आचार व विचारांचा मोठा प्रभाव होता. धर्माची मूलभूत तत्त्वे बाजूला पडून धार्मिक आचार, परंपरा, कर्मकांड व व्रतवैकल्ये यांना अतिरेकी महत्त्व प्राप्त झाले होते. यामुळे पापक्षालन होऊन देव-देवतांची कृपा प्राप्त होते असा विचार रूढ झाला होता. धर्मगुरु, शास्त्री, पंडित इत्यादी उच्चवर्णीयांना सुद्धा खऱ्या धर्माचा व धर्म तत्त्वांचा विसर पडला होता. तंत्र-मंत्र, जादूटोणा, भूतपिशाच विद्या यांना महत्त्व प्राप्त झाले होते. तंत्रमंत्र, अनुष्ठाने, ब्राह्मणभोजने, दक्षिणा यावर लाखो रुपयांची उधळपट्टी केली जात होती. समाजातील अंधश्रद्धा, कर्मकांड, व्रतवैकल्ये यांचा पुरोहित आपल्या फायद्यासाठी उपयोग करून घेत होते. प्रसिद्ध समाजसुधारक लोकहितवादी यांनी एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी दिसणाऱ्या धार्मिक स्थिती विषयी म्हटले आहे ''हिंदू लोकांत सांप्रत अनाचार फार माजला आहे. निरर्थक कामे व ढोंग फार होऊन त्यातील बीजरूपी जी नीती तीच भ्रष्ट झाली आहे. आता जो धर्म चालला आहे तो धर्म नव्हे हा बेबंद गोंधळ आहे. लोकनीती नाहीशी झाली व धर्म बुडाला असे म्हणतात. पण मला धर्म कोठेच दिसत नाही.'' थोडक्यात एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी बुद्धिप्रामाण्यवादापेक्षा अंधश्रद्धा, रूढी व परंपरा यांना जास्त महत्त्व आले होते. हिंदू धर्मात अनेक पंथ-उपपंथांचा उदय झाला होता. शाक्त पंथासारख्या काही अघोरी पंथांना सुद्धा समाजात प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. अशाप्रकारे अनेक अनिष्ठ रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, अयोग्य आचार व विचार यांनी तत्कालीन महाराष्ट्रातील धार्मिक जीवन झाकोळलेले होते.

**२) जातीव्यवस्था :**

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रात जातिव्यवस्थेचा मोठा प्रभाव होता. वैदिक काळातील वर्णव्यवस्थेचे कालांतराने जातीव्यवस्थेत रूपांतर झाले. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र अशा वर्णांमधून पुढे विविध जाती व उपजाती उदयास आल्या. वैदिक काळातील वर्णव्यवस्था कर्मावर आधारित असून परिवर्तनीय होती. मात्र जातीव्यवस्था जन्मावर आधारित असून अपरिवर्तनीय होती. मनुष्य ज्या जातीत जन्मास आला ती त्याची जात ठरत असे. जाती बरोबरच त्याचा व्यवसायही निश्चित होत असे. त्याला जात बदलता येत नसे. जातीअंतर्गतच रोटी-बेटी व्यवहार ही चालत. त्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीस जातीबहिष्कृत केले जाई.

जातिव्यवस्थेने वैशिष्ट्यपूर्ण अशी एक उतरंडच तयार केली होती. समाजात प्रत्येक जातीला विशिष्ट सामाजिक स्थान होते. या स्थानानुसारच प्रत्येक जातीला सामाजिक हक्क, अधिकार व कर्तव्ये लाभली होती. ब्राह्मण व मराठा या उच्च जातींना अनेक प्रकारचे विशेषाधिकार मिळाले होते, तर कनिष्ठ व नीच जातीच्या लोकांना मूलभूत मानवी हक्कांपासून वंचित ठेवले होते. त्यांना विकासाची कोणतीही संधी मिळू शकत नव्हती. त्यांच्यावर कडक व जाचक बंधने लादली होती. या बंधनांचे उल्लंघन करणाऱ्यावर सामाजिक बहिष्कार टाकून जातीबहिष्कृत केले जाई.

ब्राह्मण स्वत:ला इतर सर्व जातींच्या लोकांपेक्षा श्रेष्ठ व उच्च समजत तर इतर जमातीतील लोकांना तुच्छतेची वागणूक देत. ब्राह्मणांची सेवा करणे हा शुद्रांचा धर्म समजला जाई. धर्माच्या नावावर त्यांचे आत्यंतिक शोषण केले जाई. या काळात सर्वच जातींमध्ये संघर्ष चालू होता. ब्राह्मण-ब्राह्मण, ब्राह्मण-मराठा व मराठा-बहुजन जाती इत्यादींमध्ये श्रेष्ठत्वासाठी तंटे व संघर्ष होत असत. अशाप्रकारे जातिव्यवस्थेने तत्कालीन समाज जीवन पोखरून गेले होते.

**३) अस्पृश्यता :**

वैदिक काळातील वर्णव्यवस्था अपरिवर्तनीय बनुन त्यातून जाती व्यवस्था उदयास आली. अस्पृश्यता हे या जातीव्यवस्थेच्या विषवृक्षाला आलेले विषारी फळ होय. एकोणिसाव्या शतकात धर्मशास्त्र, स्मृती व पूराणांचा प्रभाव हिंदू समाज व्यवहार व समाज रचनेवर होता. त्यांनी हिंदू समाज व समाज व्यवहार जखडून बांधून टाकले होते. शूद्रांना अस्पृश्य समजले जात होते. अस्पृश्य जातींमधील महार, मांग, चांभार या प्रमुख जाती होत्या. अस्पृश्य म्हणून त्यांना गावकुसाबाहेर कायमचे वस्ती करून रहावे लागे. त्यांना अत्यंत हीन दर्जाची कामे दिली जात. ती कामे करण्यात यांच्याकडून काही कसूर झाली तर अत्यंत कठोर शिक्षा केल्या जात. उच्च जातीच्या लोकांना अस्पृश्यांच्या स्पर्शाने विटाळ होत असे. म्हणून गावात फिरतांना त्यांच्यावर अनेक बंधने लादली होती. त्यांना पुण्यासारख्या गावात मडके व कमरेस झाडाची फांदी बांधून फिरावे लागे. सार्वजनिक इमारती, देवालये, पाणवठे इत्यादी ठिकाणी त्यांना प्रवेशबंदी होती. त्यांना शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक अधिकार नाकारण्यात आले होते.

**४) गुलामगिरी (दास-दासी) :**

सामाजिक दृष्ट्या मानवतेला काळीमा फासणारी गुलामगिरीची (दास-दासी) पद्धत एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात घट्ट रुजलेली होती. उत्तर वैदिक काळामध्ये दास हा शब्द गुलाम या अर्थाने सरसकट वापरण्यात येऊ लागला. वंशपरंपरागत मालकाची सेवा करणारे व बाजारात जाऊन जनावरांप्रमाणे खरेदी-विक्री करून मिळणारे गुलाम असे गुलामांचे दोन प्रकार होते. त्यांना दास-दासी, बटकी, कसबीणी इत्यादी नावाने ओळखले जाई. सरदार, जहागीरदार, राजे व त्यांचा दरबार यांच्या पदरी हे दास-दासी असत. त्यांना सर्व प्रकारची (शेतीकाम, घरकाम इत्यादी) कामे करावी लागत. गुलामांना मोबदला देऊन किंवा पर्यायी व्यक्ती देऊन मुक्तता करून घेता येत असे. गुलाम म्हातारे झाल्यावर मालक त्यांची दास्यातून मुक्तता करीत असत. एकोणिसाव्या

शतकाच्या प्रारंभी गुलामगिरीची तीव्रता जास्त आढळते. पुढे इंग्रजांनी सन १८२७ मध्ये गुलामगिरीची प्रथा बंद करणारा कायदा संमत केला.

**५) वेठबिगार :**

वेठबीगारीची पद्धत प्राचीन भारतात अस्तित्वात होती. राजेशाही शासनव्यवस्थेमध्ये ज्यांची कर देण्याची ऐपत नसे त्यांना करा ऐवजी काही काळापुरते विनावेतनावर काम करावे लागे. या विनावेतन काम करण्याच्या पद्धतीला पुढे वेठबिगारी असे संबोधले जाऊ लागले. अतिशूद्र जातीतील लोकांना वेठबिगार म्हणून वापरले जाई. त्यांना सरकारी बांधकाम, रस्ते, दुरुस्ती कुरणातील गवत कापणे, इनामदार, जहागीरदार देशमुख, पाटील इत्यादी वतनदारांच्या घरी कामे करणे अशा कामासाठी फुकट राबवून घेतले जाई. छत्रपती, पेशवे, सरदार जेव्हा शिकार, प्रवास व तीर्थक्षेत्रास जात तेव्हा त्यांच्या प्रवासाची, राहण्याची, साहित्याची, जेवणखाण व पाण्याची सोय करण्यासाठी कुंभार, सुतार, गुरव, लोहार इत्यादी जातींच्या लोकांना वेठबिगार म्हणून राबावे लागे. थोडक्यात महाराष्ट्रात वेठबिगार पद्धतीने शूद्र व अतिशूद्र जातींना विनावेतन श्रम करावयास लावून त्यांची पिळवणूक केली जात असल्याचे स्पष्ट होते.

**६) अंधश्रद्धा :**

पेशवेकाळात व्रतवैकल्ये, भोळसट समजूती व अंधश्रद्धेला उत आला होता. दाने, व्रते, अनुष्ठाने, उपवास केल्याने परमेश्वराची कृपा होते अशी समजूत समाजात दृढ होती. मंत्र तंत्र, पायगूण, शकुन-अपशकुन यावर लोकांचा विश्वास होता. अंगात येणे, समुद्र पर्यटनास बंदी असणे, नरबळी देणे यासारख्या कुप्रथांनी समाजात ठाण मांडले होते. भूतबाधा, चेटूक, जारण-मारण-तारण, जादूटोणा यावर अज्ञानी लोकांचा विश्वास होता. तत्कालीन पुरोहितवर्गाने स्वस्वार्थासाठी सामान्य माणसाला कर्मकांडात अडकवून ठेवले जात होते. तसेच धर्माच्या नावाखाली त्यांची फसवणूक केली जात होती.

**७) स्त्रीजीवन :**

कोणत्याही समाजाची संस्कृती श्रेष्ठ आहे किंवा नाही हे त्या समाजातील स्त्री जीवन कसे आहे यावर ठरत असते. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रातील समाज व्यवस्था, पुरुषप्रधान होती. स्त्रीयांचे जीवन हे धर्मशास्त्रे, रूढी परंपरा, चालीरिती यांच्या बंधनात सर्व बाजूंनी जखडले गेल्याने अत्यंत वाईट व करूणाजनक होते. स्त्रिकडे वस्तू म्हणूनच पाहिले जाई. तिला आचार व विचार यांचे स्वातंत्र्य नव्हते. तिला शिक्षणाचे तसेच धर्मकार्य करण्याचे अधिकार नव्हते. संस्कार विधींमध्ये तिला शुद्रासारखी वागणूक दिली जाई. चूल आणि मूल हीच तिची मूलभूत कर्तव्ये मानली जात. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रातील जीवन पुढील प्रमाणे होते.

**अ) बालविवाह :**

पेशवाई काळातील सर्वात प्रचलित सर्वमान्य विवाह प्रकार म्हणजे बालविवाह होय. मुलीचा विवाह वयाच्या आठ ते नऊ वर्षापर्यंत केला जाई. मुलीचा विवाह नऊ वर्षापर्यंत झाला नाही तर तो अधर्म मानला

जाई. मुलाचे विवाहाचे वय बारा ते तेरा वर्ष इतके होते. बालविवाहामुळे मुलींमध्ये अकाली वैधव्य येण्याचे प्रमाण जास्त असे. शिवाय लहान वयातच मातृत्व लादले जात असल्याने प्रसूती काळातच स्त्रियांचा मृत्यू होण्याचे प्रमाण जास्त होते. अल्पवयातच संसाराचा भार अंगावर पडणे तसेच शारीरिक आणि मानसिक ताण असह्य होणे यामुळे पुढे व्याधीग्रस्त होण्याचे प्रमाण स्त्रियांमध्ये जास्त होते.

**ब) सती पद्धती :**

हिंदू समाजात प्राचीन काळापासून सती पद्धती प्रचलित होती या प्रथेप्रमाणे हिंदू स्त्री आपल्या पतीच्या मृत्यूनंतर त्याच्या प्रेताबरोबर सहगमन करीत असे. कालांतराने या प्रथेला धार्मिक दृष्ट्या महत्व आले. सती पद्धती वरिष्ठ जातींमध्ये अस्तित्वात होती. एखादी स्त्री सती जाण्यास तयार नसेल तर तिला सक्तीने सती जाण्यास भाग पाडले जाई. सती जाणाऱ्या विधवा स्त्रियांची स्थिती करूण व केविलवाणी होत असे. सती पद्धती म्हणजे स्त्री जीवनाला मोठा शाप होता.

**क) विधवा विवाहास बंदी :**

वैधव्य ही त्याकाळी स्त्रियांसाठी मोठी आपत्ती असून स्त्रीच्या मागील जन्मांच्या पापांचे वैधव्य हे फळ असल्याची समाजात समजूत होती. ब्राह्मण समाज व ९६ कुळी क्षत्रिय मराठा यांच्यात विधवांच्या विवाहास बंदी होती. शुद्र अतिशुद्र समाजात विधवांचे विवाह होत असत, मात्र उच्चवर्णीयांच्या प्रथेचे अनुकरण करण्याच्या मानसिकेतमुळे त्यांच्यातही विधवा स्त्रियांच्या विवाहाचे प्रमाण अत्यल्प होते. युद्धजन्य स्थिती, कुपोषण, आरोग्यविषयक सोयींचा अभाव, साथीचे रोग व बालविवाह इत्यादीमुळे स्त्रियांवर वैधव्याचे संकट कोसळत असे. अशा विधवा स्त्री पुढे दोनच पर्याय उपलब्ध असत. ते म्हणजे वैधव्य पालन करणे किंवा मृत पतीबरोबर सहगमन करणे होय. अशा विधवा स्त्रियांना अत्यंत अपमानास्पद जिणे जगावे लागे. त्यांना धार्मिक विधींमध्ये सहभाग घेता येत नसे. सामाजिक उत्सव, सण समारंभ इत्यादींमध्ये ही सहभागी होता येत नसे. थोडक्यात त्यांना आयुष्यभर जवळ-जवळ वाळीत टाकलेले जीवन जगावे लागत असे.

**ड) केशवपन :**

पेशवाई काळात स्त्रियांची अवस्था अत्यंत हलाखीची बनली होती. विधवा स्त्रियांना अत्यंत अपमानास्पद जीवन कंठावे लागे. त्यांना उत्तम वस्त्र, अलंकार व सग्रास भोजन वर्ज्य होते. ब्राह्मण समाजात विधवा स्त्रीचे केशवपन व मुंडन करण्याची प्रथा होती. केशवपन केल्याने ती विद्रूप दिसावी व तिच्याकडे कोणाचेही लक्ष जाऊ नये हा त्यामागील हेतू असावा. वास्तविक या प्रथेला कोणताही शास्त्राधार नव्हता. पण तरीही ब्राह्मण व उच्चकुलीन वर्गांमधील सर्व कुटुंबातील विधवा स्त्रीयांचे केशवपन केले जात असे.

**इ) बहुपत्नीकत्व :**

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी बहुपत्नीकत्वाची चाल मोठ्या प्रमाणात अस्तित्वात होती. राजे, सरदार, जहागीरदार, वतनदार व त्यांचे नातेवाईक इत्यादींमध्ये ही प्रथा मोठ्या प्रमाणात चालू होती. हे लोक कमीत कमी दोन किंवा दोन पेक्षा जास्त स्त्रीयांशी विवाह करीत. विवाहित पत्नी असतानाही काही वेळा ते अंगवस्त्रही ठेवत असत. सामाजिक जीवनात एकापेक्षा जास्त बायका असणे प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाई.

**ई) पडदा पद्धती :**

पेशवेकाळात उच्चवर्णीयांमध्ये पडदा पद्धती अस्तित्वात होती. घरात परपुरुषांसमोर व घराबाहेर पडताना सर्वांसमोर स्त्रियांना आपले तोंड व अंग पदराने झाकून घ्यावे लागे. यालाच पडदा किंवा घोषा पद्धत म्हणत. भारतात मुस्लिम आक्रमणे सुरू झाल्यानंतरच्या काळात त्या राज्यकर्त्यांच्या अनुकरणातून ही पद्धत राजघराणी, सरदार घराणी व उच्च कुलीन श्रीमंत कुटुंबे यांमध्ये सुरू झाली. या पडदा पद्धतीमुळे स्त्रियांना घरातही मोकळेपणाने वावरता येत नसे. त्यांना अंधाऱ्या जागेत व चार भिंतीत कोंडून राहावे लागे. त्यांना मोकळी हवा व सूर्यप्रकाश यांचा लाभ होत नसे. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होत असत.

**उ) वेश्या व्यवसाय :**

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी समाजात मुरळी, देवदासी, गणिका इत्यादींची संख्या मोठी होती. काही बहुजन जातींमध्ये जन्माला आलेले पहिले मूल देवास वाहण्याची प्रथा होती. देवाला वाहिलेल्या मुलींना मुरळी, देवदासी त्यांना विवाह करता येत नसे. देवाची सेवा करणे हे त्यांचे कर्तव्य असले तरी त्या अनेकांच्या वासनेची शिकार होत असत. यातील बऱ्याच स्त्रिया नाईलाजाने वेश्याव्यवसायाकडे वळत.

गणीकांना नाच-गाणे करून पुरुषांचे मनोरंजन करावे लागे. त्यांच्यातील तारुण्य व आकर्षण ओसरल्यावर नाईलाजाने वेश्या व्यवसायाकडे वळण्याची पाळी येत असे.

थोडक्यात एकोणीसाव्या शतकात, महाराष्ट्रातील समाज आधुनिक विचार व बुद्धिप्रामाण्यवादापासून शेकडो योजने, दूर होता. अस्पृश्यता, बालविवाह, बाल-जरठ विवाह, बहुपत्नीकत्व, कर्मकांड अशा अनेक अयोग्य परंपरा समाजात प्रचलित होत्या. मूलभूत स्वातंत्र्य, सामाजिक समता, बंधुभाव, पुरोगामी विचार या बाबी स्विकारण्यास या समाजाची तयारी नव्हती. परिवर्तनाची चाहूल घेण्याचे भान नसल्याने समाजाने नव्या सुधारणांकडे पाठ फिरवली होती. त्यामुळे समाजातील निष्क्रियता वाढीस लागून समाजाची सर्व बाजूंनी अधोगतीकडे वाटचाल चालू होती. परिणामी इंग्रजी सत्तेने या समाजाभोवती आपले पाश टाकून त्यास गुलाम बनवले, आणि आपला अंमल सुरू केला.

**● स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-१**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) वैदिक काळात वर्णव्यवस्थेचे कालांतराने कोणत्या व्यवस्थेत रूपांतर झाले?

२) समाजामध्ये कोणत्या वर्गाचे जीवन अतिशय कष्टमय होते?

३) गुलामगिरीची प्रथा कोणी बंद केली?

४) पेशवाई काळात कोणत्या स्त्रीयांचे केशवपन केले जाई?

५) हिंदू समाजात सती प्रथा केव्हापासून प्रचलित होती?

**ब) खालील उपप्रश्नामध्ये विधाने व पर्याय दिले आहेत योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.**

१. एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रात ............ जातीला विषेशाधिकार होते.

अ) क्षत्रिय ब) ब्राह्मण क) शूद्र ड) वैश्य

२. अतिशूद्र जातीतील लोकांना ........... म्हणून वापरले जाई.

अ) वेठबिगार ब) कामगार क) मजूर ड) दास

३. वैदीक काळातील वर्णव्यवस्था कालांतराने .......... बनली.

अ) लवचिक ब) परिवर्तनीय क) अपरिवर्तनीय ड) ताठर

४. एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रातील समाजव्यवस्था ........... होती.

अ) पुरुष प्रधान ब) स्त्री प्रधान क) पुरोहित प्रधान क) यापैकी नाही.

५. एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रात मुलींचा विवाह ........... वयात केला जाई.

अ) सात ते आठ वर्षे ब) आठ ते नऊ वर्षे

क) नऊ ते दहा वर्षे ड) दहा ते आकरा वर्षे

### १.२.२ परमहंस मंडळी :

भारतातील इंग्रजी राजवटीचे येथील समाजजीवनावर दुरगामी परिणाम घडून आले. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात प्रबोधनाला सुरूवात झाली. इंग्रजी शिक्षणाच्या माध्यमातून आधुनिक पाश्चात्य विचार येथील नवशिक्षित तरुणांपर्यंत पोहोचले. आपल्या समाजात व धर्मात निर्माण झालेल्या अनिष्ठ रुढी, परंपरा व प्रथा यामुळे निर्माण झालेल्या विकृती व दोष दूर करण्याची गरज त्यांना भासू लागली. अशा समाजसुधारकांनी सामाजिक व धार्मिक सुधारणेच्या चळवळी हाती घेऊन संघटनात्मक कार्य सुरू केले.

**● परमहंस मंडळी (परमहंस सभा) स्थापना :**

दादोबा पांडुरंग तरखडकर यांनी परमहंस मंडळी किंवा परमहंस सभा नावाची संस्था स्थापन केली. ही संस्था स्थापन करण्याची प्रेरणा त्यांना मानवधर्मसभा या संस्थेमुळे मिळाली. या संस्थेची स्थापना दादोबा पांडुरंग व दुर्गाराम मंछाराम यांनी केली होती. सर्व धर्मातील चांगली तत्त्वे निवडून एक मानवधर्म स्थापन केला तर धर्मा धर्मातील भांडणे बंद होऊन अखिल मानव जातीचे ऐहिक व पारमार्थिक कल्याण होईल हा त्यामागील हेतू होता. हा हेतू उदात्त व मानवतावादी असला तरी तिला निष्ठावान कार्यकर्त्यांचे पाठबळ लाभले नाही. त्यामुळे ही संस्था अल्पजीवी ठरली.

मानवधर्म सभेच्या प्रेरणेतून दादोबा पांडुरंग आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ३१ जुलै १८४९ रोजी मुंबई येथे परमहंसमंडळी नावाची संस्था स्थापन केली. तिलाच परमहंस सभा असेही म्हणतात. दादोबा पांडुरंग

यांच्याशिवाय भाऊ महाजन व आत्माराम पांडुरंग या सुधारकांचाही या संस्थेच्या स्थापनेत हातभार होता. परमहंस मंडळी संस्थेचे पहिले व शेवटचे अध्यक्ष राम बाळकृष्ण हेच होते. हंस ज्याप्रमाणे हंसक्षीरन्यायाने पाणी आणि दूध अलग करतो त्याप्रमाणे ही संस्था कार्य करील अशी दादोबा पांडुरंग यांची कल्पना असावी. म्हणून त्यांनी या संस्थेस परमहंस हे नाव दिले असावे. परमहंस ही संज्ञा अंतर्मुख वृत्ती व विवेकशीलता यांचे द्योतक आहे.

**● परमहंस मंडळीची उद्दिष्टे :**

१) जातिसंस्था नष्ट करणे.

२) मूर्तीपूजेला विरोध करणे.

३) पुनर्विवाहाला उत्तेजन देणे.

४) स्त्री शिक्षणाला प्राधान्य देणे.

५) दलित वर्गामध्ये शिक्षणाचा प्रसार करणे.

**● परमहंस मंडळीची तत्त्वे :**

दादोबा पांडुरंग यांनी या संस्थेच्या सभासदांसाठी 'धर्मविवेचन' आणि 'परमहंसिक ब्रह्मधर्म' या दोन पुस्तिका लिहिल्या होत्या. त्यानुसार संस्थेची तत्त्वे पुढीलप्रमाणे होती.

१) जगात परमेश्वर एकच आहे. त्याचे खरे रुप त्याच्या अनुग्रहाशिवाय कोणालाही पूर्णपणे कळणे शक्य नाही.

२) कोणताही धर्मग्रंथ ईश्वर निर्मित नाही. वेद, कुराण व बायबल हे धर्मग्रंथ मानव निर्मित आहेत.

३) धर्म दोन प्रकारचा असतो.

**अ) पारमार्थिक धर्म :** पारमार्थिक धर्म म्हणजे ईश्वर प्रसन्न करण्याचे साधन होय. त्यामुळे मनुष्याचा खरा पारमार्थिक धर्म म्हणजे दया, क्षमा, शांती इत्यादी मनोधर्म होय. पारमार्थिक धर्म हाच शाश्वत आहे.

**ब) व्याहारिक धर्म :** व्यावहारिक धर्म म्हणजे रीती-भाती, व्यवहार व आचार या गोष्टी होत. व्यावहारिक धर्म कालमानाप्रमाणे बदलत असतो. त्यात प्रसंगानुरूप फेरफार आवश्यक असतात.

४) सभोवार पसरलेली अफाट सृष्टी हा ईश्वराचा मुख्य ग्रंथ आहे. परमहंसवृत्तीच्या साधकाने हा सर्व धर्म ग्रंथ अभ्यासून ज्यांच्या बाबतीत एकवाक्यता होते असे सिद्धांत स्विकारावेत.

५) प्रत्येक मनुष्य विचार करण्याचे स्वातंत्र्य आहे.

६) अंत:करणातील दैवी प्रेरणा, सृष्टीचे नियम व धर्मग्रंथ यांचा मेळ घालत ज्याने त्याने परमार्थ साधला पाहिजे.

**● परमहंस मंडळीची कार्यपद्धती ::**

हिंदू व ख्रिस्ती या दोन्ही धर्मातील दोष टाळून एक नवा सुधारक पंथ स्थापन करण्याचा दादोबा पांडुरंग यांचा इरादा होता. तो त्यांनी परमहंस मंडळीच्या रूपाने मूर्त स्वरूपात आणला. सर्वधर्मीयांना व सर्व जातीतील लोकांना एकत्र आणण्याचा त्यांचा विचार होता. त्यांनी रचलेल्या प्रार्थनांमधून त्यांचे विचार प्रकट होतात. त्या प्रार्थना पुढीलप्रमाणे -

बंधूच्या नात्याने / वागा मानवाशी / उदार मनाशी / ठेवूनिया, जातिभेद सर्व / सोडा अभिमान / द्यावे अलिंगन / एकमेका. अशोक कृष्ण गीता / किंवा ख्रिस्त गीता / महम्मदची वार्ता / असेना कां, तत्त्वज्ञानात त्यांचे / असे एक जरी / न कां ते पदरी / घ्यावे आम्ही ?

परमहंस मंडळीच्या वार्षिक सभा होत असत. त्याला मुंबईच्या कानाकोपऱ्यातून सदस्य उपस्थित राहात. सदस्यांमध्ये सर्व जातींचे लोक असत. सभेची तत्त्वप्रमणाली पुरोगामी विचारांची असल्याने सनातन्यांच्या भीतीमुळे संस्थेच्या सभा अतिशय गुप्त वातावरणातच होत असत. सभासद संख्या पुरेशी वाढल्यावर समाजापुढे जाऊन उघडपणे आपली तत्त्वे मांडावीत व समाजसुधारणेची उघड मागणी करावी असा विचार सभेत मांडला जाई. राम बाळकृष्ण जयकर व डॉक्टर आत्माराम पांडुरंग यांच्या घरी सभा होत. इ.स. १८५३ मध्ये डॉक्टर भांडारकर यांच्या नेतृत्वाखाली सभा झाल्याचा उल्लेख सापडतो. सेभची सुरूवात व शेवट रत्नमालेतील स्तोत्राने होत असे. तर काही वेळा दादोबा पांडुरंग यांनी स्वत: रचलेल्या काव्याने सभेची सुरूवात व शेवट होत असे. सभेचे सदस्यत्व स्विकारणाऱ्यास दीक्षाविधी करावा लागे. प्रथम त्याला प्रार्थना म्हणावयास लावीत. नंतर परमहंस मंडळीचे नियम त्याच्याकडून वाचून घेत. त्याने ते नियम मान्य केल्यावर त्यास ओंजळीत पाणी घेऊन जमिनीवर सोडावयाला सांगत. याला 'जल संस्कार' असे म्हटले जाई. सभेमध्ये धार्मिक व सामाजिक विषयांवर शोधनिबंध वाचले जात व त्यावर साधक-बाधक चर्चा होत असत. त्यानंतर सर्व सभासद सहभोजन घेत. या सहभोजनाचे अन्न अस्पृश्य आचाऱ्याने बनवलेले असे. सभेचे सभासद डॉक्टर रामकृष्णपंत भांडारकर यांच्या भाषणातील उल्लेखावरून ख्रिस्ती माणसाने बनविलेला पाव खल्ल्याशिवाय आणि मुस्लिम व्यक्तीच्या हातचे पाणी प्यायल्याशिवाय कोणालाही सभेचे सभासद होता येत नसे. आज या गोष्टी सामान्य वाटत असल्या तरी ज्या काळात ही संस्था स्थापन झाली होती तो काळ विचारात घेता त्या क्रांतिकारक स्वरूपाच्या होत्या असे म्हणावे लागेल.

**● संस्थेचा विस्तार :**

राम बाळकृष्ण जयकर हे या संस्थेचे अध्यक्ष असून त्यांच्या जोडीला दादोबा पांडुरंग, आत्माराम पांडुरंग, बाळकृष्णशास्त्री शिंत्रे, मोरोबा विनोबा, दादाभाई नवरोजी, नारायण विश्वनाथ मंडलिक इत्यादी सुधारणावादी विचारांचे तरूण सदस्य होते. हे तरूण सदस्य संस्थेची व्याप्ती वाढविण्यासाठी प्रयत्नरत होते. संस्थेच्या शाखा पुणे, अहमदनगर, सातारा, बेळगांव, रत्नागिरी याठिकाणी स्थापन करण्यात आल्या होत्या. महमदजी ढालपाणी अहमदनगर शाखेचे तर केशव शिवराम भावलकर हे पुण्यातील शाखेचे कामकाज पहात होते. महात्मा फुले यांनी काही काळ पुण्यातील शाखेच्या कामाला चालना दिली, पण पुढे परमहंस मंडळीतूनच प्रार्थना समाज

अस्तित्वात आला. त्याचे तत्त्वज्ञान न पटल्याने महात्मा फुले बाहेर पडले व त्यांनी सत्यशोधक समाज स्थापन केला. संस्थेच्या सदस्यांनी गुप्तपणे मुंबई इलाख्या बाहेरही संस्थेचा प्रचार केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे कलकत्ता, मद्रास व काशी येथे संस्थेच्या शाखा सुरू झाल्या.

● **सभेचे कार्य :**

सभेचे अध्यक्ष राम बाळकृष्ण जयकर हे कर्ते सुधारक होते. त्यांनी स्त्री शिक्षणाला प्राधान्य देण्याच्या हेतूने आपल्या मुलींना मिशन शाळेत दाखल केले. त्याकाळी सामाजिक जीवनात स्त्रियांच्या वावरास लोकांची फारशी पसंती नव्हती. त्यांच्या या बुरसटलेल्या कल्पनांना धक्का देण्यासाठी जयकर मुंबईत सपत्नीक सर्कस पाहण्यास जात असत. जातीभेद न मानणे, मूर्तिपूजेला विरोध करणे, विधवा विवाहाला चालना देणे व दलितांसाठी कार्यक्रम राबविणे इत्यादी गोष्टींवर संस्थेच्या सदस्यांनी भर दिला.

सन इ.स. १८६० पर्यंत संस्थेने गुप्त स्वरूपात कार्य केले. मुंबईतील राम-कृष्ण अनंत जोशी या उपद्व्यापी शिक्षकाने सभेवर टीका करणारी एक कविता 'परमहंस मत प्रशंसा' या नावाने प्रसिद्ध केली. त्यामध्ये सभेची निंदानालस्ती केलेली होती. भाऊ महाजन यांनी 'प्रभाकर' या वृत्तपत्रातून सभेची बाजू मांडण्याचा प्रयत्न केला. पण सभेचे सदस्य गप्प राहिले. त्यामुळे सभेच्या कार्यद्धतीबद्दल लोकांच्या मनात संशय निर्माण झाला. याच काळात सभेच्या सदस्यांच्या पैकी कोणीतरी सभासदांची यादी पळविली. त्या यादीतील नावे प्रसिद्ध होणार या भीतीने या सभेच्या सदस्यांचा उत्साह थंडावला. या घटनेनंतर संस्थेचे अस्तित्व संपुष्टात आले.

● **परमहंस मंडळीच्या अपयशाची कारणे :**

**१) बोजड तत्त्वज्ञान :**

परमार्थाला प्राधान्य, सर्वसमभाव, कोणताच धर्मग्रंथ ईश्वर निर्मित नाही हे संस्थेचे तत्त्वज्ञान त्या काळातील लोकांना समजावण्यासारखे व मानवण्यासारखे नव्हते. संस्थेच्या सदस्यांनी शास्त्र धर्मातील रूढींवर आघात करणे व वेदांचे अपौरुषेय अमान्य करणे यामुळे सनातनी प्रवृत्तींच्या लोकांमध्ये संस्थेबद्दल नाराजी निर्माण झाली.

**२) कार्यातील गुप्तता :**

जाती संस्थेने दुगंभलेल्या समाजाला एकत्र आणण्याचा सभेचा प्रयत्न उघडपणे होणे आवश्यक होते. पण सभेचे बरेच कार्य गुप्त स्वरूपात चाले. त्यामुळे सर्व सदस्य सतत दडपणाखाली असत. त्यांच्या ठिकाणी संशयी वृत्ती व आपल्याच कार्याबद्दल आत्मविश्वासाचा अभाव इत्यादी दुर्गण निर्माण झाले होते.

**३) ख्रिस्ती वळणाचा दीक्षाविधी :**

सभेचा दीक्षाविधी ख्रिस्ती वळणाचा होता. तो समाजात सभेविषयी संशय निर्माण करण्यास कारणीभूत झाला. हा दीक्षाविधी म्हणजे ख्रिस्ती होण्याची पूर्व तयारी आहे असा ग्रह जनमानसात निर्माण झाला. संस्थेचे सदस्य बाबा पद्मनजी व नारायण रघुनाथ हे दोघे पुढे ख्रिश्चन झाले. त्यामुळे ग्रह अधिकच बळावला.

**४) मर्यादित कार्यक्षेत्र :**

सभेच्या सदस्यांनी आपल्या विचारांचा प्रसार शहरी भागात व पांढरपेशा वर्गांमध्येच केला. ज्या समाजाची सुधारणा त्यांना करावयाची होती त्या बहुजन समाजाला त्यांनी खऱ्या अर्थाने विश्वासात घेतलेच नाही. त्यामुळे या सभेला सामान्य लोकांचा पाठींबा मिळाला नाही.

परमहंस मंडळी संस्थेच्या सदस्यांना सामाजिक व धार्मिक सुधारणा विषयी अंत:करणापासून तळमळ होती. त्यासाठी प्रत्यक्ष कृती करण्याचीही त्यांची तयारी होती. परंतु त्यातून ओढवणाऱ्या सनातन्यांच्या रोषाला तोंड देण्याइतके धैर्य त्यांच्याकडे नव्हते. बाबा पद्मनजी आपल्या 'अरुणोदय' या आत्मचरित्रात दादोबा पांडुरंग यांच्या वागणुकीचे असे वर्णन करतात, ''दादोबा व भाऊ महाजन हे जरी सभेच्या मताचे व सभेचे पुरस्कर्ते असले तरी ते सभेस कधी येत नसत. आलेच, तर दुसऱ्या खोलीत बसत व सभा विसर्जन झाल्यावर अध्यक्षाची व काही निवडक मंडळींची भेट घेऊन निघून जात.'' अशा प्रकारची दादोबांची सामाजिक मनोवृत्ती परमहंस मंडळीच्या रोषास कारणीभूत झाली.

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–२**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) दादोबा पांडुरंग यांना कोणत्या सभेमुळे परमहंस मंडळी स्थापन करण्याची प्रेरणा मिळाली?

२) परमहंस मंडळीची स्थापना केव्हा झाली?

३) धर्मविवेचन आणि परमहंसिक ब्रह्मधर्म या पुस्तिका कोणी लिहिल्या?

४) परमहंस मंडळींमध्ये कोणत्या जातीच्या लोकांना प्रवेश दिला जाई?

५) परमहंस मंडळीच्या शाखा महाराष्ट्रात कोठे स्थापन झाल्या.

**ब) खालील उपप्रश्नामध्ये विधाने व पर्याय दिले आहेत योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.**

१. परमहंस मंडळीलाच ............ असेही म्हणतात.

अ) मानवधर्मसभा ब) प्रार्थना समाज क) परमहंस सभा ड) आर्य समाज

२. परमहंस मंडळीची स्थापना ........... येथे झाली.

अ) मुंबई ब) पुणे क) अहमदनगर ड) नाशिक

३. परमहंस मंडळीचे अध्यक्ष .......... होते.

अ) दादोबा पांडुरंग ब) आत्माराम पांडुरंग

क) रामबाळकृष्ण जयकर ड) न्यायमूर्ती रानडे

४. परमहंस मंडळीचे कामकाज ........... स्वरूपात चाले.

अ) खाजगी पद्धतीने ब) उघडपणे क) गुप्त स्वरूपात ड) यापैकी नाही.

५. इ.स. ........... नंतर परमहंस मंडळीचे अस्तित्व संपुष्टात आले.

अ) १८५५ ब) १८६० क) १८६५ ड) १८७०

### १.२.३ प्रार्थना समाज

**● पार्श्वभूमी :**

हिंदू धर्मात सुधारणा घडवून आणण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रात प्रार्थना समाजाचा उदय झाला. बंगालमध्ये स्थापन झालेल्या ब्राह्मो समाजाचे प्रमुख नेते केशवचंद्र सेन. यांच्यापासून प्रेरणा घेऊन पूर्वीच्या परमहंस सभेतील मंडळींनी डॉक्टर आत्माराम पांडुरंग यांच्या नेतृत्वाखाली प्रार्थना समाज संस्था स्थापन केला. दादोबा पांडुरंग यांची परमहंस मंडळ ही संस्था लोकक्षोभामुळे इ.स. १८६० मध्ये बंद पडली होती. तरीही तिच्या तत्त्वाविषयी आत्मीयता बाळगणारा व त्या तत्त्वांचे आकर्षण असणारा विचारवंतांचा एक वर्ग समाजात अजूनही होता. त्यांना हिंदू धर्मातील अनिष्ठ प्रथा दूर करणे व त्यासाठी धर्मसुधारणेच्या कार्याला गती देणे या गोष्टींची आवश्यकता वाटत होती. याच सुमारास म्हणजे इ.स. १८६४ मध्ये ब्राह्मो समाजाचे नेते केशवचंद्र सेन मुंबईत आले. त्यांनी धर्म व समाजसुधारणेच्या संदर्भात व्याख्याने दिली. त्यामुळे येथील समाजसुधारकांना नव्याने प्रेरणा मिळाल्या.

**● प्रार्थना समाजाची स्थापना :**

केशवचंद्रसेन यांच्या व्याख्यानांने पूर्वाश्रमीच्या परमहंस मंडळींना नव्याने उत्साह येऊन ३१ मार्च १८५७ रोजी मुंबई येथे दादोबा पांडुरंग व भास्कर पांडुरंग या बंधूंनी प्रार्थना समाजाची स्थापना केली. सुरूवातीस या संस्थेला 'एकेश्वर उपासक मंडळ' असे नाव होते. डॉक्टर आत्माराम पांडुरंग हे प्रार्थना समाजाचे पहिले अध्यक्ष होते. इ.स. १८६८ मध्ये केशवचंद्र सेन यांनी मुंबईला दुसरी भेट दिली व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. त्यामुळे प्रार्थना समाजाच्या कार्याला बळकटी आली. वामन आबाजी मोडक, न्यायमूर्ती चंदावकर, न्यायमूर्ती रानडे व डॉ. भांडारकर इत्यादी विचारवंतांनी या समाजाचे सदस्यत्व स्वीकारले. मुंबई, पुणे, अहमदनगर, सातारा, कोल्हापूर इत्यादी ठिकाणी प्रार्थना समाजाच्या शाखा सुरू झाल्या.

**● प्रार्थना समाजाची उद्दिष्ट्ये :**

न्यायमूर्ती रानडे प्रार्थना समाजाला जुन्या (भागवत धर्म) धर्माची शाखा मानत असत. त्यांनी प्रार्थना समाजाचे 'Love of God, in the servise of man' असे घोषवाक्य निश्चित केले होते. त्यांनी प्रार्थना समाजाची उद्दिष्टे पुढील प्रमाणे सांगितली आहेत.

१) समाजाची नैतिक प्रगती घडवून आणणे.

२) प्रचलित पूजापद्धती बदलून अध्यात्मावर आधारित नवी पूजा पद्धती निर्माण करणे.

● **प्रार्थना समाजाची तत्त्वे :**

न्यायमूर्ती रानडे व भांडारकर यांनी प्रार्थना समाजाचे तत्त्वज्ञान निर्माण केले. गीता, उपनिषदे, बौद्ध धर्म व बायबलमधील चांगल्या तत्त्वांचा आधार घेतला. इ.स. १८७३ मध्ये न्यायमूर्ती रानडे व भांडारकर यांनी प्रार्थना समाजाची तत्त्वे पुढीलप्रमाणे प्रसिद्ध केली.

१) ईश्वर एकच असून तो निराकार आहे. तोच या विश्वाचा निर्माता आहे.

२) सत्य, सदाचार व भक्ती हे ईश्वराच्या उपासनेचे खरे मार्ग आाहेत. या मार्गांचा अवलंब केल्यानेच परमेश्वर प्रसन्न होतो.

३) परमेश्वराच्या प्रार्थनेमुळे भौतीक फलप्राप्ती होत नाही, तर आध्यात्मिक उन्नती होते.

४) परमेश्वर अवतार घेत नाही. तसेच परमेश्वराने कोणतेही धर्मग्रंथ लिहिले नाहीत.

५) परमेश्वराला मूर्तीपूजा अमान्य आहे.

६) सर्व मानव एकाच परमेश्वराची लेकरे आहेत, म्हणून सर्वांनी परस्परांशी बंधुत्वाच्या भावनेने वागावे.

७) परमेश्वर प्रत्येक प्राणिमात्राच्या ठिकाणी निवास करतो.

८) परमेश्वराला भक्ती भावाने शरण गेले म्हणजे परमेश्वर प्राप्ती होते.

प्रार्थना समाजाचे स्वरूप आध्यात्मिक चळवळीचे होते. हा समाज ब्रह्मवादी होता पण मायावादी नव्हता. प्रार्थना समाजाने उपासनेसाठी अनेक प्रार्थना मंदिरे बांधली. समाजाच्या प्रार्थना मंदिरांमध्ये होणाऱ्या उपासनेत साधारणपणे पुढील सहा भाग असत.

१) उद्‌बोधक २) स्तवन ३) ध्यान व प्रार्थना ४) उपदेश ५) प्रार्थना व ६) आरती.

प्रार्थना समाजातील प्रतिवर्षी एकदा वार्षिकोत्सव साजरा केला जाई. प्रार्थना समाजाने प्रार्थना संगीत, प्रार्थना समाजाचा इतिहास इ. मराठी तसेच Spiritual Power House यासारखे इंग्रजी ग्रंथ प्रसिद्ध केले. न्यायमूर्ती रानडे यांनी प्रार्थना समाजाच्या विचारसरणीच्या समर्थनासाठी 'एकेश्वरवाद्यांची कैफियत' नावाचा निबंध प्रसिद्ध केला. 'सुबोधपत्रिका' हे प्रार्थना समाजाचे मुखपत्र होते. या पत्राद्वारे समाजाने आपले तत्त्वज्ञान व कार्य यांचा प्रसार केला. प्रार्थना समाजावर ब्राह्मो समाजाचा फार मोठा प्रभाव होता. भागवत धर्माचा कळस म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो ते संत तुकाराम यांस मुख्यत्वे प्रार्थना समाजाचे मार्गदर्शक मानले जाई. प्रार्थना समाजाचे विचार हिंदू समाजाच्या सर्व थरात पसरावेत अशी न्यायमूर्ती रानडे यांची इच्छा होती. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम इत्यादी संतांनी त्यांच्या काळी समाजात भक्तिभाव निर्माण केला. तोच भक्तिभाव समाजात पुन्हा जागृत व्हावा असे त्यांना वाटे. त्या संतांचे अभंग, ओव्या यांचा समावेश समाजाच्या प्रार्थनेत करण्यात आला. प्रार्थना समाजाचा आत्मा होय असे त्यांनी मानले.

● **प्रार्थना समाजाचे कार्य :**

**१) धार्मिक कार्य :**

प्रार्थना समाजाने धार्मिक क्षेत्रात अनेक सुधारणा घडवून आणल्या. समाजाने उपासनेसाठी अनेक प्रार्थना मंदिरे बांधली. हिंदू धर्मातील अनेक अनिष्ट गोष्टींना विरोध केला. मूर्तीपूजा, अवतार कल्पना, कर्मकांड, बहूदेवतावाद इत्यादी गोष्टी त्याज्य ठरविल्या. शुद्ध मनाने केलेली प्रार्थना किंवा उपासना हीच खरी ईश्वर भक्ती आहे असे प्रचार या समाजाने केला. महाराष्ट्रात धार्मिक जागृती घडवून आणण्याचे काम या समाजाने केले.

**२) शैक्षणिक कार्य :**

प्रार्थना समाजाने शिक्षण प्रसाराचे कार्य केले. कामगार व मजूर वर्गासाठी मुंबईत रात्रशाळा सुरू केल्या. राममोहन हायस्कूल, प्रार्थना समाज हायस्कूल विलेपार्ले, सर चंदावरकर मराठी शाळा इ. दर्जेदार शैक्षणिक संस्था सुरू केल्या. मोफत वाचनालये काढली. 'सुबोधपत्रिका' हे नियतकालिक सुरू करून प्रार्थना समाजाचे तत्त्वज्ञान व कार्य यांचा प्रसार केला. न्यायमूर्ती चंदावरकर, भांडारकर, वामन आबाजी मोडक, न्यायमूर्ती रानडे यांची धर्मपर व्याख्याने व लेख प्रकाशित केले. या समाजाने स्त्री शिक्षणाचाही जोरदार पुरस्कार केला. न्यायमूर्ती रानडे यांनी इ.स. १८८२ मध्ये पुण्यात मुलींची शाळा सुरू केली.

● **सामाजिक कार्य :**

प्रार्थना समाजाने सामाजिक क्षेत्रात लक्षणीय सुधारणा घडवून आणल्या. ना.म. जोशी यांनी मजुरांची स्थिती सुधारण्याचे प्रयत्न करणारी 'सोशल सर्व्हीस लिग' ही संस्था स्थापन केली. नामदार गोखले यांनी देशसेवेसाठी निर्भय कार्यकर्ते निर्माण होण्यासाठी Servants of India Society (भारत सेवक समाज) स्थापना केली. महर्षी वि. रा. शिंदे अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन' संस्था स्थापन केली. पुढील काळात या संघटनेने अस्पृश्यता निवारण्याच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. या वेगवेगळ्या संस्थांमधून समाजासाठी व देशसेवेसाठी कार्य करणारे चांगले कार्यकर्ते निर्माण झाले. प्रार्थना समाजाने पंढरपूर व विलेपार्ले येथे अनाथ बालकाश्रम सुरू केले. बालविवाह प्रथेला विरोध केला. न्यायमूर्ती रानडे यांनी विधवा विवाहास चालना मिळावी म्हणून 'विधवा विवाह उत्तेजक मंडळ' स्थापन केले. इ.स. १८७६-७७ मध्ये पडलेल्या दुष्काळात समाजाने लोकोपयोगी विविध कार्ये हातात घेतली.

**४) स्त्रियांसाठी कार्य :**

प्रार्थना समाजाने स्त्री शिक्षणाचा जोरदार पुरस्कार केला. स्त्रियांसाठी शाळा सुरू केल्या. प्रार्थना समाजांतर्गत 'संगत सभे'त विविध विषयांवर चर्चा होत. त्यात स्त्रीविषयक प्रश्नही असत. संगत सभेप्रमाणे स्त्रियांचीही स्वतंत्र सभा भरत असे. तिचेच पुढे इ.स. १८८२ मध्ये 'आर्य महिला समाजा'त रूपांतर झाले. स्त्रियांची सर्वांगीण उन्नती घडवून आणणे हा या संघटनेचा उद्देश होता. स्त्रियांच्या विवाहाच्या वयाचा प्रश्न यावेळी बहुचर्चित होता. प्रार्थना समाजाचे सदस्य नारायण महादेव परमानंद व डॉक्टर आत्माराम पांडुरंग यांनी स्त्री विवाहाचे वय वीस वर्षे असावे असे मत मांडले. प्रार्थना समाजाचे सदस्य भिकोबा चव्हाण यांनी वासुदेव

बाबाजी नवरंगे यांच्याशी काशीबाई या विधवेचा विवाह घडवून आणला व विधवा विवाहाचा पुरस्कार केला. स्त्रियांसाठी अन्यायकारक ठरणाऱ्या बालविवाह, पडदा पद्धती इत्यादी प्रथांना समाजाने विरोध केला.

प्रार्थना समाज हा सुधारणावादी पंथ असून त्याचे नेते आपल्या विचारांशी प्रामाणिक होते. तरीही त्यांच्या हातून अपेक्षित कार्य होऊ शकले नाही. या समाजास अपयश आले.

१) समाजाचे कार्य मुंबई, पुणे, कोल्हापूर, सातारा, अहमदनगर अशा मोजक्या शहरांखेरीज इतरत्र पसरू शकले नाही. तसेच शहरी भागातही सर्वसामान्य लोकांपर्यंत या समाजाचे विचार पोहोचू शकले नाहीत. तिचा प्रभाव सुशिक्षित वर्गापुरताच मर्यादित राहिला.

२) प्रार्थना समाजावर ख्रिस्ती धर्म तत्त्वांचा प्रभाव होता. एकेश्वरवादाचा पुरस्कार व मूर्तिपूजेला विरोध हे समाजाचे तत्त्वज्ञान हिंदू समाजातील बहुसंख्य लोकांना मानवणारे नव्हते.

३) या समाजाचे नेते बुद्धिजीवी व विचारवंत होते. पण त्यांना सामान्य लोकांचे संवाद साधणे व त्यांच्या जीवनाशी एकरूप होणे जमले नाही. ते समाजातील सर्वसामान्य लोकांवर आपल्या विचारांचा प्रभाव पाडू शकले नाहीत.

४) प्रार्थना समाजाच्या काही नेत्यांना आपले विचार व आचार यांच्यात एकवाक्यता साधता आली नाही. त्यामुळे प्रार्थना समाजाचे सदस्य केवळ बोलघेवडे सुधारक आहेत असे लोकांचा समज झाला.

वरील कारणांमुळे प्रार्थना समाजाचा व त्यांच्या विचारांचा प्रसार महाराष्ट्रात सर्वत्र होऊ शकला नाही व काळाच्या ओघात हा समाज लोप पावला.

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–३**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) इ.स. १८६४ मध्ये मुंबई येथे धर्म व समाज सुधारणेच्या संदर्भात कोणी व्याख्याने दिली?

२) प्रार्थना समाजाचे सुरूवातीचे नाव काय होते?

३) न्यायमुर्ती रानडे प्रार्थना समाजाला कोणत्या धर्माची शाखा मानत असत?

४) नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनी कोणती संस्था स्थापन केली?

५) प्रार्थना समाजावर कोणत्या समाजाचा प्रभाव होता.

**ब) खालील उपप्रश्नामध्ये विधाने व पर्याय दिले आहेत योग्य पर्याय निवडून वार्कीय पूर्ण करा.**

१. प्रार्थना समाजाची स्थापना ........... रोजी झाली.

अ) ३१ जुलै १८६७ ब) ३१ ऑक्टोबर १८६७

क) ३१ जानेवारी १८६७ ड) ३१ मार्च १८६७

२. .......... हे प्रार्थना समाजाचे पहिले अध्यक्ष होते.

अ) डॉक्टर आत्माराम पांडुरंग ब) दादोबा पांडुरंग

क) न्यायमुर्ती रानडे ड) न्यायमूर्ती चंदावरकर

३. ........... हे प्रार्थना समाजाचे मुखपत्र होते.

अ) काळ ब) प्रभाकर क) दर्पण ड) सुबोध पत्रिका

४. अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन' ही संस्था ............. यांनी स्थापन केली.

अ) महर्षी वि. रा. शिंदे ब) महात्मा फुले

क) नामदेव गोपाळ कृष्ण गोखले ड) न्यायमूर्ती भांडारकर

५) प्रार्थना समाजाने ........... येथे अनाथ बालकाश्रम सुरू केला.

अ) कोल्हापूर क) सोलापूर क) पंढरपूर ड) नागपूर

## १.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

परिवर्तन : बदल

अंमल : अधिकार, सत्ता

प्रबोधन : सुधारणा, जागृती

पौर्वात्य :पूर्वेकडील

वेठबिगारी : अत्यल्प वेतन देवून काम करवून घेणे, गुलामासारखे वागवणे.

एतद्देशीय : या देशातील

अस्पृश्य : बहिष्तकृत वर्ग, दलीत समाज

अनुष्ठान : विधीपूर्वक धर्मकृत्ये

गावकुसाबाहेर : गावाबाहेर

विवाहोत्तेजक : विवाहास चालना देणे

अंगवस्त्र : ठेवलेली स्त्री

जारण-मारण तंत्र : जादुटोना, मंत्रविद्या

सहगमन : पतीच्या शवाबरोबर स्वत:स जीवंत अग्नीत जाळून घेणे.

केशवपन : पतीच्या मृत्यूनंतर विधवेचे मूंडण करणे.

गणिक : वेश्या, कलावंतिन

बाला-जरठ विवाह : अल्पवयीन मुलीबरोबर वृद्ध पुरुषाचा विवाह

परमात्मा : दैवी पुरुष

निराकार : आकारहीन

पुरोगामी : सुधारणांसाठी अनुकूल.

उद्‌बोधन : शिकवण, विशेष ज्ञान, समज

एकेश्वरवाद : एक देव कल्पना

अंधश्रद्धा : बुद्धीला न पटणाऱ्या गोष्टींवर विश्वास ठेवणे.

धर्ममार्तंड : सनातनी धर्माचे अभिमानी

जातबहिष्कृत : जातीतुन काढून टाकणे.

**१.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

- **स्वयं अध्ययन प्रश्न १ ची उत्तरे**

**अ) एका वाक्यात उत्तरे.**

१) जाती व्यवस्थेत    २) अस्पृश्य वर्गाचे    ३) इंग्रज सरकारने

४) विधवा स्त्रीयांचे    ५) प्राचीन काळापासून

**ब) योग्य पर्याय लिहा.**

१) - ब    २) - अ    ३) - क

४) - अ    ५) - ब

- **स्वयं अध्ययन प्रश्न २ ची उत्तरे :**

**अ) एका वाक्यात उत्तरे.**

१) मानवधर्मसभा    २) ३१ जुलै १८४९    ३) दादोबा पांडुरंग

४) सर्व जातींच्या    ५) पुणे, अहमदनगर, सातारा, बेळगांव व रत्नागिरी.

**ब) योग्य पर्याय लिहा.**

१) - क    २) - अ    ३) - क

४) - ड    ५) - ब

● **स्वयं अध्ययन प्रश्न ३ ची उत्तरे :**

**अ) एका वाक्यात उत्तरे.**

१) केशवचंद्र सेन २) एकेश्वर उपासक मंडळी ३) जुन्या (भागवत धर्म) धर्माची

४) भारत सेवक समाज ५) ब्राह्मो समाज.

**ब) योग्य पर्याय लिहा.**

१) - ड २) - अ ३) - ड ४) - अ ५) - क

**१.५ सारांश :**

एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीस महाराष्ट्रातील समाज अस्पृश्यता, कर्मकांड, बालविवाह, बहुपत्नीकत्व इत्यादी अनेक अयोग्य रूढी व परंपरांमध्ये अडकून पडला होता. त्यातच समाजाने नव्या सुधारणांकडे पाठ फिरविल्याने त्यांची अधोगतीकडे वाटचाल सुरू झाली होती. अशा परिस्थितीत इंग्रजी सत्तेने या समाजाभोवती आपले पाश टाकून आपला अंमल सुरू केला. याच इंग्रजी सत्तेमुळे एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रात प्रबोधनास सुरूवात झाली. इंग्रजी शिक्षण व आधुनिक पाश्चात्य विचार इत्यादींनी प्रभावित झालेल्या सुशिक्षीत तरुणांनी सामाजिक व धार्मिक सुधारणेच्या चळवळी हाती घेऊन संघटनात्मक कार्य सुरू केले. त्यापैकी परमहंस मंडळी (परमहंस सभा) व प्रार्थना समाज या समाज सुधारणावादी संघटना होय. जातीभेद न मानणे, मूर्तिपूजेला विरोध, विधवा विवाहास चालना देणे इत्यादी सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न परमहंस मंडळींनी केला. प्रार्थना समाज हा एक सुधारणावादी पंथ असून हिंदू धर्मात व समाजात सुधारणा घडून याव्यात म्हणून विधवा विवाहासाठी प्रयत्न, बालविवाहास विरोध तसेच स्त्री शिक्षण व अस्पृश्यता निवारण यासाठी यासंघटनेने प्रयत्न केले. या काळातील समाजसुधारकांनी प्रगत आचार-विचार व भौतिक विज्ञान यांचे ज्ञान आत्मसात करून नवे प्रागतिक विचार समाजात रुजविण्यास सुरूवात केली. परिणामी महाराष्ट्राच्या इतिहासात एक नवे युग सुरू झाले.

**१.६ सरावासाठी स्वाध्याय.**

**अ) दिर्घोत्तरी प्रश्न.**

१. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीची महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थिती विशद करा.

२. परमहंस मंडळीची (परमहंस सभा) तत्त्वप्रणाली व कामगिरी स्पष्ट करा.

३. प्रार्थना समाजाचे तत्त्वज्ञान स्पष्ट करून प्रार्थना समाजाचे सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील कार्य स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा :**

१. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीचे सामाजिक जीवन

२. परमहंस मंडळी (परमहंस सभा)

३. प्रार्थना समाज

## १.७ संदर्भ ग्रंथ सूची :


१. गर्गे स. मा. - भारतीय समाजविज्ञान कोश, (खंड ३)

२. सरदार गं. भा. - महाराष्ट्र जीवन (खंड १ व २) जोशी व लोखंडे, पुणे (१९६०)

३. जोशी (पंडित) महादेवशास्त्री - भारतीय संस्कृती कोश, (खंड ५), भारतीय संस्कृती कोश मंडळ, मुंबई.

४. आचार्य जावडेकर श. द. - आधुनिक भारत, कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे (१९३८)

५. प्रा. जाधव वसंत - आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर (२००५)

६. प्रा. मोरे दिनेश - आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, के. एस. पब्लिकेशन, पुणे (२००६)

७. Mahajan V. D. - British Rule in India & After S. Chand & Company, New Delhi, (1971)

८. Kenneth W. Jones - Socio-Religious Reform Movements in British India, The New Cambridge History of India, III.I (1994)

९. Grover B. L., S. Grover - A New Look at Modern Indian History, S. Chand and Company Ltd., New Delhi (2004)

१०. Majumdar R. C., Ray Chaudhary & Datta, - An Advanced History of India, K. Macmilan ST, Martin's Press, New York, (1965).

११. Dr. Rakumar - Essays on Social Reforms Movement, Discovery Publishing House, New Delhi, (2004).


❖❖❖

# घटक – २

# स्त्री सुधारक

**अनुक्रमणिका :**


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ सावित्रीबाई फुले : पूर्वायुष्य, शिक्षण, शिक्षणकार्य, स्त्रियांच्या पुढारी, सामाजिक कार्य, मुल्यमापन.

२.२.२ ताराबाई शिंदे : पूर्वायुष्य, शिक्षण, स्त्री-पुरुष तुलना-ग्रंथ, महाराष्ट्राच्या इतिहासात स्त्री-सुधारक म्हणून त्यांचे स्थान.

२.२.३ पंडीता रमाबाई : पूर्वचरित्र, महाराष्ट्रातील समाजकार्य, ख्रिस्ती धर्माचा स्विकार, अमेरिकेतील ज्ञानाचा प्रभाव, शारदा सदनची स्थापना व रमाबाईंचे स्त्री उद्धाराचे कार्य, दुष्काळग्रस्तांसाठीचे कार्य, इतर सार्वजनिक कार्य, रमाबाईंची वाङ्मयनिर्मिती, कार्याचा परिणाम, मुल्यमापन.

२.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ संदर्भ ग्रंथ


**२.० उद्दिष्टे :**

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास खालील उद्दिष्ट्ये पूर्ण करता येतील.

- एकोणीसाव्या व विसाव्या शतकातील सामाजिक परिस्थितीचे आकलन होण्यास मदत होईल.
- एकोणीसाव्या व विसाव्याशतकातील भारतीय समाजात आणि विशेषत: महाराष्ट्रात स्त्रीयांचे स्थान काय होते हे सांगता येईल.
- महाराष्ट्रातील स्त्री समाज सुधारकामध्ये सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे व पंडिता रमाबाई यांचे स्थान स्पष्ट करता येईल.

- सावित्रीबाई फुलेंचे पूर्वायुष्य, शिक्षण, शैक्षणिक, सामाजिक व स्त्री उद्धाराचे कार्य अभ्यासता येईल.
- महाराष्ट्रातील स्त्री समाज सुधारकांमध्ये ताराबाई शिंदेचे महत्त्व, त्यांचे पूर्वायुष्य, शिक्षण, त्यांचे सामाजिक कार्य, लिखाण व स्त्री उद्धाराचे कार्य यांची सविस्तर चर्चा करता येईल.
- पंडिता रमाबाई यांचे पूर्वायुष्य, शिक्षण, समाजकार्य, त्यांचे शैक्षणिक कार्य, लिखाण, स्त्री उद्धाराचे कार्य यावर प्रकाश टाकता येईल.

## १.१ प्रास्ताविक :

मागील प्रकरणामध्ये आपण महाराष्ट्रातील समाजसुधारणेच्या चळवळीचा इतिहास आणि सुरूवात अभ्यासली. एकोणिसाव्या शतकातील समाजाचे स्वरूप अभ्यासले. आता या प्रकरणामध्ये आपण महाराष्ट्रातील स्त्री-सुधारक आणि त्यांचे समाजसुधारणेमध्ये असलेले महत्त्व याचा अभ्यास करणारआहोत. तत्पूर्वी एकोणिसाव्या शतकातील समाजामध्ये स्त्रियांचे काय स्थान काम होते हे जाणून घेणे आवश्यक आहे. कारण आज आपण मोठ्या अभिमानाने इंदिरा गांधी, प्रतिभाताई पाटील, कल्पना चावला, सुनिता विल्यम्स, पी.टी. उषा, मेरी कोम, पी.व्ही. सिंधू, हिमा दास या आणि अशा अनेक स्त्रियांची नावे सहजपणे उच्चारताना दिसतो. पण त्यांचे स्वातंत्र, शिक्षण,त्यांचे यश, त्यांचे कुटुंबातील स्थान हे त्यांना काही सहजासहजी मिळालेले नसून त्याच्यासाठी भारताच्या विविध भागातील पुरुष आणि स्त्री-समाज सुधारकांनी आपले आयुष्य पणाला लावले होते.

एकोणिसाव्या शतकाच्या आरंभी भारतीय समाजात जातीसंस्था, अस्पृश्यता या अनिष्ठ प्रथांचे प्राबल्य होते. तेवढेच किंबहुना त्याहीपेक्षा जास्त जाचक सामाजिक व कौटुंबिक बंधनाचे पालन हिंदू स्त्रियांना करावे लागत होते. बालविवाह, जरठ-कुमारी विवाह, पडदा पद्धती, केशवपन इ. प्रथांमुळे त्यांच्या स्वातंत्र्यावर बाधा आणण्यात आली होती. याशिवाय विधवा पुनर्विवाह, स्त्रीशिक्षण आणि विधवांच्या शिक्षणास विरोध इ. मुळे स्त्रीयांचे शोषण केले जात होते.

महाराष्ट्रात या अनिष्ट व अन्यायकारी परंपरांवर नाना शंकर शेठ, बाळशास्त्री जांभेकर, विष्णूशास्त्री पंडीत, महात्मा जोतीराव फुले, सावित्रीबाई फुले, रा. गो. भांडारकर, न्या. रानडे व गोपाळ गणेश आगरकर इ. समाजसुधारकांनी पाश्चात ज्ञानाने प्रेरित होवून टीका करण्यास सुरूवात केली. त्यानंतर या व्यवस्थेत काही प्रमाणात बदल होत गेले. त्यातून नवविचार व आचारासाठी जनजागृती केली जावू लागली. त्यापैकी महाराष्ट्रातून ज्या स्त्री-समाजसुधारकांनी स्त्री-उद्धाराचे कार्य केले त्या आहेत सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे आणि पंडिता रमाबाई. या तीन स्त्री सुधारकांचे कार्य आपण या प्रकरणामध्ये अभ्यासणार आहोत. त्यापैकी भारताच्या आद्य शिक्षिका म्हणून लोकप्रिय झालेल्या सावित्रीबाई फुलेंचे कार्य लोकांना बऱ्यापैकी माहिती आहे. त्यांच्या जीवन व कार्यावर लिखाण व संशोधन झालेले दिसते. पण ताराबाई शिंदे आणि पंडिता रमाबाई यांनीही तत्कलीन सनातनी, प्रचलित समाजव्यवस्थे विरुद्ध बंड करून स्त्री उद्धाराचे कार्य केलेले असूनही त्या महाराष्ट्राच्या समाजसुधारणेच्या इतिहासातून उपेक्षित राहिलेल्या आहेत. खऱ्या अर्थाने त्यांचा अभ्यास होणे,

त्यांच्यावर संशोधन व लिखाण होणे आणि ती माहिती सर्वांपर्यंत पोहोचणे अतिशय गरजेचे आहे.आज या अभ्यासक्रमाच्या निमित्ताने सर्व विद्यार्थ्यांपर्यंत या थोर तीनही स्त्री-सुधारकांची माहिती थोड्या प्रमाणात का होईना पण पोहोचेल ही चांगली गोष्ट आहे.

## २.२ विषय विवेचन :

### २.२.१ सावित्रीबाई फुले (३ जानेवारी १८३१ ते १० मार्च १८९७)

प्राचीन काळापासून भारतात वर्ण व्यवस्था, त्यातून निर्माण झालेली जातीव्यवस्था आणि जातीव्यवस्थेचा परिणाम म्हणजे अस्पृश्यता इ.च्या अस्तित्वामुळे भारतीय समाजात शुद्र व स्त्रियांना दुय्यम लेखले जात होते. अगदी एकोणिसाव्या शतकापर्यंत स्त्रियांना अत्यंत हालाकीचे व कष्टप्रद जीवन जगावे लागत होते. पण जोतिरावांच्या प्रेरणेमुळे आणि भक्कम पाठिंब्यामुळे सावित्रीबाई शिक्षण घेवून समाजकार्यात आल्या. त्यांनी वर्षानुवर्षे अंध:कारात जीवन जगणाऱ्या स्त्रियांना शिक्षणासाठी प्रेरणा दिली आणि सर्व स्त्रियांना शिक्षण मिळावे यासाठी आपले जीवन व्यतीत केले. त्यामुळेच या कर्तृत्ववान, कर्मयोगिनीचे कार्य हे महाराष्ट्राच्या आणि एकूणच भारताच्या इतिहासात महत्त्वाचे आहे. त्यामुळे त्यांच्या स्त्री उद्धाराच्या व इतर सामाजिक व सार्वजनिक कार्यावर आपण येथे चर्चा करणार आहोत.

**१) पूर्वचरित्र :**

सावित्रीबाई फुलेंचा जन्म सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील 'नायगाव' या खेड्यात ३ जानेवारी १८३१ रोजी झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई होते. त्यांच्या वडीलांचे नाव खंडोजी नेवसे-पाटील होते. सावित्रीबाईंना तीन भाऊ असून सर्व भावंडांमध्ये त्याच मोठ्या होत्या. त्या काळात मुलींना शिक्षण दिले जात नसे. त्यामुळे सावित्रीबाई वडिलांबरोबर शेतात जात असत. आईलाही घरकामात त्या मदत करीत असत. त्यांच्या एकंदर व्यक्तीमत्त्वात आईच्या संस्कारांबरोबरच वडिलांचे नेतृत्वगुण दिसत होते. लहानपणापासूनच त्यांच्यामध्ये अन्यायाचा प्रतिकार करण्याची प्रवृत्ती दिसून येते. त्यांच्या वडिलांनी त्यांना कधी बंधनात ठेवलेच नव्हते. त्यामुळे त्या मुक्तपणे वाढलेल्या होत्या. पुढे इ.स. १८४० साली नायगाव येथे मोठ्या थाटामाटात सावित्रीबाईंचे जोतिरावांशी लग्न झाले. त्यावेळी सावित्रीबाई ९ वर्षांच्या व जोतीराव १३ वर्षांचे होते.

जोतिरावांचा सहवास व सावित्रीबाईंचे शिक्षण : ११ एप्रिल १८२७ रोजी जोतीरावांचा जन्म झाला. त्यांच्या आईचे नाव चिमणाबाई व वडिलांचे नाव गोविंदराव होते. जोतीराव केवळ ९ महिन्यांचे असतानाच त्यांची आई वारली. तेव्हापासून सगुणाबाई क्षीरसागर म्हणजेच जोतीरावांच्या मावसबहिण यांनीच जोतीबांचे बालसंगोपन केले. त्या विधवा झाल्यानंतर सासरी आणि माहेरी त्यांचे कुणीच नव्हते. त्यामुळे त्या जॉन नावाच्या मिशनऱ्याची मुले सांभाळण्याचे काम करीत असत. त्या शिक्षित नव्हत्या. तरीही जॉन त्यांच्या घरातील इंग्रजीच्या वातावरणामुळे त्यांना इंग्रजी बोलता येत होते. जोतीरावांचे लग्न झाल्यावर गोविंदरावांच्या सांगण्यावरून सगुणाबाई गावात राहू लागल्या. सावित्रीबाई सगुणाबाईस कोणत्याच कामाला हात लावू देत

नसत. सावित्रीबाईंच्या गोड वागण्या-बोलण्याने त्या थोड्याच दिवसात घरातील सर्वांच्या आवडीच्या बनल्या. जोतीरावांच्या सहवासात सावित्रीबाईंमधील कठोरता आणि गर्विष्ठपणा कमी होवू लागला. त्यांच्या मनात ज्ञानाचे बीजारोपण होवू लागले.

जोतीराव म्हणायचे, 'एका पुरुषाला दिले जाणारे शिक्षण हे त्याच्या स्वत:पुरते असते, तर स्त्रीला दिले जाणारे शिक्षण हे तिच्या कुटुंबासाठी असते.' म्हणूनच त्यांनी स्त्री-शिक्षणास प्रथम प्राधान्य दिले. स्वत:च्या कुटुंबापासूनच शिक्षणाची सुरूवात करण्याचे ठरवून त्यांनी सावित्रीबाई आणि सगुणाबाई यांना धूळपाटीवर शिक्षणाचे धडे देण्यास सुरूवात केली. हाच भारतीय व्यक्तीने भारतातील स्त्री शिक्षणाचा केलेला पहिला प्रयोग होता. जोतीरावांनी या दोघींचे शिक्षण चांगल्या पद्धतीने पूर्ण केले. त्यानंतर शिक्षिकेचा कोर्स करण्याचे ठरले. नॉर्मल स्कूल, पुणे येथे मिसेस मिचेल या शिक्षक-प्रशिक्षण कार्यक्रम चालवित असत. तेथेच सावित्रीबाई व सगुणाबाईंनी प्रशिक्षण घेवून त्या प्रशिक्षित शिक्षिका झाल्या आणि महाराष्ट्रातील आद्य प्रशिक्षित शिक्षिका बनल्या.

**२) शैक्षणिक कार्य :**

जोतीरावांनी १८४८ मध्ये पुणे येथील बुधवार पेठेतील भिडेंच्या वाड्यात मुलींची पहिली शाळा काढली. ही महाराष्ट्रातील पहिली मुलींची शाळा होय. याच शाळेत जोतीबांनी स्वत:च्या मदतीकरीता सावित्रीबाईंना शिक्षिका म्हणून घेतले. त्यावेळी सनातन्यांकडून होणारा त्रास व इतर संकटांकडे दुर्लक्ष करून सावित्रीबाईंनी आपले शैक्षणिक कार्य चालूच ठेवले. शाळेतील मुलींबद्दलची माया, प्रेम, जिव्हाळा, परोपकारीवृत्ती व सामाजिक सेवाभाव इ. मुळे लोकांच्यामध्ये सावित्रीबाईबद्दल हळूहळू आदर निर्माण होत गेला. अशाप्रकारे त्या थोर शिक्षिका बनल्या.

सनातन्यांच्या प्रचंड विरोधाला न जुमानता काही युरोपियन अधिकारी व काही सुधारणावादी विचारांचे ब्राह्मण यांच्या सहकार्याने जोतिबा-सावित्रीने सुरू केलेले स्त्री शिक्षणाचे कार्य चांगलेच नावारूपाला आले. म्हणूनच पहिली भारतीय शिक्षिका म्हणून सावित्रीबाईंचे आणि स्त्री शिक्षणाचे आद्य जनक म्हणून जोतिबा सावित्रीबाई दोघांचे नाव आज आदराने घेतले जाते.

सावित्रीबाई या केवळ उत्तम शिक्षिका नव्हत्या; तर त्या चांगले शिक्षक-प्रशिक्षक, भारतातील पहिल्या मुख्याध्यापिका, उत्तम पर्यवेक्षिका होत्या. सावित्रीबाईंनी स्त्रियांबरोबरच शुद्रांनाही शिक्षणासाठी प्रेरित केले. रूढी परंपरा व ज्ञानाचे उच्चाटन करून शिक्षणातून लोकांना माणूस बनवणे, स्वत्व जपण्यास शिकविणे म्हणजेच 'मनुष्यत्वासाठी शिक्षण' हा पायाभूत विचार सावित्रीबाईंनी तत्कालीन काळात मांडला.

**३) सावित्रीबाई स्त्रियांच्या पुढारी :**

सावित्रीबाईंनी तत्कालीन समाजातील स्त्रियांचे दुय्यम स्थान, त्यांचे अज्ञान, दु:ख इ. चे निरीक्षण करून स्त्री-दास्य विमोचनाचा कैवार घेतला. त्यादृष्टीने त्यांनी बालविवाह, विधवांवरील अन्याय इ.वाईट प्रथांचे

निर्मुलन करण्यासाठी प्रयत्न केले. पण हे कार्य करीत असताना सावित्रीबाईना असा अनुभव आला की, त्या हे कार्य ज्यांच्यासाठी करीत होत्या, त्यांच्याकडूनच त्यांना विरोध होत होता. पण हा त्यांचा दोष नसून त्यांच्याअज्ञानाचा परीणाम होता, हे त्यांनी जाणले. यावेळी जोतीरावांनी त्यांना सांगितले की, ''प्रतिकूल परिस्थितीत कार्य करून ते यशस्वी करणे यातच कार्यकर्त्यांची खरी परीक्षा असते.'' यावेळी सावित्रीबाई त्यांच्या प्रयत्नात यशस्वी झाल्या. त्यांनी हळूहळू मागास जाती व स्त्रीयांमधील जुन्या समजूती, अनिष्ठ चालिरिती संपविण्यासाठी त्यांच्यात शिक्षणप्रसार करून मोठेच क्रांतिकार्य केले. सावित्रीबाई व इतर सुधारणावादी लोकांच्या प्रयत्नांचा सरकारवर सकारात्मक परिणाम होवून त्यांनी स्त्रियांना व वंचितांना शिक्षण देण्याची जबाबदारी मान्य केली. तेव्हापासून स्त्रियांना व वंचितांना असे ठामपणे वाटू लागले की, सावित्रीबाईच आपल्या पुढारी आहेत.

**४) सावित्रीबाईंचे सामाजिक कार्य :**

सावित्रीबाईंनी आपल्या शैक्षणिक कार्याबरोबरच सामाजिक कार्यही केले. दुष्काळाच्या वेळी जोतिबा-सावित्रीबाई यांनी अन्नछत्रे उघडून हजारो लोकांचे प्राण वाचविले. बालहत्या प्रतिबंधक (१८५३) गृहातील मुलांना वाढविले, त्यांच्यावर खऱ्या माणुसकीचे संस्कार केले. दोघांनीही समाजात माणूस घडविण्याचे व त्यांना समतेचे दूत बनविण्याचे कार्य केले. त्यांनी स्त्रियांना केवळ सामाजिक छळापासून वाचविले नाही, तर त्यांच्यामध्ये जगण्याची उमेद निर्माण केली. महिलांचे हळदी-कुंकवाचे कार्यक्रम घेवून त्याद्वारे प्रबोधन सुरू ठेवले. त्यांनी तत्कालीन समाजातील व्यक्तींना आपल्या काव्यांद्वारे अंधश्रद्धा व जुन्या समजुतीतून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला.

इ.स. १८५२ मध्ये जोतिबांच्या मार्गदर्शनाखाली महिला सेवा मंडळाची स्थापना करण्यातआली. हे स्त्री-चळवळीला गतीमान करणारे मंडळ होते. समाजातील विषमतेतील अंतर कमी करण्याचा प्रयत्न या मंडळाने केला.

इ.स.१८६८ मध्ये फुले दांपत्याने अस्पृश्यतेविरुद्ध आवाज उठवला आणि स्वत:च्या घरातील पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला केला. परिणामी त्यांच्यावर मोठ्या प्रमाणावर टीका होवू लागली. पण त्यांनी त्या सर्वांना न जुमानता अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी प्रयत्न सुरूच ठेवले.

त्यांच्याच प्रेरणेने सती व केशवपन या अनिष्ठ प्रथांना विरोध केला गेला. परिणामी केशवपनाविरुद्ध पुण्यात न्हाव्याचा पहिला ऐतिहासिक संप झाला. विधवा पुर्नविवाहला चालना देणारी सभा त्यांनी काढली. विधवा मातांसाठी बालहत्या प्रतिबंधगृह काढले. दुष्काळात ब्रिटीश सरकारला मदतकार्य करायला भाग पाडले.

फुले दांपत्याने काळाच्याही पुढे जाऊन उचललेले पाऊल म्हणजे त्यांनी ब्राह्मण विधवेचा मुलगा दत्तक घेवून सर्वांचा वरोध असतानाही त्याचा आंतरजातीय विवाह घडवून आणला. म्हणजेच ते केवळ बोलके सुधारक नव्हते तर कर्ते सुधारक होते.

### ५) मूल्यमापन :

इ.स. १८९० मध्ये प्लेगने सर्वत्र हैदोस घातला असताना हॉस्पीटल चालवून शेकडो रुग्णांची त्यांनी स्वत: सुश्रूषा केली. त्यातच संसर्ग होवून १० मार्च १८९७ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

एक शिकलेली स्त्री किती अंगाने समाजाचा विकास करू शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे सावित्रीबाई होत. त्यांचे चारीत्र अत्यंत तेजस्वी व स्फूर्तीदायक आहे. आजची युवा पिढी आणि पालकांपर्यंत अशी चरित्रे पोहोचायला हवीत जेणेकरून त्यांच्या विचारांना चालना मिळेल. परिणामी त्यांच्यात सामाजिक जाणिव निर्माण होवून राष्ट्रप्रेम व राष्ट्राभिमान वाढीस लागेल.

महाराष्ट्र शासनाने सावित्रीबाईंच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याची दखल घेवून १९९५ पासून ३ जानेवारी हा दिवस 'बालिका दिन' म्हणून साजरा करण्याचे घोषित केले आहे. हाच खऱ्या अर्थाने त्यांच्या कार्याचा गौरव आहे.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-१**

**योग्य पर्याय निवडून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. सावित्रीबाई फुले यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील 'नायगाव' या खेड्यात ............ रोजी झाला.

अ) ३ जानेवारी १८३१ ब) २ जानेवारी १८३१
क) १ जानेवारी १८३० ड) ३ जानेवारी १८३१

२. जोतीराव फुलेंनी १८४८ मध्ये ........... येथील बुधवार पेठेतील भिड्यांच्या वाड्यात मुलींची पहिली शाळा काढली.

अ) मुंबई ब) सातारा क) पुणे ड) नाशिक

३. जोतीबा-सावित्रीबाईंनी .......... मध्ये बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली.

अ) १८४८ ब) १८५२ क) १८५१ ड) १८५३

४. ........... रोजी प्लेगाचा संसर्ग होऊन सावित्रीबाई फुले यांचा मृत्यू झाला.

अ) ९ मार्च १८९७ ब) ७ मार्च १८९७

क) १० मार्च १८९७ क) १० मार्च १८९६

५. महाराष्ट्र शासनाने सावित्रीबाई फुलेंच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याची दखल घेवून १९९५ पासून ३ जानेवारी हा दिवस ............. दिवस म्हणून साजरा करण्याचे घोषित केले आहे.

अ) बालिका दिन ब) महिला दिन क) युवा दिन ड) शिक्षक दिन

## २.२.२ ताराबाई शिंदे (१८५० – १९१०) :

महात्मा जोतीबा फुलेंनाही यांच्या लिखानाची दखल घ्यावी असे वाटले ती स्त्री म्हणजे 'ताराबाई शिंदे' होय. ज्या लेखिका किंवा साहित्यीक नव्हत्या, लोकप्रिय किंवा प्रसिद्ध समाजसुधारकही नव्हत्या; परंतु स्त्री–पुरुष तुलना' हे केवळ ५० पानांचे अतिउच्च दर्जाचे व सडेतोड अशा शब्दात स्त्री–पुरुष समानतेविषयीचे विचार मांडणारे पुस्तक लिहिले. या एका पुस्तकाद्वारे तत्कालीन प्रस्थापित पुरुषप्रधान समाजव्यवस्थेविरुद्ध घणाघाती टीका करून स्त्री–मुक्तीचे विचार परखडपणे मांडून त्यांनी एक प्रकारे महाराष्ट्रातील समाजसुधारणेच्या इतिहासामध्ये आपला ठसा उमटविला आहे. पण त्या महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये 'समाजसुधारक' म्हणून उपेक्षित राहिलेल्या दिसतात.

एकंदरीत आजची सामाजिक व्यवस्था, स्त्रियांवरील वाढते अन्याय व अत्याचार सुशिक्षित असूनही तिला कुटुंब, समाज अथवा तिच्या कार्यक्षेत्राच्या ठिकाणीही मिळणारी दुय्यम दर्जाची वागणूक इ. चा विचार करता या पुरुषप्रधान संस्कृतीला छेद देणारे ताराबाई शिंदे यांचे परखड विचार व निर्भिड वृत्ती यांचा समाजामध्ये प्रचार होणे काळाची गरज बनली आहे. त्यांनी सक्रियपणे समाजसुधारणेसाठी लढा दिला नसला तरी त्यांचे विचार व लिखाण म्हणजेच तत्कालीन समाजव्यवस्थेविरुद्धचे बंड आणि स्त्री स्वातंत्र्यासाठी उचललेले धाडसाचे पाऊल होते, असेच म्हणावे लागेल. त्यामुळेच काळाच्याही पुढे जावून निर्भयपणे आपले विचार मांडणाऱ्या स्त्रीचा एक समाजसुधारक म्हणून अभ्यास होणे आवश्यक आहे. आपण या प्रकरणात ताराबाई शिंदे यांच्या विचारांवर चर्चा करणार आहेत.

### १) पूर्वचरित्र :

ताराबाई शिंदे यांच्या व्यक्तीगत जीवनाविषयी पुरेशी माहिती उपलब्ध होत नाही. त्या विदर्भातील बुलढाणा या गावी जन्मल्या. त्यावेळी त्याला बुलढाणे असेही म्हणत. तेथील प्रसिद्ध व प्रचंड मोठ्या वाड्याचे मालक बापूजी हरी शिंदे हे त्यांचे वडील. ताराबाई चार भावांमध्ये एकट्याच असल्यामुळे आई वडीलांच्या लाडक्या होत्या. ताराबाईंचे वडील हे महात्मा जोतीराव फुले यांच्या सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते होते. महात्मा फुले यांच्या विचारांचा त्यांच्या मनावर प्रभाव होता. सर्व प्रकारच्या समतेच्या भूमिका त्यांना पटल्या व त्यांनी आपल्या घरापासून या समतेला सुरुवात केली. त्यांनी आपल्या चार मुलात व ताराबाईंमध्ये भेदभाव केला नाही.

### २) शिक्षण :

त्या काळी स्त्रियांना शिक्षण घेण्याचे स्वातंत्र्य नसल्याने ताराबाईंच्या शिक्षणाची व्यवस्था घरीच करण्यात आली होती. मराठी, इंग्रजी आणि संस्कृतचाही त्यांनी अभ्यास केला होता. लक्ष्मणशास्त्री हळवेंची 'मुक्तामाला', रिसबुडांचे 'मंजुघोषा' या कादंबऱ्या, चितळेंचे 'मनोरमा' नाटक, रामजी दासोजींची 'स्त्री चरित्रासारखे' इ. तत्कालीन साहित्य त्यांच्या वाचनात आले. त्यांच्या चौफेर वाचनामुळे साहित्यातून होत असलेल्या स्त्रीविषयक चित्रणामुळे त्यांचे मन तळमळत असे. सत्यशोधक विचार, जातीव्यवस्थेमुळे दलितांवर

होणारे अन्याय, स्त्रियांचे समाजातील दुय्यम स्थान व त्यांची होत असलेली उपेक्षा यामुळे त्यांच्या जीवाची घालमेल होत असे.

**३) वैवाहिक जीवन :**

ताराबाईंचे लग्नही लवकरच झाले. तेव्हाच्या मलकापूर तालुक्यातील माकोडी या खेड्यातील श्री. नारायणराव देशमुख (चव्हाण) यांच्याशी त्या विवाहबद्ध झाल्या. ताराबाई सुसंस्कृत व शहरी वातावरणात वाढलेल्या व माकोडी हे गाव एक लहान व आडवळणाचे खेडे होते. तेथे जाण्या येण्यासाठी बैलगाडी व घोड्याशिवाय पर्याय नव्हता. या व इतर काही कारणांमुळे ताराबाई तेथे राहिल्याच नाहीत. त्या कायमच्या माहेरीच राहिल्या व नारायणराव घरजावई झाले. म्हणजेच एका अर्थाने मातृसत्ताक पद्धती ताराबाईंनी पुन्हा अंमलात आणली आणि 'स्त्री-पुरुष तुलना' हे पुस्तक लिहिण्याआधीच स्त्री जातीचं पुरुष जातीवरचं वर्चस्व यांनी प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध केलं.

ताराबाईंनी काळाच्या पुढचे पाऊल उचलले खरे पण त्यांचा संसार नीट चालला नाही. वंशरूपानं त्यांचा अंश शिल्लक राहिला नाही. नारायणरावांना या श्रीमंत व घरंदाज कुटुंबाच्या पसंतीला उतरेल असे वागणे जमले नाही. त्यांचा स्वभाव बदलता आला नाही. ताराबाईंनाही त्यांच्याशी जुळवून घेता आले नाही. त्यामुळे त्यांचा संसार फार काळ टिकला नाही. ताराबाई एकट्याच पडल्या कारण त्यावेळी स्त्री कितीही शिकलेली व विचारवंत असली तरीही स्त्रीचा दर्जा दुय्यमच असे. तशातच नको त्या चर्चा होत असत. त्या त्यांच्या कानावर येत असत. त्या सर्वांचा परिणाम ताराबाईंवर झाला.

**४) ताराबाईंचे विचार व कार्यक्षेत्र :**

ताराबाईंनी यांनतर आपला पूर्ण वेळ कामात आणि वाचनात घालवायला सुरूवात केली. त्यानंतर त्या स्वत: घोड्यावर बसून शेतातला कारभार पाहू लागल्या. पुरुषांसारखी कोर्टातील कामे करू लागल्या. तसेच आजूबाजूला पाहिलेल्या स्त्रियांचे जगणे आणि त्यांचा स्वत:चा अनुभव यावर त्यांनी चिंतन करायला सुरूवात केली. त्या मराठी व इंग्रजी वर्तमानपत्रेही नित्यनियमाने वाचत असत. त्यावेळी २६ मे, १८८१ च्या टाईम्स ऑफ इंडिया मधील विजयालक्ष्मी खटल्याची बातमी त्यांनी वाचली.

या खटल्याच्या संदर्भात जेव्हा मराठी, हिंदी, इंग्रजी वर्तमानपत्रातून बातम्या, लेख अग्रलेख, वाचकांची मते, विविध संस्था व संघटनांची मते इ. प्रसिद्ध होवू लागले. तेव्हा सर्वत्र स्त्री-प्रश्नांची चर्चा जोरदार सुरू झाली. स्त्रीजातीवर जोरदार टीका होवू लागली. अशा वेळी कोणीतरी या प्रश्नावर बोलणे, लिहिणे, गरजेचे बनले होते. त्यावेळी स्त्रियांचा कैवार घेऊन ताराबाईंनी लिहिण्याचे ठरविले.

**५) 'स्त्री-पुरुष तुलना' या पुस्तकाविषयी :**

इ.स. १८८२ मध्ये ताराबाई शिंदे यांनी बुलढाण्यासारख्या मागास समजल्या जाणाऱ्या गावात राहून मिळतील ती मराठी, इंग्रजी, संस्कृत संदर्भ साधने गोळा करून 'स्त्री पुरुष तुलना' हे पन्नास पानांचे पुस्तक लिहिले. यापुढेही जावून जेव्हा स्त्रियांचे जग केवळ चूल-मूल यापेक्षा जास्त व्यापक नव्हते. अशा संकुचित

वातावरणातही त्यांनी असा विचार कृतीत आणला, तो प्रसिद्ध केला आणि जगासमोर आणला. एकोणीसाव्या शतकातील सामाजिक परिस्थितीचा विचार करता हे खूपच धाडसाचे पाऊल होते.

महात्मा फुलेंच्या 'सत्सार अंक २' या १८८५ साली प्रसिद्ध झालेल्या पुस्तकात ताराबाई शिंदे यांचा व त्यांनी लिहिलेल्या 'स्त्री पुरुष तुलना' या पुस्तकाचा उल्लेख मिळतो. महात्मा फुलेंनी या पुस्तकाचे खूपच कौतूक केले आहे. पण ताराबाईंच्या इतर समकालीन लोकांनी या पुस्तकाची दखल घेतलेली दिसत नाही. महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेल्या 'महात्मा फुले समग्र वाङ्मया'च्या पहिल्या आवृत्तीचे एक संपादक कै. सं. ग. मालशे यांनी या पुस्तकाचा शोध लावला. १९७५ साली मालशे यांनी आपल्या सविस्तर प्रस्तावनेसह हे पुस्तक प्रकाशित केले. ताराबाई ज्या वातावरणात वाढल्या ते वातावरण, तत्कालीन सामाजिक परिस्थिती, स्त्रियांवर होणारे अन्याय, अत्याचार या कारणांबरोबरच त्यावेळी देशभर गाजलेला विजयालक्ष्मी खटला इ. कारणांमुळे 'स्त्री-पुरुष तुलना' या पुस्तकाद्वारे ताराबाई शिंदेंनी आपले परखड विचार व्यक्त केलेले दिसतात.

ताराबाईंनी या पुस्तकाच्या प्रस्तावनेतच आपल्या लेखनामागचा हेतू स्पष्ट केला आहे. त्यांच्या मते, या लिखानामागचा हेतू पुरुषांचे दोष काढणे हा नाही तर स्त्रियांचे गुण दाखविणे हा आहे. हे पुस्तक लिहिताना ताराबाईंच्या समोर कोणताही संकुचित विचार नसून उच्चविचार होते.

ताराबाईंनी या पुस्तकात एकोणिसाव्या शतकातील समाजात रूढ झालेली सनातन वृत्ती, पुरुषांनी स्त्रियांना दिलेली दुय्यम दर्जाची वागणूक तत्कालीन जातीय व्यवस्थेतील प्रथा-परंपरा, बालविवाह, जरठ कुमारी विवाह, पुर्नविवाह, सतीप्रथा, पडदापद्धती, केशवपण, विधवांना मिळणारी वाईट वागणूक, व्यभिचार व स्त्रियांवर पुरुषांकडून अमानुषपणे केले जाणारे अन्याय, अत्याचार, बालहत्या इ. चा अतिशय स्पष्ट आणि परखड, झणझणीत भाषेत युक्तीवाद केलेला दिसतो. याशिवाय या पुस्तकात त्यांनी कारागिरांची होणारी हेळसांड वर्णन करून ती परदेशी वस्तू वापरल्याने महाराष्ट्रातील उद्योगधंदे लयास जात होते. त्यामुळे येथील कारागिरांची हेळसांड पाहून त्याबद्दल त्या कळवळा व्यक्त करतात.

आपल्या पुस्तकात त्या स्त्रियांप्रमाणे पुरुषांनीही पातिव्रत्याचे नियम पाळावेत अशी रास्त अपेक्षा व्यक्त करतात. त्यांनी स्त्रीवादी दृष्टिकोनातून रामायण आणि महाभारतातील स्त्री-पात्रांचे परीक्षण केले आहे. पुढे त्या स्त्री सुधारणेच्या नावाखाली पुण्यात होणाऱ्या पोकळ सभांवरही टीका करताना दिसतात. त्यांच्या मते, यासभा स्त्री सुधारणेचा कोणताही ठोस निर्णय घेवून त्याचे आचरण न करता त्या तीस-पस्तीस वर्षे नुसता सुधारणेचा देखावा करीत आहेत. आपल्या लिखानात त्यांनी स्त्रीच्या अस्तित्वाशिवाय पुरुषाला अर्थ नाही याबाबतही चर्चा केलेली आहे.

ताराबाईंच्या लेखनाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांना वैज्ञानिक प्रगतीविषयी प्रेम व आपुलकी होती. म्हणूनच त्यांनी ब्रिटीशांनी सुरू केलेल्या रेल्वेचे कौतुक केलेले दिसते. सामान्यांना मिळालेल्या अशा सुविधा अतिशय प्रगतीकारक आहेत असे त्या म्हणतात. म्हणूनच इंग्रजांच्या सर्व प्रकारच्या सुधारणांचे ताराबाईंना कौतुक होते. त्यांच्या मते, इंग्रजांमुळेच भारतातील बेबंदशाहीचा नाश झाला व भारतात एक सुघटित राज्यव्यवस्था सुरू

झाली. असे परखड आणि रोखठोक विचार मांडणाऱ्या ताराबाईच्या 'स्त्री पुरुष तुलना' या पुस्तकाचे इंग्रजीत भाषांतर होवून त्याचेही सर्वत्र कौतुक झालेले दिसते.एवढ्या तोलामोलाचे हे स्त्रीवादी लिखाण सर्वांपर्यंत पोहोचावे व समाजात समतेचा विचार रूजावा यासाठी आपण त्यांचा अभ्यास केला पाहिजे.

तत्कालिन सामाजिक परिस्थिती पाहता निर्भिडपणे सामाजिक समतेचा विचार मांडणाऱ्या या थोर स्त्रीचा महाराष्ट्राच्या समाजसुधारणेच्या इतिहासात एक स्त्री समाजसुधारक म्हणून इतर समाजसुधारकांच्या बरोबर यांचाही गौरव होणे रास्त आहे.

**६) मूल्यमापन :**

आज आपण महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास या विषयावरील कोणतेही पुस्तक पाहिले तर असे लक्षात येते की, तेथे ताराबाई शिंदे यांचे नाव कोठेही दिसत नाही. पण आजच्या विद्यार्थ्यांना व इतर सामान्य लोकांनाही त्यांच्याविषयी माहिती होणे आवश्यक आहे. कारण त्यांच्या केवळ एका पुस्तकातून त्यांनी तत्कालीन सनातनी वृत्तीविरोधात बंड करून स्त्रियांच्या सर्व प्रश्नांवर सखोल चर्चा केली. स्त्री-पुरुष समतेचा विचार मांडला. यावरून आपण असे म्हणू शकतो की, त्यांचे चौफेर वाचन, चिंतन, सामाजिक प्रश्नांची जाण, निरीक्षण, स्वानुभव आणि निर्भिड वृत्ती इ. चा परिपाक म्हणजे ताराबाई शिंदे यांच्या हातून झालेली 'स्त्री पुरुष तुलना' या पुस्तकाची निर्मिती होय. यामध्ये मांडलेल्या बंडखोर विचारांमुळेच त्यांनी महाराष्ट्राच्या इतिहासात आपला वेगळा ठसा उमटवला आहे.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-२**

**योग्य पर्याय निवडून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. ताराबाई शिंदे यांचा जन्म ........... या गावी झाला.

अ) बुलढाणा ब) अहमदनगर क) जळगांव ड) नाशिक

२. 'स्त्री-पुरुष तुलना' हे पुस्तक .......... यांनी लिहिले.

अ) सावित्रीबाई फुले ब) जोतिराव फुले क) ताराबाई शिंदे ड) पंडिता रमाबाई

३. ......... या खटल्याचा परिणाम होवून ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री-पुरुष तुलना' हा ग्रंथ लिहिला.

अ) राजलक्ष्मी ब) भवरीदेवी क) शारदादेवी ड) विजयालक्ष्मी

४. 'स्त्री-पुरुष तुलना' पुस्तकाच्या प्रस्तावनेत ताराबाईंनी आपल्या लिखानाचा उद्देश पुरुषांचे दोष काढणे हा नसून ............. हा आहे असे स्पष्टपणे नमूद केले आहे.

अ) स्त्रियांचे दोष दाखविणे ब) स्त्रियांचे गुण दाखविणे

क) स्त्री-पुरुष यांची तलना करणे, ड) तत्कालीन पुरुषप्रधान समाज व्यवस्थेवर हल्ला करणे

५) .......... यांच्या 'सत्सार अंक २ रा या १८८५ साली प्रसिद्ध झालेल्या पुस्तकात ताराबाई शिंदे व त्यांनी लिहिलेल्या 'स्त्री-पुरुष तुलना' या पुस्तकाचा उल्लेख आढळतो.

अ) महात्मा जोतीराव फुले
ब) सावित्रीबाई फुले
क) बहिणाबाई चौधरी
ड) पंडिता रमाबाई

## २.२.३ पंडिता रमाबाई (१८५८-१९२२) :

महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात स्त्री उन्नतीसाठी कार्य केलेल्या सुधारकांच्या यादीत केवळ 'ख्रिस्ती धर्म स्विकारून' स्त्री उद्धाराचे कार्य केल्यामुळे उपेक्षित किंवा काहीसे नजरेआड राहिलेले नाव म्हणजे 'पंडिता रमाबाई'

पंडिता रमाबाईंनी पाश्चात विद्या संपादन करून हिंदी ख्रिस्ती मुली, विधवा, दुष्काळग्रस्त स्त्रिया यांना शिक्षित व स्वावलंबी करून जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली. त्यांनी भारताबरोबरच परदेशातही आपल्या विद्वत्तेची किर्ती गाजवून महाराष्ट्रातील स्त्रियांना सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी आपले सारे जीवन व्यतीत केले. म्हणूनच भारताच्या व विशेषत: महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात त्यांनी केलेले स्त्री उद्धाराचे कार्य उल्लेखनीय आहे. त्यामुळे त्यांच्या या कार्यावर प्रकाश टाकणे गरजेचे आहे.

### १) पूर्वचरित्र :

पंडिता रमाबाईंचा जन्म कर्नाटकातील माळहेरंजी येथे एका विद्वान ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव अनंतशास्त्री डोंगरे व आईचे नाव अंबाबाई होते. त्या काळात प्रचलित असलेल्या प्रथा व जाचक रूढींना न जुमानता अनंतशास्त्रींनी स्वत:च्या पत्नीला व मुलीला संस्कृत शिकवले. त्यामुळे लोकांनी त्यांच्यावर फार अत्याचार केले. परिणामी ते गाव सोडून हिंदुस्थानच्या तीर्थयात्रेस गेले. ते मद्रासमध्ये असताना तेथील भयंकर दुष्काळाने (१८७६-७७) पं. रमाबाईंचे आई वडील व मोठी बहिण मरण पावले. त्यानंतर आपल्या श्रीनिवास या भावाबरोबर पुराणे व व्याख्याने सांगून त्या आपला उदरनिर्वाह करू लागल्या. अशा पद्धतीने जीवनाचा प्रवास करत करत त्या कलकत्यास पोहोचल्या. तेथे त्यांच्या विद्वत्तेचे खरे चीज झाले. कलकत्ता विश्वविद्यालयातील पंडितांनी त्यांना व्याख्यानासाठी आमंत्रण दिले आणि पंडिता व 'सरस्वती' ही दोन बिरूदे त्यांना अर्पण केली. तेव्हापासून त्यांची किर्ती देशभर पसरली. अचानकपणे श्रीनिवासचेही निधन झाले. रमाबाई पूर्णपणे निराधार झाल्या. तरीही त्यांनी धीर सोडला नाही. स्वत:ची बुद्धिमत्ता व शीघ्रकवीत्व याद्वारे साऱ्या देशाचे लक्ष वेधून घेतले, अनेक सन्मान व मानपत्रे मिळवली.

१८८० साली त्यांनी 'बाबू बिपीन बिहारीदास मेधावी' या बंगाली, शूद्र समाजातील वकिलाशी विवाह केला. हा विवाह आंतरप्रांतिय, आंतरजातीय आणि विशेष म्हणजे प्रतिलोम होता. त्या काळात हे कट्टर सनातनींना रूचणारे नव्हते. त्यामुळे अनेकजण त्यांच्या विषयी नाराज झाले. विवाहानंतर केवळ १९ महिन्याच्या आतच कॉलरा या आजाराने मेधावींचा मृत्यू झाला. त्यावेळी त्यांना 'मनोरमा' नावाची एक कन्या होती. पतीच्या मृत्यूनंतर आपल्या कन्येसह रमाबाई महाराष्ट्रात आल्या. यावरून असेच म्हणावे लागेल की, कौटुंबिक

आणि सांसारीक सुखाच्या दृष्टीने रमाबाई खूप दुर्दैवी ठरल्या.

**२) पंडिता रमाबाईंचे महाराष्ट्रातील समाजकार्य :**

**आर्य महिला समाजाची स्थापना :** १८८२ मध्ये रमाबाई पुण्यात आल्या. तेथे त्यांची जाहीर व्याख्याने व पुराणे होत असत. त्यांची वक्तव्ये अभ्यासपूर्ण व निर्भयपणे केलेली असत. त्यामुळे त्यांची निंदा करणाऱ्या अनेक टवाळ पुणेकरांनी त्यांच्यापुढे हार मानली.

रमाबाईंनी महाराष्ट्रभर स्त्री शिक्षणासाठी लोकजागृतीचे काम सुरू केले. त्यांच्या विषयी टिळक चरित्रकार न. चिं. केळकर म्हणतात, ''बाई धीट, दुसऱ्यावर छाप टाकणारी व हजरजबाबी असल्याने कोणी तिच्याशी प्रत्यक्ष भेटून वाद किंवा निषेध केला नाही.''

स्त्री समाजाच्या सर्वांगीण प्रगतीच्या हेतूने त्यांनी ३० एप्रिल १८८२ रोजी पुण्यात तर ३० नोव्हेंबर १८८२ रोजी मुंबईत 'आर्य महिला समाज स्थापन केला. शिवाय सोलापूर, पंढरपूर, अहमदनगर व बार्शी येथेही आर्य महिला समाज स्थापन करण्यात त्या यशस्वी झाल्या. तरीही महाराष्ट्रातील स्त्रियांनी त्यांना पुरेसा पाठिंबा दिला नाही.

पुण्यात आल्यापासून ते इंग्लंडला जाण्यापर्यंतच्या एक वर्षाच्या काळात रमाबाईंनी केलेल्या दोन महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे १) त्यांची हंटर कमिशन पुढील स्त्रीशिक्षणाविषयीची साक्ष आणि २) स्त्री-धर्म-नीती या पुस्तकाचे लिखान त्यामुळे त्यांच्या या कार्याची चर्चा करणे आवश्यक आहे.

**३) रमाबाईंची हंडर आयोगापुढील साक्ष (१८८३) :**

१८५४-१८८२ या काळामध्ये प्राथमिक शिक्षणाची प्रगती अपेक्षेप्रमाणे न झाल्याने भारत सरकारने विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली १८८२ मध्ये एक आयोग स्थापन केला. त्याला 'हंटर आयोग' म्हटले जाते. 'प्राथमिक शिक्षणाच्या विकासाचा अभ्यास करणे हा त्याचा मुख्य हेतू होता.

रमाबाईंनी हंटर आयोगाला दाखवून दिले की, ब्रिटीश सत्तेखालील ९ कोटी ९७ लक्ष स्त्रियांपैकी केवळ ९९ हजार ५०० स्त्रिया साक्षर आहेत. त्यांनी भारतीय शिक्षण पद्धतीमधील दोष दाखवून ते दूर करण्यासाठी सूचना केल्या. त्यामध्ये खालील महत्त्वाचे मुद्दे मांडले.

१) मराठी व इंग्रजीचे बिनचूक ज्ञान असणाऱ्या शिक्षिका असाव्यात.

२) मुलींच्या शाळेतील शिक्षिकांना मुलांच्या शाळेतील शिक्षिकांपेक्षा जास्त पगार मिळावा.

३) सर्व आवश्यक उपकरणांनी युक्त वसतीगृहे असावीत.

४) सामान्य स्त्रियांचा भित्रेपणा व स्त्रीशिक्षणास ९० टक्के पुरुषांचा विरोध. या गोष्टी विचारात घेवून त्यांनी 'मुलींच्या शाळा तपासण्याचे काम स्त्री अधिकाऱ्यांनी करावे' असे सुचवले.

५) 'भारतीय स्त्रियांच्या लाजाळूपणामुळे त्या पुरुष डॉक्टरांकडे आपल्या रोगाविषयी सांगण्यापेक्षा मरण स्वीकारत. त्यामुळे स्त्रियांना वैद्यकीय शिक्षण देण्यात यावे', अशी त्यांनी विनंती केली.

रमाबाईंची हंटर आयोगापुढील सक्ष व त्याचे परिणामांचा जर विचार केला तर असे दिसते की, स्त्रीशिक्षणाच्या बाबतीत भारतीयांच्या विचारात मागासलेपणा तर ब्रिटीशांच्या विचारात पुरोगामीपणा होता खालील चर्चेवरून आपणास याची प्रचिती येते.

'युनायटेड स्टेटस्‌ची लोकस्थिती व प्रवासवृत्त' या आपल्या पुस्तकात रमाबाई म्हणतात, हंटर आयोगापुढील साक्षीनंतर चार वर्षांनी स्त्रियांच्या वैद्यकीय शिक्षणाबाबत भारतात लोकमत घेण्यात आले. त्यामुळे काही सुधारक व स्त्री-उन्नती इच्छुक असणाऱ्या लोकांचे मतही 'स्त्रियांना वैद्यक शिकवू नये' असे होते. याउलट विल्यम हंटर यांच्यावर या साक्षीचा खूपच परिणाम झाला. त्यांनी ती साक्ष इंग्रजीत भाषांतरीत करून घेतली. त्यातील रमाबाईंची स्त्रियांविषयीची कळकळ पाहून त्यांनी एडिन्बरोमध्ये 'रमाबाई व त्यांच्या कामगिरी' या विषयावर व्याख्यान दिले. ते व्याख्यान व्हिक्टोरिया राणींच्या वाचनात आले आणि त्यांनी भारतीय स्त्रियांच्या वैद्यकीय शिक्षणास चालना दिली. त्यानंतरच 'लेडी डफरीन फंड (१८८५)', 'स्त्री डॉक्टर' व 'स्त्रियांचे दवाखाने' इ. ची भारतात सुरुवात झाली.

म्हणजेच आपण असे म्हणू शकतो की, भारतात स्त्रियांसाठी वैद्यकीय शिक्षणाचा प्रारंभ व प्रसार करण्यात रमाबाईंचा मोलाचा वाटा आहे.

**४) प. रमाबाईंकडून ख्रिस्ती धर्माचा स्वीकार (लंडन) :**

एप्रिल १८८३ मध्ये पं. रमाबाई आपल्या कन्येसह इंग्लंडला गेल्या तेथे परित्यक्ता स्त्रियांसाठी काम केले जात असे. त्याचे मूळ रमाबाईंना येशूच्या व्यक्तीमत्त्वात दिसून आले. परिणामी त्यांनी जिराल्डिन यांच्या साक्षीने ख्रिस्ती धर्म स्वीकारला. इंग्लंडमध्ये त्यांनी ख्रिस्ती धर्म, त्यांचे समाजजीवन, चालीरिती, स्त्रीशिक्षण संस्थांची सुव्यवस्था व उर्जितावस्था (वाढ) आणि पतीत स्त्रियांविषयी समाजची सहानुभूती इ. मुळे प्रभावित होवून त्याचा सूक्ष्मपणे अभ्यास केला.

**५) पं. रमाबाईंवर अमेरिकेतील ज्ञानाचा प्रभाव :**

पं. रमाबाई इंग्लंडमध्ये असतानाच त्यांच्या ज्ञानाची किर्ती इंग्लंड बरोबर अमेरिकेतही पसरली. परिणामी अमेरिकेतील फिलाडेल्फिया येथील स्त्रियांच्या वैद्यकीय कॉलेजच्या प्रमुखांनी त्यांना डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या पदवीदान समारंभासाठी आमंत्रित केले. डॉ. आनंदीबाईंनाही रमाबाईंविषयी विशेष प्रेम व आदर होता. त्यामुळे दोन दिवस त्यांच्या बोटीची वाट बघत त्या समुद्र किनारीच बसून होत्या. त्या म्हणतात, 'रमाबाई ही फुलासारखी सुकुमार आहे' परंतु तिने आपल्या धैर्याने मोठमोठ्या योध्यासही खाली पहावयास लावले.

अमेरिकेतील स्त्रियांची प्रगती पाहून तेथील शिक्षणपद्धतीने त्यांचे लक्ष वेधून घेतले. बाल शिक्षणपंडित कुमारी ॲना हॅलोवेल, बालशिक्षणाची आई मिस इलिझाबेथ पीबडी व दारूबंदी कायद्याच्या आद्य प्रवर्तक मिस फ्रॅन्सिस ई. विलर्ड इ. स्त्रीयांनी अमेरिकेत रमाबाईवर विशेष छाप पाडली. त्यातूनच तेथे त्यांनी अनेक व्याख्याने दिली.

आपल्या 'द हाय कास्ट-हिंदू वूमन' (१८८७) या पुस्तकाद्वारे त्यांनी अमेरिकेत भारतातील बालविधवांबद्दल सहानुभूती निर्माण केली. म्हणूनच त्यांच्या कार्याला मदत करण्यासाठी 'रमाबाई असोसिएशन' (३१ डिसेंबर १८८७) ही संस्था काढून पुढील १० वर्षे अर्थसहाय्य करण्याचे अभिवचन मिशनऱ्यांनी दिले.

**६) शारदा सदनची स्थापना व रमाबाईचे कार्य :**

आपल्या कार्यासाठी अमाप पैसा व भक्कम पाठबळ मिळवून रमाबाई भारतात परत आल्या. त्यानंतर बालविधवांच्या उन्नतीसाठी त्यांनी मुंबईत 'शारदा सदन' (११ मार्च १८८९) स्थापन केली. नोव्हेंबर १८९० मध्ये शारदा सदन पुण्यास तर १८९२ मध्ये ते स्वत:च्या इमारतीत गेले. तेथे ६४ विद्यार्थ्यींनी होत्या. त्यामध्ये दुर्गाबाई किर्लोस्कर, वेणूबाई नामजोशी व काशीबाई देवधर इ. चा समावेश होता. या सदनाची पहिली विधवा विद्यार्थिनी म्हणजे महर्षि आण्णासाहेब कर्वे यांची भावी पत्नी सौ. आनंदीबाई कर्वे (पूर्वीची गोईबाई)

प्रारंभी शारदा सदनात ख्रिस्ती धर्माचा प्रसार केला जाणार नाही, अशी रमाबाईंनी खात्री दिल्याने काही सुधारक त्यांच्या पाठिशी होते. पण संस्थेच्या प्रमुखच ख्रिस्ती असल्याने त्यांच्या व्यक्तीमत्त्वाचा प्रभाव मुलींवर झाल्याशिवाय राहिला नाही. परिणामी काही मुली ख्रिस्ती होवू लागल्या. अशी प्रकरणे उघडकीस येताच न्यायमूर्ती रानडे व भांडारकर यांनी जाहीरपणे सल्लागार मंडळाचे राजीनामे दिले. रमाबाईंवर वर्तमानपत्रातून जोरदार टीका होवू लागल्या. पण शारदा सदन ही एक ख्रिस्ती संस्था आहे व तेथे ख्रिस्ती धर्मप्रसार केला जातो, या टिकेस उत्तर देताना त्या म्हणतात, ''आमच्या देशबांधवांनी योग्य आश्रय व उत्तेजन दिले असते, तर ही संस्था ख्रिस्ती होण्याची काहीच गरज नव्हती. हिंदू समाजाने मदत दिली नाही म्हणून मी मिशनऱ्यांकडे भिक्षा मागितली.''

दरम्यानच्या काळात अमेरिकन मिशनऱ्यांनी केलेला दहा वर्षांचा करार संपल्यावरही भारतीयांनी या संस्थेला आर्थिक मदत दिली नाही. त्यामुळे मिशनऱ्यांनी 'अमेरिकन रमाबाई असोसिएशन' ही संस्था काढून रमाबाईंच्या कार्याला आर्थिक मदत सुरू केली. त्यामुळे शारदा सदन हे उघड उघड ख्रिस्त मिशन बनले आणि रमाबाईंची शारदासदन ही संस्था केडगावला हलवून त्याचे नाव 'मुक्तीसदन' असे करण्यात आले. या ठिकाणी कार्य करीत असताान रमाबाईंनी शोषित व पिडीत बालविधवांना केवळ आश्रयच दिला नाही तर त्यांचे बौद्धिक व आध्यात्मिक शिक्षण, दृष्टतेच्या प्रभावापासून त्यांचे रक्षण, आजारपणात त्यांची काळजी, त्यांना नैतिकदृष्ट्या उत्तम स्त्रिया बनवणे, उत्तम आरोग्यासाठीचे उपाय, वेगवेगळ्या हस्तकला व इतर उद्योगांद्वारे यांना स्वावलंबी बनवणे इ. सर्व जबाबदाऱ्या धैर्याने पार पाडल्या.

**७) दुष्काळग्रस्तांसाठीचे कार्य :**

दुष्काळाच्या संदर्भात त्यांनी दिलेल्या योगदानावरून आपणास पं. रमाबाईंचे महाराष्ट्राबाहेरील कार्यही वाखानण्याजोगे होते याची प्रचिती येते. १८९७ व त्यानंतर १८९९ या दोन वर्षी मध्यप्रदेश व गुजरातच्या मोठ्या दुष्काळातून रमाबाईंनी हजारो अनाथांना वाचवून आश्रय दिला. त्यांचे पालन पोषण, शिक्षण व त्यांच्या

स्वावलंबी जीवनासाठी त्यांना हस्तकला व इतर उद्योग शिकविण्याची जबाबदारी घेतली.

**८) इतर सार्वजनिक कार्य :**

रमाबाईंनी सार्वजनिक दृष्ट्या हितकारक अशा अनेक गोष्टींचे योगदान दिले होते. त्यामुळे येथे त्या कार्याचा आढावा घेणे आवश्यक आहे.

१) भारतातील विविधभाषी, विविधधर्मी जनतेचे वैचारिक ऐक्य साधण्यासाठी सर्व परिचित अशा एकाच भाषेची भारताला जरूरी आहे, याचा पहिला ईशारा रमाबाईंनी सन १८८९ मध्ये दिला होता.

२) नगरपालिका, अग्निशमन दल, प्राथमिक शिक्षण, किंडरगार्डन इ. विषयांवर लिखाण करून किंडरगार्डन व विषयाचा अवलंब भारतात प्रथम त्यांनीच केला. शारदा सदनद्वारे मुंबई इलाख्यात त्या वर्गासाठी शिक्षिकांना प्रशिक्षण देवून बाहेर पाठवले जात असे.

३) रमाबाईंची महत्त्वाची राष्ट्रीय कामगिरी म्हणजे त्यांच्या प्रयत्नांने काँग्रेसमध्ये स्त्रीप्रतिनिधींचा झालेला प्रवेश.

४) भारतातील मद्यपान निषेधक स्त्रीमंडळाच्या या एक क्रियाशील सभासद होत्या.

५) संमतीवयाच्या (१८९१) कायद्याविरुद्ध पुण्यास जोराची चळवळ चालू असताना रमाबाईंनी स्त्रियांची बाजू हिरीरीने घेतली. त्यासंदर्भात मुंबईच्या सभेचे चालकत्व त्यांच्याकडे होते.

६) पुण्याच्या प्लेगविषयक (१८९९) धामधुमीत रमाबाईंच्या लेखाने ब्रिटीश पार्लमेंटमध्ये हिंदी लोकमताचा प्रतिध्वनी उठवला. सरकारी प्लेग हॉस्पीटलमधील अस्वच्छता, अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणा, तिथल्याच एका चौकीदाराच्या अत्याचारास बळी पडलेल्या त्यांच्या विद्यार्थीनीचा अनुभव, हृदयशून्य व अन्यायी सिटी मॅजिस्ट्रेट यांचे खरे रूप त्या जळजळीत लेखातून प्रत्ययास येते.

७) केडगावला रमाबाईंनी आश्रय दिलेल्या अनेक अशिक्षित, शरीराने व मनाने दुर्बल परिस्थितीने अनैतिक ठरलेल्या स्त्रियांना माणसात आणण्यासाठी आपली सर्व शक्ती खर्च केली.

मुक्तीसदनात रमाबाईंनी जी सदने काढली, त्यापैकी कृपासदन जग त्यांना तिरस्कारणीय मानते, त्यांना गत आयुष्य विसरून नवजीवन जगण्यास संधी दिली जाते असे. प्रीतीसदनात वृद्ध, अशक्त व अपंग स्त्रियांना आसरा मिळे, तर अंध स्त्रियांसाठी 'बार्तमी सदन' काढण्यात आले होते. त्यांना ब्रेल पद्धतीने शिक्षणही सुरू केले होते. स्वेटर विणणे, वेताच्या खुर्च्या विणणे, केळीच्या रोपटीच्या टोपल्या बनवणे, वाकाच्या दोऱ्या तयार करणे ई. कामे त्या कुशलतेने करत.

**९) पं. रमाबाईंची वाङ्मयनिर्मिती (लिखाण) :**

पं. रमाबाईंनी विधवा व इतर स्त्रियांसाठी कार्य करताना स्त्रियांच्या व्यथा मांडणारी व स्त्रियांच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण अशी वाङ्मयनिर्मितीही केली. त्यांनी स्त्री-धर्मनीती (१८८२), इंग्लंडचा प्रवास, द हाय कास्ट हिंदू वूमन (१८८७), युनायटेड स्टेटस्‌ची लोकस्थिती व प्रवासवृत्त (१८८९) व बालोद्यान शिक्षण

पद्धतीची पुस्तके लिहिली. त्यांनी ग्रीक व हिंब्रू भाषेतून बायबलचे मराठीत भाषांतर केले.

**१०) पं. रमाबाईंच्या कार्याचा परिणाम :**

डॉ. रघुनाथराव परांजपे यांनी १९१५ साली महर्षि कर्वे यांचा जीवन आराखडा प्रसिद्ध केला. त्यामध्ये ते म्हणतात, ''१८९३ साली शारदा सदन विरुद्धची चळवळ अगदी कमाल दर्जापर्यंत पोहोचली असताना त्यात धर्माची एक स्वदेशी संस्था काढण्याबद्दल कित्येकांनी केवळ आणि केवळ चर्चा केली. पण श्री. धोंडो कर्वे कार्य करण्यास पुढे येईपर्यंत इतरांच्या तोंडी योजनांचे काहीच झाले नाही.'' विशेष हे की, 'पं.रमाबाईंच्या कार्यानेच स्फूर्ती व प्रेरणा होवून आपण पुण्याजवळ हिंगणे येथे स्त्रियांसाठी संस्था काढू शकलो, असे स्पष्ट मत धोंडो कर्वे व त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी आपल्या चरित्रग्रंथात मांडले आहे.

सौ. मेरीबाई उर्फ शेवंतीकाबाई निकंबे यांनी मुंबईच्या शारदा सदनात काम केले हाते. हे सदन पुण्यास आल्यावर त्याच भांडवलावर त्यांनी उच्चवर्णीय विधवा, गृहिणी व कुमारिकांसाठी मुंबईत एक शाळा काढली. सुंदराबाई पोवार आणि 'रमाबाई असोसिएशन प्रमुख' (मिसेस ज्युडीथ ॲण्ड्र्यूज) हे सर्वकाळ रमाबाईचे पाठीराखे राहिले.

रमाबाईंच्या कार्याचा परिणाम भारताबरोबरच परदेशातही मोठ्या प्रमाणावर झाला होता, हे खालील उदाहरणावरून स्पष्ट होते.

रमाबाईंच्या शारदा सदनातील कार्याचा परिणाम यवद्वीपच्या (Java) कार्टिनी या राजकन्यावर, किंबहुना इंडशेनेशियावर झाला. शाळेत तिने एक वर्तमानपत्रात रमाबाईंच्या कार्याविषयी वाचले. त्यातून आपल्या देशातही स्त्रियांची प्रगती व्हावी या कल्पनेने तिने युरोपमध्ये पुष्कळशा पत्रमैत्रिणी मिळवल्या. परिणामी तिच्या प्रयत्नाने तेथे स्त्रीशिक्षणास सुरूवात झाली. कार्टिनीच्या पत्रांचा संग्रह पुढे 'थ्रू डार्कनेस इन टू लाईट' (Through darkness into light) या नावाने प्रसिद्ध झाला. त्यामध्ये आपल्याला या कार्याची प्रेरणा पं. रमाबाईकडून प्राप्त झाल्याचे तिने म्हटले आहे.

याशिवाय रमाबाईंच्या कार्यास मदत करण्यासाठी बऱ्याच इंग्लंड, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड इ. देशातील स्त्रियांनी आपले आयुष्य वेचले.

**११) मूल्यमापन :**

पंडिता रमाबाई सरस्वती यांच्याशी कित्येक गोष्टीत महाराष्ट्रातील समाजसुधारकांचे मतभेद झाले असले तरी त्याचे कार्य हे उच्च कोटीतले आहे. त्यांच्या विधवा शिक्षणाच्या कार्याविषयी धोंडो केशव कर्वे म्हणतात, ''या कार्याबद्दल भारतीय समाजाने विशेषत: दक्षिणी समाजाने नेहमी कृतज्ञ राहिले पाहिजे.' प्लेगच्या धामधुमीत रमाबाईंनी जाहीररितीने अधिकाऱ्यांच्या अनेक दुष्कृत्यांचा निषेध केल्याने ''नारी असुनि सत्यपणा तूच राखिला'', हे त्यांचे संगीत गुणवर्णन बरेच दिवस पुणेकरांच्या तोंडी राहिले होते. रमाबाईंची सेवा केवळ उच्च वर्णिय हिंदूभोवतीच प्रदक्षिणा घालत बसली नाही. त्यामुळेच १८९६ आणि १८९९ च्या दुष्काळात त्यांनी जातीपातीची सर्व बंधने तोडून हजारो अनाथांना नवजीवन दिले. त्यांनी हिंदू बाल-

विधवांसाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांचे लिखाणही स्त्रियांच्या उन्नतीच्या दृष्टिने पूरक असेच होते. ते स्त्रियांना केंद्रिभूत मानून व स्वतःच्या अनुभवातून आले होते. स्वामी विवेकानंदांनी अमेरिकेत भारताविषयी जशी मतक्रांती घडवून आणली, तशीच आपल्या वक्तृत्वाची छाप प. रमाबाईंनी विवेकानंदांच्या आधी दहा वर्षे अमेरिकेतील जनतेवर पाडली होती. १९१९ मध्ये भारत सरकारने रमाबाईंना ''कैसर-ए-हिंद' या पदवीने त्यांना सन्मानित केले असले तरी त्यांच्या कार्याचे मोल भारतीयांना आणि विशेषत: महाराष्ट्राला फार उशीरा उमगले.

तथापी, भारतापेक्षा परदेशात रमाबाईंची कीर्ती खूप मोठ्या प्रमाणावर पसरल्याने अनेक विदेशी स्त्रियांनी त्यांच्या कार्यात मदत करून आपले आयुष्य सत्कर्मी लावले. अनेक विदेशी लोकांनी रमाबाईंच्या कार्यावर लिखाण करून त्यांचे कार्य जगभर पोहोचवले.

पं. रमाबाईंच्या एकंदरीत कार्याचा आढावा हेच स्पष्ट करतो की, कोणी कितीही टीका केली असली तरी त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. पं. रमाबाई खऱ्याअर्थाने एक लोकोत्तर स्त्री होती. स्त्रियांच्या संदर्भात अनेक जाचक रूढी, परंपरा व कर्मठबंधनांचा पुरस्कार करणाऱ्या पुरुषप्रधान हिंदू समाजात एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात, एक उच्चवर्णिय हिंदू विधवेने, स्त्रियांसाठी प्रचलित सनातनी प्रवाहाविरुद्ध जावून केलेले कार्य अनमोल आहे. प्रत्येक व्यक्तीने ते अभ्यासण्यासारखे आहे. त्यावरून रमाबाईंच्या विचार, कृती व कार्यातील व्यापकता लक्षात येते.

भारताला काय पण महाराष्ट्रातील सामान्य लोकांनाही पं. रमाबाईंविषयी खूप कमी माहिती आहे. या तेजस्विनी स्त्रीच्या कार्याची ओळख व अनुकरण करणे, ही काळाची गरज आहे. त्यांचे कार्य हे सदैव प्रेरणादायी असेच आहे. पण केवळ त्यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारून हे कार्य केल्याने त्या 'उपेक्षित' राहिल्या असेच म्हणावे लागेल. पण या अभ्यासक्रमाच्या निमित्ताने त्यांचा अभ्यास होवून हे चित्र बदलेल अशी आशा वाटते

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - ३**

**अ) योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा.**

१) पंडिता रमाबाईंचा जन्म .......... येथे झाला.

अ)माळहेरंजी ब) बनारस क) कलकत्ता ड) पुणे.

२) रमाबाई यांना 'पंडिता' व 'सरस्वती' ही दोन बिरूदे ........... विश्वविद्यालयाने अर्पण केली.

अ) मुंबई ब) पुणे क) कोलकत्ता ड) मद्रास

३) आपल्या 'द हाय कास्ट हिंदु वुमन' या पुस्तकाद्वारे रमाबाईंनी ............ या देशात भारतातील बाल विधवांविषयी सहानुभूती निर्माण केली.

अ) भारत ब) इंग्लंड क) रशिया ड) अमेरिका

४) रमाबाईंनी विधवांच्या उन्नतीसाठी .............. येथे १८८९ मध्ये 'शारदा सदन' ची स्थापना केली.

अ) पुणे  ब) मुंबई  क) केडगाव  ड) माळहेरंजी

५) इ.स. ........... मध्ये भारत सरकारने रमाबाईंना 'कैसर-इ-हिंद' या पदवीने सन्मानीत केले.

अ) १९१९  ब) १९१८  क) १९२०  ड) १९२१

## २.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ :

१. पर्यवेक्षण करणे : एखाद्या कामावर किंवा संस्थेच्या कामावर देखरेख ठेवण्याचे काम करणे.

२. बालहत्या प्रतिबंधक गृह : १९ व्या शतकात स्त्रियांवर असलेल्या कडक निर्बंधामुळे स्त्रियांना अतिशय निम्न दर्जाची वागणूक मिळत असे. अशा काळात एखाद्या कुमारिकेला किंवा विधवेला व्यभिचारातून संतती प्राप्त झाल्यास ती किंवा तिचे नातेवाईक त्या संततीस ठार मारत असत. हे टाळण्यासाठी आणि अशा बालहत्या रोखण्यासाठी जोतीराव व सावित्रीबाईंनी १८५३ मध्ये बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली.

३. केशवपन : तत्कालीन काळात एखाद्या महिलेचा नवरा मरण पावल्यास त्याच्या विधवा पत्नीने आपल्या डोक्याचे मुंडण करणे बंधनकारक होते. अशा स्त्रीने आपले केसा कापून टाकावेत व विद्रुप दिसावे अशी तिच्यावर जबरदस्ती केली जात असे. विधवेच्या डोक्याचे केस मुळापासून काढून टाकण्याच्या पद्धतीस केशवपन म्हटले जात असे.

४. विजयालक्ष्मी : सुरत जिल्ह्यातील 'ऊडपाड' येथील एका १९ वर्षाच्या विजयालक्ष्मी नामक ब्राह्मणविधवा बाईने व्यभिचार करून गर्भ राहिल्यावर तिने नंतर त्या बालकाची हत्या केली त्यामुळे तिला सुरतेच्या सेशन कोर्टाने फाशीची शिक्षा सुनावली. ही शिक्षा फार जास्त वाटल्यावरून काही मानवतावादी मंडळींनी विजयालक्ष्मीच्या वतीने मुंबई सरकारला विनंती केल्यामुळे ती शिक्षा ५ वर्षाच्या सक्त मजूरीची कायम झाली. या अगोदर हायकोर्टाने अपीलात तिची शिक्षा फाशीवरून जन्मठेपेवर आणली होती.

५. किंडरकार्टन : किंडरकार्टन म्हणजे बालकमंदिर (Nursery)

## २.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

- **स्वयं अध्ययन प्रश्न १ ची उत्तरे**

**अ)** १) ३ जानेवारी १८३१  २) पुणे  ३) १८५३

४) १० मार्च १८९७  ५) बालिका दिन

● **स्वयं अध्ययन प्रश्न २ ची उत्तरे :**

**अ)** १) बुलढाणा २) ताराबाई शिंदे ३) विजयालक्ष्मी

४) स्त्रियांचे गुण दाखविणे ५) महात्मा जोतीराव फुले

● **स्वयं अध्ययन प्रश्न ३ ची उत्तरे :**

**अ)** १) माळेहरंजी २) कलकत्ता ३) अमेरिका

४) मुंबई ५) १९१९

## २.५ सारांश :

'स्त्री-सुधारक' या प्रकरणामध्ये आपण भारताच्या आद्य शिक्षिका व मुख्याध्यापिका म्हणून ज्यांचा गौरव केला जातो त्या सावित्रीबाई फुले यांच्या जीवन व कार्याचा आढावा घेतला. यामध्ये त्यांचे पूर्वायुष्य, त्यांचा जोतीरावांशी विवाह, प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी घेतलेले शिक्षण, त्यांचे शैक्षणिक कार्य, अस्पृश्यांसाठीचे कार्य, दुष्काळग्रस्तांना केलेली मदत, स्त्रियांच्या उद्धारासाठी केलेले कार्य, प्लेगच्या धामधुमीत रुग्णांना केलेले सहकार्य इ. मुद्यांवर चर्चा केली. सावित्रीबाईंनी समाजासाठी केलेले हे कार्य सोपे कार्य नव्हते. तरीही त्या डगमगल्या नाहीत. प्रचलित परिस्थितीच्या प्रवाहाविरुद्ध जावून त्यांनी केलेले कार्य सर्वांनी अभ्यासणे आवश्यक आहे.

या प्रकरणात आपण ज्यांचा अभ्यास केला, त्या दुसऱ्या स्त्री-सुधारक 'ताराबाई शिंदे' त्यांनी सावित्रीबाईंसारखे शैक्षणिक, सामाजिक व सार्वजनिक कार्य सक्रियपणे केले नसले, तरी त्या सत्यशोधक विचारसरणीने प्रेरीत होत्या. तत्कालीन समाजाने स्त्रियांना दिलेली दुय्यम वागणूक त्यांना रुचली नाही. व त्यांनी आपल्या 'स्त्री-पुरुष' तुलना' या पुस्तकाद्वारे याविरुद्ध बंड केले. त्यांची भाषा आणि त्यांनी मांडलेले विचार हे अतिशय परखड होते. ते काळाच्याही पुढच पाऊल होते. पण तरीही आज ताराबाई शिंदे विषयी लोकांना खूप कमी माहिती आहे. कारण आजपर्यंत त्यांच्या जीवनावर खूप कमी लिहिले गेले आणि जे लिहिले गेले त्यासाठी पुरेशी माहिती उपलब्ध झालेली नाही. पण ताराबाई शिंदे यांचे चरित्र, त्यांचे विचार व कार्य आज समाजापर्यंत, विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. त्यासाठी संशोधन होणे गरजेचे आहे. ते न झाल्यामुळेच ताराबाईंविषयी आपणास खूप कमी माहिती आहे. परिणामी आज त्यांना साहित्यीकांमध्ये स्थान दिले जात नाही आणि समाजसुधारक म्हणूनही गणले जात नाही. त्या महाराष्ट्राच्या समाजसुधारकांच्या यादीमध्ये उपेक्षितच राहिल्या. पण तत्कालीन परिस्थितीमध्ये त्यांच्या विचारांचा अभ्यास केल्यास आपल्या असे लक्षात येते की, त्यांचे विचार व कृती म्हणजे स्त्री सुधारणेच्या बाबतीतील मैलाचा दगड होय.

महाराष्ट्राच्या समाजसुधारणेच्या इतिहासात ताराबाईंसारखीच उपेक्षित राहिलेली स्त्री कैवारी महिला / स्त्री सुधारक म्हणजे 'पंडिता रमाबाई' होय. या प्रकरणात आपण पंडिता रमाबाईंचे पूर्वचरित्र, त्यांचे महाराष्ट्रातील समाजकार्य, ख्रिस्ती धर्माचा स्वीकार, शारदा सदनची स्थापना व स्त्री-उद्धाराचे कार्य, इतर

सार्वजनिक कार्य, वाङ्मयनिर्मिती, त्यांच्या कार्याचा परिणाम आणि त्या अनुषंगाने त्यांचे महााष्ट्राच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण स्थान इ. ची सांगोपांग चर्चा केली. त्यातून नक्कीच विद्यार्थ्यांना उपयुक्त माहिती मिळेल व पंडिता रमाबाईंचे कार्य सर्वांपर्यंत पोहोचेल व त्यांच्या कार्याला न्याय मिळेल.

**२.६ सरावासाठी स्वाध्याय.**

**अ) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. साविबिाई फुले यांच्या जीवन व कार्याचा आढावा घ्या.

२. सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक कार्याची चर्चा करा.

३. सावित्रीबाई फुले यांच्या सामाजिक कार्यावर प्रकाश टाका.

४. महाराष्ट्रातील स्त्री-सुधारक म्हणून ताराबाई शिंदेंचे कार्य स्पष्ट करा.

५. ताराबाई शिंदेच्या स्त्री-पुरुष तुलना ग्रंथाची थोडक्यात माहिती द्या.

६. ताराबाई शिंदेंच्या जीवन व कार्यावर प्रकाश टाका.

७. पंडिता रमाबाईंच्या स्त्री उद्धाराच्या कार्याचा आढावा घ्या.

८. पंडिता रमाबाईंचे सार्वजनिक कार्य स्पष्ट करा.

९. पंडिता रमाबाईंच्या कार्याचा भारतात व भारताबाहेरील देशात काय परिणाम झाला/

**ब) टीपा लिहा :**

१. सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक कार्य.

२. सावित्रीबाई फुले यांचे स्त्री उद्धाराचे कार्य

३. साविबिाई फुले यांचे अनिष्ठ प्रथांविरुद्धचे कार्य.

४. ताराबाई शिंदे

५. पंडिता रमाबाईंचे वाङ्मय

६. पंडिता रमाबाईंचे दुष्काळातील कार्य.

७. पंडिता रमाबाईंचे महाराष्ट्राच्या इतिहासातील स्थान.

## २.७ संदर्भ ग्रंथ सूची :

१. संपा. डॉ. मा. गो. माळी, सावित्रीबाई फुले, समग्र वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि मंडळ.

२. कीर धनंजय, महात्मा जोतिराव फुले, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९६८.

३. डॉ. सौ. नागतोंडे किरण, कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले, दिलीपराज प्रकाशन प्रा. लि., पुणे २६ जानेवारी २०१३.

४. झोडगे फुलवंताबाई, साध्वी सावित्रीबाई फुले, चिनार पब्लिशर्स, धनकवडी, पुणे, मे. २०१३.

५. संपा. प्रा. नरके हरी, आम्ही पाहिलेले महात्मा फुले, महात्मा जोतिराव फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई, ६ जून १९९३

६. डॉ. सौंदडकर सारनाथ, (संपादक) सावित्रीबाई फुले-समग्र वाङ्मय, सारनाथ प्रकाशन बुक डेपो, परभणी, १२ जानेवारी २०१३.

७. भालेराव इंद्रजीत, महाराष्ट्राचे शिल्पकार, ताराबाई शिंदे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २६ मार्च २००३.

८. शिंदे ताराबाई, महात्मा फुले पुरस्कृत - स्त्री पुरुष तुलना, सत्यशोधक ग्रंथमाला, नागपूर, २६ ऑक्टोबर २००१.

९. टिळक देवदत्त नारायण, महाराष्ट्राची तेजस्विनी : पंडिता रमाबाई, नागरिक प्रकाशन, नाशिक, १९६०.

१०. अत्रे प्र.के, मराठी माणसे, मराठी मने, परचुरे प्रकाशन, मुंबई, १९७२.

११. केळकर न. चिं, (संपादक), लनेकमान्य टिळकांचे चरित्र खंड-१, केळकर प्रकाशन, पुणे, १९२३.

१२. पंडिता रमाबाई, युनायटेड स्टेटस्‌ची लोकस्थिती व प्रवासवृत्त, भाग-१, वि.म. वाळवेकर, मुंबई, १९८९.

१३. कानिटकर काशीबाई, डॉ. सौ. आनंदीबाई जोशी यांचे चरित्र.

१४. कर्वे धोंडो केशव, आत्मवृत्त, वामन मल्हार जोशी, हिंगणे, १९२८.

१५. Shaha A. B. (ed). The leters and correspondence of Pandita Pamabai, Maharashtra State Board for Literature and Culture, Bombay, June 1997.

❖❖❖

## घटक – ३

# समाज सुधारक

**अनुक्रमणिका :**


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ लहुजी साळवे

३.२.२ विठ्ठल रामजी शिंदे

१.२.३ गाडगे महाराज

३.२.४ आण्णा भाऊ साठे

३.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

३.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ संदर्भ ग्रंथ


**३.० उद्दिष्टे :**

या घटकाच्या अभ्यासाची उद्दिष्ट्ये –

- महाराष्ट्रातील समाज सुधारकांच्या कार्याचा परिचय करून घेणे.
- लहुजी साळवे यांच्या कार्याची ओळख करून घेणे.
- विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कार्याची ओळख करून घेणे.
- गाडगे महाराज यांच्या कार्याची ओळख करून घेणे.
- अण्णा भाऊ साठे यांच्या कार्याची ओळख करून घेणे.
- या महाराष्ट्रातील समाजसुधारकांच्या कार्याची तुलनात्मक ओळख करून घेता येईल.

## ३.१ प्रास्ताविक :

१८१८ ला पेशवाईचा पराभव करून इंग्रजांनी आपली सत्ता महाराष्ट्रात स्थापन केली. महाराष्ट्रात प्राचीन काळापासून किती तरी राजकीय स्थित्यांतरे झाली. राजकीय क्षेत्रात सतत संघर्ष होई पण समाजजीवनात मात्र कोणतेही बदल झाले नव्हते. पण ब्रिटीशांची राजवट, पाश्चात्य, शिक्षण व पाश्चात्य विचार यामुळे महाराष्ट्रातील जीवनपद्धती, संस्कार, समजुती व श्रद्धा यांना आव्हान मिळाले. वर्षानुवर्षे वर्णव्यवस्था व जातीपद्धतीमध्ये समाज विभागाला गेला होता. धर्माचा प्रचंड प्रभाव त्यातून निर्माण झालेले कर्मकांडाचे स्तोम रुढीपरंपरा, अंधश्रद्धा, शब्दप्रामाण्य यामुळे समाजात विषमता निर्माण झाली. स्त्रियांची व शुद्रांची अतिशय दयनीय स्थिती झाली. समाज धर्मभोळेपणा, अज्ञान, रूढीप्रियता व शिक्षणाचा अभाव यामुळे गतीहीन झाला होता. पाश्चात्य शिक्षण, ब्रिटीशाचा एकछत्री अंमल, कायद्यापुढे सर्वसमान हे तत्त्व, दळणवळणाची साधने, यामुळे आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेची सुरूवात झाली. परिणाम स्वरूप राष्ट्रवाद उदयाबरोबरच सामाजिक व धार्मिक चळवळीचीही सुरूवात महाराष्ट्रात सुरू झाली. जातीयतेची कडक बंधने, अस्पृश्यता, स्त्रिया संबंधित अनिष्ठ रूढी परंपरा या विरुद्ध समाजप्रबोधनासाठी भारतात अनेक समाजसुधारक निर्माण झाले.

## ३.२ विषय विवेचन :

### ३.२.१ लहुजी साळवे :

महाराष्ट्रात ब्रिटीशांची सत्ता स्थीर होऊ लागली. त्याचबरोबर सामाजिक सांस्कृतिक परिवर्तने होऊ लागली. शिक्षणाचा प्रसारही होऊ लागला होता. पण ही प्रगती ठराविक उच्चभ्रूवर्गापुरती मर्यादित होती. हाच वर्ग ब्रिटीशांच्या धोरणाचा लाभार्थी होता. हाच वर्ग आधुनिक शिक्षण घेऊन आर्थिक प्रगती करीत होता. सामाजिक श्रेष्ठत्व तर त्यांच्याकडे होतेच. मात्र बहुजन समाज आर्थिक व सामाजिक क्षेत्रात मागासलेलाच होता. जातीभेदाने समाज कुंठीत झाला होता. अशावेळी महात्मा फुले यांनी स्त्रिया व शुद्रासाठी शिक्षणाची दारे खुली केली. जोतिबा फुले यांनी समाज सुधारणेसाठी सामाजिक प्रश्नांच्या मुळाशीच घाव घातला. सामाजिक प्रश्नाचा धर्माशी संबंध असतोच. धर्मकृत्यातील खोटारडेपणा त्यांनी उघड केला. अंधश्रद्धा व रूढी परंपरा यावर कठोर आघात केले. त्यांनी सामाजिक समतेचा पुरस्कार केला. लहुजी मांग तथा लहुजी साळवे वस्ताद हे एकोणीसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या इतिहासातील एक लढवय्ये क्रांतीकारक व्यक्तिमत्त्व होते. लहुजी साळवे महात्मा फुलेच्या चळवळीचे खंदे पुरस्कर्ते होते. जोतिबा फुलेंच्या कार्यात सक्रिय सहभागी होते. तसेच ते वसाहतवादा विरोधी राष्ट्रवादी लढ्यातील दलित नायक म्हणूनही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले.

- **जीवन चरित्र :**

लहूजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ साली पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील पेठे या गावी झाला. त्यांच्या आईचे नाव विठाबाई व वडीलांचे नाव राघोजी असे होते. राघोजीस दोन मुलगे होते. थोरला शिवाजी व लहान लहुजी. त्यांचे वडील राघोजी शस्त्रविद्या व मल्लविद्येमध्ये निपूण होते. इंग्रजांचे पेशव्याशी खडकी येथे १८१७ ला युद्ध झाले या युद्धात राघोजी शहीद झाले. या लढाईत लहुजीही लढले होते. आपल्या

डोळ्यादेखत त्यांनी रणांगणात पित्याचा मृत्यू बघितला होता. त्याच वेळेस त्यांनी इंग्रजांची राजवट उलथवून टाकण्याचा विचार केला होता. या पेशव्यांची हार झाली होती. लहुजींच्या पूर्वजाकडे शिवकाळात पुरंदर किल्याचे संरक्षणाची जबाबदारी होती. या किल्ल्याचे संरक्षण करीत. त्यांच्या पराक्रमामुळे या घराण्याला राऊत ही मानाची पदवी शिवाजी महाराजांनी प्रदान केली होती. लहुजी साळवे यांच्याकडे पूर्वजांकडून पराक्रमाचा वारसा चालत आला होता. त्यांच्या घराण्यात तलवार, दांडपट्टा, कट्यार, भाला, बर्ची, खंजीर, निशानेबाजी, घोडेस्वारी आदि शस्त्रविद्यांचा परंपरागत वारसा चालत आला होता. सन १८२२ मध्ये लहुजींने गंजपेठेत तालीम स्थापन करून शस्त्रविद्या, शारीरिक कसरतीचे खेळ, व्यायाम यांचे प्रशिक्षण देणे सुरू केले. ते अविवाहित होते. त्यांचा मृत्यू १७ फेब्रुवारी १८८१ रोजी ८७ व्या वर्षी झाला. त्यांना ८६ वर्षाचे आयुष्य लाभले.

पुण्यातील दलित जातीजमातींचा इतिहास कथन करणाऱ्या लेखात डॉ. एलिनॉर झेलियट यांनी लिहिले आहे की, ''विसाव्या शतकाच्या आरंभापर्यंत ऐतिहासिक नोंदीमध्ये पुण्याच्या केवळ लहुजी मांग या एकमात्र दलित व्यक्तीचे नाव सापडते.'' यावरून लहुजी साळवे हे त्या काळात सामाजिक चळवळीत व क्रांतिकारी चळवळीत सक्रिय होते.

**● पुण्याच्या गंजपेठेत तालीमीची स्थापना :**

लहुजींनी पुण्याच्या गंजपेठेत १८२२ मध्ये तालीमीची स्थापना केली. तरुणांना प्रशिक्षित करण्यासाठी देशातील पहिली तालीम, युद्ध कलाकौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू केले. या तालमीत समाजातील सर्वच जातीची मुले प्रशिक्षणासाठी येऊ लागली. त्यांच्या या आखाड्यातून हजारो क्रांतीकारक तरूण तयार झाले. उमाजी नाईक, वासूदेव बळवंत फडके, गोपाळ गणेश आगरकर, चाफेकर, क्रांतिवीर नाना दरबारे, महात्मा फुले, सदाशिवराव गोवंडे, मोरो विठ्ठल वाळवेकर, नाना छत्रे, परांजपे असे शेकडो देशभक्त व क्रांतिकारकांना यांनी प्रशिक्षण दिले. महात्मा फुले यांनी लहुजीच्या गंजपेठेतील तालमीत व दांडपट्टा, तलवारबाजी, गोळीबार आदी शारीरिक शिक्षण घेतले. १८४७ च्या दरम्यान फुले व लहुजी यांची भेट झाली. फुले यांचे ते शारीरिक शिक्षण देणारे गुरु होते. उमाजी नाईक व वासूदेव बळवंत फडके यांनी इंग्रजाविरुद्ध सशस्त्र बंड केले. १८५७ च्या बंडातही त्यांच्या तालमीत शिकलेल्या क्रांतीवीरांनी भाग घेतला होता. त्यातील काही शहीदही झाले होते. साताऱ्याच्या उठावाचा कट केल्याबद्दल बाविया मांग, मोशिया मांग, यशवंत मांग, मुल्ल्या मांग या लहुजीच्या पराक्रमी शिष्यांना ७ सप्टेंबर १८५७ रोजी साताऱ्याच्या झेंडा मैदानावर फाशी देण्यात आली.

लहुजीने एका बाजूला स्वातंत्र्यासाठी तरूण धाडशी क्रांतीवीर तयार केले तर दुसऱ्या बाजूला महात्मा जोतिबा फुले यांच्या सामाजिक कार्याला समर्थ साथ दिली.

**● महात्मा फुलेच्या चळवळीत कृतीशील पाठिंबा :**

महात्मा फुले यांनी अस्पृश्यांसाठी मुला-मुलींसाठी शाळा सुरू केल्यानंतर या शाळेमध्ये मुले आणण्यासाठी मांग, महाराच्या वस्त्यांमध्ये जाऊन लहुजी व राणबा महार यांनी प्रयत्न केले. सन १८४८ ते १८५५ या काळात

शाळा प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी खुप मोठे परिश्रम घेतल्याची नोंद आहे. १५ सप्टेंबर, १८५३ च्या ज्ञानोदयाला दिलेल्या मुलाखतीत महात्मा जोतीबा फुले यांनी म्हटले आहे की, ''मुलींसाठी प्रथम शाळा सुरू केल्याने आमच्या जातवाल्यास फार वाईट वाटले व प्रत्यक्ष माझ्या बापाने देखील आम्हाला घराबाहेर घालवले. शाळेसाठी कोणी जागा देईना. बांधावयास रुपये नव्हते. लोक आपली मुले पाठवण्यास इच्छिणात. परंतू त्यावेळी लहुजी राघोजी राऊत मांग व राणबा महार यांनी शिकल्यापासून कसकसे लाभ आहेत हे आपल्या जातवाल्यांस समजाऊन त्यांची खात्री केली.'' लहुजींच्या तालमीतच सावित्रीबाई फुले यांची मुलींची शाळा भरत असे. लहुजीचे हे योगदान प्रभावी व मुलभूत होते त्यांनी आपली पुतणी मुक्ता साळवे हीस देखील शाळेत दाखल केले. ही वयाच्या चौदाव्या वर्षी महार मांगाच्या दु:खाविषयीचा निबंध लिहून ब्राह्मणी व्यवस्थेविरुद्ध विद्रोह पुकारते.

जोतिबा आणि सावित्रीबाई यांच्या शरीरसंरक्षणाची जबाबदारी त्यांनी निकरांनी निभावली. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांना सनातनी ब्राह्मण गुंडांकडून होणाऱ्या छळाचा बंदोबस्त स्वत: आपल्या सहकाऱ्यांसह करतात.

अस्पृश्यांसाठी शैक्षणिक कार्य केल्याबद्दल म. फुले यांच्या शिक्षण खात्याने १६ नोव्हेंबर १८५२ रोजी पुण्यात सत्कार केला त्या समारंभास लहूजी साळवे जातीने हजर होते.

● **स्वामी दयांनद सरस्वती यांची मिरवणूक :**

१८७५ मध्ये पुण्यातील उदारमतवादी ब्राह्मणी सुधारकांनी आर्य समाजाचे प्रणेते दयानंद सरस्वती यांची पुण्यात मिरवणूक काढण्याचा कार्यक्रम आयोजित केला या वेळी सनातनी विचारांच्या गुंडांनी त्याला हिंसक विरोध केला. या गुंडाचा बंदोबस्त करून मिरवणूक यशस्वी पार पाडण्याकरीता पुण्यातील सुधारक मंडळीने महात्मा फुले यांच्याकडे मदत मागितली. फुले यांनी या मिरवणुकीला विरोध करणाऱ्या गुंडांचा बंदोबस्त करण्याचे काम लहुजीला दिले. यासंदर्भात त्यांच्या दत्तक पुत्र यशवंत याचे सासरे व फुले यांचे अनुयायी ग्यानोबा कृष्णाजी ससाणे म्हणतात की, ''पुण्यात दयानंद सरस्वती आले असता त्यांची मिरवणूक निघाली असता मारामारी होऊ नये म्हणून त्यांनी मला व लहुजी मांगाचे मुलाला व आणखी इतर मंडळीला मिरवणूकी बरोबर पाठविले होते.''

● **अस्पृश्यांसाठी विहीर खोदली :**

अस्पृश्यांना सवर्ण आपल्या विहीरीवर पाणी भरू देत नसत. त्यांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागे. अशा वेळी त्यांनी आपल्या गंजपेठ तालमीजवळ १८२२ मध्ये स्वत: विहीर खोदली बांधली व त्या विहीरीचे पाणी भरण्यास अस्पृश्य जातीला परवानगी दिली.

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–१**

**अ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१. पेशवाईची सत्ता ............ साली संपुष्टात आली.

अ) १८१८ ब) १८२६ क) १८१९ ड) १८१२

२. लहूजीच्या पूर्वजांकडे शिवकाळात ........... या किल्याची जबाबदारी होती.

अ) रायगड ब) पुरंदर क) पन्हाळा ड) विशाळगड

३. लहूजीने पुण्यात .......... पेठेत १९२२ साली तालमीची स्थापना केली.

अ) गंजपेठ ब) बुधवारपेठ क) गुरुवारपेठ ड) मंगळवारपेठ

**ब) एका वाक्यात प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) शिवाजी महाराजांनी लहूजी साळवी यांच्या घराण्याला कोणती पदवी दिली होती?

२) लहूजी साळवे यांच्या तालमीतून प्रशिक्षित झालेल्या दोन क्रांतिकारकांची नांवे सांगा?

३) मांग महारांच्या दुःखा विषयीचा निबंध कोणी लिहिला?

४) जोतिबा व साविबिाई फुले यांच्या संरक्षणाची जबाबदारी कोणी घेतली होती?

## ३.२.२ विठ्ठल रामजी शिंदे :

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये महर्षि विठ्ठल रामजी यांनी मौलिक स्वरूपाचे कार्य केले आहे. त्यांच्या कार्याचा, विशेषत: आधुनिक मानवतावादी विचारांचा समाज निर्माण करण्यासाठी संशोधनपर कार्य केले. त्याबरोबरच संस्थात्मक कार्याची उभारणी केली. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे हे एक सेवाभावी कार्यकर्ते होते. त्यांचा पिंड हा मुख्यत: धर्मप्रसारक, तत्त्वचिंतक व इतिहास संशोधक असा बनलेला होता. त्यांनी अस्पृश्यता निवारण्याचे कार्य केले. हे कार्य करीत असताना त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. उपहास, अवहेलना आणि कठोर टीका सहन करून त्यांनी आपले कार्य नेटाने चालविले. ख्रिस्ती मिशनऱ्यांप्रमाणे अस्पृश्योद्धाराच्या कार्यासाठी मिशन झाले पाहिजे अशी कल्पना होती. त्यांनी केलेल्या सामाजिक कार्यासाठी बडोदे सरकारचा पुरस्कार यांना मिळाला. दि. १८ जून १९३२ रोजी वि. रा. शिंदे यांना महात्मा गांधींच्या अध्यक्षतेखाली 'महर्षि' ही पदवी प्रदान करण्यात आली.

● **सामाजिक कार्य :**

समाजातील अनिष्ठ रूढी परंपराना विरोध केला. अस्पृश्यातेच्या रूढी विरुद्ध समाज जागृतीच्या कार्याबरोबरच या समस्येचा शोध संशोधनाद्वारे घेण्याचाही प्रयत्न केला. सन १९०३ साली अहमदनगर जिल्ह्यातील भिंगार गावी त्यांना रात्री बारा वाजता अस्पृश्यांच्या सभेसाठी बोलावले होते. तिथे गेल्यानंतर

त्यांना अस्पृश्य समाजाची हृदयद्रावक स्थिती पहायला मिळाली व त्यांनी निर्धार केला की, यापुढे अस्पृश्यांसाठी कार्य करायचे. अस्पृश्यतेच्या प्रश्नाबाबत त्यांची सर्वत्र दृष्टी होती. ते म्हणतात, ''अस्पृश्यतेचा प्रश्न केवळ चर्चेने विद्वत्ता प्रदर्शनाने, अथवा सभा-परिषदांमधून केल्या जाणाऱ्या वादविवादाने सुटणार नाही. आता आम्हास सोडवावयाचा प्रश्न विचार प्रांतातला नसून इच्छाप्रांतातला आहे. यासाठी भारंभार ग्रंथांच्या आधाराची गरज नाही. अंत:करणात उत्कट इच्छेचा प्रभाव असल्यामुळेच अस्पृश्यतेचा प्रश्न सुटत नाही.''

**● होळीच्या सणाविरुद्ध प्रचार :**

होळीच्या सणाला शिव्या देणे, दारू पिणे, अंगाला शेण-राख लावणे अशा परंपरेला त्यांनी विरोध केला. त्यांनी या संदर्भात प्रबोधन करण्यासाठी किर्लोस्कर थिएटरात या संदर्भात एक सभा घेतली होती. या संदर्भात त्यांना होळीच्या सणाविरुद्ध मोहीम काढणारा एक प्रचारक म्हणून ते प्रसिद्ध झाले होते.

**● गुन्हेगार जाती व विठ्ठल रामजी शिंदे :**

गुन्हेगार जातीसंबंधित त्यांनी २५ मे १९१६ रोजी पुण्याच्या वसंत व्याख्यान मालेत ''गुन्हेगार जातीची सुधारणा'' या विषयावर व्याख्यान दिले.

**● डिप्रेस्ड क्लासेस मिशन (भारतीय निराश्रित सहाय्यकारी मंडळी)**

महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्यता निवारण्याच्या कार्याला प्राथमिकता दिली. हे कार्य अत्यंत कष्टाचे होते. कारण अस्पृश्यता नष्ट करावयाची तर धर्म रूढीमुळे पाळले जाणारे आचार बंद करणे गरजेचे होते. त्यासाठी त्यांनी अस्पृश्यता निवारण्याचे कार्य संस्थात्मक पातळीवर केले.

अस्पृश्य उद्धारासाठी त्यांच्यावर होणारी जुलूम, जबरदस्ती, अन्याय दूर करण्यासाठी दि. ८ ऑक्टोबर, १९०६ रोजी मुंबई येथे नराश्रित सहाय्यकारी मंडळ अर्थात 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन' ची स्थापना केली.

**● डिस्प्रेस्ड क्लासेस मिशनचे प्रमुख उद्देश :**

१. अस्पृश्य समाजात शिक्षणाचा प्रसार करणे त्यांच्यासाठी शाळा, उद्योग-शाळा, दवाखाने व वसतीगृहे काढणे.

२. स्पृश्य समाजचे परिवर्तन करणे, अस्पृश्यता निवारण्यासाठी सर्व स्तरातून पाठिंबा मिळवणे. विशेषत: राष्ट्रीय सभेने देखील आपल्या कार्यक्रमांत अस्पृश्यता निवारणाला महत्त्वाचे स्थान द्यावे म्हणून प्रयत्न करणे. तसेच अस्पृश्यता निवारणाच्या कार्यात सरकारचेही सहाय्य मिळविण्याचा प्रयत्न करणे.

३. अस्पृश्यांना नोकऱ्या मिळवून देणे व त्यांच्या सामाजिक अडचणींचे निवारण करणे.

४. अस्पृश्यांच्या ठिकाणी सार्वजनिक धर्म, व्यक्तिगत शील व नागरिकत्व, इ. गुणांचा प्रसार करणे.

५. अस्पृश्यांमध्ये शिक्षणाविषयी आस्था निर्माण करून त्यांना सामाजिक व राष्ट्रीय कर्तव्याची दीक्षा देणे.

अस्पृश्यता निवारण्याच्या कामासाठी त्यांचे सर्व कुटूंब मुंबई येथील परळच्या महार वस्तीत हालवले. त्यांच्या बहिण जनाक्का यांनी अस्पृश्य स्त्रियांची सेवा-सुश्रुषा केली. त्यांची दुसरी बहिण तन्याक्का यांनी एका क्षय झालेल्या मुलीची सेवा सुश्रुषा करतांना त्यांनाही क्षयाची लागण झाली. त्यातच त्यांचा मृत्यू झाला. आई यमुनाबाई यांनी अस्पृश्यांच्या मुलाचे संगोपन केले. जुन्या कपड्यापासून पोलकी, अंगडी, परकर इत्यादी बनविण्याचे कार्य केले. त्यांच्या वडिलांनी हिशेब लिहिण्याचे काम केले. अशा पद्धतीने त्यांचे सर्व कुटुंब अस्पृश्यता निवारण्याचे काम अस्पृश्यांच्या वस्तीत राहून काम करत होते. त्या काळात असे हे एकमेव कुटुंब होते. हे काम करताना समाजाने त्यांची अवहेलना केली तरी ते डगमगले नाहीत.

या मिशनतर्फे महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात या प्रांतात दलित वर्गासाठी प्राथमिक व माध्यमिक वर्गाच्या शाळा सुरू करण्यात आल्या. त्यांच्यासाठी वसतिगृहे, मोफत दवाखाने, रात्रीच्या शाळा यासारखे उपक्रम हाती घेतले. सन १९१२ पर्यंत अस्पृश्य वर्गातील मुलांसाठी २५ शाळा काढण्यास शिंदेनी यश मिळविले. शिक्षण प्रसार, नोकऱ्या मिळवून सामाजिक आडचणींचे निवारण करणे, सार्वत्रिक धर्म, व्यक्तिगत शील आणि नागरिकता या गुणांचा प्रसार करणे अशी महत्त्वाची कामे या मिशनद्वारे करण्यात आली. समाज प्रबोधनासाठी किर्तन व व्याख्यानांचा उपयोग केला. मुंबई, पुणे, सातारा, कोल्हापूर, मालवण, हुबळी, ठाणे, अमरावती, मद्रास इ. ठिकाणी वसतिगृहे व शिक्षण संस्था मिशनद्वारे काढण्यात आल्या. शिक्षणाबरोबरच अस्पृश्यांसाठी औद्योगिक शिक्षण देण्यास सुरूवात केली.

राष्ट्रीय सभेच्या कलकत्ता अधिवेशनात अस्पृश्य निवारण्याचा ठराव पास करण्यात आला. सन १९१७ च्या कलकत्ता येथे भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात त्यांनी अस्पृश्यता निवारण्याचा ठराव त्यांच्या प्रयत्नाने मंजूर करण्यात आला. तो असा होता, ''ही राष्ट्रीय सभा हिंदूस्थानातील सर्व लोकांस जाहीर विनंती करते की, अस्पृश्य समाजावर आजपावेतो जी जुलूम जबरदस्ती करण्यात आलेली आहे, ती ताबडतोब बंद करण्यात यावी व त्यांना इतर नागरीकांना उपलब्ध असलेले सर्व नागरी हक्क समानतेने उपभोगण्याची संधी द्यावी.'' महर्षी वि. रा. शिंदे यांच्या प्रयत्नातून अस्पृश्यता निवारण्याचा कार्यक्रम आखिल भारतीय पातळीवर जाऊन पोहोचला.

● **प्रार्थना समाजाचे कार्य :**

मुंबई येथे केशवचंद्र सेन यांनी सन १८६७ मध्ये प्रार्थना समाजाची स्थापना केली होती. वि. रा. शिंदे यांनी भांडारकरांच्या सहाय्याने प्रार्थन समाजाचे कार्य पुढे चालवले. सन १८९८ साली त्यांनी प्रार्थना समाजाची दीक्षा घेतली. तौलनिक धर्मशास्त्राचे शिक्षण घेण्यासाठी ते ऑक्सफर्ड येथे मँचेस्टर कॉलेजमध्ये सन १९०१ मध्ये दाखल झाले. धर्मोपदेशक होण्याची परिपूर्ण तयारी करून सन १९०३ च्या अखेरीस ते परत आले व याच वर्षी त्यांनी प्रार्थना समाजाचे धर्मप्रचारक म्हणून अपाल्या जीवीत कार्याला प्रारंभ केला. धर्मप्रचाराच्या कार्यातही त्यांनी आपली कल्पकता आणि संघटकन कौशल्य दाखवले. मुंबई येथील प्रार्थना समाजाची मरगळ झटकून काढली.

पत्रकांद्वारे धर्मप्रचार करण्यासाठी 'पोस्टल मिशन'च्या स्थापनेला प्रेरणा देऊन पुढे त्यांनी ते स्वत: चालविले. धर्माविषयीची गोडी वाढविण्यासाठी उदार धर्मग्रंथ वर्ग चालविला. धर्मविधी चालविण्याचे शिक्षण

देण्यासाठी तरूण ब्रह्मसंघ काढला. धर्मप्रचार करण्याच्या हेतूने शेकडो व्याख्याने मुंबईत आणि मुंबई इलाख्यातील ठिकठिकाणच्या प्रार्थना समाजात दिली. सन १९०३ ते १९१४ पर्यंत राष्ट्रीयसभेच्या अधिवेशनाच्या वेळी भारतीय एकेश्वरी धर्मपरिषद नियमीतपणे भरवण्यात पुढाकार घेतला. १९१८ मध्ये पुण्यात कौटुंबिक उपासना मंडळाची स्थापना करून धर्मकार्य चालविले. सन १९२३ मध्ये मंगळूर येथे ब्राह्मसमाजाचे आचार्य म्हणून जोमाने कार्य केले.

● **वायकोम सत्याग्रह :**

महर्षि वि. रा शिंदे इ.स. १९२३ मध्ये डिप्रेस्ड क्लास मिशनच्या कार्यातून निवृत्त झाले. त्यानंतर ते ब्राह्मो समाजाचे आचार्य म्हणून दक्षिणेत गेले. दक्षिणेत त्रावणकोर संस्थानात वायकोम येथे अस्पश्य लोकांवर फार बंधने होती. येथील मंदिरात व मंदिराच्या रस्त्यावर अस्पृश्य लोकांना जाण्यायेण्याची मनाई होती. हा अन्याय नष्ट करण्यासाठी इ.स. १९२४ मध्ये मोठा सत्याग्रह करण्यात आला. त्यांनी अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश दिला पाहिजे असे प्रतिपादन केले. वि.रा. शिंदे यांच्या या सत्याग्रहामुळे त्यांचेकडून ब्राह्मो समाजाचे आचार्यपद काढून घेण्यात आले.

● **स्त्रीविषयक कार्य :**

विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्यता निवारण कार्याच्या जोडीने प्राधान्य दिले ते स्त्रीविषयक समस्यांना त्यांनी १९०७ साली पतित, दलित व विधवा स्त्रियांसाठी निराश्रित महिला समाज ही संस्था स्थापन केली. या संस्थेच्या दोन शाखा परळ व भायखळा येथे काढण्यात आल्या. या सदनातील प्रशिक्षित स्त्रियां घरोघरी जाऊन स्त्रियांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करीत असत. स्त्रियांच्या आरोग्याची काळजी घेत असत. रामजी व जनाक्का हे दोघे विविध कुटुंबांना भेट देऊन स्त्रियांची विचारपूस करत. स्त्री-पुरुषात समानता आणावी भावनिक ऐक्य व्हावे असा प्रयत्न करीत.

सन १९१२ मध्ये स्त्रियांसाठी खास परिषद बोलाविली होती. रमाबाई रानडे या ह्या परिषदेच्या अध्यक्षा होत्या. लोकांना व्यसनांपासून मुक्त करणे, स्त्रीशिक्षणासाठी प्रोत्साहन देणे, मुरळी प्रथा बंद करण्यासाठी प्रयत्न केला. त्यांनी २५ एप्रिल १९१० रोजी देवदासीच्या प्रश्नावर एक सभा घेतली. त्यांनी अनेक मुरळ्यांचे विवाह लावून दिले. देवदासीच्या प्रश्नावर त्यांनी ऑक्टोबर १९०७ मध्ये 'मुरळी अथवा हिंदुस्थानातील हिंदू देवळातील अनीति-मूलक आणि बीभत्स प्रकार' हा संशोधनपर लेख लिहिला स्त्रियांनाही धर्म प्रसाराचे कार्य करू द्यावे, त्यांना शिक्षण द्यावे अशी मागणी केली. सन १९१९ मध्ये पुणे नगरपालिकेने मुलाप्रमाणे मुलींनाही सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची सोय उपलब्ध करून द्यावी यासाठी चळवळ संघटीत केली. महर्षि वि. रा. शिंदेंनी सन १९२३ मध्ये पुणे येथे महिलांसाठी 'अहिल्याश्रम' या संस्थेची स्थापना केली.

● **शेतकरी चळवळ :**

शेतकरी वर्गाची हालाखीची स्थिती कशी सुधारावी, हा त्यांच्या उत्तरकालीन कार्यातील एक प्रमुख कळीचा विषय होता. सन १९२६ ते १९३२ या कालखंडात शेतकऱ्यांच्या परिषदांमध्ये अध्यक्षपदावरून भाषणे

करून त्यांच्यात जागृती करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. बहुजन पक्षाच्या वतीने निवडणूक लढवित असताना त्यांनी काढलेल्या जहीरनाम्यात एक पिडीत, शोषित वर्ग म्हणून त्यांनी शेतकरी वर्गाचा निर्देश केला आहे. अस्पृश्यांची शेतकरी परिषद (१९२६ पुणे), मुंबई इलाखा शेतकरी परिषद (१९२८ पुणे), वाळवे तालूका शेतकरी परिषद (१९३१ बोरगाव), संस्थानी शेतकरी परिषद (१९३२ तेरदाळ) व चंदगड तालूका शेतकरी परिषद (१९३२ वडनेर) या पाच परिषदांमध्ये त्यांनी अध्यक्षपदावरून भाषणे केली. या पाच परिषदांमध्ये त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्येचे वस्तुनिष्ठ विवरण करून स्वत:च्या भूमिकेवरून मुलगामी उपाय सुचवले आहेत. भूमीहीन शेतकऱ्यांना जमीन मिळाली पाहिजे, दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची पाळी येऊ नये, राजकारणात शेतकऱ्यांना स्थान असले पाहिजे, शेतकऱ्यांनी संघटित झाले पाहिजे. शेतसारा वाढीविरुद्ध शेतकऱ्यांनी आंदोलन केले पाहिजे, असे विचार मांडले.

**● स्वातंत्र्य चळवळीतील योगदान :**

विठ्ठल रामजी शिंदे हे महात्मा गांधी यांच्या विचारांचे पुरस्कर्ते होते. सन १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीत महर्षि शिंदेंनी सक्रीय सहभाग घेतला, त्याबद्दल त्यांना अटक झाली होती. त्यावेळी त्यांना येरवडा तुरुंगात ठेवण्यात आले. सहा महिन्यांची सक्तमजूरीची शिक्षा त्यांनी भोगली. सविनय कायदेभंग चळवळीचा झंझावती प्रचार त्यांनी केला. या कामी त्यांच्या पत्नी देखील त्यांच्या समवेत असत.

**● संशोधन व लेखन :**

विठ्ठल रामजी शिंदे हे थोर साहित्यिक व तत्त्वचिंतक आणि संशोधक होते. त्यांनी कवने ही रचली आहेत. त्यांनी रचलेल्या महात्मा फुलेचा पोवाडा प्रसिद्ध आहे. ते रोजनिशी लिहित असत. सन १९०८ साली त्यांनी बहिष्कृत भारत हा सुप्रसिद्ध दिर्घ निबंध लिहिला. या निबंधात त्यांनी अस्पृश्यांच्या प्रश्नांकडे तीव्रतेने लक्ष वेधले. नागपूर येथील नवभारत ग्रंथालयाने १९३३ साली 'भारतीय अस्पृश्यांचा प्रश्न' या ग्रंथात त्यांनी अस्पृश्यतेच्या उगमापासूनचा इतिहास व बुद्धपूर्वकाळापासून ते वर्तमान काळापर्यंत दिसणारी अस्पृश्यतेची रूपे याचे साधार असे विवेचन केले आहे. त्यांचे समाजशास्त्रीय स्वरूपाचे 'माझ्या अठवणी व अनुभव' हे आत्मचरित्र त्यांनी येरवड्याच्या तुरुंगात लिहिले. महाराष्ट्रीय ज्ञानकोशाच्या सातव्या खंडासाठी त्यांनी 'अस्पृश्यतानिवारणाचा आधुनिक इतिहास' हा संशोधनात्मक माहितीपूर्व लेख लिहिला. 'भागवत धर्माचा विकास' हा संशोधनपर प्रबंध लिहिला. यांनी लिहिलेला वैचारिक स्वरूपाच्या लेखाचा संग्रह सन १९६३ मध्ये 'शिंदे लेखसंग्रह' या नावाने प्रसिद्ध झाला आहे. त्यांचे धर्मविषयक व अन्य असंग्रहीत लेखन सन १९७९ मध्ये महाराष्ट्र शासनाने 'धर्म, जीवन व तत्त्वज्ञान' ह्या सातशे पृष्ठाच्या बृहद ग्रंथामध्ये प्रसिद्ध केला आहे. यांनी ब्रह्मधर्माचे प्रचारक या नात्याने त्यांनी वेळोवेळी केलेले उपदेश, दिलेली व्याख्याने व लिहिलेले लेख सन १९९२ साली बी. बी. केसरकर यांनी 'विठ्ठलरामजी शिंदे यांचे लेख व्याख्यान व उपदेश' म्हणून प्रसिद्ध केले. यात एकंदर शहाऐंशी लेख समाविष्ट आहेत.

**● योग्यता :**

महर्षि वि. रा. शिंदे यांनी जीवनभर अस्पृश्यता निर्मूलनाचे कार्य केले. त्यांनी अस्पृश्यांचे जीवनमान

उंचावण्यासाठी कार्य केले. त्यासाठी त्यांनी भारतभर भ्रमंती केली. जनसभा घेतल्या व त्यामधून समाज प्रबोधनाचे कार्य केले. डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या माध्यमातून महर्षि शिंदे यांनी दलित, शेतकरी, स्त्रिया, वाईट प्रथा, शिक्षण अशा विविध क्षेत्रात कार्य केले. त्यांच्या या कार्याच्या गौरवार्थ इतिहास संशोधक वि. का.राजवाडे यांनी महाराष्ट्राच्या निवडक कर्त्या पुरुषांमध्ये त्यांची गणना अंत्यज्योद्धारक म्हणून केली आहे.

सन १९४३ मध्ये त्यांना अर्धांगवायुचा झटका आला व त्यामध्ये त्यांचा २ जानेवारी १९४४ मध्ये मृत्यू झाला.

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–२**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१. वि. रा. शिंदे यांनी इ.स. १९१७ मध्ये ........... येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात अस्पृश्यता निवारणाचा ठराव पास करून घेतला होता.

२. वि. रा. शिंदे यांनी पुण्यात १९१८ साली .......... मंडळाची स्थापना करून धर्मकार्य चालवले.

३. वि. रा. शिंदे यांनी प्रार्थना समाजाच्या प्रचारासाठी, पत्रकांद्वारे धर्मप्रसार करण्यासाठी ......... च्या स्थापनेला प्रेरणा देऊन पुढे त्यांनी ते स्वत: चालविले.

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) वि. रा. शिंदे यांनी अस्पृश्यांसाठी कोणत्या संस्थेची स्थापना केली?

२) भारतीय अस्पृश्यतेचा शोध हा ग्रंथ कोणी लिहिला?

३) वि. रा. शिंदे यांना 'महर्षि' ही पदवी कोणाच्या हस्ते देण्यात आली?

४) वि. रा. शिंदे यांच्या आत्मचरित्राचे नाव सांगा?

५) वि. रा. शिंदे यांनी अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशासाठी कोणता सत्याग्रह केला?

## ३.२.३ गाडगे महाराज (सन १९८६ ते १९५६)

गाडगे महाराजांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालूक्यातील शेणगाव येथे २३ फेब्रुवारी १८७६ रोजी झाला. त्यांच्या वडीलांचे नाव झिंगराजी व आईचे नाव सखुबाई होते. गाडगे महाराजांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर होते. ते परीट समाजाचे होते. बलुतेदारांपैकी परीट हा महत्त्वाचा बलुतेदार गाव–कामगार होता. गावाच्या आसामीची कपडे धुण्याचे काम त्याला करावे लागत होते. त्या बदल्यात त्याला बलुतं मिळत असे. हेच त्यांच्या उत्पन्नाचे साधन होते. भारतीय सामाजातील खालच्या जाती अंधश्रद्धा व परंपरेच्या गर्तेत अडकलेल्या होत्या. परीट समाजात व्यसनाधिनता सर्वत्र होती. कर्ज काढून सण साजरे करावेत, मुलाच्या जन्माच्या वेळी किंवा मृत्यूच्या वेळी देवाला बकरे कापावेत, दारू प्यावी आणि कर्ज फेडण्यात पुढील आयुष्य घालवावे हे चित्र सार्वत्रिक होते. झिंगाराजींची आर्थिक परिस्थिती चांगली होती. मात्र त्यांना दारूचे व्यसन

लागले या व्यसनापायी त्यांचे सर्व जमीन घर सावकाराच्या ताब्यात गेले. सखुबाईला नवऱ्याच्या व्यसनापायी मोल मजूरी करावी लागली. मुलांना पोटभर अन्न देणे अशक्य झाले. यातच झिंगारजीचा मृत्यू झाला.

● **बालपण :**

अशा संकटाच्या समयी सखुबाईचे भाऊ चंद्रभान यांनी मदतीचा हात दिला. चंद्रभान कडे शेती होती. त्याने बहिणीला व भाच्याला आपल्या गावी दर्यापूर येथे आणले. आता डेबू मामाचे गुरे चारण्याचे काम करू लागला. गुरे चारताना आपल्या सहकार्यांसोबत जातीपातीचा विचार न करता ते जेवत. या बालमित्रांसोबत पोहणे, हुतुतू, आट्यापट्या, सुरपारंब्या, कुस्ती इ. खेळ ते खळत असत. थोड्याच दिवसात त्यांनी मामाची शेती कसायला सुरू केली. नांगरणे, पेरणी, मळणी या कामात त्यांनी प्राविण्य मिळविले. शेतीची कामे संपताच ते रात्रीच्यावेळी भजनाला जात. त्यांना भजनाची आवड निर्माण झाली. त्यांनी त्यामध्ये प्राविण्य मिळविले. त्यांनी भजनातून लोकप्रियता मिळविली. शेतीत कष्ट करून मामावर असलेले कर्ज त्यांनी फेडले. मामाच्या अज्ञानाचा फायदा घेऊन जमीन बळकावण्याचा सावकाराचा हेतू होता तो त्यांनी सफल होऊ दिला नाही. आपल्या कर्तृत्वावर त्यांनी पंचक्रोशीत प्रतिष्ठा मिळविली. आता लोक त्यांना देवसिंग म्हणू लागले.

● **विवाह :**

डेबुचा विवाह ते १५-१६ वर्षाचे असताना मसापूरच्या धनाजी खल्लारकरांची कन्या कुंताबाई हिच्या बरोबर झाला. त्यांना अलका, कलावती या दोन मुली व मुदगल व गोपाळ अशी दोन मुले झाली. मुल झाल्यानंतर त्यांनी मटनाचे जेवण दिले नाही. दारू मटनाने समाजाचे वाटोळे केले आहे. तेव्हा त्यांनी गोड जेवण समाजाला दिले. डेबुजीने शेती व अखंड लोकसेवा यात त्यांनी स्वत:ला झोकून दिले.

● **गृहत्याग :**

लोकसेवा करताना समाजात वावरताना त्यांना मानवी जीवनातील दु:ख, दैन्य, अनिश्चितता, इ. गोष्टींच्या अनुभवाने ते अंतर्मुख बनले. जीवनातील निरनिराळ्या प्रश्नांचा शोध घेण्याचा प्रयत्न ते करू लागले. स्वत:च्या संसारातील त्यांचे लक्ष उडाले. १ फेब्रुवारी १९०५ रोजी जगाचा संसार सुखी करण्यासाठी ते घराबाहेर पडले. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेशात त्यांनी भटकंती केली. त्यांच्या अंगावर फाटक्या चिंध्यांचे कपडे असत व अन्न व पाणी घेण्यासाठी गाडगे असा वेश त्यांनी धारण केला. काम केल्याशिवाय कोठेही भाकरीला स्पर्श केला नाही. सुरूवातीला विचित्र वेषामुळे लोकांचे शिव्याशाप सहन केले. तोंडातून शब्दही न उच्चारता मार सहन केला. सर्व प्रकारचा उपहास, छळणूक निंदा त्यांनी शांतपणे सहन केली.

● **सामाजिक परिस्थिती संबंधित निरीक्षणे :**

त्यांनी भटकंती करताना कारखान्यातून राबवणाऱ्या मजुरांची दयनीय अवस्था पाहिली. सावकारांच्या ओझ्याखाली दबलेल्या कुटुंबांची अगतिकता पाहिली. अनेक देवदेवता पुजा पद्धती, त्यांना बळी देण्यासाठी कोंबड्या बकऱ्यांच्या होणाऱ्या कत्तली पाहिल्या. समाजातील स्पृश्यास्पृश्य भेदाभेद पाहिला. भगत, मांत्रिक, गंडे-दोरे, ताईत देणारे देवऋषी यांचा दांभिकपणा पाहिला. समाजात शिक्षणाचा अभाव, कमालीचे दारिद्र्य,

अज्ञान, अनिष्ट चालिरीती व अंधश्रद्धा पाहून त्यांनी निरपेक्ष लोकसेवेचे व लोक शिक्षणाचे व्रत अंगिकारले. त्यांनी वयाच्या ८० वर्षापर्यंत समाजाची अखंड सेवा केली. २० डिसेंबर १९५६ रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. अमरावती येथे त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले तेथेच त्यांची समाधी आहे. गाडगे महाराजांच्या प्रातोप्रांतीच्या भटकंतीत ठिकठिकाणचे लोक त्यांना निरनिराळ्या नावाने ओळखत होते. वऱ्हाडात त्यांना डेबूजी बुवा वट्टीसाधु म्हणत. नागपूरकडे चापरेबुवा म्हणत, मद्रास आणि कोंकण विभागात गोधडे महाराज, सातारा जिल्ह्यात लोटके महाराज, गोकर्णाकडे चिंधेबुवा, पुणे, बडोदा व खानदेशात त्यांना गाडगे महाराज आणि निकटवर्तीय त्यांना नुसते बाबा म्हणत.

● **लोक शिक्षणाचे कार्य :**

गाडगे बाबांना लहानपणा पासून भजनाची आवड होती. तुकाराम महाराजांचे अभंग त्यांना मुखोद्गत होते. त्यांच्यावर तुकाराम महाराज व संत कबिरांचा प्रभाव होता. त्यांनी अज्ञानी समाजाला सज्ञान करण्यासाठी किर्तनाचा उपयोग केला. त्यांनी किर्तन हे समाज प्रबोधनाचे साधन बनवले व गोपाला-गोपाला देवकीनंदन गोपाला या नामकिर्तनाने मानवजातीला सुज्ञ करण्याचा प्रयत्न केला.

● **किर्तनातून उपदेश :**

आपल्या किर्तनातून त्यांनी समाजातील दांभिकपणा रूढी परंपरा गाडगे महाराजांनी आपल्या किर्तनाची सुरूवात विदर्भातील ऋणमोचन या आपल्या गावापासून सुरूकेली. त्यांनी संपूर्ण महाराष्ट्र, आंध्र, गुजरात या प्रदेशातील गावात फिरून किर्तनाद्वारा लोकजागृतीचे कार्य केले. त्यांनी आपल्या किर्तनातून भुकेल्याला जेवण, तहानलेल्यांना पाणी, उघड्या-नागड्यांना वस्त्र, गरीब मुलांना शिक्षणासाठी मदत, बेघरांना आसरा, अंध-पंगू रोग्यांना औषधोपचार, बेकारांना रोजगार, पशु-पक्षी मुक्या प्राण्यांना अभय, गरीब तरूण-तरुणींचे लग्न, दुःखी आणि निराशांना हिंमत द्यावी, हा संदेश त्यांनी दिला. गाडगे महाराजांचे किर्तन हा एक लोकविलक्षण अनुभव असे. त्यांच्याकडे सूक्ष्म निरीक्षण शक्ती होती. समाजातील दोषांचा अचूक वेध घेण्याची क्षमता त्यांच्याकडे होती. यातून ते समाजाच्या मर्मावर बोट ठेवत व किर्तनातून ते श्रोत्याशी सुसंवाद साधत. श्रोत्यांना प्रश्न विचारून त्यांना त्यांचे अज्ञान, दुर्गुन व दोष यांची जाणीव करून देत. त्यांची भाषा साधी-सुबोध व श्रोत्यांच्या अंत:करणाला जाऊन भिडणारी होती. त्यांनी सर्व सामान्य लोकांना दोन वेळा कमी खा पण मुलांना शाळा शिकवा, कर्ज काढून कोणताही उत्सव साजरा करू नका, देवाला बळी देण्यासाठी मुक्या प्राण्याची हत्या करू नका, चोरी करू नका, देवऋषी भगत यांच्या नादी लागू नका, गोरगरीबावर दया करा, आपल्या अन्नातील एक घास तरी गरीबांना व दिन-दुबळ्यांना द्या या सारख्या महत्त्वपूर्ण विषय ते आपल्या किर्तनातून हाताळत असत.

● **किर्तनाची अनोखी पद्धत :**

त्यांच्या किर्तनाचे वैशिष्ट्य म्हणजे परमेश्वर प्राप्तीचे साधन म्हणून त्यांनी किर्तनाचा उपयोग केला नाही तर त्यांनी किर्तनाचा उपयोग सामाजिक जागृतीचे साधन म्हणून वापरले. त्यांची किर्तनाची पद्धती ही वेगळी व प्रभावकारी होती. त्यांना टाळ मृदंग पेटी यासारखे साधने लागत नसत. दोन दगड हातात घेऊन त्याचा टाळा

सारखा उपयोग करत श्रोत्यांना प्रश्न विचारून त्यांच्या उत्तराच्या आधारेच समाज सुधारणेचा विचार यांच्या मनात खोलवर रूजवत. श्रोत्यांना ते नामस्मरण करावयास लावत. अतिशय साधी व सर्वसामान्य व्यक्तीच्या जीवनातील उदाहरणे देऊन सुधारणेचा विचार समाजाच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न ते किर्तनाच्या माध्यमातून करत. पारमार्थिक विषया बरोबरच व्यवहारिक व नैतिक विषयांचाही त्यांनी आपल्या किर्तनातून लोकजागृतीसाठी उपयोग करून घेतला. स्वच्छता, प्रामाणिकपणा, भूतदया व जातिभेदाचा नाश या विषयावर त्यांचा मोठा भर असे. बाबांनी आपला स्वतंत्र खराटा संप्रदाय निर्माण केला. खराट्याने नुसता गावातील घरातील कचराकाढला नाही तर त्यांनी माणसांचे जुने विचार झाडून माणसाची मने स्वच्छ करण्याचा आयुष्यभर प्रयत्न केला. स्वच्छतेचे महत्त्व त्यांनी केवळ किर्तनातून सांगितले नाही तर प्रत्यक्ष कृती करून दाखवत खेडेगावात किर्तन असेल तर गाव झाडून स्वच्छ करीत. तीर्थक्षेत्री किर्तन असेल तर देव दर्शन न घेता बाहेरच थांबून स्वच्छता व यात्रेकरूची सेवा करीत.

**● सदावर्ते चालवली :**

त्यांनी गोरगरीब लोकांसाठी सदावर्ते चालवली. या मार्फत गरीब लोकांना चांगले जेवण दिले. पण स्वत: मात्र गरीब घरून आणलेली भाकरीच खाल्ली. त्यांच्या पोषाखाबरोबरच त्यांचे खाणे ही साधे होते. जवळ असलेल्या गाडग्यात किंवा हातावर जेवण करत.

माणसात देव शोधणाऱ्या या संताने लोकांनी दिलेल्या देणग्यांतील पैशातून रंजल्या-गांजल्या, अनाथ लोकांसाठी महाराष्ट्रात ठिकठिकाणी धर्मशाळा, अनाथालये, आश्रम व विद्यालये सुरू केली. पंढरपूर, नाशिक, आळंदी येथे यात्रेकरूला राहण्यासाठी धर्मशाळा बांधल्या. पुण्यात सोमवारपेठेतही धर्मशाळा बांधली. मुंबईत जे. जे. हॉस्पिटल शेजारी पारशी ट्रस्टच्या जागेत एक तीन मजली भव्य धर्मशाळा बांधली.

प्रबोधनकार ठाकरे यांनी गाडगे महाराजांच्या हयातीतच त्यांनी त्यांचे चरित्र लिहिले. त्यांच्या किर्तनाच्या संदर्भात ते म्हणतत की, 'बाबाच्या किर्तनाचे शब्दचित्र उभे करणे माझ्या ताकदी बाहेरचे आहे.'

गाडगे बाबांच्या ओघवत्या वऱ्हाडी वाणीतले किर्तन ऐकूण आचार्य अत्रे म्हणतात, ''सिंहाला पहावे वनात, हत्तीला पहावे रानात, गाडगे महाराजांना पहावं किर्तनात.''

गाडगे महाराजांनी आपली गादी किंवा मठ स्थापन केला नाही. इतकेच काय त्यांनी कोणालाही व कधीही आपल्या पाया पडू दले नाही. संत तुकाराम हे माझे गुरु व माझा शिष्य कोणीही नाही, असे त्यांनी म्हटले होते.

**● स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - ३**

**अ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१) गाडगे महाराजांवर ........... व .......... संतांचा प्रभाव होता.

२) गाडगे महाराजांना कोकण विभागात ........... नावाने ओळखतात.

३) गाडगे महाराजांनी ............ नाम किर्तनाने समजाला सुज्ञ बनविले.

४) नागपूरकडे गाडगे महाराजांना ........... नावाने ओळखतात.

५) गाडगे महाराजांच्या हयातीत ............ यांनी त्यांचे चरित्र लिहिले.

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) गाडगे महाराजांची समाधी कोणत्या शहरात आहे?

२) गाडगे बाबानी आपल्या किर्तनाची सुरूवात कोणत्या गावातून केली?

३) गाडगे महाराजांनी निर्माण केलेल्या संप्रदायाचे नाव सांगा?

४) वऱ्हाड प्रांतात गाडगे महाराजांना कोणत्या नावाने ओळखतात ?

५) सिंहाला पहावे वनात, हत्तीला पहावे रानात व गाडगे महाराजांना पहावे किर्तनात असे कोणी म्हटले आहे?

**१.२.४ अण्णा भाऊ साठे :**

अण्णा भाऊ साठे मराठी साहित्य विश्वातले एक मौल्यवान रत्न आहेत. अण्णा भाऊ एक प्रतिथयश कलाकार होते. लोकशाहीर ही उपाधी या कलावंताला लोकांनी दिली होती. निद्रिस्त समाजाला जाग आणण्याइतका जोश त्यांच्या लेखनीत होता. क्रांती त्यांच्या साहित्याचा मुलमंत्र होता. पोवाडे, लावण्या, गीतं, पदं या काव्यप्रकाराचा त्यांनी सामान्य कष्टकरी जनतेत विचारांच्या प्रचारासाठी वापर केला. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळात राजकीय व सामाजिक प्रश्नांविषयी त्यांनी मोठी जागृती केली. त्यात संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती चळवळ यामध्ये त्यांनी त्यांच्या शाहीरी वाङ्मय प्रकारातून लोक जागृती केली. त्यांचे साहित्य जगभर पोहचले ते अनेक भाषात भाषांतरीत झाले. त्यांना ४९ वर्षाचे आयुष्य लाभले. त्यांचा मृत्यू १८ जुलै १९६९ रोजी झाला.

**● जीवन चरित्र :**

अण्णाभाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी वाटेगांव तालुका वाळवा जिल्हा सांगली येथे मातंग समाजात झाला. त्यांचे वडील भाऊ साठे व आई वालूबाई यांना तुकाराम, शंकर आणि जाई अशी मुले होती. त्यांचे मुळ नाव तुकाराम होते. त्यांना वडिलांनी वाटेगावच्या शाळेत घातले पण शिक्षकाच्या निर्दयी मारामुळे दोन दिवसात शाळा सोडली. १९३२ साली ते वडीलाबरोबर वाटेगांव ते मुंबई असा पायी प्रवास करून आले. त्यांनी मुंबईत हमाली, कोळसा वाहणे, गिरणी कामगार अशी मिळेल ते काम केले.

**● कम्युनिष्ट पक्षाचे कार्य :**

माटुंगा लेबर कॅम्पमध्ये ते राहत. माटुंगा झोपडपट्टीत कम्युनिष्ट पक्षाचे कार्यालय होते. तेथे लाल बावटा यूनियन होती. या यूनियनमध्ये कॉम्रेड अण्णा भाऊ साठे यांची जडणघडण झाली. १९६३ मध्ये ते भारतीय

कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या प्रभावाखाली आल्यावर ते कम्युनिष्ट पक्षाचे कार्यकर्ते झाले. खऱ्या अर्थाने कम्युनिस्ट पक्षानेच अण्णा भाऊंना एक महान लेखक, कलावंत व शाहीर म्हणून घडविले. अण्णा भाऊ मुंबईत कम्युनिस्ट विचारांच्या सभा संमेलनाचे आयोजन करणे, विविध प्रकारची पाम्प्लेटस्, हॅण्डबील वाटणे, मोर्चे संप हरताळ यशस्वी करण्यासाठी पोस्टर्स रंगविणे, डकवणे, रस्त्यावर घोषणा लिहिणे अशी कामे त्यांनी त्यांच्या तरूण वयात करायला सुरूवात केली.

● **अण्णा भाऊचे साहित्य :**

अण्णा भाऊ लिहित तेव्हा पांढरपेशा वर्गाच लेखनाची परंपरा सांभाळात होता. वाङ्मयीन नेतृत्व याच समाजाकडे होते त्यांचे विषय वेगळे होते. पण अण्णा भाऊंनी आपल्या प्रतिभेतून सर्वसामान्यांच चित्रण केले. अण्णा भाऊंकडे जन्मजात प्रतिमा होती. गोड गळा, संघर्षात उडी घेण्याची प्रवृत्ती यामुळे त्यांच्या प्रतिभेला पंख फुटले. कथाकार कादंबरीकार, शाहीर, तमाशा व वगनाट्य लेखन अशी त्यांची साहित्यिक कामगिरी आहे. अण्णा भाऊंनी ३२ कादंबऱ्या, १४ कथा संग्रह, लोकनाट्य, १२ पोवाडे, इनामदार हे नाटक व 'माझा रशियाचा प्रवास हे प्रवास वर्णन एवढे साहित्य निर्माण केले. त्यांची प्रत्येक साहित्यकृती वाचकांच्या मनाचा ठाव घेणारी आहे.

हे साहित्य केवळ करमणुकीसाठी नाही असे अण्णा भाऊ नेहमी म्हणत. ते म्हणतात, ''माझ्या साहित्यातील माणसं मला भेटलेली असतात. त्यांचं जगणं, मरणं मला माहित आहे.'' असा अस्सलपणा त्यांच्या साहित्यात आहे.

अण्णा भाऊ यांना कार्यकर्ते लेखक असे म्हटलं गेलं, कारण आपल्या साहित्याला त्यांनी सामाजिक चळवळीशी जोडलं. सामान्य लोक कष्टकरी लोकांशी त्यांची बांधीलकी होती. अण्णा भाऊंच्या लिखानात वर्गीय दृष्टिकोण दिसतो. जातीय विषमतेचे वर्णनही येते. ते केवळ जातीय विषमतेतून निर्माण झालेल्या दु:ख उगळत बसत नाहीत तर जग बदलण्याचा निर्धार करतात. जग बदलण्यासाठी नुसते लिहित वा गात नव्हते. स्वत: लढत होते व इतरांनाही लढण्याची प्रेरणा देत होते. त्यांच्या 'वैजयंता' कादंबरीच्या प्रस्तावानेत ते म्हणतात, ''पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांच्या, श्रमिकांच्या तळहातावर तरली आहे.'' त्यांच्या साहित्यातील त्यांनी केलेली वर्णन त्यांच्या सूक्ष्म निरीक्षणाची साथ देतात. त्याचे साहित्य मानवी जीवनातील संघर्ष, नाट्य, दु:ख, दारिद्र्य यांनी भरलेले आहे. त्यांच्या कथा कादंबऱ्यातून त्यांनी चितारलेल्या माणसात जबरदस्त जीवनेच्छा दिसते.

अण्णा भाऊंची फकिरा कादंबरीला १९६१ मध्ये महाराष्ट्र राज्य सरकारचे पहिले पारितोषिक मिळाले. ही कादंबरी अस्पृश्य व्यक्तीच्या पराक्रमाचे चित्रण करणारी आहे. या कादंबरीच्या ३५ आवृत्या निघाल्या. फकिरा हिंदी व पंजाबी भाषेत लोकप्रिय झाली. 'माकडीचा माळ' मध्ये भटक्याचं जीवन आहे. 'चंदन' मध्ये स्त्री व भटक्याच्या व्यथा आहेत.' चिखलातील कमळ' मध्ये त्यांनी देवदासीची समस्या मांडली आहे. 'वैजयंता' मध्ये त्यांनी तमासगीरांच्या व्यथा मांडल्या आहेत. 'चित्रा' मध्ये कामगारांचा लढा त्यांनी चित्रित केला आहे. चित्रा कादंबरी कन्नड, रशियन, पोलिश भाषेत भाषांतरित झाली. 'वारणेचा वाघ' गुजराती भाषेत प्रचंड लोकप्रिय झाली. अण्णा भाऊच्या कथा कादंबऱ्या रशियन विद्यापीठात अभ्यासक्रमाला नेमल्या गेल्या. भारतातील जवळजवळ

सर्व भाषांत त्यांच्या कथा कादंबऱ्या भाषांतरित झाल्या. त्यांच्या सात कादंबऱ्यांवर चित्रपट निघाले आहेत. त्यांच्या 'वैजयंता', टिळा लावते मी रक्ताचा', 'डोंगरची मैना', 'मुरळी मल्हारी रायाची', 'वारणेचा वाघ', 'साताऱ्याची तऱ्हा' व 'फकिरा' या कादंबरीवर चित्रपट निघाले. 'फकिरा' या चित्रपटात त्यांनी भूमिकाही केली होती.

**● अण्णा भाऊ साठे यांची साहित्य विषयक भूमिका :**

'वैजयंता' कादंबरीच्या प्रस्तावनेत त्यांनी साहित्य विषयक भूमिका मांडली आहे. ते म्हणतात, ''जो कलावंत जनतेची कदर करतो त्याची कदर जनता करते हे मी प्रथम शिकून मगच लेखन करीत आहे. माझ्या देशावर, जनतेवर आणि तिच्या संघर्षावर अटळ विश्वास आहे. देश सुखी व्हावा, समृद्ध व्हावा, इथे समानता नांदावी, महाराष्ट्राच्या भूमीचे नंदनवन व्हावे अशी मला रोज स्वप्ने पडतात.

त्यांच्या साहित्याच्या व कार्याच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक अन्यायामुळे जो समाज शैक्षणिक, सांस्कृतिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे, त्या समाजामध्ये आत्मविश्वास निर्माण केला.

**● 'चले जाव' चळवळीतील सहभाग :**

कोहिनूर मिलची नोकरी सुटल्याने ते पुन्हा वाटेगावला आले. पण त्यांचे मन लागेना त्यांनी त्यांचा चुलत भाऊ बापू साठे याच्या तमाशाच्या फडात काम करू लागले. महाराष्ट्राच्या तमाशा या कलेच्या परंपरेत वैशिष्टपूर्ण भर घातली. त्याला कारणही तसे झाले होते. अण्णा भाऊंच्या 'लाल बावटा कला पथका'वर बंदी घातली. पुढे तमाशावरही बंदी घातली. तेव्हा त्यांनी तमाशाच्या कलेला लोकनाट्यात रूपांतरीत केले. त्या त्या काळच्या राजकीय परिस्थितीबद्दल सामान्यामध्ये जागृती घडवण्याच मोठे काम त्यांच्या वगनाट्यांनी केले. तमाशाची सुरूवात श्री गणेशाचे वंदन करून होत असे ही परंपरा मोडून अण्णा भाऊ यांनी तमाशाला नवे रूप दिले. त्याला नवे विषय व नवा अविष्कार दिला. पहिल्या नमनात मातृभूमी हुतात्मे, राष्ट्रपुरुष यांचा समावेश झाला. गणातील कृष्ण गवळणी काढून टाकल्या. त्यामध्ये अमुलाग्र परिवर्तन केले. लावणी व तमाशा लोकशिक्षणाकडे वळवण्याचे श्रेय अण्णा भाऊला द्यावे लागले. थोडक्यात, महात्मा फुलेंचा सत्यशोधकी जलसा व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीतील आंबेडकरी जलशाची समाज प्रबोधनाची क्रांतीकारी परंपरा नव्या लोकनाट्यातून पुढे आणली.

''प्रथम मायभूमीच्या चरणा।<br>
छत्रपती शिवाजी चरणा।<br>
स्मरोनी गातो कवणा।।''

'चलेजाव' चळवळीच्या काळात वाटेगावात बर्डे गुरुजीच्या नेतृत्वाखाली अनेक घडामोडी सुरू होत्या. टेलिफोन लाईन कापून टाकण्या सारख्या घडामोडी घडत होत्या. त्यात अण्णा भाऊ त्यात सामिल असल्याने त्यांच्यावर वॉरंट निघाले. परिणामी त्यांना कायमचे घर सोडावे लागले. पुढे त्यांच्या विचाराला दिशा मिळत

गेली व कम्युनिष्ट पक्षाचे पुर्ण वेळ काम करायला सुरूवात केली. पक्ष कार्यासाठी झोकून दिले.

लाल बावटा कला पथकाची स्थापना १९४४ साली टिटवाळा येथील शेतकरी परिषदेत केली. यात शाहीर अमर शेख, अण्णा भाऊ व गव्हाणकर एकत्र आले. लावण्या, पोवाडे, पथनाट्य लिहिण्यास सुरूवात केली. त्यांनी एकूण १५ वगनाट्य लिहिली व यातून त्यांना प्रसिद्धी मिळत गेली. मुंबई सरकारने लाल बावटा कलापथकावर बंदी घातली होती. पुढे तमाशावरही बंदी आली. तमाशातील कलाकाराचे संसार उघड्यावर आले. अण्णांनी तमाशाचे लोकनाट्यामध्ये रूपांतर करून सरकारची बंदी कुचकामी ठरवली. त्यांनी १३ लोकनाट्ये लिहिली.

**● लाल बावटा कलाकथकाची स्थापना :**

टिटवाळा येथे १९४४ साली झालेल्या शेतकरी परिषदेत दत्ता गवाणकर आणि अमर शेख या शाहीरांच्या सोबत लाल बावटा कलापथकाची स्थापना केली. या कलापथकाच्या माध्यमातून त्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळ जनजागृतीचे कार्य केले.

**● संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील योगदान :**

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र घडविण्यात अण्णा भाऊ यांचा सिंहाचा वाटा होता. गुजरात राज्याने मुंबई गुजरातला जोडून द्यावी अशी मागणी केली. महाराष्ट्र आणि गुजरात यांच्यामध्ये मुंबईसाठी संघर्ष पेटला. तेव्हा संयुक्त म्हाराष्ट्राचा लढा उग्र व गतिमान करण्यासाठी लाल बावटा कलापथकाच्या माध्यमातून मराठी माणसाला जागृत करण्यासाठी अण्णा भाऊ संपूर्ण महाराष्ट्रात रात्रंदिवस फिरले. त्यांनी याच पार्श्वभूमीवर ''माझी मैना गावावर राहिली'' ही लावणी मुंबईवर लिहिली. ही लावणी रुपकात्मक आहे. यातील मैना म्हणजे बेळगाव, कारवार इ. सिमा भाग पती-पत्नीच्या विरहाचे रूपक साधून सिमा भाग महाराष्ट्रापासून अलग होतो व सिमा भागातील मराठी जनता महाराष्ट्रात येण्यासाठी तळमळते. अशा दोघांच्या भाव बंधनाची कहाणी या लावणीमध्ये व्यक्त होते. त्यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मोरारजी देसाई होते. त्यांनी अण्णा भाऊंना कोणताही दोष नसताना अमरावतीच्या तुरुंगात डांबून ठेवले. त्यांच्यावर मानसिक, शारीरिक अन्याय अत्याचार केले.

बाबूराव बागूल यांनी अण्णा भाऊ यांची तुलना प्रसिद्ध रशियन साहित्यिक मॅक्सिम गॉर्की यांच्याशी केली आहे. आणि महाराष्ट्राचा मॅक्सिम गॉर्की असा गौरव केला आहे.

**● स्वातंत्र्य मिळाले त्याच्या दुसऱ्या दिवशी मुंबईत मोर्चा :**

१६ ऑगस्ट १९४७ ला अण्णा भाऊ यांनी मुंबईत मोठा मोर्चा काढला. या मोर्चाला हजारो लोक उपस्थित होते. या मोर्चाची प्रमुख घोषणा ''ये आझादी झुठी है, देश की जनता भूकी है।''

अण्णा भाऊ साठे यांनी प्रचंड मोठी ग्रंथ संपदा निर्माण करून सामान्य माणसाचे दुःख दारिद्र्य मांडले. त्यांच्या साहित्यातील पात्र हे समाजातील सामान्य लोकांचे प्रतिनिधित्व करतात. सामाजिक विषमते विरुद्ध लढतात. साहित्यातून त्यांनी समाजाचे जिवंत चित्रण केले. लालबावटा कलापथकाची स्थापना करून संयुक्त

महाराष्ट्राच्या चळवळीत स्वातंत्र्याच्या चळवळीत योगदान दिले. लावणी व तमाशा या कला पथकाला लोकशिक्षणाकडे वळवण्याचे श्रेय अण्णा भाऊला द्यावे लागते.

● **स्वयं अध्ययन प्रश्न - ४**

**अ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१. अण्णा भाऊंच्या .............. कादंबरीला महाराष्ट्र राज्य सरकारचे परितोषिक मिळाले आहे.

२. अण्णा भाऊंची गुजराती भाषेत .............. कादंबरी लोकप्रिय झाली.

३. अण्णा भाऊंच्या .............. कादंबऱ्यांवर चित्रपट निघाले.

४ लावणी व तमाशाला लोकशिक्षणाकडे वळविण्याचे कार्य ........... यांनी केले.

**ब) एका वाक्यात प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. अण्णा भाऊ यांनी कोणत्या नेत्याच्या प्रभावाने कम्युनिस्ट पक्षाचे कार्य केले?

२. 'पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांच्या, श्रमिकांच्या तळहातावर तरली आहे' हे विधान अण्णा भाऊंच्या कोणत्या कादंबरीच्या प्रस्तावनेमध्ये आहे?

३. अण्णा भाऊ साठे यांनी कोणत्या कादंबरीतून तमासगिरांच्या कथा मांडल्या आहेत?

४. अण्णा भाऊंच्या कोणत्या कादंबरीत कामगारांच्या लढ्याचे चित्रण आले आहे?

५. माझा रशियाचा प्रवास हे प्रवास वर्णन कोणी लिहिले?

६. लाल बावटा कलापथकाची स्थापना कोणत्या साली झाली?

७. महाराष्ट्राचा मॅक्सिम गॉर्की असा अण्णा भाऊचा गौरव कोणी केला?

## ३.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ :

१. पारमार्थिक विषय - अध्यात्मिक विषय

२. निरपेक्ष लोकसेवा - कोणत्याही फळाची अपेक्षा न ठेवता, भेदभाव न करता केलेली लोकसेवा.

३. अंधश्रद्धा - अशा रूढी परंपरा ज्या सारासार विवेकावर आधारीत नसतात.

४. प्रार्थना समाज - ब्राह्मो समाजाची स्थापना १९२८ मध्ये राजाराम मोहन रॉय यांनी केली. या समाजाचे मुळ स्त्रोत प्राचीन धर्मग्रंथ होते. ब्राह्मो समाजापासून प्रेरणेतून प्रार्थना समाजाची स्थापना केली होती. पण प्रार्थना समाजावर पाश्चात्य विचार व ख्रिश्चन धर्मातील विचारांचा प्रभाव निर्माण झाल्यामुळे हिंदू धर्मातील एक सुधारणावादी पंथ म्हणून प्रचारात आला.

५. मुरळी - खंडोबा या देवतेस मुल होण्यासाठी नवस बोलला जातो. असे नवसाने झालेले पहिले

मुल खंडोबाला सोडण्याचा रिवाज आहे. मुलगी असेल तर मुरळी व मुलगा असेल तर वाघ्या म्हणतात. मुरळीला देवाची दासी म्हणून रहावे लागते तिला विवाह करता येत नाही.

६. नास्तिक - देव व कर्मकांड न मानणारा

७. सदावर्ते - अन्नछत्रे

**३.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

- **स्वयं अध्ययन प्रश्न १ ची उत्तरे**

**अ)** १) सन १८१८ २) पुरंदर ३) गंजपेठ

**ब)** १) राऊत

२) उमाजी नाईक, वासूदेव बळवंत फडके, गोपाळ गणेश आगरकर, चाफेकर क्रांतीवीर नाना दरबारे, महात्मा फुले, सदाशिवराव गोवंडे, मोरो विठ्ठल वाळवेकर, नाना छत्रे, परांजपे, असे शेकडो देशभक्त व क्रांतीकारांना त्यांनी प्रशिक्षण दिले.

३) मुक्ता साळवे

४) लहुजी साळवे

- **स्वयं अध्ययन प्रश्न २ ची उत्तरे :**

**अ)** १) कलकत्ता २) कौटुंबिक उपासना मंडळी ३) पोस्टल मिशन

**ब)** १) डिप्रेस्ड क्लासेस मिशन

२) वि. रा. शिंदे

३) महात्मा गांधी

४) माझ्या आठवणी व अनुभव

५) वायकोम सत्याग्रह

- **स्वयं अध्ययन प्रश्न ३ ची उत्तरे :**

**अ)** १) तुकाराम महाराज व कबीर २) गोधडे महाराज

३) गोपाला-गोपाला देवकी नंदन गोपाला ४) चापरे बुवा ५) प्रबोधनकार ठाकरे

**ब)** १) अमरावती २) ऋणमोचन ३) खराटा

४) डेबूजी बुवा, वट्टीसाधू ५) आचार्य अत्रे

● **स्वयं अध्ययन प्रश्न ४ ची उत्तरे :**

**अ)** १) फकिरा २) वाणेचा वाघ ३) सात

४) अण्णा भाऊ साठे

**ब)** १) श्रीपदा अमृत डांगे २) वैजयंता ३) वैजयंता

४) चित्रा ५) अण्णा भाऊ साठे ६) १९४४

७) बाबुराव बागल

**३.५ सारांश :**

१८१८ ला पेशवाईचा पराभव करून इंग्रजानी महाराष्ट्रात आपली सत्ता स्थापन केली. भारतीय समाज वर्णव्यवस्था व जातीपद्धतीमध्ये विभागला गेला होता. स्त्रियांची व शुद्राची स्थिती अतिशय दयनीय झाली होती. समाज धर्मभोळेपणा, अज्ञान, रूढीप्रियता व शिक्षणाचा अभाव यामुळे गतीहीन झाला होता. पाश्चात्य शिक्षण, ब्रिटीशाचा एकछत्री अंमल, कायदापुढे सर्वसमान हे तत्त्व, दळणवळणाची साधने, यामुळे आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेची सुरूवात झाली. परिणामस्वरूप राष्ट्रवादाच्या उदयाबरोबरच महाराष्ट्रात सामाजिक व धार्मिक चळवळीचीही सुरूवात झाली. जातीयतेची कडक बंधने, अस्पृश्यता, स्त्रिया संबंधित अनिष्ट रुढी-परंपरा याविरुद्ध समाजप्रबोधनासाठी भारतात अनेक समाजसुधारक निर्माण झाले.

लहुजी मांग तथा लहुजी साळवे वस्ताद हे एकोणीसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या इतिहासातील एक लढवय्ये क्रांतीकारक व्यक्तिमत्त्व होते. लहुजी साळवे महात्मा फुलेच्या चळवळीचे खंदे पुरस्कर्ते होते. जोतिबा फुलेच्या कार्यात सक्रिय सहभागी होते. तसेच ते वसाहतवादाविरोधी राष्ट्रवादी लढ्यातील दलित नायक म्हणूनही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. त्यांनी सन १८२२ मध्ये लहुजींने गंजपेत तालीम स्थापन करून शस्त्रविद्या, शारीरिक कसरतीचे खेळ, व्यायाम यांचे प्रशिक्षण देणे सुरू केले. उमाजी नाईक, वासूदेव बळवंत फडके, गोपाळ गणेश आगरकर, चाफेकर, क्रांतीवीर नाना दरबारे, महात्मा फुले, सदाशिवराव गोवंडे, मोरो विठ्ठल वाळवेकर, नाना छत्रे, परांजपे असे शेकडो देशभक्त व क्रांतीकारकांना त्यांनी प्रशिक्षण दले. ते अविवाहित होते. त्यांचा मृत्यू १७ फेब्रुवारी, १८८१ रोजी वयाच्या ८७ व्या वर्षी झाला.

विठ्ठल रामजी शिंदे यांचा जन्म मराठा कुटुंबात २३ एप्रिल १८७३ रोजी कर्नाटक राज्यातील जमखंडी या ठिकाणी झाला. त्यांच्या कुटुंबावर वारकरी संप्रदायाचा प्रभाव होता. या संस्कारातूनच त्यांच्या चरित्राची जडणघडण झाली. या जडणघडणीतूनच त्यांनी अस्पृश्योद्धाराच्या कार्याची सुरूवात केली. त्यांनी मुंबई इलाख्यामध्ये प्रार्थना समाजाचेही कार्य केले. माणसाने माणसाशी माणूसकीने वागले पाहिजे व यासाठी सेवावृत्ती जोपासली पाहिजे हे तत्त्व ठेवून कार्य केले. अस्पृश्यता निवारण्याच्या कार्यासाठी त्यांनी सन १९०६ मध्ये 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन' ची स्थापना केली. या संस्थेमार्फत महाराष्ट्र, कर्नाटक व गुजरात या प्रांतात दलितांसाठी प्राथमिक व माध्यमिक शाळा व वसतिगृहे सुरू केली. मोफत दवाखाने, रात्रीच्या शाळा, यांसारखे उपक्रम हाती

घेतले. डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या माध्यमातून त्यांनी दलित, शेतकरी, स्त्रिया, वाईट प्रथा, शिक्षण अशा विविध क्षेत्रात कार्य केले. त्यांनी 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' हा संशोधनपर ग्रंथ लिहिला. त्यांनी स्त्रियांसाठी सक्तीच्या शिक्षणाचा पुरस्कार केला. त्यांनी सन १९०७ साली पतीत, दलित व विधवा स्त्रियांसाठी 'निराश्रित महिला समाजा'ची स्थापना केली. त्यांनी शेतकरी वर्गाची हालाखीची स्थिती कशी सुधारावी या तळमळीतून इ.स. १९२६ ते १९३२ या कालखंडात शेतकऱ्यांच्या परिषदांमध्ये अध्यक्ष पदावरून भाषणे करून त्यांच्यात जागृती करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. सन १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीत महर्षी शिंदेनी सक्रीय सहभाग करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. सन १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीत महर्षि शिंदेंनी सक्रीय सहभाग घेतला. त्याबद्दल त्यांना टक झाली होती. त्यावेळी त्यांना येरवडा तुरुंगात ठेवण्यात आले. सन १९४३ मध्ये त्यांना अर्धांगवायुचा झयका आला व त्यामध्ये त्यांचा २ जानेवारी १९४४ मध्ये मृत्यू झाला.

गाडगे महाराजांनी कारखान्यातून राबणाऱ्या मजुरांची दयनीय अवस्था पाहिली. सावकारांच्या ओझ्याखाली दबलेल्या कुटुंबाची अगतिकता पाहिली. अनेक देवदेवता पुजा पद्धती, त्यांना बळी देण्यासाठी कोंबड्या, बकऱ्याच्या होणाऱ्या कत्तली पाहिल्या. समाजातील अस्पृश्यास्पृश्य भेदाभेद पाहिला. भगत, मांत्रिक, गंडे-दोरे, तार्सत देणारे देवऋषी यांचा दांभिकपणा पाहिला. समाजात शिक्षणाचा अभाव, कमालीचे दारिद्र्य, अज्ञान, अनिष्ट चालिरीती व अंधश्रद्धा पाहून त्यांनी निरपेक्ष लोकसेवेचे व लोक शिक्षणाचे व्रत अंगिकारले. किर्तनाच्या माध्यमातून त्यांनी पारमार्थिक विषया बरोबरच व्यवहारिक व नैतिक विषयांचाही त्यांनी आपल्या किर्तनातून लोकजागृतीसाठी उपयोग करून घेतला. स्वच्छता, प्रामाणिकपणा, भूतदया व जातिभेदाचा नाश या विषयावर त्यांचा मोठा भर असे. बाबांनी आपला स्वतंत्र खराटा संप्रदाय निर्माणकेला. खराट्याने नुसता गावातील घरातील कचरा काढला नाही तर त्यांनी माणसाचे जुने विचार झाडून माणसाची मने स्वच्छ करण्याचा आयुष्यभर प्रयत्न केला. माणसात देव शोधणाऱ्या या संताने लोकांनी दिलेल्या देणग्यांतील पैशातून रंजल्या-गांजल्या, अनाथ लोकांसाठी महाराष्ट्रात ठिकठिकाणी धर्मशाळा, अनाथालये, आश्रम व विद्यालये सुरू केली. पंढरपूर, नाशिक, आळंदी येथे यात्रेकरूला राहण्यासाठी धर्मशाळा बांधल्या. पुण्यात सोमवारपेठेत धर्मशाळा बांधली. मुंबईत जे. जे. हॉस्पिटल शेजारी पारशी ट्रस्टच्या जागेत एक तीन मजली भव्य धर्मशाळा बांधली. त्यांनी वयाच्या ८० वर्षापर्यंत समाजची अखंड सेवा केली. २० डिसेंबर १९५६ रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

अण्णा भाऊ साठे मराठी साहित्य विश्वातले एक मौल्यवान रत्न आहेत. अण्णा भाऊ एक प्रतिथयश कलाकार होते. लोकशाहीर ही उपाधी या कलावंताला लोकांनी दिली होती. निद्रिस्त समाजाला जाग आणण्याइतका जोश त्यांच्या लेखनीत होता. क्रांती त्यांच्या साहित्याचा मुलमंत्र होता. पोवाडे, लावण्या, गीतं, पदं या काव्यप्रकाराचा त्यांनी सामान्य कष्टकरी जनतेत विचारांच्या प्रचारासाठी वापर केला. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळात राजकीय व सामाजिक प्रश्नांविषयी त्यांनी मोठी जागृती केली. त्यात संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती चळवळ यामध्ये त्यांनी त्यांच्या शाहिरी वाङ्मय प्रकारातून लोक जागृती केली. त्यांचे साहित्य जगभर पोहचले ते अनेक भाषांत भाषांतरीत झाले. त्यांना ४९ वर्षाचे आयुष्य लाभले. त्यांचा मृत्यू १८ जुलै १९६९ रोजी झाला.

महाराष्ट्रातील या समाजसुधारकांनी विविध मार्ग वापरून समाज जागृतीचे कार्य केले. वस्ताद लहूजी साळवे यांनी तालमीची स्थापना करून क्रांतीकारकांना प्रशिक्षीत केले व महात्मा फुले सोबत कार्य करत त्यांच्या शिक्षणाच्या कार्यात सक्रिय सहभाग नोंदविला. विठ्ठलरामजी शिदे यांनी अस्पृश्यतेचा प्रश्न राष्ट्रीय पातळीवर नेला त्याच बरोबर या प्रश्नाची पाळे-मुळे संशोधनाचे हत्यार वापरून शोधून काढली व प्रत्यक्ष अस्पृश्यांच्या वस्तीत संपूर्ण कुटुंबाने राहून त्यांच्या आर्थिक व सामाजिक उत्थानाचा प्रयत्न केला. गाडगे महाराजांनी किर्तनाच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य केले. तर अण्णा भाऊ साठे यांनी साहित्याच्या माध्यमातून सामान्य वंचितांचे प्रश्न मांडले. साहित्याची निर्मितीच लोकांचे प्रबोधन करण्यासाठी व त्यांच्या व्यथा मांडण्यासाठी केली.

## ३.६ सरावासाठी प्रश्न.

१. लहूजी साळवे यांचे जीवन कार्य स्पष्ट करा.

२. गाडगे महाराजांचे जीवन कार्य स्पष्ट करा.

३. गाडगे महाराजांची किर्तनाची अनोखी परंपरा.

४. वि. रा. शिंदे यांचे अस्पृश्योद्धाराचे कार्य स्पष्ट करा.

५. वि. रा. शिंदे यांचे प्रार्थना समाजाचे कार्य स्पष्ट करा.

६. वि. रा. शिंदे यांचे संशोधन व लेखनाचे महत्व विषद करा.

७. अण्णा भाऊ साठे यांचे जीवन कार्य स्पष्ट करा.

८. अण्णा भाऊ साठे यांचे साहित्यातील योगदान स्पष्ट करा.

## ३.७ संदर्भ ग्रंथ सूची :


१. क्रांतिगुरु लहुजी वस्ताद, वि. दा. पिंपळे, संस्कृती, पुणे.

२. सशस्त्र क्रांतीचे जनक - लहुजी वस्ताद, अनंत घोडे, मुक्ताई प्रकाशन, कोल्हापूर.

३. मुक्ता साळवे, फतिमा शेख आणि लहुजी वस्ताद प्रतिके आणि समकालीन सांस्कृतिक राजकारण, सचिन गरूड, नाग-नालंदा, प्रकाशन, इस्लामपूर.

४. विसाव्या शतकातील मातंग समाज, डॉ. सोमनाथ डी. कदम, संवाद प्रकाशन, प्रा. लि.

५. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास १८१८-१९६०, प्राचार्य डॉ. एस. एस. गाठाळ, कैलाश प्रकाशन.

६. महाराष्ट्राचे थोर समाज सुधारक - महर्षिक विठ्ठल रामजी शिंदे (गौरव ग्रंथ), संपादक : प्रा. अशोक नाईकवाडे, ज्ञानेश प्रकाशन, नागेश्वरवाडी, औरंगाबाद.

७. निवडक विठ्ठल रामजी शिंदे, संपादक : गो.मा. पवार, साहित्य कादमी प्रकाशन, नवी दिल्ली.

८. वि. रा. शिंदे आणि सामाजिक चळवळ - विलास मोरे
९. वि. रा. शिंदे : राजकिय सामाजिक विचार - तानाजी ठोंबरे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.
१०. वि. रा. शिंदे : आर्थिक, सामाजिक विचार - पी.डी. दिघे, लोकवाङ्मय गृह, मुंबई.
११. संत गाडगे महाराज स्मारक ग्रंथ, संपादक : प्राचार्य रा. तु. भगत, चैतन्य प्रकाशन, कोहापूर.
१२. अण्णा भाऊ साठे-चरित्र व कार्य, संपादक : प्रा. विजयकुमार जोखे, नाग-नालंदा प्रकाशन, इस्लामपूर.
१३. विसाव्या शतकातील मातंग समाज, डॉ. सोमनाथ दी. कदम, संवाद प्रकाशन, कोल्हापूर.
१४. विसाव्या शतकातील महाराष्ट्रामधील समाजसुधारणेचा इतिहास प्रा. व्ही. बी. पाटील, के.सागर्स प्रकाशन, पुणे.

❖❖❖

# घटक –४

# शैक्षणिक सुधारक

**अनुक्रमणिका :**

४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील

४.२.२ महर्षी बापूजी साळुंखे

४.२.३ डॉ. पजांबराव देशमुख

४.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ संदर्भ ग्रंथ

**४.० उद्दिष्टे**

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या प्रेरणेने रयत शिक्षण संस्था स्थापन करून शिक्षण प्रसारांचे महान कार्य केले. त्यानी शिक्षणाच्या माध्यमातून स्वावलंबन, श्रमप्रतिष्ठा, स्वाभिमान आणि आत्मविश्वास बहूजन समाजात निर्माण केला. बहुजनांना शिक्षण देऊन दारिद्र्य आणि जातीयतेच्या गुलामगिरीतून मुक्त केले. त्यांच्या कार्याचा अभ्यास केल्यावर तुम्हांला...

- कर्मवीर आण्णांच्या जीवनचरित्राची माहिती होईल.
- त्यांचा शिक्षणप्रसार, वसतिगृह योजना व सत्यशोधक समाजासाठी केलेल्या कार्याचा परिचय होईल.
- आण्णांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा परिचय होईल.
- आण्णांच्या महान कार्याचा गौरव कसा झाला हे माहित होईल.

महर्षी बापूजी साळुंखे या सुधारकाने स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था स्थापन करून बहुजन समाजाच्या

शिक्षणप्रसाराला मोठा हातभार लावला. भूमिगत चळवळीत भाग घेऊन त्यांनी जनजागृतीचे कार्य केले. त्यांच्या जीवनकार्याचा अभ्यास केल्यावर तुम्हाला....

- महर्षी बापूजी साळुंखे यांच्या जीवन-चरित्राचा परिचय होईल.
- भुमिगत चळवळीतील आणि रयत शिक्षण संस्थेसाठी त्यांनी केलेल्या योगदानाची माहिती होईल.
- स्वामी विवेकानंद संस्था उभारणीसाठी, वाढीसाठी आणि शिक्षण प्रसारासाठीचे कार्य समजेल.
- बापूजींच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाची आणि कार्य गौरवाची माहिती मिळेल.

डॉ. पंजाबराव देशमुखांनी विदर्भात शिक्षण प्रसारासाठी शिक्षण संस्था उभारून केलेले कार्य महनीय आहे. बहूजन समाज, मागासवर्ग आणि शेतकऱ्यांना अज्ञान, जातीयतेच्या आणि कर्जाच्या विळख्यातून मुक्त करण्यांचा प्रयत्न केला. त्यांच्या जीवनकार्याचा अभ्यास केल्यावर तुम्हाला...

- डॉ. पंजांबराव देशमुख यांच्या जीवन-चरित्राचा परिचय होईल.
- त्यांनी केलेल्या सामाजिक, अस्पृशता निवारण्यासाठी आणि शिक्षण प्रसारांची माहिती मिळेल.
- शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी केलेले कार्य समजेल.

## ४.१ प्रास्ताविक :

आधुनिक महाराष्ट्राच्या जडण-घडणीसाठी विसाव्या शतकात समाज सुधारकानी सुधारणा चळवळ अधिक गतीमान आणि व्यापक बनवली. बहूजन समाज हा अज्ञान, दारिद्र्य आणि विविध प्रकारच्या रूढी-परंपरेच्या जाळयात अडकला होता. अशा समाजाला शिक्षणरूपी संजीवनी दिल्याखेरीज तो जागृत होणार नाही. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होणार नाही हे जाणून सुधारकांनी विविध शिक्षणसंस्था स्थापन करून ज्ञानदानाचे कार्य सुरू केले. त्यातूनच अस्पृशता निवारणे, समता, स्वातंत्र्य, मानवतावादी विचार प्रस्तूत करण्याचे कार्य झाले. शेतकरीवर्ग अज्ञानी, कर्जबाजारी आणि दारिद्र्यात जीवन जगत होता. त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करण्यांत आले. अशा प्रकारचे थोर कार्य करणाऱ्या समाजसुधारकांत कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी बापूजी साळूंखे आणि डॉ. पंजाबराव देशमुख यांचा समावेश होतो. त्यांच्या जीवनकार्याचा अभ्यास आपण या प्रकरणात करणार आहोत.

## ४.२ विषय विवेचन :

### ४.२.१ कर्मवीर भाऊराव पाटील ( इ.स.१८८७ ते १९५९ )

कर्मवीर भाऊराव पाटील ऊर्फ अण्णा ही एक आदर्श व्यक्ती होती. त्यांनी महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात अभूतपूर्व क्रांती घडवून आणली. बहुजन समाजाला ज्ञानाची संजीवनी देणारे ते एक महान धन्वंतरी होते. अज्ञान आणि जातीयतेच्या गराडयात सापडलेल्या अज्ञानी समाजाला मुक्त करण्याचे कार्य त्यांनी केले. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या प्रेरणेने त्यांनी शिक्षणप्रसाराचे कार्य हाती घेतले. त्यासाठी तन, मन व धन त्यांनी अर्पण केले.

श्रमशिक्षणातून स्वावलंब, प्रतिष्ठा, स्वाभिमान आणि आत्मविश्वास निर्माण करून ज्ञानाची गंगा खेडोपाड्यात आणि झोपडीपर्यंत पोहचवली. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी महाराष्ट्रात शिक्षणाची मोठी चळवळ उभी केली.

● **बालपण आणि शिक्षण :**

कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म २२ सप्टेंबर, १८८७ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज या गांवी झाला. कुंभोज हे त्यांचे आजोळ तर मूळ गांव ऐतवडे होय. त्यांच्या वडीलांचे नांव पायगौंडा तर आईचे नांव गंगाबाई असे होते. त्यांचे वडिल सरकारी नोकरीत होते. नोकरीच्या निमित्ताने त्यांना तासगांव, विटा, दहिवडी, कोरेगांव इस्लामपूर इत्यादी ठिकाणी फिरावे लागले. त्यामुळे भाऊरावांचीही वडिलांच्याबरोबर भटकंती झाली. आईचा ओढा माहेरकडे असल्यामुळे भाऊरावांचा बराच काळ कुंभोजला गेला. त्यांचा मामाचा मित्र सत्याप्पा हा शूर, साहसी, उदार व दयाळू होता. अन्यायाचा तो कर्दनकाळ होता. अन्यायाविरूद्ध बंड करण्याचे बाळकडू त्यांच्याकडून मिळविले.

नोकरीनिमित्त वडिलांना अनेक ठिकाणी फिरावे लागल्यामुळे भाऊरावांचे प्राथमिक शिक्षण वेगवेगळ्या ठिकाणी झाले. पाचवी इयत्ता पास झाल्यानंतर त्यांना कोल्हापूरमधील राजाराम हायस्कूलमध्ये दाखल केले. जैन वसतिगृहात त्यांची राहण्याची व भोजनाची व्यवस्था करण्यात आली. भाऊराव बोर्डिंगमधील बरेच नियम पाळत नसत. परिणामी, त्यांना वसतिगृह सोडावे लागले. फक्त इंग्रजी सहावीपर्यंत शिक्षण असलेल्या या मुलाने शिक्षणाच्या क्षेत्रात थक्क करणारे कार्य करून दाखविले. म्हणून हा मुलगा पुढे कर्मवीर भाऊराव पाटील बनला.

अभ्यासात भाऊरावांचे लक्ष नसले तरी कुस्ती, मल्लखांब यांसारख्या खेळात ते नेहमी आघाडीवर असायचे. त्यामुळेच राजर्षी शाहू महाराजांच्या वाड्यात त्यांना आश्रय मिळाला. त्यांच्या वाड्यातच भाऊरावांनी सामाजिक सुधारणेचे बाळकडू घेतले. वयाच्या अठराव्यावर्षी त्यांचा विवाह लक्ष्मीबाई बरोबर झाला. त्यामुळे नोकरी व्यवसाय करण्याची गरज निर्माण झाली.

● **नोकरी व व्यवसाय :**

भाऊराव पाटील यांनी प्रारंभी शेठ मणिकचंद पानाचंद या मुंबईच्या जवाहऱ्याच्या दुकानात काम केले. पुढे सातारा येथे शिकवण्या घेतल्या. किर्लोस्कर आणि ओगले या कारखान्यातील उत्पादनाचा फिरता एजंट म्हणून काम केले. यासाठी त्यांना भारतभर प्रवास करावा लागला. महाराष्ट्रातल्या सामाजिक परिस्थितीची जाणीव त्यांना झाली. त्यांच्या मनातला समाजसेवक खडबडून जागा झाला. समाजाचे अज्ञान आणि दारिद्रय दूर करायचे असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. शिक्षण म्हणजे जनजागृती, जनजागृती म्हणजे समाजक्रांती आणि समाजक्रांतीतून नवसमाजनिर्मिती हे सूत्र त्यांनी त्या काळात आपल्या मनात पक्के केले. त्यांनी आपल्या सार्वत्रिक शैक्षणिक कार्याला सुरूवात केली

● **डांबर प्रकरण :**

कोल्हापूरात किंग एडवर्ड यांच्या पुतळ्याला १४ फेब्रुवारी, १९१४ मध्ये कोणीतरी डांबर फासले. त्या प्रकरणी अण्णासाहेब लठ्ठे यांच्यावर संशय घेण्यात आला. भाऊरावांनी त्यांच्या विरोधात साक्ष द्यावी म्हणून त्यांना

फार छळण्यात आले. परंतु त्यांनी खोटी साक्ष दिली नाही. पोलीसांच्या छळाला कंटाळून त्यांनी दोनवेळा आत्महत्येचा प्रयत्न केला. पण त्यातून ते बचावले. पुढे या डांबर प्रकरणातून त्यांची सुटका झाली.

**● रयत शिक्षण संस्थेची स्थापना आणि विकास :**

गोरगरीबांच्या मुलांच्या शिक्षणाच्या उन्नतीकरता एक संस्था असावी असे भाऊरावांना व तेथील कार्यकर्त्यांना वाटत होते. सर्व जातीजमातींच्या मुलांना एकत्र करून त्यांना अभ्यास करवून घेणे, त्यांना शिक्षणसाहित्य पुरवणे, अभ्यासाकडे लक्ष देणे, व्यसनापासून दुर ठेवून चांगले संस्कार करावेत यासाठी संस्था स्थापन करण्याचा उद्देश होता. सन १९१० मध्ये सांगली जिल्हयातील दुधगांव या ठिकाणी शिक्षणप्रसारक संस्थेची स्थापना केली. दि. ५ सप्टेंबर, १९१९ रोजी कराड शेजारच्या काले या गांवी सत्यशोधक समाजाची मोठी परिषद भरली. या परिषदेमध्ये रयतेच्या मुलांना शिक्षण देण्याच्या हेतूने 'रयत शिक्षणसंस्था' सुरू करण्याचे ठरवले. दि. ४ ऑक्टोबर, १९१९ रोजी विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर काले येथे रयत शिक्षण संस्था स्थापन करण्यात आली. या रयत शिक्षण संस्थेचे 'वटवृक्ष' हे बोधचिन्ह ठरविण्यात आले.

**● वसतीगृहाची स्थापना :**

कर्मवीर भाऊराव पाटलांनी १९२४ मध्ये काले येथून रयत शिक्षण संस्थेचे स्थलांतर सातारा येथे केले. याच वर्षी 'छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस' हे वसतिगृह स्थापन केले. आज या संस्थेच्या अनेक शाळा, माध्यमिक शाळा, अध्यापन विद्यालये आणि महाविद्यालयातून ज्ञानदानाचे कार्य चालविले जात आहे. या शिक्षण संस्थेचे ध्येयवाक्य 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' असे आहे. कर्मवीर अण्णाच्या शैक्षणिक कार्यात त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाईचा हातभार फार मोठा होता.

खेड्यापाड्यातून आलेल्या बहूजन समाजाच्या मुलां-मुलींच्या निवासाची आणि भोजनाची व्यवस्था व्हावी म्हणून वसतीगृहे सुरू केली. सातारा येथील 'छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस' मध्ये विविध जातीतील मुले एकत्र राहू लागली. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सुरू केलेल्या वसतीगृहातील दिनचर्येमुळे विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा, स्वावलंबीवृत्ती, आत्मनिर्भरता आणि सन्मार्गी प्रवृत्ती निर्माण होण्यास मदत झाली. शैक्षणिक कार्यात कर्मवीरांच्या पत्नी लक्ष्मीबाईचा हातभार फार मोठा होता. एके प्रसंगी बोर्डिंगमधील मुलांना खाण्यासाठी काही नव्हते म्हणून त्या मातेने आपले मंगळसूत्र मोडले होते. या गोष्टीवरून त्यांच्या मनात असलेल्या निस्सीम त्यागाची कल्पना येते.

**● मुष्टीफंड योजना :**

वसतीगृहासाठी प्रारंभी अण्णानी मुष्टीफंड योजना सुरू केली. पुर्वी गावात पिठाच्या गिरण्या नव्हत्या. स्त्रिया भल्या पहाटे उठून घरीच जात्यावर दळण दळत असत. दळण दळण्यापूर्वी गृहिणी वसतिगृहासाठी जात्याच्या वरती खुंटीला अडकवलेल्या पिशवीत मूठभर अन्न टाकीत असे. प्रत्येक घराघरात अडकवलेल्या पिशवीतले धान्य वसतिगृहातील मुले गोळा करत व त्यांच्या जेवणाची सोय होई. म्हणून या योजनेला मुष्टीफंड योजना म्हणत होते.

भाऊरावांचे वसतीगृह म्हणजे स्वावंलबी शिक्षणांचे एक कृतीशील प्रयोगकेंद्र आणि राष्ट्रीय एकात्मतेचा

मोठा प्रयोग होता. वसतीगृहात राहणारी मुले गरीब रयतेची होती. अशा मुलांच्या राहण्याच्या आणि भोजनासाठी खर्चासाठी त्यांनी 'कमवा आणि शिका' ही अभिनव योजना सुरू केली. त्यातून त्यांनी श्रमप्रतिष्ठेची दिक्षा तर दिलीच परिणामी विद्यार्थ्यांचे हात कामाला लागले. म.गांधीजींना भाऊराव पाटील यांच्या कार्याचा गौरव करताना असे म्हटले आहे की,'जातिनिरपेक्ष असे सर्वांकरिता संयुक्त वसतिगृह काढून भाऊरावांनी नवमानव निर्मितीचा प्रयोग सुरू केला होता.'

● **सत्यशोधक चळवळ आणि अण्णा :**

महात्मा जोतीराव फुले यांनी २४ सप्टेंबर, १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना करून जातीभेद उच्चाटन, बहूजन समाजात शिक्षणप्रसार, अस्पृशांचा उद्धार, अंधरूढीपरंपरा नष्ट करण्यासाठी प्रयत्न केला. पण फुले यांच्या नंतर सत्यशोधक चळवळ थंडावली. त्या चळवळीला राजर्षी शाहू महाराजांनी राजाश्रय दिला. पुढील काळात भाऊरावानी फुले आणि शाहू छत्रपतींच्या कार्याची पताका स्वता:च्या खांद्यावर घेतली. त्यांनी सत्यशोधक चळवळीसाठी सातारा, पुणे, विदर्भ व मराठवाडा हा भाग पालथा घालून जनजागृतीचे मोठे कार्य केले. महात्मा फुले, शाहू छत्रपती, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे कार्य पुढे चालू ठेवले व वर्षानुवर्ष चालत आलेल्या रूढी, परंपरा, अनिष्ट प्रथा भाऊरावांनी बंद पाडण्याचा प्रयत्न केला. म. गांधीच्या स्वदेशी व्रताचा स्वीकार करून आयुष्यभर हातांनी विणलेले खदीचे कपडे वापरण्याची व अनवाणी फिरण्याची शपथ भाऊरावांनी घेतली.

● **शैक्षणिक तत्त्वज्ञान :**

कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान म्हणजे शिक्षणाकडे पाहण्याची त्यांची एक विशिष्ट आणि विशाल जीवनदृष्टी होय. अगदी सामान्याला समजेल, पेलवेल अशी व्यवहार, सहज आचरणात आणता येईल अशी शैक्षणिक पध्दत म्हणजेच त्यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान होय. कर्मवीर अण्णानी कोणत्याही विद्यापीठाची पदवी घेतली नव्हती. पण बहूजन समाजाची आर्थीक, सामाजिक व शैक्षणिक परिस्थिती त्यांनी जवळून पाहिली होती. त्यासाठी समाजात बदल घडून विकास साध्य करण्यासाठी त्यांनी शिक्षणरूपी गंगोत्री घरोघरी पोहचविण्याचा प्रयत्न केला. शिक्षणांच्या माध्यमातून सामाजिक प्रगती करण्यासाठी कृतीच्या माध्यमांतून त्यांनी प्रयत्न केला. शाळा, महाविद्यालये आणि वसतीगृहातून केलेल्या विविध प्रयत्नातून त्यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान आकाराला आले. स्वावलंबन, स्वाभीमान, स्वाध्याय आणि स्वातंत्र्य या चतु:सूत्रीवर व मानवतावादांवर आधारलेल्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा त्यांनी स्विकार केला.

इ.स.१९८६-८७ अखेर संपूर्ण महाराष्ट्रभर १६ पूर्व प्राथमिक शाळा, ३२१ माध्यमिक विद्यालये, ८ अध्यापन विद्यालये, २९ महाविद्यालये, ७९ वसतिगृहे, ६ कार्यालये, ३७ इतर शाखा व एकूण शाखा ४९६ असा या रयत शिक्षण संस्थेचा पसारा आहे. आज ७५० पेक्षा जास्त शाखामधून जवळ जवळ ५ लाखापेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आशिया खंडातील सर्वात मोठी व शैक्षणिक गुणवत्ता निर्माण करणारी संस्था म्हणून तिचा नावलैकिक आहे. कर्मवीरांनी लावलेल्या वटवृक्षाला आज अनेक पारंब्या फुटलेल्या आहेत.

## ● भाऊरावांच्या कार्याचा गौरव :

कर्मवीर भाऊराव पाटील यांचा सन्मान अनेक सामाजिक संस्थानी मानपत्र देऊन केला. भारत सरकारने त्यांना 'पद्मभूषण' हा किताब देऊन त्याचा गौरव केला. पुणे विद्यापीठाने 'डी.लिट.' ही पदवी देऊन त्यांचा गौरव केला. तर महाराष्ट्रातील तमाम जनतेने 'कर्मवीर' ही पदवी देऊन त्यांचा गौरव केला. यशवंतराव चव्हाण कर्मवीरांच्या कार्याचा गौरव करतांना म्हणतात,''कर्मवीर ही व्यक्ती नव्हती. ती एक संस्था होती. बहुजन समाजात ज्ञानाचा प्रकाश पसरविण्यासाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले व महाराष्ट्रात नवयुग निर्माण केले. त्यांची रयत शिक्षण संस्था म्हणजे महाराष्ट्रात नवजीवन ओतणारी गंगा आहे.'' ह. रा. महाजन म्हणतात,''अमेरिकेत निग्रोंना शिक्षण देण्याचे कार्य अतिशय बिकट परिस्थितीत करणारा बुकर टी. वॉशिंग्टन साऱ्या जगात ओळखला जातो. कर्मवीर भाऊरावांनी दरिद्री देशात बहुजन समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार करण्याचे कार्य केले ते वॉशिंग्टनपेक्षा काडीमात्रही कमी नाही. महाराष्ट्राचा हा बुकर टी. वॉशिंग्टनच होता.'' अशा या थोर कर्मवीराचे ९ मे, १९५९ रोजी निधन झाले. अत्यंदर्शनासाठी पुण्यातील ससून हॉस्पिटलमध्ये जनसामान्यांची रीघ लागली होती.

## ● स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-१

**अ) योग्य ते पर्याय निवडून विधाने पूर्ण लिहा.**

१. कर्मवीर आण्णांनी सांगली जिल्ह्यातील ............ येथे शिक्षणप्रसारक संस्था स्थापन केली.

अ) मिरज    ब) दुधगाव    क) कवलापूर    ड) पलूस

२. ५ सप्टेंबर १९१९ रोजी सत्यशोधक समाजाची परिषद ....... येथे भरली.

अ) काले    ब) सातारा    क) कुंभोज    ड) कोल्हापूर

३. रयत शिक्षणसंस्थेचे .......... हे बोधचिन्ह आहे.

अ) वटवृक्ष    ब) आंबा    क) पिंपळ    ड) लिंब

४. कर्मवीर भाऊराव पाटलांना ............. विद्यापीठाने डी. लीट ही पदवी बहाल केली.

अ) मुंबई    ब) पुणे    क) शिवाजी    ड) सोलापूर

५. ........... हा किताब देवून भारत सरकारने कर्मवीर भाऊराव पाटलांना सन्मानिय केले होते.

अ) पद्मश्री    ब) भारतरत्न    क) पद्मभूषण    ड) पद्मविभूषण

**ब) खालील उपप्रश्नांची उत्तरे एका वाक्यांत लिहा :**

१) कर्मवीर भाऊराव पाटील यांनी कोणत्या कारखान्यांचे फिरता एजंट म्हणून काम केले?

२) कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्था केव्हा स्थापन केली?

३) वसतीगृहातील मुलांच्या भोजनासाठी कर्मवीर अण्णांनी कोणती अभिनव योजना राबविली?

४) कर्मवीर भाऊराव पाटील यांना भारत सरकारने कोणता किताब देऊन गौरव केला?

### ४.२.२ शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुखे : ( इ.स.१९१९ ते १९८७ )

● **प्रस्तावना :**

समाजसुधारणा चळवळीत कार्य करणाऱ्या समाजसुधारकांना राष्ट्राच्या उज्ज्वल भवितव्यासाठी समाज जागृत करण्यास शिक्षण हे महत्वाचे माध्यम वाटले. अज्ञानाच्या अंधकारामध्ये अडकलेला समाज शिक्षणाशिवाय प्रकाशमान होणार नाही. शैक्षणिक विकास म्हणजे मानवाचा सर्वांगीण विकास होय. शिक्षणाच्या भक्कम आणि मजबूत पायावरच मानवी जीवणांचे यश अवलबून आहे. यासाठी महाराष्ट्रातील काही समाजसुधारकांनी आणि तज्ञांनी आपले आयुष्य शिक्षणकार्यासाठी, शिक्षण प्रसारासाठी समर्पित केले. गरीब, गांजलेल्या व मागासलेल्या बहुजन समाजासाठी महात्मा जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, महाराज सयाजीराव गायकवाड, महर्षी धोंडो केशव कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंजाबराव देशमुख आणि शिक्षण महर्षी बापूजी साळुंखे यांचे कार्य महनीय आहे. महाराष्ट्रातील कोल्हापूरच्या श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संकल्पक, संस्थापक, संवर्धक दलितमित्र, शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांना ओळखले जाते समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाशिवाय साधन नाही हे त्यांनी ओळखून शिक्षणरूपी कार्यात त्यांनी स्वत:ला झोकून दिले. त्यासाठी आहोरात परिश्रम घेतले.

● **जीवन वृत्तांत :**

शिक्षण महर्षी बापूजी साळुंखे यांचा जन्म ९ जून १९१९ रोजी सातारा जिल्हयातील रामपूर या खेड्यात झाला. रामपूर हे पाटण तालुक्यातील चिपळूण-पुणे रस्त्यावरील एक निसर्गसंपन्न गांव होय. बापूजीच्या वडिलांचे नांव ज्ञानोजी तर आईचे नाव तानूबाई असे होते. त्यांचे बालपणाचे नाव गोविंदराव होते. त्यांना चार बंधू व दोन बहिणी. गोविंदा एक वर्षाचा असताना त्यांच्या आईचा मृत्यू झाला. पण त्यांच्या पित्याने मायेची उब देऊन त्यांचा सांभाळ केला. गोविंदा अवघ्या बारा वर्षांचा असतांना त्यांचे वडिल मरण पावले. अशा अवस्थेतही गोविंदरावांनी आपल्या गुणाने आपला विकास करून घेतला.

गोविंदाचे प्राथमिक शिक्षण रामपूरमध्येच झाले. शाळेत प्रवेश करण्यापूर्वीच त्याला वडिलांनी लिहायला, वाचायला शिकविले होते. वयाच्या आठव्या वर्षी शाळेत गेलेला गोविंदा मुळातच हुशार असल्यामुळे एकाच वर्षांत दोन परीक्षा देत प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. त्याच्या या विलक्षण प्रगतीमुळे त्यास पाचवीच्या वर्गातून एकदम सातवीच्या वर्गात बसवण्यात आले. इ.स. १९३३ मध्ये गोविंदा इयत्ता सातवीची परीक्षा पास झाला. पुढील हायस्कूलचे शिक्षण घेण्यासाठी इस्लामपूरात दाखल झाला. इस्लामपूर येथे परशुराम हे त्याचे सर्वांत मोठे बंधू नोकरीनिमित्त राहात होते. त्यांच्या कडे वास्तव केले. काही वर्षांतच परशुराम यांचा विवाह झाल्यानंतर ते वर्षभरातच पत्नीसह बेळगावला राहण्यासाठी गेले. गोविंदा पुन्हा पोरका झाला. या काळात श्री. षण्मुख कापसे यांनी गोविंदाचा काही काळ सांभाळ केला. त्यानंतर इस्लामपूरचे सभ्य व प्रतिष्ठित गृहस्थ श्री. नेर्लेकर पाटील आणि षण्मुख कापसे यांनी गरीब, अनाथ व होतकरू मुलांसाठी रामाच्या देवळात वसतिगृह सुरू केले होते. त्यांत गोविंदाला ठेवले. वार लावून त्याच्या जेवणाची व्यवस्था केली. अशा परिस्थितीला सामोरे जाऊन गोविंदा १९३८ मध्ये मॅट्रिकची परीक्षा पास झाला.

मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यानंतर गोविंदास नोकरी लागत होती. पण त्याने महाविद्यालयीन शिक्षण घेण्याचा निर्णय घेतला. वडील बंधू परशुरामभाऊंच्या साहाय्याने ते 'राष्ट्रवीर' चे संपादक शामराव देसाई व डॉ. आप्पासाहेब पवार यांना भेटले. त्यांच्या कृपेने कोल्हापूरमधील 'राजाराम कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. राहण्याची सोय 'प्रिन्स शिवाजी बोर्डिंग' मध्ये झाली. राजर्षी शाहू महाराजांच्यामुळे गोविंदासारख्या अभागी तरूणांना वसतीगृहात राहून शिक्षण घेता आले.

महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच त्यांनी, छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, विवेकानंद यांच्या चरित्राचा अभ्यास केला. साऱ्या जगाला मानवतेचा संदेश देणाऱ्या महात्मा गांधीजींच्या विचारांचा गोविंदरावांवर प्रभाव होता. गोविंदरावांची राहणी साधी, उच्च विचारसरणी आणि सेवाभावीवृत्ती पाहून त्यांचे स्नेंही श्री. आर. डी. पाटील यांनी त्यांना सर्वप्रथम 'बापूजी' या नावाने संबोधले. यानंतर प्रिन्स शिवाजी बोर्डिंगमधील सर्वजण त्यांना बापूजी म्हणू लागले. आज सारा महाराष्ट्र त्यांना 'बापूजी' या नावाने ओळखतो आहे.

शिक्षण सुरू असतानाच त्यांचा विवाह बेळगांव येथील नानासाहेब पाटील यांची कन्या सुशिला बरोबर १५ डिसेंबर १९४० रोजी मारूती मंदिरात अत्यंत साध्या पद्धतीने झाला. विवाहानंतर बापूजी कोल्हापूरात आले. राजाराम कॉलेजातील बापूजींचे गुरू 'थोर इतिहास संशोधक डॉ. आप्पासाहेब पवार' यांनी बापूजींच्यावर सोंडूर संस्थानातील घोरपडयांच्या ऐतिहासिक कागदपत्रांच्या संशोधनाची जबाबदारी सोपवली. ती त्यांनी यशस्वीरित्या पूर्ण केली. त्यांची ही कामगिरी, हुशारी व चिकाटी पाहून सोंडूर संस्थानचे संस्थानिक 'यशवंतराव घोरपडे' यांनी आपले राजपुत्र व राजकन्या यांना इंग्रजी, मराठी व गणित शिकवण्याची जबाबदारी बापूजींवर सोपवली. युवराज मुरारराव घोरपडे यांच्या शिक्षणासाठी बापूजीनी त्याच्याबरोबर परदेशी जावे असे सांगितले. परंतु बापूजी परदेशात न जाता १९४२ च्या क्रांती लढयात भाग घेतला.

**● स्वातंत्र्य लढयातील सहभाग :**

क्रांतिसिंह नाना पाटीलांच्या सोबतीने बापूजीनी १९४२ च्या स्वातंत्र्य संग्रामात उडी घेतली. याच सुमारास म. गांधीजीनी इंग्रजाना हाकलून लावण्यासाठी 'चले जाव ची घोषणा' ८ ऑगस्ट, १९४२ रोजी केली. क्रातिसिंह नाना पाटील यांनी 'प्रतिसरकार' स्थापन करून ब्रिटिश सत्तेला मोठा हादरा दिला. नागनाथ नायकवडी यांच्या मार्गदर्शनाखाली बापूजी भूमिगत चळवळीत दाखल झाले. तरूण तडपदार नेते बॅ. नाथ पै आणि बापूजींनी सभा, गुप्त बैठका, कार्यक्रमाव्दारे बेळगांव आणि खानापूरात लोकजागृतीचे कार्य केले. बापूजींच्या स्वातंत्र्य संग्रामातील बहूमान करण्यासाठी भारत सरकारने 'स्वातंत्र्यसैनिक' म्हणून सन्मान पत्र बहाल केले आहे. महाराष्ट्र सरकारने बापूजीच्या भूमिगत आंदोलनातील सहभागामुळे त्यांना सन्मानपत्र देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे.

**● रयत शिक्षण संस्थेतील कार्य :**

स्वत: शिकावे आणि इतरांना शिकवावे. या उद्देश्याने प्रेरित होऊन प्रिन्स मराठा बोर्डिंगमधील बापूजी आणि त्यांच्या ध्येयवादी मित्रानी इस्लामपूरात 'श्रीराम समाजसेवा मंडळाची' स्थापना करून पंधरा प्राथमिक शाळा सुरू केल्या. दोन वर्षे बापूजींनी शिकवण्याचे काम मनापासून केले. श्रीराम समाजसेवा मंडळाचे अध्यक्ष

म्हणून  त्यांनी काम पाहिले. १९४२ च्या क्रांती लढयात भाग घेता यावा म्हणून पंधरा प्राथमिक शाळा कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेला जोडून दिल्या.

१२, १३ मे, १९४५ रोजी पूज्य साने गुरूजी यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थी कॉंग्रेसच्या कार्यकर्त्याची परिषद कराड तालुक्यातील कापील या गांवी भरली. या परिषदेत रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आपले जीवन समर्पित करून सातारा जिल्हयाची पर्यायाने देशाची सेवा केल्याबद्दल त्यांना एक लाख रूपयांची थैली अर्पण करण्यांचे ठरले. निधी समितीचा अध्यक्ष या नात्याने बापूजीनी ७०,००० रूपयांचा निधी जमा केला. बापूजीनी निधी जमविण्यासाठी पायपीट केली. २७ नोव्हेंबर, १९४८ रोजी महात्मा फुले यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी सातारा येथील धनिणीच्या बागेत राष्ट्रसंत श्री. सदगुरू गाडगे महाराज यांच्या शुभहस्ते कर्मवीर अण्णाना रू. १,०१,१११/-ची थैली अर्पण करण्यात आली. या प्रसंगी बापूजीचा सत्कार झाला व त्यांनी घेतलेल्या कष्टाचे चीज झाले. म.गांधीजींच्या हत्येनंतर क्रांतिकारकांचा साताराही पेटून उठला. २७ फेब्रुवारी, १९४८ रोजी गृहमंत्री मोरारजी देसाई यांनी साताऱ्यातील जवाहर चौकातील भाषणात कर्मवीर भाऊराव पाटील यांची नालस्ती केली. ही गोष्ट बापूजींना आवडली नाही बापूजी व्यासपीठावर गेले आणि ते ओरडले, 'मोरारजी, भाऊरावांच्याबद्दल उच्चारलेला 'सैतान' शब्द परत घ्या, बेजबाबदार आरोप करू नका.' अशा परखड शब्दात बापूजींनी गृहमंत्र्याला खडसावले होते.

● **स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना :**

रूकडी येथील रयत शिक्षण संस्थेच्या हायस्कूलमध्ये हेडमास्तर म्हणून बापूजींनी सहा वर्षे काम केले. विविध देणग्या आणि कार्यक्रम घेऊन वसतिगृह बांधले. त्यांच्या कामाचा गौरव म्हणून रयत शिक्षण संस्थेचे आजीव सेवक पद त्यांना दिले. परंतु त्यामुळे हितशत्रू वाढले. बापूजींना हे आवडले नाही त्यांनी रयत शिक्षण संस्थेतून बाहेर पडण्याचे ठरविले. नवी शिक्षण संस्था सुरू करण्याचा त्यांनी कर्मवीर आण्णांच्याकडे मनोदय व्यक्त केला. अण्णानी बापूजींना आशीर्वाद दिला.

दि. १९ ऑक्टोबर, १९५४ रोजी कराड मधींल योगेश्वर मुरलीधर मंदिरात आपल्या सहकारी मित्रांच्या व हितचिंतकांच्या समवेत बापूजींनी नवीन संस्था स्थापन करून तिला पूर्ण वाहून घेण्याबद्दल शपथा घेतल्या. नवी संस्था जन्माला आली. त्यानंतर १ नोव्हेंबर, १९५४ रोजी तासगाव तालुक्यातील तुरची येथे बापूजींचे जवळचे सहकारी मित्र बी. ए. बाबर यांच्या मळ्यात रात्री बारा वाजता एक बैठक आयोजित केली. परमपूज्य स्वामी रामानंद भारती हे उपस्थित होते. या बैठकीत 'श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था' असे संस्थेचे नामाकरण करण्यात आले. बापूजींनी संस्थेस आपल्या कार्याची दिशा दाखविणारे आपले ध्येय निर्देशित करणारे बोधवाक्य दिले 'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार'. या बोधवाक्यातील प्रत्येक शब्दाची व्याप्ती प्रचंड आहे. श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्थेचे मुख्य कार्यालय कोल्हापूर येथे आहे.

● **बापूजींचे शैक्षणिक तत्त्वज्ञान :**

बापूजी नेहमी म्हणत,'केवळ स्वराज्य नको तर सुराज्य हवे. मी देशाला असे नागरिक देऊ इच्छितो की,

जे आत्मविकसित असतील आणि ज्यांच्यात राष्ट्रीय विकासाची सक्रिय तळमळ असेल.' बापूजींनी संस्थेची जी घटना तयार केली त्यातील काही मुद्दयांतून त्यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान स्पष्ट होते. काही मुद्दे- १) ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार २) सत्य, शील, प्रामाणिकता, त्याग व पिळवणुकीस आळा ही पंचतत्त्वे शिक्षणातून जीवनात उतरविणे. ३) समाजाचा सांस्कृतिक विकास साधणे. ४) आचार, विचार व उच्चार यांच्या पावित्र्यावर भर देणे. ५) राजकारण आणि भेदाभेद यांपासून सर्वस्वी अलिप्त राहणे.

बापूजींच्या जीवनप्रवासाचे तेज शैक्षणिक तत्त्वज्ञानात आहे. ते विद्यार्थ्यांविषयी म्हणतात.'तरूणांनी विकाराला थारा न देता सुविचाराधीन राहून स्वत:चा व देशाचा उध्दार घडवावा, त्यांची मने विशाल हवीत.' प्राचार्य, प्राध्यापकासंबंधी ते म्हणतात, 'गाढा व्यासंग, सखोल अभ्यास, निष्कलंक चारिष्य, आपल्या विषयात तज्ज्ञ, सत्प्रवृत्त, वक्तशीर व बोले तैसा चाले या गुणांनी युक्त असावा.'

बापूजी शिक्षणक्षेत्राबाबत म्हणत,'शिक्षणक्षेत्र हे न्यायदानाप्रमाणे स्वायतं असावे. यांत्रिक पध्दतीचे नियम व शासकिय हुकूमान्वयें चालू नये कारण त्यामुळे जाज्वल्य, जिवंत समाजकार्य होणार नाही. त्यात चैतन्य असणार नाही.' शिक्षणपध्दती ही समाजाभिमुख, जीवनाभिमुख असावी. विद्यार्थी शिक्षणाकडे येत नसेल तर शिक्षणाने विद्याार्थ्याकडे गेले पाहिजे. शिक्षणातून विद्यार्थी व संपूर्ण समाजाचे परिवर्तन हा प्रमुख हेतू त्यांनी ठेवला होता.

**● बापूजींचे शैक्षणिक कार्य व प्रसार :**

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेसाठी आपले उभे आयुष्य बापूजींनी समर्पित केले तेच या संस्थेचे संकल्पक, संस्थापक, सवर्धक बनले. बापूजींनी ६ जून १९५५ मध्ये कोल्हापूर, तासगांव, चाफळ, तारळे, उंडाळे येथे माध्यमिक शाळा सुरू केल्या. कोल्हापूर आणि चाफळ येथे वसतिगृहे सुरू केली. लवकरच त्यांनी आपल्या संस्थेचा पसारा सातारा, सांगली, कोल्हापूर, उस्मानाबाद, बीड, रत्नागिरी, रायगड आणि ठाणे जिल्हयात वाढविला. त्यांना शैक्षणिक शाळा, महाविद्यालये काढण्यासाठी ना. बाळासाहेब देसाई आणि ना. यशवंतराव चव्हाण यांनी मदत केली. त्यांनी बहुजनांच्या आणि मागासवर्गीयांच्या शिक्षणप्रसारासाठी अनेक सवलती दिल्या. त्यामुळे बापूजींना महाराष्ट्राच्या दऱ्या-खोऱ्यात, खेडोपाडी, झोपडीपर्यंत शिक्षणाचा प्रसार करता आला. ठाणे जिल्हयात वारली या आदिवासी लोकांच्यासाठी डहाणू येथे त्यांनी आश्रमशाळा सुरू केली. संस्थेच्या कार्याचा व्याप १९८७ पर्यंत पुढील प्रमाणे होता. १६४ माध्यमिक शाळा, १४ महाविद्यालये, ८ डी.एड्. कॉलेज, २ कन्या महाविद्यालये, २ कन्याशाळा, २ रात्र शाळा,२ आणि वसतिगृहे, ३५ एकूण २२७ सुरू होती. यावरून बापूजींच्या कार्यांची आपणास कल्पना येते.

**● बापूजींच्या कार्य-कर्तृत्त्वाचा गौरव :**

शिक्षणक्षेत्रातील बापूजींचे कार्य पाहून महाराष्ट्रातील समाजाने त्यांना 'शिक्षण महर्षी' उपाधि देऊन गौरवीले. तर बापूजींचा वाढदिवस साजरा करून त्यांच्या विद्यार्थ्यांनी त्यांना परमपूज्य असे संबोधले. महाराष्ट्र शासनाने त्यांच्या सामाजिक कार्याची नोंद घेवून 'दलित मित्र' या किताबाने गौरवले. दि. ११ फेब्रुवारी, १९८६ रोजी शिवाजी विद्यापीठाने बापूजींचा 'डॉक्टर ऑफ लेटर्स' ( डी. लिट )ही सन्मानाची सर्वोच्च पदवी

देऊन त्यांचा गौरव केला. त्यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील भूमिगत कार्याचा गौरव भारत सरकार व महाराष्ट्र शासनाने 'स्वातंत्र्यसैनिक' म्हणून मानपत्र दिले आहे.

गरीबांच्या झोपडीपर्यंत ज्ञानाचा प्रकाश पोचवून, बहूजन समाजाला शिक्षणांच्या माध्यमातून आत्मनिर्भर बनविणाऱ्या या थोर शिक्षण महर्षीची प्राणज्योत दि. ८ ऑगस्ट, १९८७ रोजी मालवली. बापूजी साळुंखे यांनी आपल्या शैक्षणिक कार्याचा डोंगरच उभा करून आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात आपले नांव अजरामर केले. त्यांचा जीवनवृत्तांत युवापिढीला सदैव प्रेरणादायी आहे.

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–२**

**अ) योग्य ते पर्याय निवडून विधाने पूर्ण लिहा.**

१. शिक्षण महर्षी बापूजी साळुंखे यांचा जन्म ........... रोजी सातारा जिल्ह्यातील रामपूर या खेडयात झाला.

अ) ९जून १९१९ ब) ९ जुलै १९१९ क) ९ सप्टेंबर १९१९ ड) ९ आक्टोंबर १९१९

२. गोविंदरावांचे परममित्र आर. डी. पाटील यांनी गोविंदरावांना सर्वप्रथम .......... म्हणून संबोधले.

अ) बापूजी ब) परमपूज्य क) शिक्षणमहर्षी ड) कर्मवीर

३. सोंडूर संस्थानच्या राजपूत्राचे बापूजी ......... होते.

अ) मार्गदर्शक ब) शिक्षण क) राजगुरू ड) गुरू

४. श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्थेचे मुख्य कार्यालय ........ येथे आहे.

अ) कोल्हापूर ब) कराड क) सातारा ड) तासगाव

**ब) खालील उपप्रश्नांची उत्तरे एक वाक्यात लिहा :**

१) डॉ. आप्पासाहेब पवार यांनी सोंडूर संस्थानच्या घोरपडे घराण्यांच्या ऐतिहासिक कागदपत्राच्या संशोधनाची जबाबदारी कोणावर सोपविली?

२) बापूजी साळुंखे यांनी भूमिगत चळवळीत लोकजागृतीचे कार्य कोठे केले?

३) श्री. स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्थेचे बोधवाक्य कोणते आहे?

४) श्री. स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्थेची स्थापना केव्हा करण्यात आली?

५) शिवाजी विद्यापीठाने बापूजी साळुंखे यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव म्हणून कोणती पदवी बहाल केली?

### ४.२.३ डॉ. पंजाबराव देशमुख ( १८९८ ते १९६५ ) :

● **प्रस्तावना :**

डॉ. पंजाबराव देशमुख हे विदर्भातील बहूजन आणि मागासवर्गीय जनतेचा प्रमुख नेता म्हणून त्यांनी केलेले सामाजिक, राजकिय आणि शैक्षणिक क्षेत्रातील कार्य महनीय आहे. बहूजन समाज आणि मागासवर्गीय समाजाच्या आणि शेतकऱ्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी त्यांनी कार्य केले. त्यांनी शिक्षणाच्या प्रसारातून सामाजिक ऐक्य स्थापन करण्याचे कार्य केले. अस्पृशता निवारण्यासाठी त्यांचे योगदान महत्वाचे आहे. म्हणून आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीसाठी कार्य करणाऱ्या सुधारकांत त्याची गणना केली जाते.

● **जीवन वृत्तांत :**

डॉ. पंजाबराव देशमुख यांचा जन्म २७ डिसेंबर, १८९८ रोजी अमरावती जिल्ह्यातील पापळ या गांवी एका सधन शेतकरी कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव शामराव व आईचे नांव राधाबाई असे होते. त्यांच्या कुटूंबाकडे वंशपरंपरागत मोठी संपत्ती होती. ते मोठे जमीनदार होते. त्यांचे मूळ आडनांव कदम होते. परंतु, देशमुखी वतनामुळे त्यांचे आंडनाव देशमुख हे रूढ झाले.

त्यांचे प्राथमिक शिक्षण त्यांच्या पापळ या जन्मगांवी झाले. पुढील शिक्षणाची सोय गांवात नसल्यामुळे ते अमरावतीच्या हिंदू हायस्कूलमध्ये दाखल झाले. इ.स. १९१८ मध्ये अमरावतीच्या हिंदू हायस्कूल मधून ते मॅट्रिक पास झाले. मॅट्रिक झाल्यावर ते पुणे येथील फर्ग्यूसन महाविद्यालयात दाखल झाले. पदवी संपादन करण्यापूर्वी त्यांना उच्च शिक्षणासाठी इंग्लडला जाण्याची संधी मिळाली. त्यांनी एडीनबर्ग विद्यापीठाची एम्. ए. आणि ऑक्सफर्ड विद्यापीठाची डी.फील्. ही पदवी संपादन केली. पंजाबरावांनी लिहलेल्या 'वैदिक वाङ्मयातील उद्गम आणि विकास' या प्रंबधाबद्दल त्यांना पीएच्.डी. ही पदवी मिळली. इंग्लडमध्ये असताना त्यांनी बार-ॲट-लॉची पदवीही संपादन केली. इंग्लडमधील आपले शिक्षण पूर्ण करून जुलै,१९२६ मध्ये ते भारतात परत आले.

भारतात परतल्यावर त्यांनी अमरावती येथे वकिलीचा व्यवसाय सुरू केला. लवकरच त्यांनी सार्वजनिक जीवनात भाग घेतला. त्यांचे विचार बरेच प्रागतिक होते. जेव्हा जातीयतेची बंधने अतिशय कडक होती. सन १९२७ मध्ये मुंबईच्या सोनार जातीतील विमलाबाई वैद्य यांच्याबरोबर पंजाबरावांचा विवाह झाला. त्यामुळे विदर्भात, विशेषत: मराठा समाजात मोठी खळबळ निर्माण झाली. तथापी, या विरोधाला पंजाबराव डगमगले नाहीत. विवाहनंतर विमलाबाईनी बी.ए आणि एल्.एल्.बी ची पदवी संपादन केली. पंजाबरावांच्या सर्व सामाजिक कार्यात त्यांनी उत्फुर्तपणे भाग घेतला. विमलाबाईंचा विविध स्त्रीसंघटनांशी संबंध आला.

डॉ. पंजाबराव देशमुख यांना अनेक महत्वाच्या आणि सन्मानांच्या जागेवर काम करण्यांची संधी मिळाली. सन १९२८ मध्ये अमरावती जिल्हा कौन्सिलचे अध्यक्ष बनले. सन १९३० मध्ये प्रांतीय कायदेमंडळात सदस्य म्हणून त्यांची निवड झाली आणि त्याचवेळी त्यांनी शिक्षण, कृषी आणि सहकार खात्याचे मंत्री म्हणून कार्य केले. परंतु त्यांनी आपल्या मंत्रीपदाचा १९३३ मध्ये राजीनामा दिला. पंजाबरावांनी अमरावती मध्यवर्ती बॅकेचे अध्यक्ष म्हणून काम केले. काही काळ त्यांनी देवास संस्थानचे राजकिय मंत्री म्हणून काम केले.

सन १९४६ मध्ये भारतीय राज्यघटना समिती स्थापन करण्यात आली. घटना समितीचे सदस्य म्हणून पंजाबरावांनी काम पाहिले. ते लोकसभेवर १९५२, १९५७ आणि १९६२ अशा तीनवेळा निवडून गेले. सन १९५२ ते १९६२ पर्यंत केंद्रीय मंत्रीमंडळात ते कृषीमंत्री होते. त्यांच्या मंत्रीपदाच्या कारकिर्दीत त्यांनी विविध समित्यावर काम केले. त्यांनी अनेक देशाना भेटी दिल्या. त्यांनी आपल्या मंत्रीपदाचा वापर देश आणि भारतीय समाजाच्या सेवेसाठी केला. समाजाच्या आणि शेतकऱ्यांच्या विकासासाठी त्यांनी विविध योजना राबविल्या. त्यामुळेच समाजसुधारकांमध्ये पजांबराव देशमुखाना महत्त्वाचे स्थान दिले जाते. १० एप्रिल,१९६५ रोजी त्यांचे निधन झाले.

● **सामाजिक कार्य :**

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शैक्षणिक कार्या बरोबर सामाजिक कार्य महत्वाचे आहे. त्यांनी समाजातील अनिष्ठ रूढी आणि परंपरांच्या निर्मूलनासाठी कार्य केले.

हिंदू धर्मातील जातीभेदाला त्यांनी प्रखर विरोध केला. दि. १३ आणि १४ नोव्हेंबर, १९२७ मध्ये 'वर्धा अस्पृश परिषद' अमरावती येथील 'इंद्रभुवन थिएटर' मध्ये भरली होती. या परिषदेचे अध्यक्षस्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भूषविले होते. अस्पृश्यता निवारणासाठी अमरावती जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष असताना त्यांनी सार्वजनिक विहिरी अस्पृश्यांसाठी खुल्या केल्या. अमरावती येथील अंबादेवीचे मंदिर अस्पृश्यांसाठी खुले व्हावे म्हणून त्यांनी सत्याग्रह केला. त्यांनी स्थापन केलेल्या 'श्रद्धानंद छात्रालयात' सर्व जातिजमातींच्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात असून सामाजिक एकतेचे वातावरण निर्माण केले होते. मागासलेल्या जातींच्या उन्नतीसाठी त्यांनी अखिल भारतीय मागास जाती संघाची स्थापना केली. यावरून अस्पृश्यता निवारण्याविषयी व समाजातील सर्व घटकांना समान हक्क मिळावेत याविषयी त्यांना तळमळ होती हे स्पष्ट होते. स्वत: आंतरजातीय विवाह करून जातीसंस्थेची बंधने तर त्यांनी झुगारून दिलीच पण तरूण पिढीसमोर एक आदर्श घालून दिला.

● **शैक्षणिक क्षेत्रातील कार्य :**

बहुजन समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शिक्षणाचा प्रसार होणे डॉ. पंजाबरावांना आवश्यक वाटत होते. सुशिक्षित झालेला समाज आपला विकास करू शकेल असा त्यांना विश्वास वाटत होता, म्हणूनच प्रारंभीपासून त्यांनी शिक्षणविषयक कार्याला गती दिली. त्यासाठी त्यांनी १९२६ मध्ये अमरावती येथे 'श्रद्धानंद छात्रालय' सुरू केले आणि विद्यार्थांना वसतिगृहाची सुविधा उपलब्ध करून देऊन सर्व जातीसमूहातील धर्मातील विद्यार्थांना प्रवेश दिला.

अमरावती जिल्हा कॉन्सिलचे अध्यक्ष म्हणून काम करताना प्राथमिक शिक्षण सर्वांसाठी पंजाबरावानी सक्तीचे केले. याच सुमारास त्यांनी जादा कर बसवून जमा होणारा पैसा शिणासाठी खर्च करण्याची योजना आखली. प्रांतीय मंत्रीमंडळात शिक्षणमंत्री म्हणून कार्य करताना गरीब आणि ग्रामीण भागातील विद्यार्थांना शिक्षण घेता यावे म्हणून विविध सोयी-सवलती उपलब्ध करून दिल्या.

सन १९३२ मध्ये डॉ. देशमुखानी अमरावती येथे 'श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटी' या शिक्षणसंस्थेची स्थापना करून ग्रामीण आणि शहरी भागात मोठया प्रमाणात प्राथमिक शाळा, विद्यालये व महाविद्यालये आणि

वसतिगृहे सुरू केली. या कार्यांबरोबरच प्राथमिक शिक्षकांच्या विविध समस्यांची उकल करण्यासाठी त्यांनी 'प्राथमिक शिक्षण संघ' स्थापन करून शिक्षकांचे प्रश्न आणि अडचणी सोडविण्यांचा प्रयत्न केला.

**● शेतकऱ्यांच्या सुधारणेचे प्रयत्न :**

डॉ. पंजाबराव देशमुख हे शेतकरी कुटुंबापैकी होते. त्यांनी शेतकऱ्यांची दैनावस्था, त्यांचे मागासलेपण, त्यांची होणारी पिळवणूक व विविध अडचणींचे जवळून निरीक्षण केले होते. त्यामुळे त्यांनी शेतकऱ्यांची या अवस्थेतून सुटका करण्यासाठी व या वर्गाची प्रगती घडवून आणण्यासाठी निरनिराळया उपाययोजना केल्या. शासनाच्या विविध योजना यशस्वीपणे राबवून शेतकऱ्यांच्या विकासाचे कार्य केले. १९२७ मध्ये त्यांनी 'शेतकरी संघ' स्थापन केला. शेतकरी संघाच्या प्रचार व प्रसारासाठी 'महाराष्ट्र केसरी' हे वृत्तपत्र सुरू केले. या वृत्तपत्रावरील विचारांमधून शेतकऱ्यांविषयी त्यांची तळमळ जाणवते.

शेतकऱ्यातील अज्ञान, दारिद्र आणि मागासलेपणा दूर करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्याच बरोबर व्यापारी, सावकार इ. कडून होणारी शेतकऱ्यांची पिळपणूक थांबावी म्हणून त्यांनी प्रयत्न केले शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य आणि चांगली किंमत मिळवून देण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

**● केंद्रीय मंत्रीमंडळात कृषी मंत्री म्हणून कार्य :**

स्वातंत्र्यानंतर १९५२ मध्ये पंजाबरावांच्यावर केंद्रीय मंत्रीमंडळात कृषीमंत्री म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली. त्यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी विविध योजनांची आखणी करून त्या योजना यशस्वीपणे राबविल्या. आपल्या देशातील शेतकऱ्यांनी प्रगत अशा तत्रज्ञानांचा शेतीत अवलंब करावा. विविध योजना आणि प्रकल्प त्यांनी राबविले. आपल्या देशातील शेतकऱ्यांनी मोठया प्रमाणात उत्पादन घेण्यासाठी पारंपारिक पध्दतीने शेती व्यवसाय न करता आधुनिक तंत्रज्ञानाचा, शास्त्रीय पध्दतीचा अवलंब करावा म्हणून त्यांनी चालना दिली. परदेशातील प्रगत शेतीपध्दतीचा आणि तांत्रीक बाबीचा वापर शेतकऱ्यांनी करावा असे त्यांना वाटे. जपानी भातशेतीचा देशभरातील शेतकऱ्यांनी अवलंब करावा म्हणून संपूर्ण देशात या पध्दतीच्या शेतीचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी पजांबराव देशमुख यांनी मोहिम राबविली. त्याचा परिणाम भाताच्या वाढत्या उत्पादनात झाला. यापाठीमागे त्यांची अशी इच्छा होती की, प्रगत शेतीपध्दतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांची आर्थिक प्रगती व्हावी.

**● भारत कृषक समाज स्थापना :**

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी सन १९५५ मध्ये 'भारत कृषक समाज' स्थापन केला. या भारत कृषक समाजाचा हेतू असा होता की, भारतीय शेतकऱ्यांच्या समस्यांचा विचार करून त्यावर योग्य तो सल्ला व मार्गदर्शन करून शेती व्यवसायाला चालना देण्याचा होता. या समाजाच्यावतीने 'राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी-विक्री संघ' स्थापन केला. अशा प्रकारच्या विविध संघटनाच्या मदतीने भारतीय शेतकऱ्यांना आधुनिक शेतीतंत्राचे ज्ञान देऊन त्यांच्या समस्या सोडविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. कृषीक्षेत्रात आपल्या शेतकऱ्यांनी केलेल्या प्रगतीचे ज्ञान जगाला व्हावे या उद्देशाने त्यांनी १९६० मध्ये दिल्ली येथे 'जागतिक कृषी प्रदर्शन' भरविले. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शेतकऱ्यांच्यासाठी केलेल्या कार्याचे स्मरण म्हणून अकोला येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची स्थापना करण्यांत आली.

● **पंजाबराव देशमुख यांच्या कार्याचे मूल्यमापन :**

महाराष्ट्रातील बहूजन समाजाच्या विशषत: अस्पृशांच्या, बहूजनांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थीक कार्य करणाऱ्या महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासारखेच कार्य करणारा सुधारक म्हणून पंजाबराव देशमुखाचा उल्लेख करावा लागतो. विदर्भात शिक्षणसंस्था स्थापन करून त्यांनी शिक्षणाचा प्रसार केला. त्यांना मिळालेल्या पदाचा, सत्तेचा वापर त्यांनी लोकहितासाठी केला. बहुजन समाज्याच्या प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी त्यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांचे कार्य समाजाच्या दृष्टीने असामान्य मानता येते.

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :**

**अ) खालील उपप्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा :**

१) डॉ. पंजाबराव देशमुखांनी केव्हा व कोणाबरोबर विवाह केला?

२) डॉ. पंजाबराव देशमुखांनी १९२७ मध्ये बोलविलेल्या 'वर्धा अस्पृश्य परिषदेचे' अध्यक्षस्थान कोणी भूषविले?

३) पंजाबराव देशमुखांनी अमरावती येथे कोणती शिक्षणसंस्था स्थापन केली?

४) शेतकऱ्यांना जागृत करण्यासाठी पंजाबराव देशमुख यांनी कोणते वृत्तपत्र सुरू केले?

५) 'भारत कृषक समाज' कोणी व केव्हा स्थापन केला?

## ४.५ सारांश :

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजक्रांतीचे, समाजउत्थानाचे व समाजगृतीचे केलेले कार्य बहुमोलाचे आहे. त्यांनी श्रमशिक्षणातून स्वालंबन, स्वाभिमान, स्वाध्याय व स्वातंत्र्य या चतु:सूत्रीवर शैक्षणिक तत्त्वज्ञानाची उभारणी केली. त्यांनी रयत शिक्षणसंस्थेची स्थापना करून 'कमवा व शिका' असा मूलमंत्र देवून, वसतिगृहाची सोय उपलब्ध करून देवून गरीबांच्या शिक्षणाची सोय केली. त्यानी सत्यशोधक चळवळीतून समाजजागृती केली. चळवळीचे कार्य भाऊरावांनी सामान्य माणसापर्यंत पोहचवले. त्यांनी शिक्षणप्रसाराच्या कार्याला अखेरच्या श्वासापर्यंत वाहून घेतले. ज्ञानी, गुणवान, कर्तव्यतत्पर व सामार्थ्यवान पिढ्याा निर्माण करण्याचे महान कार्य कर्मवीर भाऊराव पाटलांनी केले.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात शिक्षणाची गंगा पोहचवण्यासाठी भगिरथ प्रयत्न केले. विद्यार्थीदशेतच इस्लामपूर येथे श्रीराम समाजसेवा मंडळाची स्थापना केली. सोंडूरच्या घोरपडे घराण्याच्या सर्वकष संशोधनाचे कार्य पूर्ण केले. स्वातंत्र्य लढ्यात चांगले कार्य केले. रयत शिक्षणसंस्थेत कार्य केले. स्वत: श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्था स्थापन करून बहुजनांच्या शिक्षणाची मोठी सोय उपलब्ध करून दिली. बहुजन समाजाच्या कल्याणासाठी त्यांनी केलेले कार्य ऐतिहासिक आहे.

डॉ. पंजाबराव देशमुखांनी अंतरजातीय विवाह करून समाजाला आदर्श घालून दिला. विदर्भात शिवाजी एज्युकेशन सोसायटी स्थापन करून शिक्षणप्रसाराचे मोठे कार्य केले. त्यांनी अस्पृशता नाहीसी करण्यासाठी विहिरी, मंदिरे खुली करून महान कार्य केले. शेतकऱ्यांना अज्ञानातून, सावकारी कर्जाच्या पाशातून मुक्त करण्यासाठी विविध संस्था स्थापन केल्या. शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून शेतीतून अधिक उत्पादन घेता यावे म्हणून जागृती केली. त्यांचे कार्य महनीय आहे.

- **विद्यापीठीय स्वरूपाचे प्रश्न**

**वस्तुनिष्ठ प्रश्न :**

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

१. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केलेल्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचा आढावा घ्या.

२. बापूजी साळुंखे यांची शिक्षणक्षेत्रातील कामगिरी सांगा.

३. डॉ. पंजाबराव देशमुखानी केलेल्या कार्याचा आढावा घ्या.

**ब) टिपा लिहा :**

१. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक तत्वज्ञान

२. कर्मवीर आण्णा व सत्यशोधक चळवळ

३. मुष्टीफंड योजना

४. डॉ. बापूजी साळुंखे यांचे स्वातंत्र्यलढ्यातील कार्य

५. शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे श्री. स्वामी विवेकानंद संस्थेतील कार्य

६. डॉ. पंजाबराव देशमुखांचे सामाजिक कार्य.

७. भारत कृषक समाज

८. डॉ. पंजाबराव देशमुख

## ४.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ :

- निराधार : आश्रय नसलेला
- अनाथ : पोरका, निराश्रीत
- अव्यभिचारी : व्यभिचार न करणरा
- पूंजी : संपत्ती
- विजयादशमी : दसऱ्याचा सण

- वटवृक्ष : वडाचे झाड
- कसब : कौशल्य, कामगिरी
- प्रतीसरकार : समात्तर शासन किंवा सरकार
- छात्रालय : विद्यालय
- कृषक : शेती
- सगेसोयरे : आप्त, नातेवाईक
- भगत : जादूटोणा करणारे
- उपेक्षित : दुर्लक्षिलेले
- छळणूक : हालअपेष्ट

## ४.७ संदर्भ ग्रंथ सूची :


१. जोशी ग. ना. : भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद इतिहास, खंड नं. १०, महाराष्ट्रातील प्रबोधनकार, प्रकाशन, पुणे, १९९४

२. व्ही. एन. स्वामी : महाराष्ट्रातील समाजसुधारक, संत, साहित्यिक व थोर भारतीय विचारवंत, विद्याभारती प्रकाशन

३. भिडे, पाटील, थोरात : महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर

४. बा. ग. पवार : ग्रामीण शिक्षण चळवळीचे जनक कर्मवीर भाऊराव पाटील, मातृभूमी प्रकाशन, पुणे.

५. कडिआळ रा. अ. : कर्मवीर भाऊराव पाटील ( काळ आणि कर्तव्य ) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

६. डॉ. गजानन सुर्वे : शिक्षणमहर्षी परमपूज्य डॉ. बापूजी साळुंखे, व्यक्ती आणि कार्य

७. सदाशिव ज. कोडोलीकर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे, जीवन व कार्य

८. मोहिते कल्पना, डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जीवन व कार्य, मुक्ता पब्लिशिंग हाऊस कोल्हापूर, २०१२

९. Mathew Anjievel : Karmveer Bhaurao Patil, Rayat Shikshan Sanstha, Satara, 1979

१०. K. Sagar : Social Reformers in Maharashtra, K. Sagar Publications, 2006.


❖❖❖